# प्रजासत्ताक भारत
## आणि
# मानवी हक्क




▪ संदीप तुंडूरवार
▪ डॉ. शरद सांबारे
▪ डॉ. रीता धांडेकर
▪ डॉ. संघमित्रा कोलारकर
▪ प्रा. राजेश कनिरे
▪ प्रा. विजयकुमार पंधरे

# प्रजासत्ताक भारत आणि मानवी हक्क


**मुख्य संपादक**

- **संदीप तुंडूरवार**
  प्रोफेसर आणि राज्यशास्त्र विभाग प्रमुख
  एस.बी. सिटी कॉलेज (स्वायत्त), नागपूर
- **डॉ. शरद सांबारे**
  सहयोगी प्राध्यापक आणि राज्यशास्त्र विभाग प्रमुख
  यशोदा गर्ल्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर
- **डॉ. रीता धांडेकर**
  प्रोफेसर आणि राज्यशास्त्र विभाग प्रमुख
  सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर
- **डॉ. संघमित्रा कोलारकर**
  प्रोफेसर आणि गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
  सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर
- **डॉ. राजेश कनिरे**
  सहाय्यक प्राध्यापक आणि राज्यशास्त्र विभाग प्रमुख
  श्री निकेतन कला-वाणिज्य महाविद्यालय, नागपूर
- **प्रा. विजयकुमार पंधरे**
  राज्यशास्त्र विभाग
  डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, नागपूर

**सह संपादक**

- **डॉ. नितीन कायरकर**
  पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग
  राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
- **डॉ. प्रभा चिंचखेडे**
  सहयोगी प्राध्यापक, गृहअर्थशास्त्र विभाग
  सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर
- **डॉ. रायन महाजन**
  महिला विकास आणि विकास केंद्र
  राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**प्रजासत्ताक भारत आणि मानवी हक्क**

मुख्य संपादक

**संदीप तुंडूरवार**

**डॉ. शरद सांबारे**

**डॉ. रीता धांडेकर**

**डॉ. संघमित्रा कोलारकर**

**डॉ. राजेश कनिरे**

**प्रा. विजयकुमार पंधरे**

सह संपादक

**डॉ. नितीन कायरकर**

**डॉ. प्रभा चिंचखेडे**

**डॉ. रायन महाजन**

..............................................

प्रकाशक

**"अविशा प्रकाशन"**

८४, खामला, नागपुर - २५

..............................................

मुखपृष्ठ

**सी.डी. शिवणकर**

स्कॅन डॉट कॉम्प्युटर, महाल, नागपूर

..............................................

**अक्षर जुळवणी**

स्कॅन डॉट कॉम्प्युटर, महाल, नागपूर

मोबा. ९८२२५६५७८२

..............................................

**किंमत :** २०० रु.

..............................................

**दिनांक : २० डिसेंबर २०२५**

..............................................

**ISBN** : **978-93-49360-05-1**

**परिक्षण समिती**

डॉ. राहुल बावगे, नागपूर

डॉ. संजय गोरे, गडचांदूर

डॉ. राजेंद्र मुद्दमवार, राजुरा

डॉ. राम बुटले, पुणे

डॉ. श्रीकांत शेंडे, नागपूर

डॉ. भुपेंद्र घरत, नागपूर

डॉ. अमर बोंदरे, नागपूर

प्रा. किशोर नैताम, नागपूर

डॉ. वकिल शेख, कोराडी (नागपूर)

डॉ. संदीप काळे, सेलू

डॉ. नागेश्वर कन्नाके, वाशीम

प्रा. धनंजय पोशट्टीवार, नागपूर

डॉ. दिनकर चौधरी, भिसी

डॉ. संतोष डाखरे, भामरागड

प्राचार्य डॉ. नंदाजी सातपुते, गडचिरोली

डॉ. कविता मते, नागपूर

डॉ. उज्वला मोकदम, नागपूर

# संपादकीय

डॉ. व्ही.एम. पेशवे समाजिक संशोधन संस्था, यवतमाळ यांच्याद्वारा एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्याचे हे तेरावे वर्ष होय. संस्थेने दशकपूर्तीच कात टाकत नव्या दशकाकडे सुरू केलेला प्रवास संस्थेने प्राप्त केलेल्या विश्वासात जसा आहे तसा तो ऊर्जा देणारा उर्मी जागविणारा ठरला आहे. कोविडच्या काळवंडलेल्या चक्रव्यूहायतून बाहेर पडत जग पूर्वस्थितीवर येऊ पाहत आहे ज्याला नवसामान्यीकरण म्हटल्या जातं. मात्र नवसामान्यीकरणाच्या जगातील प्रश्न अधिक भेदक, टोचणी देणारे आणि व्यवस्थेची विण उसवणारे दिसत आहेत. एका बाजूला जगभरातील समर्थ्यशाली नेतृत्वाने उभा केलेला चमचमाट, डोळे टिपून टाकणारी आकर्षकता, हवाहवासा वाटणारा चंगळवाद, भौतिकवादी वस्तूंच्या प्राप्तीची झपाटलेली नशा यामुळे आपल्या आजूबाजूच्या दखलप्राप्त व विचारस्वमुख ठरणाऱ्या प्रश्नांकडे समाजमन संवेदनशील, सहिष्णूतेने पाहतो आहे काय? असा प्रश्न पडावा असे विदारक चित्र अनुभवाच्या व जाणिवेच्या पातळीवर असतानाही दुर्लक्ष होणे हे समाजाच्या स्वस्थ आरोग्याच्या दृष्टिने खचितच आशावादाला टाचणी लावणारे आहे. अशा वाताहात होऊ पाहणाऱ्या कार्यकाळात संवेदनशील मनाला जागृत करणाऱ्या प्रश्नांची चर्चा  घडवून आणत त्यावर अल्पकालीन व दीर्घकालीन उत्तरे शोधता येईल या दृष्टीने यावर्षी परिषदेच्या आयोजनाचा विषय 'प्रजासत्ताक भारत आणि मानवी हक्क' या विषयावर आधारित आहे.

भारताचा स्वातंत्र्यलढा आणि संविधान निर्मिती या दोन घटना भारताच्या कालपटावर कोरले गेलेले सुवर्णपान होय. साम्राज्यवादाचे जोखड दुर सारून सार्वभौमत्वाची केलेली पेरणी अनेकानेक अर्थाने करताना मागास व अविकसित देशांकरीता प्रेरणा होती. भारताच्या संविधान निर्मितीचे मानदंड प्रजासत्ताक भारताचा पाया रचणारे जसे होते तद्वतच जागतिक व्यवस्थेतील अनेक देशांकरिता ते उदाहरण ठरणार होते. भारतीय संविधानाची निर्मिती मुळातूनच एक अनोखी घटना होती. राजेशाही, साम्राज्यवाद, वांशिकता यांचा विलय होऊन लोकशाही स्थापित करणे हीच अचंबित करणारी घटना होती. महत्त्वाचे म्हणजे व्यक्तीत्वाची प्रतिष्ठा भारतीय संविधानातून आविष्कृत करण्यात

आली. व्यक्तीला प्राप्त असणारे अधिकार, राज्याने नागरिक विकासाच्या दृष्टीने धोरण आखावे याबाबतची तरतूद, प्रौढ मताधिकार, सर्वांना समान न्याय मिळावा याकरिता न्यायपालिकेची सत्ताकेंद्रापासून ठेवलेली स्वायत्तता, राज्यकारभारातील सहभागाची समान संधी, विकासाच्या समपातळीवर आणण्याकरिता दुर्लक्षित, उपेक्षित गटाला दिलेले आरक्षण, अनुसूचित जाती जमाती विषयक तरतुदी यासह अनेक तरतुदींनी भारतीयांच्या भाविश्वाला अधिक समृद्ध करण्याचा मानवतावादी दृष्टीकोन विकसित केला. प्रजासत्ताक भारताच्या वाटचालीत संविधानिक मूल्यांना बळकटी देणारे प्रसंग जसे आलेत तसे अनेक प्रसंगी मूलभूत संरचनावर आघात करण्याचा प्रयत्न झाला. तो संपलाय असे नव्हे? तर अधिक जोमदारपणे त्यावर वेगवेगळ्या मार्गाने आक्रमण चढविले जात आहे. वस्तुतः भारतीय संविधान जगातील इतर संविधानांपेक्षा व्यापक व मानवी हक्कांना बळकटी देणारे मानले जाते. अमेरिकेत समतेचे प्रावधान समाविष्ट करण्याकरीता तेराव्या घटनादुरुस्ती पर्यंत वाट बघावी लागली. भारतीय संविधानात समतेचे तत्व तर प्रारंभीच संमत करण्यात आले होते. भारतीय संविधानाची परिपक्वता दर्शवणारी ही बाब आहे; मात्र परिपक्वता ही राज्यकर्त्यांवर अधिक विसंबून असते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत २५ नोव्हेंबर १९४९ ला आपल्या भाषणात म्हणालेत संविधान मोठे आहे की लहान यावर तिची यशस्वीता अवलंबून नाही तर, राज्यकर्ते कसे आहेत यावर ते विसंबून असेल भारताची राज्यघटना जबाबदेही आणि नागरिकांच्या मानवी हक्कांना संरक्षित करणारी आहे. परंतु, ज्यांच्यावर हे उत्तरदायित्व आहे त्यांचे वर्तन कसे आहे यावर ते अधिक अवलंबून आहे. भारताच्या प्रजासत्ताक वाटचालीतील म्हणून दोन महत्त्वपूर्ण निरीक्षणे आपण समजून घेतली पाहिजे. १९७५ मध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणी लागू केली व १९७७ मध्ये ती उठवली. त्यानंतर घेण्यात आलेल्या निवडणुकीत उत्तर भारतातील जनतेने आपल्या मतदानातून अभूतपूर्वक परिवर्तन घडवून आणले व सत्तेचा कौल बदलविला. जनता राजवट स्थापित झाली. १९७९ मध्ये सत्तेवर आलेल्या जनता राजवटीच्या खेळखंडोबाला कंटाळून संपूर्ण भारतातील मतदारांनी पुन्हा एकदा इंदिरा गांधींनी लादलेल्या आणीबाणीला विस्मरणात ढकलून १९८० मध्ये सत्तासोपान पदावर चढविले. याचा अर्थ राज्यकर्ते व जनता आपले वर्तन कसे ठेवते यावर संविधानिक

व्यवस्थेचे अस्तित्व ठरत असते.

वर्तमान काळात नागरिक ज्या तऱ्हेने राज्यकर्त्यांनी उभ्या केलेल्या विविध प्रश्नांना, धोरणांना, योजनांना, घोषणांना, ध्रुवीकरणाला जो राजकीय प्रतिसाद देत आहेत व मूल्यात्मक संरचनांकडे डोळेझाक करीत आहे ती बाब संविधानाच्या अविचलपणाच्या दृष्टीने अधिक विचारार्थ म्हणून प्रकर्षाने पुढे येते. महत्वाची बाब म्हणजे प्रजासत्ताकाचे भवितव्य जेवढे राज्यकर्त्यांवर अवलंबून नाही तेवढे मात्र जनतेवर आहे. भारतीय जनता वस्तुतः कसा विचार करीत राहिला आहे याचा मागोवा या परिषदेच्या निमित्ताने घेतला जातो आहे. भारतीय संविधानाची उद्देशिका म्हणतांना दर पिढी भारतीय संविधानाशी बांधिल आहो अशी प्रतिज्ञा घेतो व आपले उत्तरदायित्व सांगत असतो. मात्र आजच्या हितसंबंधी भांडवलवाद (ज्यात एककारलेपणा) व्यवस्थेत नागरिक आमिषांना प्रचार-तंत्राना प्रभावित होऊन ते वर्तन करीत आहे त्याची चाचणी व समीक्षा होण्याची नितांत गरज आहे. एखाद्या देशाचे संविधान ७५ वर्षांची वहिवाट करते ही बाब अभिमान मिरवावी इतकी मोठी मानली जात नाही. परंतु भारतासारख्या विविधतेत ती अडखळत का होईना बऱ्यापैकी तग धरून आहे. ही मात्र समाधानाची बाब आणि म्हणूनच ती समजून घ्यावी लागेल. सद्यस्थितीत मतदार मूल्य मात्र प्रभावीत झाले आहे. तिचा प्रवास सत्तासंबंधी भांडवलांकडे वळतोय याची जेवढ्या तीव्रतेने नवा पिढीला जाणीव होईल तितक्या त्वरेने संविधान मूल्याविषयीची दृढता आकार घेईल. वस्तुतः मूलभूत कर्तव्य, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, राष्ट्रीय एकता ही मागाहून आलेली मूल्य आपल्यातील संविधान मूल्याप्रतीच्या कटिबद्धतेत असलेल्या कमतरतेतून आलेली आहेत. आपल्याला कर्तव्य भावना लिखित रूपातून जाणवून द्यावी लागली हे खरंतर आपल्या वर्तनात आलेली उणीव होय. बाधीत उणीवांना दूर सारण्याच्या दृष्टीने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या मनोभावातून डॉ. व्ही.एम. पेशवे संस्थेने 'प्रजासत्ताक भारत मानवी हक्क' या विषयावर संशोधक, लेखक, बुद्धीवादी वर्ग यांना लिहिते करण्याचा प्रयत्न केला आहे. संस्थेचा अल्पसा वाटा यामध्ये असावा यातून हे प्रयोजन घडते आहे.

डॉ. व्ही.एम. पेशवे सामाजिक संशोधन संस्थेची उभारणी डॉ. राम जाधव आणि डॉ. राम बुटले यांच्या समर्थ नेतृत्वात झाली, तो प्रवास आज दशकपूर्ती

ओलांडत नव्या दशकाच्या प्रवासाकडे चाललेला आहे हे विशेष होय. दशकपूर्तीची वाटचाल एका संस्थेच्या दृष्टीने खूप लांब पल्याचे उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने कळसाध्याय नाही याची जाणीव संस्था उभारणीतील आयोजकांना आणि सर्वांनाच आहे. आपली वाठचाल सातत्यपूर्ण ठेवून पुढे जाणे असा मानस परिषदांच्या आयोजनाबाबत राहिला आहे. यावेळची परिषद 'प्रजासत्ताक व मानवी हक्क' या विषयाला समर्पित आहे. विषयाची यथार्थता, औचित्य पाहता आयोजनाचे महत्त्व निश्चितच पटण्याजोगे आहे. परिषदेचे आयोजन डॉ. व्ही.एम. पेशवे समाजिक संशोधन संस्था, यवतमाळ आणि राज्यशास्त्र विभाग, सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर, श्री निकेतन कला-वाणिज्य महाविद्यालय, नागपूर, एस.बी. सिटी कॉलेज (स्वायत्त), नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने होत आहे. परिषदेचे वैशिष्ट्ये म्हणजे निःशुल्क आयोजनासोबतच मानवी हक्कांच्या क्षेत्रात निरलसपणे कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा उचित गौरव करण्याची एक परंपरा आहे. तत्वतः विषयानुरूप मांडणी असलेले लेख संदर्भ ग्रंथांच्या प्रकाशित केले जातात. मान्यवरांच्या यथोचित सन्मान करण्याचे हे दहावे वर्ष तर तज्ञ लेखांचे पुस्तक प्रसिद्ध करण्याचे सातत्य अकराव्या वर्षीही कायम राखले आहे. मान्यवरांच्या गौरव राशीचे मूल्य आजच्या संदर्भात फार मोठे नसले तरी मूल्यात्मक दृष्टीने मात्र अधिक आहे. संस्थेचा प्रथम पुरस्कार सुप्रसिद्ध विधीज्ञ आणि मानवी हक्काच्या कार्यात अग्रता घेऊन वंचित-गरजूंना विधीज्ञाचा लाभ देणाऱ्या ॲड. असीम सरोदे यांना देऊन सन्मानित करण्यात आले. द्वितीय वर्षातील पुरस्कार लोकविद्यापीठाचे कुलपती अशी ख्याती असणारे व शेतीतील धान लागवटीच्या क्षेत्रात अभिनव संशोधन करून सक्षमता निर्माण करण्याचा पाया रचणारे संशोधक दादाजी खोब्रागडे यांना प्रदान करून सन्मानित केले. पुरस्कारांच्या तिसऱ्या वर्षात दिल्ली-मुंबईत आमचे सरकार 'आमच्या गावात आमचे सरकार' या प्रारूपाचे बीज रोवणारे त्याला अंमलात आणून आदिमांच्या जीवनात नवा सूर्य घेऊन येणाऱ्या देवाजी तोफा यांना देऊन सन्मानित केले. चौथ्या वर्षातील पुरस्कार श्रमिक एल्गार संस्थेच्या माध्यमातून श्रमिकांसोबत वंचित पीडित शोषित वर्गात नवीन पहाट उजाडणाऱ्या ॲड. पारोमिता गोस्वामींना देऊन सन्मान करण्यात आला. पाचवा पुरस्कार मानवी शाश्वततेला अबाधित राखणाऱ्या पर्यावरणाच्या हितसंबंधात गेली ३० वर्षे अव्याहतपणे अभिनव कार्य करीत

असलेल्या सातपुडा फाउंडेशनचे संस्थापक माननीय श्री. किशोर रिठे यांना प्रदान करून गौरविण्यात आले. सहावा पुरस्कार पारधी समुदायांच्या मुलांकरिता आपले संपूर्णआयुष्य चौकटपूर्ण जीवनात व्यतीत करण्याऐवजी समुदायाच्या उत्थानाकरिता झोकून देऊन मानवी हक्काची वहिवाट प्रभावीपणे रुजविणाऱ्या प्रश्नचिन्ह(?) आदिवासी आश्रमशाळेचे संस्थापक श्री. मतीन भोसले यांना देऊन गौरविले. सातवा पुरस्कार कश्मीर प्रश्नावर गेली तीन दशके समर्पितपणे कार्य करणारे संस्थेचे संस्थापक श्री. संजय नहार यांना श्री बिंझाणी नगर महाविद्यालयात संपन्न झालेल्या 'गांधी आणि मानवी हक्क' या परिषदेत प्रदान करण्यात आला. आठवा पुरस्कार गेली चार दशके दुर्गम आणि निबीड अरण्याच्या क्षेत्रात जाऊन समाज जीवनाशी समरस होत कुरखेडा-कोरची भागातील आरोग्य प्रश्न हाताळत महिला व नवजात अर्भकाकरिता जीवनदान ठरलेले डॉ. सतीश गोगुलवार यांना देऊन सन्मानीत करण्यात आलेत. तीन तलाक प्रश्नाची चर्चा शाहबानोपासून सुरू होत पाच महिलांपर्यंत आला. सर्वांनी चिवट पद्धतीने लढा उभारून देशाच्या सर्वोच्च न्यायालयात या प्रश्नावर निर्णय घेण्यास बाध्य केलेत. न्यायालयीन लढा किती अशक्यप्राय होता याची जाणिव याबाबत लढा देणाऱ्यांना होती. या लढ्यात महत्वपूर्ण योगदान असणाऱ्या शायराबानो यांना भारतीय महाविद्यालय, अमरावती येथे आमंत्रित करून संस्थेचा नववा पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. दहावा पुरस्कार तृतीयपंथीयांकरिता कार्य करणाऱ्या दिशा पिंकी शेख अहिल्यानगर यांना यशवंत महाविद्यालय, वर्धा येथील 'तृतीयपंथी आणि मानवी हक्क' या विषयावर संपन्न झालेल्या परिषदेत पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेत. खर तर या सर्वांना आम्ही सन्मानीत केलेत या ऐवजी आमची संस्थाच कृतार्थ पावली आहे. सन्मानप्राप्त व्यक्तीचे कार्यक्षेत्र भिन्न असले तरी त्यांच्या कार्यातून निघणाऱ्या प्रेरणा गांधी सूत्रांकडे घेऊन जाणाऱ्या आहेत मानवी प्रतिष्ठेचा, सभ्यतेचा ज्या ज्या महनीय व्यक्तिमत्त्वाची विचार करीत प्रत्यक्षात उतरवण्याकरिता प्रसंगी आपले बलिदान दिलेत त्यांचा वारसा घप्प करणारे गौरव धनी आहे. या वर्षीचा पुरस्कारआंतरभारती संस्था, पुणे यांना प्रदान करण्यात येत आहे. भारतीय संविधान निर्मितीचा प्रवास टप्प्यात आलेला नसताना देशभरात ज्या विविध संस्थांनी देशाला एकात्मतेत बांधण्याचा प्रयत्न केला त्यात अग्रता असणारी संस्था आंतरभारती होती. १९३० मध्ये

त्रिचनापल्लीच्या तुरुंगात साने गुरुजी होते. त्यांचा संबंध तेव्हा अन्य भाषिक सत्याग्रहीशी आला व त्यांना जाणवले की भविष्यात भाषेच्या आधारावर प्रांतवाद आकार घेऊ लागला तर स्वातंत्र्य आंदोलनातून निर्माण झालेली एकात्मता खंडित झाल्याशिवाय राहणार नाही. हे घडू नये याकरीता भाषा एकसंघतेचा प्रयोग करण्यात आला. भाषा भगिनींमधील संवाद वाढावा, प्रत्येक भाषांना आपली भाषा जपली जाते याचा विश्वास निर्माण व्हावा. भाषेतील आत्मीयता जोपासणे, तिचे माधुर्य जपणे त्या दृष्टीने साने गुरूजींनी आंतरभारतीची स्थापना केली. प्रत्येक नागरिकांनी आपल्या मातृभाषे व्यतिरिक्त अन्य भाषा शिकावी व भाषिक प्रांत वादातून बाहेर पडावे. हा मानस या मागे होता. त्यांनी आखून दिलेल्या सूत्र रूपावर आंतरभारती संस्था आजही कार्यरत आहे. भारताच्या एकात्मतेला बांधून ठेवण्याचा प्रयत्न भारतीय संविधानानी केलेला आहे. या प्रयत्नाचे वाटेकरी असणारी संस्था आंतरभारती होय. या संस्थेचे भाषा बंधूत्वाचे कार्य राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रवासातील लक्षणीय पाऊल होय; त्याचा गौरव व्हावा याकरिता आंतरभारती संस्थेला पुरस्काराच्या रूपाने गौरविण्यात येत आहे.

संपादक मंडळ

**संदीप तुंडूरवार**

**डॉ. शरद सांबारे**

**डॉ. रीता धांडेकर**

**डॉ. संघमित्रा कोलारकर**

**डॉ. राजेश कनिरे**

**प्रा. विजयकुमार पंधरे**

# अनुक्रम


- संविधानाच्या परिप्रेक्षात भारतीय प्रजासत्ताकाची पाऊण शतकी वाटचाल **डॉ. लक्ष्मीकांत देशमुख** ...... १३
- भारतीय प्रजासत्ताकापुढील आव्हाने आणि स्वयंसेवी संस्थाचे कार्य **डॉ. डी. एस. कोरे** .......... ३५
- प्रजासत्ताक भारत **डॉ. विवेक कोरडे** ............ ४५
- लोकशाहीचा राजपथ **रोहन चौधरी** ................. ५५
- बसवेश्वरांचा प्रजासत्ताक : वचनसाहित्य, मानवाधिकार आणि भारतीय संविधानाचे तुलनात्मक अनुशीलन **डॉ. राहुल बावगे** ............ ५९
- जनहित याचिका : लोकशाही आणि मानवी हक्क **डॉ. संदीप बी. काळे** ........ ७२
- भारतीय न्यायपालिकेच्या निर्णयांची मिमांसा **डॉ. संतोष संभाजी डाखरे** ... ८३
- गांधीवादी मूल्यांच्या पार्श्वभूमीवर भारतीय गणराज्यातील मानवी हक्क व संविधानिक संरक्षण : एक अध्ययन **प्रमोद वाटकर** ................ ९४
- भारतीय संघराज्यातील मूलगामी परिवर्तन **प्रा.डॉ. प्रशांत विघे** ........ १०७
- भारतीय लोकशाही : प्रजासत्ताक मूल्ये आणि मूलभूत अधिकार **डॉ. अमर कृ. बोंदरे** ....... ११६
- शेती, भारतीय संविधान आणि जागतिकीकरणाचा परिणाम **डॉ. राजू पा. लिपटे** ....... १२२
- लोकशाहीचा अमृत महोत्सव आणि निवडणूक आयोग **डॉ. विनोद को. गायकवाड** १२९
- प्रजासत्ताक भारतीय समाजातील असमानता आणि मानवी हक्क **डॉ. नितीन सु. कायरकर** . १३६

☛ इतर मागास प्रवर्गाचे हक्क आणि आरक्षणाची तरतूद **डॉ. भास्कर सुभाष वघाळे** १४८

☛ भारतीय संघराज्याचे बदलते स्वरूप : आकलन आणि समीक्षा **डॉ. राहुल प्रकाश चुटे** ..... १५८

☛ पर्यावरणीय मानवी हक्क आणि भारतीय संविधान : अनुच्छेद २१ चे पर्यावरणीय न्यायाकडे रूपांतर **प्रा. किशोर एन. नैताम** .. १७०

☛ प्रजासत्ताक भारतातील मानवी हक्कांची संकल्पना आणि त्याचा विकासात्मक प्रवास : एक चिकित्सक अध्ययन **डॉ. भूपेंद्र ईश्वर घरत** ..... १८३

☛ भारतीय संविधान आणि मुस्लिम महिलांचे प्रतिनिधित्व **शबिना अंजुम शेख, डॉ. वकील शेख** .......... १९०

☛ संविधान कलम ३७१ आणि विदर्भ विकास मंडळ **डॉ. रायन त्र्यं. महाजन** ... १९६

☛ अल्गोरिदमिक प्रशासन आणि भारतीय संविधान : कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवाधिकार आणि न्यायव्यवस्थेपुढील आव्हाने **गणेश चोंडेकर, डॉ. मंगेश जी. आचार्य** ... २०३

☛ मानवी हक्क आणि भारतीय संविधान **सतीश शंकरराव राठोड** .. २०८

☛ महिला सक्षमीकरण, लिंगभाव समानता आणि पोषण आरोग्याची धोरणे - एक परस्परसंबंधी विश्लेषण **डॉ. प्रेरणा रत्नपारखी** ..... २१४


☛ महिला आणि मानसिक आरोग्य **डॉ. शिवानी आठल्ये** ....... २२८

## स्मृति विशेष



**डॉ. राम जाधव**

कोव्हिड २०२१ ने जागतिक समीरकरणे जशी बदलवली तसेच अंतर्गत संदर्भांनाही धक्का बसला. डॉ. व्ही.एम. पेशवे सामाजिक संशोधन संस्थेची न भरून निघणारी हानी झाली. संस्थेचे अध्वर्यू, उपाध्यक्ष आणि संस्थेच्या उन्नयनाकरिता सातत्याने प्रयत्नशील असणारे मृदू, संयमी व्यक्तित्व डॉ. राम जाधव यांना याच काळात हिरावून नेले. (१०.२.२०२१) त्यांच्या स्मृती चिरंतन असल्या तरी संस्थेच्या प्रवाहित वाटचालीला मात्र निश्चितच मर्यादा आलेली आहे. डॉ. राम जाधव यांच्या जाण्याने पोकळी अधिकच गहरी झाली आहे.



प्रजासत्ताक भारत
आणि
मानवी हक्क
CONSTITUTION OF INDIA
संदीप तुंडूरवार
डॉ. शरद सांबारे
डॉ. रीता धांडेकर
डॉ. संघमित्रा कोलारकर
प्रा. राजेश कनिरे
प्रा. विजयकुमार पंधरे

# संविधानाच्या परिप्रेक्षात भारतीय प्रजासत्ताकाची पाऊण शतकी वाटचाल

❐ **डॉ. लक्ष्मीकांत देशमुख**
पूर्व संमेलनाध्यक्ष,
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, पुणे

**'आम्ही भारताचे लोक'**

यंदाचे वर्ष आपणच सिद्ध केलेल्या व स्वतः प्रत अर्पण केलेल्या भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव साजरा करताना एक महत्त्वाची गोष्ट विसरलो आहोत की, या भारतीय संविधानाचे सार्वभौमत्त्व आपल्या सर्व भारतीयांकडे आहे. भारतीय संविधानाचे मालक आणि रखवालदार तुम्ही-आम्ही सर्व जण आहोत. आजची आपली दुरावस्था यासाठी झाली आहे की, हे सार्वभौमत्त्व आपण निवडून देणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या विधिमंडळ आणि कार्यपालिकेकडे (Legislature and Exective) सोपवून दिले आहे. पाच वर्षांतून एकदा मतदान केले की आपले काम संपले, या भ्रमात आपण राहिलो की आपण निवडलेले लोकप्रतिनिधी आणि कार्यपालिका भारतीय संविधानाप्रमाणे काम करेल व आम्हा भारतीय लोकांना जो स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि त्रिविध न्यायाचा भारत अपेक्षित आहे, तो ते घडवतील. तसेच ब्रिटिश वसाहतवादाच्या आर्थिक पिळवणुकीतून जे दारिद्र्य आले होते त्यातून आपली मुक्तता करतील. मुख्य म्हणजे हजारो वर्षांच्या वर्ण व वर्चस्ववादी जातप्रधान व्यवस्थेमुळे जे सामाजिक मागासलेपण आणि कमालीची विषमता व शोषण बहुजनांच्या नशिची आले होते, त्यातून सुटका होऊन प्रत्येक भारतीयास सर्व प्रकारच्या खऱ्याखुऱ्या समतेसह सन्मानाने जगता येईल आणि अवघी रयत सुखी होईल, असे काम विधिमंडळ आणि कार्यपालिका सातत्याने संविधानाप्रमाणे मिशन मोडमध्ये करेल. पण ते या ७५ वर्षात दुर्दैवाने साध्य झाले नाही.

आपल्या महाराष्ट्र राज्याचे उदाहरण देऊन बोलायचे झाले तर आज अवघा शेतकरी वर्ग ओल्या दुष्काळानं ग्रासलेला असताना काल-परवा पार

पडलेल्या राज्यातील नगरपालिका आणि नगर पंचायतीच्या निवडणुकीत जे दिसून आले, ती शुद्ध साठमारी होती, पैशाचा महापूर बाहवून मत विकत घेण्याचा आणि सत्ता सोपान गाठण्यासाठीचा अश्लाध्य प्रयत्न होता. निवडणुकीद्वारे लोकांचे राजकीय प्रशिक्षण होते, असा म्हणण्याचा प्रघात आहे. ते दिवस केव्हाच संपले आहेत आणि किळसवाणी राजकीय साठमारी तुम्हा-आम्हा नागरिकांना असाह्यपणे पाहावी लागत आहे. हेच व असेच चित्र देशभराचे आहे. त्यामुळे आज तुम्ही-आम्ही असाह्य हतबल झालो आहोत. आपली अवस्था काय आहे, हे फार पूर्वी साहिर लुधियानवी हा जनतेचा शायर लिहून गेला होता, 'हरेक जिस्म घायल, हरेक रूह प्यासी, निगाहों में उलझन दिलों मे उदासी, जिन्हे नाज है हिंद पर वा कहाँ है?' आज मला या निमित्ताने हाच प्रश्न विचारायचा आहे, ज्या आमच्या नेत्यांवर आपण विश्वास ठेवला, पुन्हा पुन्हा निवडून दिले, देशप्रेमी लोकशाही प्रजासत्ताकवादाचा ज्यांना अभिमान आहे, असं म्हणतात ते कुठे गेले? 'जिन्हे नाज है हिंद पर वो कहाँ हैं?'

आज त्यांना नावं ठेवण्यापेक्षा आपण त्यांना तसे कसे का करू दिले? मतदार राजा का, केव्हा व कसा लाभार्थी, मतविकावू आणि अंध अनुयायी झाला? उत्तर एकच आहे. संविधानाचे आपण भारतीय निर्माते आहोत. जनता सार्वभौम आहे, याचा आपणास विसर पडला आहे आणि सरकारकडे 'मायबाप' म्हणून पाहण्याची मन शरणता आपल्या आजच्या अपेक्षाभंगाचं मूळ आहे. म्हणून भारतीय संविधानाचा अमृत महोत्सवी वर्ष हे सिंहावलोकन आणि आत्मचिंतनाचे निमित्त आहे असे मानून प्रामाणिकपणे आत्मपरीक्षण केले पाहिजे, माझा आजचा बीज भाषणाचा विषय तोच आहे. तुम्हा सर्वांच्या साक्षीनं मी आज भारतीयांचा प्रतिनिधी म्हणून त्यांच्या भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न करणार आहे.

जसं हे भारतीय संविधानाचं अमृत महोत्सवी वर्ष आहे. पण त्याला दोन वर्षांपूर्वी संपलेल्या मूलभूत संरचना सिद्धान्ताची सुवर्ण महोत्सवाची पार्श्वभूमी आहे. १९७३ च्या केशवानंद भारती प्रकरणातले सर्वोच्च न्यायालयाचे निकालपत्र खऱ्या अर्थाने ऐतिहासिक आहे. संसदेला घटना दुरुस्तीचा अधिकार जरूर आहे, पण संविधानाच्या मूलभूत संरचनेत आणि मूल्यात बदल करता येणार

नाही आणि त्यात संविधानाची उद्देशिका येते. किंबहुना ही उद्देशिका भारतीय संविधानाचे कालातीत तत्त्वज्ञान आहे आणि ते साकार करण्यासाठी भारतीय लोकशाही प्रजासत्ताकाची (डेमॉक्रेटिक रिपब्लिक) स्थापना झाली आहे. या राज्यप्रणालीद्वारे आपणास धर्मनिरपेक्ष व समाजवादी राज्य खऱ्या अर्थाने स्थापन करायचे आहे. लोकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय द्यायचा आहे. विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य द्यायचे आहे. दर्जा आणि संधीची समानता द्यायची आहे आणि व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मतेसाठी आवश्यक असणारी बंधुता - मैत्रभाव निर्माण करायचा आहे.

थोडक्यात सांगायचे झाले तर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या चार स्तंभावर भारतीय संविधानाची जगाला अभिमान वाटेल अशी इमारत उभी आहे. अवघ्या ८१ शब्दांच्या उद्देशिकेतून जे स्वतंत्र भारताच्या नवनिर्माणाचे ध्येय भारतीयांपुढे ठेवले आहे, ते समग्र व पूर्णपणे निर्दोष आहे. यापेक्षा अधिक उच्चतर असे काही आदर्श युटोपिया असूच शकत नाही. होय, आपले संविधानकर्ते उदात्त स्वप्न पाहणारे होते आणि ते साकार करण्याची क्षमता भारतीयांमध्ये आहे, असे मानणारे होते. त्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक लोकशाही प्रजासत्ताकाची स्थापना केली. कारण हे लोकांचे संविधान आहे, ते त्यांनीच साकार करायचे आहे, हा त्यांचा दृढ विश्वास होता. तो आपण या ७५ वर्षांत अगदीच काही विफल केला नाही. बरंच काही आपण साध्य केलं आहे, तरीही एकविसाव्या शतकातील या संपलेल्या पाव शतकात असं काय झालं की, आज विधिमंडळ व कार्यमालिका देश व लोक हितापेक्षा स्व आणि पक्षहित साध्य करण्यात मग्न आहे, न्यायपालिका एका दोलायमान अवस्थेत एका क्रॉसरोडवर उभी आहे आणि संविधानाच्या रखवालीची भूमिका पूर्णपणे ती का निभवत नाही? त्याबाबत आज आपण गांभीर्याने विचार करू या.

आज लोकशाही व प्रजासत्ताक हे शब्द एकाच अर्थानं वापरले जातात, तरी या दोन भिन्न संकल्पना आहेत. त्या आपण संविधानाच्या उद्देशिकेत एकत्र का केल्या हे समजून घेण्यासाठी त्या काय आहेत हे प्रथम पाहू यात.

लोकशाही म्हणजे लोकांचे तुमचे आमचे राज्य. त्याबाबतची अब्राहम लिंकनची व्याख्या सर्वश्रुत आहे. पण मला डॉ. आंबेडकरांची व्याख्या अधिक

सार्थ वाटते. विशेषत्वाने भारताच्या संदर्भात ती अशी आहे, 'रक्तपाताविना लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतीकारी बदल घडवून आणणाऱ्या शासन व्यवस्थेचा प्रकार आणि पद्धत म्हणजे लोकशाही होय!'

आणि रिपब्लिक प्रजासत्ताक म्हणजे अशी राज्यव्यवस्था जिथे राष्ट्रप्रमुख हा वंशपरंपरेने निवडला न जाता लोकांमार्फत मतदानाने थेट किंवा लोकनियुक्त प्रतिनिधींमार्फत निवडला जातो. अमेरिका हा प्रजासत्ताक देश आहे. कारण तिथे राष्ट्राध्यक्षाची निवड मतदारांमार्फत केली जाते. भारत जरी रिपब्लिक प्रजासत्ताक देश असला तरी येथील राष्ट्रपती हे लोकप्रतिनिधींमार्फत म्हणजे अप्रत्यक्ष निवडले जातात. मात्र त्यांना कार्यकारी अधिकारी नाहीत, तर ते नामधारी (सेरिमोनियल) राष्ट्राध्यक्ष आहेत. सारी कार्यकारी व प्रशासकीय सत्ता ही प्रधानमंत्री व कॅबिनेटकडे असते. म्हणजेच अमेरिकेसारखा भारत हा क्लासिकल रिपब्लिक व्याख्येत मोडत नाही. पण तो राष्ट्रप्रमुख लोकातून निवडले जातात म्हणून भारत रिपब्लिक आहे, तसाच तो संसदीय लोकशाही असणारा लोकशाही पद्धतीचा देश आहे. कार्यपालिका ही संसदेला जबाबदार असते. ही इंग्लंडची लोकशाही पद्धत आहे. मात्र तेथे वंशपरंपरेने राष्ट्रप्रमुख तेथील राजा किवा राणी असतो. भारताचे राष्ट्रपती पण असेच नामधारी सेरिमोनियल राष्ट्रप्रमुख असतात, फक्त दर पाच वर्षांनी नवा राष्ट्रपती निवडला जातो. म्हणजेच भारताने अमेरिकेच्या रिपब्लिकचा ढाचा निवडला आणि नामधारी घटना प्रमुखाचे पद राष्ट्रपतीला दिले, त्याचवेळी इंग्लंडप्रमाणे बहुमताच्या सरकारच्या नेत्यास प्रधानमंत्रीपद व कार्यकारी अधिकार दिले. अशा तऱ्हेने भारताची लोकशाही प्रजासत्ताक व्यवस्था संविधानकर्त्यांनी संविधान सिद्ध करताना बनवली आहे.

डॉ. आंबेडकर संसदीय लोकशाहीसाठी आग्रही होते, त्याचे कारण इंग्लंडसारखी ही पद्धत जबाबदारी व जबाबदेही मागणारी आहे. त्यामध्ये रिपब्लिक पद्धतीप्रमाणे स्थैर्य कमी असले तरी सामाजिक आर्थिक परिवर्तनाचे ते प्रमुख माध्यम आहे, असे त्यांचे मत होते. संसदेत कार्यपालिकेला म्हणजेच सरकारला तारांकित प्रश्न, स्थगन प्रस्ताव चर्चा आणि असहमतीच्या आवाजाने डिबेट अँड डिसेंटने सदैव दक्ष आणि संसदेप्रती जबाबदार राहावं लागतं. अविश्वासाचा ठराव आणून त्यांना सत्तेतून घालवता येतं. पुन्हा या माध्यमातून

सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे कार्यक्रम जबाबदेहीसह परिणामकारकरितीने राबविण्याची अधिक शक्यता असते, मार्गदर्शक तत्त्वात सामाजिक व आर्थिक कार्यक्रमाचे नीतिनिर्देश आहेत, ते राज्यकारभारासाठी मूलभूत आहेत, त्याची जाणीव सरकारला असते आणि विरोधी पक्ष त्यांना ते त्यापासून दूर राहिले तर प्रश्न विचारून जाणीव करून देऊ शकतो. पुन्हा संसद ही सत्ताधारी व विरोधी पक्ष सदस्यांची मिळून बनलेली असते, ती देशाची विविधता आणि भिन्न भिन्न हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणारी असते. त्यामुळे समुचित व सर्वसमावेशक विकास शक्य होतो. मुख्य म्हणजे रिपब्लिक व्यवस्थेत राष्ट्राध्यक्ष हा थेट निवडून आलेला व संसदेला जबाबदार नसणारा अमर्याद अधिकारांनी संपन्न असतो. तो हुकूमशाहा बनवण्याची अधिक शक्यता असते. अर्थात लोकशाही मार्गाने प्रचंड बहुमत असलेला प्रधानमंत्री पण थेट हुकूमशहा नाही पण निरंकुश ऑटोक्रॅटिक 'मी म्हणेल ती पूर्व' मानणारा व तसे काम करणारा बनू शकतो. तशी अनेक उदाहणे आजच्या संदर्भात देता येतील. तरीही प्रधानमंत्र्यास तसे वागण्यात काही अंगभूत संसदीय लोकशाही प्रणालीच्या व संविधानाने निर्माण केलेल्या चेक अँड बॅलन्सेस व संसदेच्या तीन अंगातील सत्तेचे विभाजन यांचा अडथळा असतो व तो पार करणे सहज शक्य नसते, एकूणच संसदीय लोकशाही ही स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या चारही तत्त्वांना साकार करण्यासाठी अन्य कोणत्याही प्रणालीपेक्षा अधिक उपयुक्त आहे हे निश्चित.

भारताच्या संदर्भात मूलभूत संरचना सिद्धान्ताप्रमाणे संविधानाच्या उद्देशिकेतील तत्त्वज्ञानाप्रमाणे राज्यकारभार करणे ही सरकारची संविधानिक जबाबदारी आहे, संविधान हे सर्वोच्च आहे. मुख्य म्हणजे सरकार हे सत्ताधीश असत नाही, तर जनतेने त्यांना आपला प्रतिनिधी म्हणून त्यांच्या विकासासाठी व जनहितासाठी कारभार करण्यासाठी पाच वर्षांसाठी निवडलेलं असतं. विद्यमान प्रधानमंत्री स्वतःला प्रधानसेवक म्हणवून घेतात, ते वाच्यार्थ्यानं खरं आहे. पण आजच्या राजकारणग्रस्त भारतात सरपंच ते संसद सदस्य स्वतःला सत्ताधीश व जनतेचा मालक समजत, ज्या विरुद्ध आपल्या नेत्यांनी ब्रिटिशांचा वसाहतवाद संपविण्यासाठी स्वातंत्र्यलढा दिला, त्यात त्याला व सामंतशाहीला स्पष्ट नकार होता, जी जातीव्यवस्थेने दृढमूल केली होती, ती आज पुन्हा

अधिक प्रबळ झालेली दिसून येते. कारण जेव्हा सार्वभौम व देशाची मालक असणारी जनता त्यांच्या सेवकांना मायबाप सरकारचा एतद्देशीय दर्जा देतो, तेव्हा ते सामंतवादी मानसिकतेचे होणार नाहीत, तर काय होणार?

पण लोकशाही प्रजासत्ताकाचे संविधान लागू झाल्यापासून सुरुवातीची वाटचाल पंडित नेहरूंमुळे उत्तम सुरू झाली. कारण नेहरू हे स्वतः संविधान रचणारे एक प्रमुख संविधानकर्ते होते आणि जे स्वातंत्र्यसेनानी आणि महात्मा गांधींचे अनुयायी होते, त्यामुळे त्यांनी नवजात स्वतंत्र भारताच्या आधुनिकीकरणाची व सामाजिक व आर्थिक क्रांतीचा पाया रचला. शिक्षण, तंत्रज्ञान, शेती, उद्योग आदी क्षेत्रांमध्ये मूलभूत काम केले. ते होते त्यांनी संविधानाचे तत्त्वज्ञान शिरोधार्य मानत सेक्युलॅरिझम आणि समाजवाद साकार करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. संमिश्र अर्थव्यवस्थेद्वारे सरकारमार्फत मोठे अवजड उद्योग उदाहरणार्थ, पोलाद कारखाने, भाक्रानांगल व दामोदर सारखी धरणे, अणुविज्ञानाद्वारे वीज निर्मिती, इस्त्रो, आय.आय.टी., आय.आय.एम., इन्स्टिटच्यूट ऑफ सायन्स, विद्यापीठे, आय.आय.एम. द्वारे देशाला आधुनिक करण्यासाठी जवळपास सर्वच क्षेत्रात स्वरूपाच्या आणि पायाभूत उच्च दर्जाच्या आणि सक्षम तंत्रज्ञांच्या संस्था उभारल्या. तसेच लोकशाही राष्ट्राला जरूरी असणाऱ्या निष्पक्ष व संविधानिक संस्था उदाहरणार्थ निवडणूक आयोग, यु.जी.सी, कॅगसारख्या संस्था उभारल्या व त्यांना पूर्ण स्वातंत्र्य दिले. देशाचा मोठेपणा कला, साहित्य, संस्कृती, विज्ञान आणि संशोधनामध्ये असतो म्हणून या क्षेत्रासाठी फिल्म इन्स्टिटच्यूट ऑफ इंडिया, एन.एफ.डी.सी., नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, साहित्य व संगीत ॲकॅडमी, फिल्म फेस्टिव्हल, अणुशक्ती आयोग, एन.सी.एल. डी.आर.डी.ए. यादी न संपणारी आहे. अशा संस्था निर्माण केल्या. त्यांनी देशविकासात किती मोलाचे योगदान दिले ते आपण सारे जाणतो.

पण पंडित नेहरूंचे सर्वांत मोठे श्रेय म्हणजे भारतासारख्या गरीब, निरक्षर आणि जाती-धर्माच्या विळख्यात बद्ध असणाऱ्या लोकांच्या देशात लोकशाही रुजवली. अनेक निकोप लोकशाही संकेत रुजवले. उदाहरणार्थ वर्षातून चार ते साडेचार महिने संसद चालवणे, स्वतः जातीने उपस्थित राहणे, विरोधी पक्ष सदस्यांची संख्या अत्यंत कमी असताना त्यांना अधिक वेळ बोलू देणे,

आपल्या विरुद्धची टीका म्हणजे देशावरील टीका एवढेच नाही तर देशद्रोह मानण्याच्या आजच्या प्रवृत्तीपासून दूर असणं, लोकशाही म्हणजे डिबेट आणि डिसेंट (चर्चा व असहमती) हे तत्त्व मान्य करून तसं वागणं, कायदे करताना संसदीय समितीत चर्चा करून आम सहमती घडवून आणून व संसदेत प्रत्येक सदस्याला त्याचे मत मांडू देणं, सदस्यांच्या योग्य सूचना व सुधारणा सुधारून कायद्यात दुरुस्ती करून तो आम सहमतीने मंजूर करणे. हे सारे आज स्वप्नवत् वाटणारे संकेत अगदी डॉ. मनमोहन सिंग यांच्यापर्यंत प्रमाण कमी कमी होत गेले तरी पाळले जायचे. तपास यंत्रणांना तपासाची पूर्ण मोकळीक, न्यायपालिकेचा पूर्ण सन्मान आणि न्यायाधीश निवडीत गुणवत्ता व सरन्यायाधीशाच्या मताला प्राधान्य देणे ही नेहरूपर्वाची संविधानप्रणित जवळपास आदर्श लोकशाही प्रजासत्ताक कार्यरत होते. अगदी तरुण अटल बिहारींचे संसदपटुत्व पाहून ते एक दिवस प्रधानमंत्री होतील, असं म्हणून उत्तेजन देणे, स्वपक्षातील खासदारांची टीका शांतपणे ऐकणे व त्यातील तथ्यांशाप्रमाणे कामात सुधारणा करणे. खरे तर त्यांच्याइतका करिश्मॅटिक व देवदुर्लभ लोकप्रियता असणारा दुसरा नेता आजवर भारतात झाला नाही. त्यांचा कालखंड हा नवनिर्माणाचा, आधुनिक भारताच्या विज्ञान, विवेक, मानवता, जागतिक शांतता आणि मानवी अधिकारांच्या पायावर उभारणीचा होता. आज भारताची जी प्रगती झाली आहे, त्याचे सर्वाधिक श्रेय नेहरूंनी जो भक्कम संस्थात्मक पाया घातला, लोकशाही रुजवली, विविधतेचा सन्मान केला आणि सेक्युलॅरिझम रुजविण्याचा प्रयत्न केला, लोककल्याणकारी आणि विषमता कमी करून आंबेडकर प्रणित आर्थिक व सामाजिक लोकशाही सुदृढ केला त्याला आहे.

पंडित नेहरूंची १७ वर्षांची प्रधानमंत्री पदाची कारकीर्द पाहिली तर त्यांचे प्रत्येक धोरण व आखलेला कृती कार्यक्रम संविधानाच्या परिप्रेक्षात होता. हा देश लोकशाही प्रजासत्ताक आहे व आपल्यावर संविधानकर्त्यांनी ज्याचा तो एक भाग होते जी जबाबदारी टाकली आहे, त्याचे त्यांना भान आणि कर्तव्याची भावना जागृत होती. विद्यमान राष्ट्रपती सन्माननीय द्रौपदी मुर्मूनी 'संविधान हे लोकांकडून शक्ती घेणारे जिवंत दस्तावेज आहे', असे जे उद्गार काढले आहेत, तसेच डॉ. राजेंद्रप्रसादांनी 'संविधान तेव्हाच यशस्वी होते,

जेव्हा त्यासाठी काम करणारे (पक्षी कार्यपालिका) आणि ज्यांच्यासाठी ती राबवायची आहे, ते लोक (पक्षी भारतीय जनता) समाधानी होत.' या विचारांच्या प्रकाशात पाहिले तर नेहरू १००% संविधानिक लोकशाहीवादी होते, असं म्हणलं तर अतिशयोक्ती होणार नाही, त्यांनी पहिली घटना दुरुस्ती केली ती आर्थिक न्यायासाठी. जमीनदारांकडून अतिरिक्त जमीन काढून ती भूमिहिनांना वाटप करण्यासाठी. त्यांनी हिंदू कोड बिलास प्रचंड विरोध असतानाही शांतपणे वेळ काढत तिचे चार कायदे करून ते संमत करून घेणे हे त्यांचे हिंदू स्त्रीला न्याय देणारे महान काम होते. पण असे त्यांना मुस्लीम वैयक्तिक कायद्याबाबत करता आले नाही. कारण फाळणीनंतर भयभीत मुस्लीम जनतेला ते भारताचे समान नागरिक आहेत, हा विश्वास देणे अधिक महत्त्वाचे होते. त्यामुळे पर्सनल लॉवरून फाळणीच्या जखमा ताज्या असताना त्यांना भयग्रस्त करणे उचित नव्हते, असे त्यांना वाटले असणार.

ते हाडाचे सेक्युलर होते आणि वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगणारे नेते होते. त्यांच्या समाजवादी विचारांचा खास करून सार्वजनिक क्षेत्रास महत्त्व देऊन देशाच्या साधन-संपत्तीचा विनियोग गरिबांच्या हितासाठी व विषमता कमी करण्यासाठी करण्याच्या कार्यक्रमामुळे डावे व पुरोगामी प्रगतीशील कलावंत त्यांच्यावर फिदा होते, दिलीपकुमारला लॉर्ड मेघनाथ देसाईंनी 'नेहरूंचा नायक' संबोधत त्या शीर्षकाचे पुस्तक लिहिले आहे. राज कपूर म्हणायचा की माझ्या चित्रपटाची प्रेरणा नेहरूप्रणित समाजवादात आहे. नेहरूंचा कला जगतावरचा प्रभाव प्रेम धवनच्या एका गीतात ठळकपणे जाणवतो. नेहरूंना आधुनिक विज्ञाननिष्ठ व कामगार शेतकऱ्यांचे हित साधणारा भारत घडवायचा होता, त्याबाबतच्या या गीतातल्या ओळी बोलक्या आहेत. 'छोडो कल की बाते, कल की बात पुरानी, नये दौर में लिखेंगे मिलकर नयी कहानी, हम हिंदोस्तानी...'

नेहरूंना भारताच्या प्राचीन इतिहास आणि संस्कृतीची विलक्षण जाण होती. विविधतेत एकता, बहु धार्मिकता आणि बहुसांस्कृतिकतेसह सहिष्णू व परस्परांचा आदर करीत शांततामय सहअस्तित्व मानणाऱ्या व आचरणाऱ्या भारतीय जीवनशैलीला त्यांनी गंगा-जमनी तहजिब असं सार्थ नाव दिलं. त्या काळातही एक लोकप्रिय घोषणा होती, 'हिंदू, मुस्लीम, सिख, ईसाई, हम सब है भाई भाई' ती नेहरूंच्या प्रभावातून आली होती. आज ती कुठे हरवली

आहे? कला, संगीत, वस्त्रोद्योग, स्थापत्यकला आणि सूफी-भक्ती संगीत ही भारताची सामाईक विरासत कंपोझिट कल्चर आहे, हा नेहरूंचा इतिहास व संस्कृतीच्या अभ्यासातून दृढ झालेला विश्वास होता. एकूणच नेहरूंच्या सेक्युलॅरिझम आणि समाजवादाचा प्रभाव पन्नास व साठच्या दशकात भारतीय जनतेवर अत्याधिक होता. त्या काळातील 'धूल का फूल', 'आवारा', 'श्री चारसो बीस', 'धर्मपुत्र' आणि 'सात हिंदोस्तानी' या सारख्या चित्रपटातून स्पष्टपणे दिसून येतो. जगात कदाचित नेहरू हा एकमेव नेता असेल, ज्याच्या प्रभावातून चित्रपट, गाणी, शायरी आणि संगीत निर्माण झालं. मला तरी शोधूनही असा दुसरा कलावंत नेता सापडलेला नाही.

नेहरूंनंतर भारतीय प्रजासत्ताकाची वाटचाल शास्त्रीजींच्या काळात अबाधित होती. ते साधेपणा व नैतिकतेचे मूर्तीमंत प्रतीक होते. त्यांनी सीमा रक्षण करणारे जबान व देशाचा पोशिंदा बळीराजा शेतकऱ्यांना सन्मान देण्यासाठी 'जय जवान जय किसान' ही घोषणा दिली, त्यावर आधारित मनोजकुमारचा 'उपकार' हा चित्रपट आजही लोकप्रिय आहे. शास्त्रींनी हरित क्रांतीचे बीज रोवले ते इंदिरा गांधींच्या काळात पूर्णत्वास गेले. इंदिरा गांधींचा १९७५ पर्यंतचा आणीबाणी लागू होण्यापर्यंतचा कालखंड हा सामाजिक व आर्थिक न्यायाचा कालखंड होता. त्यांचा भर मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे धोरणे आखण्यावर व कृती कार्यक्रमावंवर विशेषत्वाने होता. गरीबी हटावची घोषणा व त्यासाठी बँकांचे राष्ट्रीयीकरण करून गरिबांना कर्जपुरवठा करणे, बीस सूत्री कार्यक्रम, इंदिरा आवास योजना आणि हरित क्रांती पूर्णत्वास नेणे या कामगिरीमुळे त्यांनी लोकशाही प्रजासत्ताकाला बळ देत सामान्य जनतेच्या जीवनात आर्थिक समृद्धी आणण्याचा व सामाजिक न्याय देण्याचा प्रयत्न केला.

पण इंदिरा गांधींनी लावलेली अठरा महिन्यांची आणीबाणी हा भारताच्या प्रजासत्ताक व संविधानिक मूलभूत अधिकारावर घातलेला घाला कदापिही समर्थनीय ठरू शकत नाही. पण त्या स्वतःच अस्वस्थ होत्या. कोणतेही बाह्य दडपण नसताना त्यांनी मनाचा कौल मानून आणीबाणी उठवली व पराभव स्वीकारला. पुन्हा दोन वर्षांनी त्या सत्तेवर आल्या, पण त्यांनी शिख अतिरेक्यांकडून खून होईपर्यंत सामाजिक व आर्थिक न्यायाचा कार्यक्रम

जोमाने राबवला हे सत्य आहे.

पण इंदिरा गांधींच्याच काळात सरकारी उपक्रमात प्रशासकीय हस्तक्षेप कमालीचा वाढला होता, तो त्यांचा कालखंड 'परमिट आणि लायसेन्स राज्य' म्हणून कुविख्यात आहे. प्रागतिक कररचना करून श्रीमंतावर अधिकचा कर लावणे हे सामाजिक व आर्थिक लोकशाहीच्या तत्त्वांशी सुसंगत आहे, पण इंदिराजींनी त्याचा अतिरेक केला. एक वेळ तर ९७% कर श्रीमंत उद्योगपतींवर लावला गेला होता. त्या काळात जगात उदारीकरण व जागतिकीकरणाचे वारे वाहायला प्रारंभ झाला होता. चीनने १९७९ मध्ये साम्यवादी अर्थविचारांना बगल देत भांडवलशाही वळण घेत 'श्रीमंत होणे अभिमानास्पद आहे' असं मानत वेगाने आर्थिक प्रगतीवर लक्ष केंद्रीत केले होते. पंडित नेहरूंच्या मुशीत तयार होऊनही व सार्वजनिक उद्योगांएवढेच महत्त्व खासगी उद्योगांना देण्याची नेहरूंची विचारधारा ज्ञात असूनही इंदिरा गांधींनी त्या वेळी आर्थिक धोरणात योग्य बदल केला नाही आणि जागतिकीकरणाची भारताची बस त्या वेळी चुकली आणि चीन भारतापुढे निघून गेला.

राजीव गांधींच्या काळात संगणक व टेलिफोन क्रांती झाली. त्यांनी पंजाब, आसाम व नागालँडमध्ये शांतता प्रस्थापित केली आणि भारताची एकात्मता अक्षुण्ण ठेवली. त्यासाठी त्यांनी तेथील काँग्रेसची सत्ता त्यागण्याचा अस्सल लोकशाहीवादी उमदेपणा त्यांनी दाखवला. पण प्रचंड बहुमत असताना शहाबानो पोटगी प्रकरणात हा मुस्लीम धर्मात हस्तक्षेप करणारा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे व तो आम्ही मान्य करणार नाही, अशी मुस्लीम धर्मगुरू आणि पर्सनल लॉ बोर्डाने घेतली. त्याच्यापुढे राजीवनी मान तुकवली व संसदेत कायदा करून हा सर्वोच्च न्यायालयाचा प्रागतिक निर्णय बदलला. ही धर्मांधतेपुढे पत्करलेली शरणागती व नंतर प्रक्षुब्ध हिंदू मन कुरवाळण्यासाठी अयोध्येच्या राम मंदिराचे बंद दरवाजे उघडणे, रामलल्लाच्या मूर्तीची पूजा सुरू करणे आणि तेथून पुढील १९८९ च्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार सुरू करणे, 'आम्ही रामराज्य आणू अशी घोषणा करणे...' यामुळे हिंदू व मुस्लीम धर्मातील सेक्युलॅरिझम विरोधी लोक व संघटना पक्षांना बळ मिळाले व अवघ्या दहा वर्षांत १९९९ मध्ये भाजप पक्ष सत्तेवर आला आणि हिंदुत्वाचे राजकारणात पब्लिक डिस्कोर्समध्ये प्रतिष्ठित झाले. राजीव गांधींचे हे निर्णय

निःसंशय संविधानिक सेक्युलॅरिझमच्या विरोधी होते. सहिष्णू हिंदू कडवे हिंदुत्ववादी होण्याची ती सुरुवात होती.

पुढे पी.व्ही. नरसिंहरावांचे सरकार आले, तेव्हा बिकट आर्थिक परिस्थितीतून (आठवा इंग्लंडच्या बँकेत सोने गहाण ठेवणे व तेल आदी आवश्यक वस्तूंच्या आयातीसाठी केवळ महिनाभर पुरेल एवढाच परकीय चलन साठा शिल्लक असणं) मात करण्यासाठी अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंगांच्या साथीने नवे उदार आर्थिक धोरण स्वीकारले, ज्याला 'खाउजा' खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे धोरण म्हणले जाते. एकप्रकारे संसदेत चर्चा न करता रावांनी समाजवादी तत्त्वज्ञान सोडून दिले होते. त्यांच्या काळात या निओ लिबरल इकॉनॉमिक धोरणाचा फायदा जाणवू लागला. आज तो तीस-चाळीस कोटींचा श्रीमंत व 'डिस्पोजेबल इन्कम' असणारा नवमध्यमवर्ग दिसतो आहे, त्याचे श्रेय नरसिंहरावांना दिले पाहिजे. पण त्यांच्या काळात शेतीकडे व गरिबांच्या कल्याणाकडे बऱ्यापैकी दुर्लक्ष झाले. तसेच रामजन्मभूमी आंदोलनाद्वारे हिंदुत्वाच्या आधारे जातीच्या वर उठत धर्माच्या नावाने हिंदू मतपेटी बांधण्यासाठी भाजपच्या लालकृष्ण अडवाणींनी राम यात्रा काढली, विटा जमा केल्या, कारसेवकांना अयोध्येला बोलावले आणि बाबरी मशीद पाडण्यात आली. परिणामी पुढे अवघ्या पाच वर्षांत भाजप केंद्रात आघाडी करून एन.डी.ए.च्या नावाने सत्तेवर आली. रावांना आर्थिक उदारीकरण व अर्थव्यवस्थेला प्रगती पथावर नेण्याचे श्रेय जसे दिले पाहिजे, तसेच समाजवाद व सेक्युलॅरिझम कमजोर करण्याचे अपश्रेयपण त्यांनाच दिले पाहिजे.

अटल बिहारी वाजपेयींनी रावांचा आर्थिक सुधारणा आणि टेलिफोन क्रांतीचा कार्यक्रम अधिक वेगवान केला. त्यांनी राष्ट्रीय महामार्ग बांधकाम आणि ग्रामीण सडक योजनेद्वारे ग्रामीण रस्ते बांधणीद्वारे विकेंद्रित विकासाचा प्रयत्न केला. पण भाजपचे सरकार असूनही वाजपेयींवर नेहरू विचारांचा प्रभाव असल्यामुळे त्यांचा कारभार आजवरच्या काँग्रेस सरकारच्या कारभारापेक्षा वेगळा नव्हता, त्यांनी भारतीय प्रजासत्ताकाला धक्का दिला नाही, हे त्यांचे श्रेय, त्यांच्या काळात भारताने दुसऱ्यांदा अणुस्फोट करून भारताला अण्वस्त्रधारी देशाच्या पंक्तीत नेऊन ठेवले. पण त्यांच्या काळात भारतीय विमानाचे अपहरण होणे व प्रवाशांच्या सुटकेसाठी अतिरेकी सोडणे आणि भारतीय संसदेवर

हल्ला झाला तरी काही ठोस कृती न करणं या त्यांच्या उण्या बाजू आहेत.

डॉ. मनमोहन सिंगांच्या दहा वर्षाच्या प्रधानमंत्री पदाच्या कालखंडात त्यांनी अर्थिक उदारीकरणास पुढे नेले. त्यांच्या काळात सलग दहा वर्षे ८% दराने जीडीपी वाढीची झाली. त्यांनी या काळात गरीब कल्याणाचा म्हणजेच आर्थिक न्यायाचा रोजगार हमी कायदा व अन्न सुरक्षा कायदा आणला आणि त्याद्वारे ग्रामीण भागात मागेल त्या व्यक्तीस शंभर दिवस रोजगार आणि तीन चतुर्थांश लोकांना स्वस्त दराने रेशनकार्डावर गहू आणि तांदूळ देण्याचा कार्यक्रम सक्षमतेने राबवला. पण त्यांनीही वाजपेयींप्रमाणे पाकिस्तानी अतिरेक्यांनी मुंबईला जो २००८ मध्ये हल्ला केला, त्याविरुद्ध काही ठोस उत्तर दिले नाही. त्यांच्या दुसऱ्या टर्ममध्ये भ्रष्टाचार प्रचंड वाढला, तो त्यांना नियंत्रित करता आला नाही. पण तरीही ते हाडाचे सेक्युलर व व्यावहारिक समाजवादी होते, असे स्थूलमानाने म्हणता येईल. त्यांनी आपल्या दहा वर्षांच्या कारकिर्दीत खासगी उद्योजकतेला उत्तेजन दिले, त्यासाठी अनेक सुधारणा केल्या, पण त्याच वेळी सार्वजनिक क्षेत्रालाही बळ दिले. एकप्रकारे त्यांनी नव्या वळणाची नेहरूंची संमिश्र अर्थव्यवस्था राबवली, असं माझं जेवढं अर्थज्ञान आहे, त्याआधारे म्हणावसं वाटतं. त्यांच्या काळात प्रजासत्ताक व संविधानाची योग्य ती चूज राखली गेली असं म्हणता येईल.

मागील अकरा वर्षांपासून पूर्ण बहुमताचे नरेंद्र मोदींचे भाजप प्रणित सरकार कार्यरत आहे. या सरकारने केंद्रीय सत्ता बळकट केली, त्यांनी संविधानिक सेक्युलॅरिझमची तमा न बाळगता उघडपणे सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या नावाने हिंदुत्वाचे राजकारण केले. तपास यंत्रणांचा वापर करून विरोधी राज्य सरकारे खिळखिळी करणारे, संविधानिक संस्था आणि मीडियाला अंकित करणारे मोदींचे सरकार संविधानिक तत्त्वज्ञानापासून बरेच फारकत घेणारे आहे. मात्र त्यांनी भारताला सायबर युगात नेले, जनधन, आधार आणि मोबाईल म्हणजेच जॅम ट्रिनिटीने मध्यस्थ दलाल टाळून गरीब जनतेला विविध अनुदाने व सामाजिक सुरक्षेचा थेट लाभ दिला. तसेच चीन व पाकिस्तान विरुद्धचे कणखर संरक्षण धोरण आणि कृती (आठवा पाकिस्तान विरुद्धचे उरी, पुलवामा, ऑपरेशन सिंदूर आणि चीनसमोर पूर्ण सीमेवर सैन्य उभे करून त्यांना रोखणे) आणि राष्ट्रहित व धोरणात्मक स्वायत्तता

जपणारे परराष्ट्र धोरण राबवले जे तिसऱ्या टर्ममध्ये मोठ्या प्रमाणात प्रश्नांकित झाले आहे. पाकिस्तानचे अमेरिका, चीन व अरब राष्ट्रांच्या गुडबुकमध्ये जाणे, ट्रम्पच्या टैरिफ हल्ल्यापुढे काय करावे हे न कळून जाणवणारी हतबलता आणि चुकीची नोटबंदी, जी.एस.टी. व कोविडमध्ये लावलेली टाळेबंदीमुळे उध्वस्थ झालेले असंघटित उद्योग, जनगणना पुढे ढकलणे आणि जागतिक नियमाप्रमाणे आकडेवारी गोळा न करता जीडीपीत वाढ झाल्याचे दर्शविणे यामुळे मोदींची तिसरी टर्म काटेरी झाली आहे. वाढती बेरोजगारी व पराकोटीची आर्थिक विषमता, बहुसंख्याकांचे राजकारण करीत अल्पसंख्याकांना राजकीय विश्वातून अदखलपात्र करणं, विरोधी राज्यांना राज्यपालामार्फत कारभार न करू देणं, त्यांची बिलं प्रलंचित ठेवणं... या साऱ्यांमुळे भारतीय प्रजासत्ताकाला संविधानाच्या परिप्रेक्ष्यात मोठा धक्का बसला आहे. चोवीस तास निवडणुकीचा विचार करत धोरणं आखणं व काम करणं, समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करीत अनुकूल भ्रामक असले तरी नरेटिव्ह सेट करणे... यामुळे अनेक जागतिक संस्था मोदी सरकारला 'इलेक्टेड ऑटोक्रसी' लोकनियुक्त एकाधिकारशाही राजवटीचा दर्जा देत आहेत. जागतिक लोकशाही निर्देशांकासोबत भूक निर्देशांक, मानवी विकास निर्देशांकातही त्यांच्या काळातली झालेली घसरण ते गरिबांना पुरेसा आर्थिक न्याय देत नाहीत, हे सिद्ध करते. बंधुता, सामाजिक सौहार्दतेचा अभाव आणि अभिजन संस्कृती लादण्याचा प्रयत्न हा प्रजासत्ताकाच्या विरुद्ध जाणारा आहे. ते संविधानिक तत्त्वांची पुरेशी बूज राखत नाहीत, असंच त्यांच्या कारभाराबाबत म्हटलं पाहिजे. पण पुढील तीन वर्षे त्यांची अर्थकारण, बेरोजगारी व विषमतेबाबत कसोटी पाहणारी, ठरणारी आहे. रावांच्या पुढेही जात त्यांनी प्रछन्न भांडवलशाहीचा स्वीकार करत समाजवादाला दरकिनार केलं आहे आणि ते कधीच सेक्युलर नव्हते, हे वेगळं सांगण्याची गरज नाही.

असा हा नेहरू ते मोदी पर्वातील भारतीय प्रजासत्ताकाच्या वाटचालीचा धावता आढावा.

आता संविधानाच्या परिप्रेक्षात मागील पंचाहत्तर वर्षांत भारतीय प्रजासत्ताकाची वाटचाल किती संविधानिक होती व कुठे, केव्हा ती नव्हती वा कमी राहिली ते पाहू.

भारतानं आजवर एकूण १११ घटना दुरुस्त्या केल्या आहेत. त्याद्वारे संविधान लेखनाचे काम, ज्याला वर्क इन प्रोग्रेस म्हणता येईल असे आहे. मुळात संविधानकर्त्यांना तेच अभिप्रेत आहे. कोणताही एक ग्रंथ तोही संविधानासारखा देश चालवण्याचा कायद्याचा ग्रंथ सर्वोच्च असला तरी तो धर्मग्रंथाप्रमाणे अपौरुषय नसतो आणि अपरिवर्तनीय नसतो. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यांच्यासोबत संविधान निर्मितीत महत्त्वाची भूमिका निभावणारे नेहरू व पटेल हे मानव होते महामानव हाते. त्यांनी इतरांच्या सहकार्याने चर्चा करून सहमतीनं हे संविधान सिद्ध केलं होतं. पण कलम ३६८ संविधानात समाविष्ट करून अन्वये घटनेत बदल करण्याचे प्राबधान ठरले, पण केशवानंद भारती खटल्यात आजवरच्या सर्वांत मोठ्या १३ न्यायाधीशांच्या खंडपीठाने निकाल देताना बेसिक स्ट्रक्चर डॉक्टराईन म्हणजे मूलभूत संरचना सिद्धान्त सिद्ध केला. त्यालाही ५२ वर्षे झाली आहेत. पण काळाच्या ओघात विविध खटल्यात त्याची चर्चा झाली आणि घटनेत झालेला बदल हा घटनेच्या मूलभूत सिद्धान्ताशी अनुकूल आहे की नाही, असेल तर त्याला मान्यता देणे, नसेल तर ती घटना दुरुस्ती रद्द करण्यास सर्वोच्च न्यायालयाने मागेपुढे पाहिले नाही.

दोन उदाहरणे देऊन हा सिद्धान्त समजून घेता येईल.

पहिलं उदाहरण आहे शिक्षण हक्क कायदा, मार्गदर्शक तत्त्वातील कलम ४५ राज्याने संविधान लागू झाल्यापासून दहा वर्षात ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला-मुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण द्यावे असे निर्देशित करते, त्यासाठी २००२ मध्ये ८६ व्या घटना दुरुस्तीने त्याला मूलभूत अधिकाराचे स्थान देण्यात आले व संविधानात २१अ हे नवे कलम अंतर्भूत झाले. हे संविधानाच्या मूलभूत संरचनेशी व तरतुदींशी सुसंग होते. दुसरे उदाहरण म्हणजे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तीच्या नियुक्तीसाठी 'कोलेजियम' पद्धत बदलून 'नॅशनल ज्युडिशियल अपॉईंटमेंट कमिशन एन.जे.ए.सी. ॲक्ट २०१४ हा ९९ व्या घटना दुरुस्तीने संसदेने संमत केला व अर्ध्याहून अधिक राज्यांनी त्यास मान्यता दिली, पण सवोच्च न्यायालयाने तो मूलभूत संरचना सिद्धान्तातील न्यायालयांच्या स्वतंत्रतेवर घाला घालणारा आहे, असे ठरवत रद्द केला. ही दोन उदाहरणे कार्य दर्शवितात? संसदेला

घटना दुरुस्ती करता येतं, पण संविधानाच्या मूलभूत शाश्वत तत्त्वांशी छेडछाड करता येत नाही. त्यात प्रामुख्याने पुढील बाबी असतील असे त्या खटल्यातील खंडपीठाच्या विविध न्यायमूर्तींनी नमूद केले आहे.

(१) संविधानाची सर्वोच्चता (२) सार्वभौम लोकशाही गणराज्य किंवा प्रजासत्ताक शासन प्रणाली (३) सेक्युलॅरिझम (४) समाजवाद (२०२४ चा निकाल) (५) विधीमंडळ, कार्यपालिका व न्यायपालिकेमधील सत्तेचे विभाजन (६) संघराज्यवाद (७) मानवी प्रतिष्ठा (८) कल्याणकारी राज्याचे ध्येय (९) मूलभूत अधिकार आणि (१०) संविधानाची उद्देशिका जी संविधानाचा भाग आहे व पहिल्या सात बाबी त्यात अंतर्भूत आहेत.

येथे मी वाचकांचे लक्ष 'सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताका'कडे मूलभूत संरचना सिद्धान्ताने मूलभूत व अपरिवर्तनीय मानल्या गेलेल्या बाबींकडे लक्ष वेधू इच्छितो. त्याचा अर्थ काय आहे? भारतीय जनता ही सार्वभौम आहे, तिने स्वतःच्या विकासासाठी व देशाच्या सुचारू कारभारासाठी लोकशाही प्रजासत्ताक कार्यप्रणाली स्वीकारली आहे. त्याप्रमाणे कारभार करताना कोणताही कायदा वा कार्यक्रम संविधानाच्या सर्वोच्चतेस बाधा आणणार नाही. तसेच सेक्युलॅरिझम, समाजवाद, सत्तेचे विभाजन मान्य करून या तीन स्तंभांनी परस्परात ढवळाढवळ न करणे, संघराज्यवाद व कल्याणकारी राज्याचे ध्येय याबाबत कोणताही तडजोड या सिद्धान्ताप्रमाणे असंविधानिक ठरते. प्रसंगी सर्वोच्च न्यायालय त्याची स्वतःहुन दखल घेत किंवा याचिका स्वीकारून रद्द करेल. ते संविधानाचे रखवालदार म्हणून त्यांचे प्रधान कर्तव्य आहे. जगातील हे एक सर्वोत्तम सकारात्मक हस्तक्षेपाचे केशवानंद भारती खटल्याचे निकालपत्र आहे. त्यामुळे कितीही मोठे बहुमत मिळवून प्रधानमंत्री पदी विराजमान झालेल्या व्यक्तीस हुकूमशहा होता येणार नाही आणि संविधान बदलता येणार नाही, याची पक्की व्यवस्था झाली आहे. म्हणून हा सिद्धान्त भारतीय न्यायपालिकेच्या इतिहासातील सुवर्णपान आहे.

म्हणून आज संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षात आणि दोन वर्षांपूर्वी सुवर्ण महोत्सव झालेल्या मूलभूत संरचना सिद्धान्ताच्या परिप्रेक्षात भारतीय प्रजासत्ताकाची पाऊण शतकी वाटचाल मूलभूत मानलेल्या गोष्टींच्या प्रकाशात कशी झाली हे तपासून पाहणे मला आवश्यक वाटते. कारण केवळ संविधान

डोक्यावर धर्मग्रंथाप्रमाणे भक्तीभावाने घ्यायचे नसते, तर ते पाळायचे असते, आचरणात आणायचे असते. ते विधीमंडळ व कार्यपालिकेचे आद्य व बंधनकारक स्वरूपाचे कर्तव्य आहे, ते आम्ही सार्वभौम भारताचे लोकांनी त्यांना दिलेले काम व कर्तव्य आहे आणि त्यांची धोरणे, कायदे आणि घटना दुरुस्त्या योग्य आहेत की नाही हे पाहण्याचे व संविधानाची रक्षा करण्याचे काम आपणच न्यायपालिकेस दिले आहे.

पण आपण आपले सार्वभौमत्व विसरून बसलो आहोत. कारण आज जे चाललं आहे, ते पसंत नसूनही आवाज उठवता येत नाही, अशी हतबलता का आली याचाही शोध घेतला पाहिजे. मूलभूत संरचना सिद्धांताच्या परिप्रेक्षात मूलभूत बाबींच्या संदर्भात भारतीय प्रजासत्ताकाने म्हणजे आम्ही निवडून दिलेल्या सरकारनी संविधानाचे 'इन लेटर अँड स्पिरिट' पालन केले की नाही, याचा आपण बाबनिहाय सैद्धान्तिक आढावा घेऊ या.

**एक - सेक्युलॅरिझम धर्म निरपेक्षता**

महात्मा गांधींचं नाव घेतलं की, त्यांच्या सर्वधर्म समभाव आठवतो. त्यांना प्रिय असलेले 'ईश्वर अल्ला तेरा नाम आठवतं. भारतीय सेक्युलॅरिझम हा धर्मविरोधी नाही तर सर्वधर्माप्रती समान आदर बाळगणारा आहे. मात्र राज्याचा कुठलाही धर्म नसतो व तो कारभारात सर्व धर्माप्रती तटस्थ असतो. हा भारतीय संविधानाने तसेच स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधीने परिभाषित केलेला शब्द आणि विचार आहे. तेच संविधानिक मूल्य आहे.

नोव्हेंबर १९४७ मध्ये झालेल्या काँग्रेस पक्षाच्या फाळणी आणि नरसंहार स्थलांतराच्या पार्श्वभूमीवर झालेल्या महात्मा गांधी सहभागी होते या त्यांच्या शेवटच्या अधिवेशनात त्यांनी सेक्युलर शब्द वापरला होता. ते अल्पसंख्याकांच्या अधिकाराबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना म्हणाले होते, 'भारत हा इतिहास काळापासून एकात्म देश आहे आणि काँग्रेस पक्षाचे हा महान देश, एक लोकशाहीवादी सेक्युलर देश बनावा या ध्येयाचा आहे. अशा देशात सर्व नागरिक, त्यांचा धर्म कोणताही असो, त्यांना सर्व हक्काचा (भेदभाव विरहित) उपभोग घेता येईल.

महात्मा गांधींच्या या विचाराप्रमाणे संविधानकर्त्यांनी धर्म, जात, वंश, लिंग, दर्जा व जन्मस्थान आदींचा भेद न करता सर्वांना मूलभूत अधिकार

दिले आहेत. तसेच कलम २५ ते २८ द्वारे अल्पसंख्याकांसह सर्वांना धर्मस्वातंत्र्य म्हणजे आपला धर्म पाळण्याचे, प्रचार करण्याचे व आपल्या धार्मिक संस्थांचा व्यवहार सांभाळण्याचे मूलभूत अधिकार दिले आहेत. कलम २९ द्वारे अल्पसंख्याकांना त्यांची भाषा, लिपी व संस्कृती संवर्धन जतनाचे तर कलम ३० द्वारे त्यांना स्वतंत्र शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे व चालवण्याचे अधिकार दिले आहेत.

मागील पंचाहत्तर वर्षांत पंडित नेहरूंनी त्यांच्या कालावधीत सेक्युलॅरिझमचे पूर्णपणे पालन केले होते, तसेच अटल बिहारी वाजपेयींसह (त्यांच्या मर्यादा लक्षात घेऊन) २०१४ पर्यंत कमी-अधिक प्रमाणात पालन करण्याचा सर्व पंतप्रधानांनी प्रयत्न केला. नरेंद्र मोदींची मागील अकरा वर्षे पाहता, अल्पसंख्याकांचे नावही न घेता 'सबका साथ सबका विकास' हा आपला कारभाराचा मंत्र आहे असे ते म्हणत असले तरी त्यांनी केलेल्या सी.ए.ए., एन.आर.सी. आणि वक्फ बोर्डसुद्धा कायद्याबाबत मुस्लीम केवळ साशंक नाहीत, तर भयभीत आहेत. कारण कार्यपालिकेचे वर्तन, गोवंश बंदी कायद्याचा वापर करून तथाकथित गोरक्षक संशयावरून मॉब लिंचिंग करत असताना सरकारची निष्क्रियता व मौन हे सेक्युलॅरिझम विरोधी आहे, असे म्हणावे लागेल. तसेच राज्य प्रामुख्याने एक तर सार्वजनिक जीवनात धर्म विधी, भेटी आदींपासून दूर राहावे किंवा महात्मा गांधी नेहरूंप्रमाणे सर्वधर्मांच्या उत्सवात सामील होऊन धार्मिक सौहार्दाचा संदेश द्यावा हे अभिप्रेत आहे, पण मोदीजी तसे काही करीत नाहीत. त्याची अनेक उदाहरणे देता येतील वाचावेत, पण ते विद्यमान प्रधानमंत्री असल्यामुळे त्याची गरज नाही. सेक्युलॅरिझम ते हिंदुत्व ही प्रजासत्ताकाची वाटचाल दुर्दैवी आहे. त्याची दखल न्यायपालिकेने घेतली पाहिजे अशी अपेक्षा आहे, पण तेथेही अपेक्षाभंगच पदरी येतो. तेव्हा प्रजासत्ताकाचे कर्तेधर्ते म्हणून आपण भारतीय लोक सर्व धर्मांचा आदर कटाक्षाने करू या. इतर धर्मीयांना असुरक्षित वाटणार नाही, याची दक्षता घेऊ या.

**दोन - समाजवाद**

समाजवाद दूसरे तिसरे काही नसून आर्थिक समतेचे पर्यायी नाव आहे असा 'लेमन'चा अर्थ सांगता येईल. देशाच्या संसाधनाचा सर्व लोकांना लाभ

होईल आणि मूठभरांच्या हाती अधिक संपत्ती असणार नाही, असे राज्यकारभाराचे मार्गदर्शक तत्त्व संविधानात अर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्याच्या उदात्त हेतूने अंतर्भूत करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने प्रथम प्रधानमंत्री नेहरूजींनी अनेक पायाभूत स्वरूपाचे सार्वजनिक उद्योग आणि उपक्रमाची उभारणी केली. त्यामुळे लाखोंना रोजगार मिळाला आणि अर्थिक विषमता कमी करण्याचा त्यांनी मिश्र अर्थव्यवस्थेच्या अभिनव प्रयोगाद्वारे यशस्वी प्रयत्न केला. इंदिरा गांधींनी पण सामाजिक व आर्थिक लोकशाही बळकट करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे अनेक धोरणे व कृती कार्यक्रम आखले होते. पण पुढे नरसिंहरावांच्या काळापासून भारताने यू-टर्न घेत समाजवादाला सोडचिठ्ठी दिली असं टोकाचं विधान मी करणार नाही, पण त्याला बऱ्याच अंशी चासनात बांधून ठेवलं असं म्हणता येईल. आज सार्वजनिक क्षेत्र दिवसेंदिवस आकुंचित होत आहे आणि दुसऱ्या बाजूला खाजगी कारखानदारी वाढत नाही. सेवा क्षेत्रात स्टगनन्सी स्थिरता आली आहे. शेती क्षेत्राची दुर्दशा कमी न होता वर्षागणिक वाढत आहे. त्यामुळे बेरोजगारी व तीव्र आर्थिक विषमता वाढली आहे. यावर खूप काही लिहिता बोलता येईल, पण एकाच आकडेवारीने आजचे सरकार केवळ श्रीमंत व नवमध्यम वर्गाची केवळ काळजी करते व शेतकरी कामगार (खास करून असंघटित कामगार) आणि गरिबांची पर्वा (रेवडी बाटण्याखेरीज तीही मतासाठी) करीत नाही, हे स्पष्टपणे लक्षात बेईल.

लुकॉस चान्सेल व थॉमस मिकेटी या 'स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स पॅरीस'च्या अर्थशास्त्रज्ञांनी 'ब्रिटिश राज टू बिलेनियर राज?' या २०१९ च्या अहवालाद्वारे १९२२ ते २०२५ या कालखंडाचा अभ्यास करून भारतातील उत्पन्नाची विषमता सप्रमाण सिद्ध केली आहे. या अहवालाप्रमाणे १९३० मध्ये जेव्हा भारतावर ब्रिटिशांची सत्ता होती, तेव्हा सर्वांत वरच्या १% लोकांकडे देशाची २१% संपत्ती होती. स्वातंत्र्योत्तर काळात (नेहरू व इंदिरा गांधींच्या धोरणामुळे अर्थातच) सर्वांत वरच्या १% लोकांकडे १९८० मध्ये केवळ ६% संपत्ती होती. (येथे या दोघांनी संपत्तीचे नाही तर गरिबीचे फेरवाटप केले व आर्थिक विषमता वितरीत अर्थात कमी केली अशी टीका केली जाते. त्यात काही तथ्य जरूर आहे.) आणि २०१४-१५ मध्ये नवआर्थिक धोरण म्हणजे

खाउजा धोरणामुळे ११% लोकांकडे २२% संपत्ती (म्हणजेच १९३० च्या ब्रिटिश राजवटी एवढीच) होती. पण जागतिक बँकेच्या एका अहवालाप्रमाणे २०२२-२३ मध्ये भारतातील १% लोकांकडे ४०% संपत्ती होती, तर खालच्या ५०% लोकांची संपत्ती जेमतेम ६.४% होती. आज ही विषमता अधिकच वाढली आहे.

ही आकडेवारी इतकी बोलकी आहे की, त्यावर अधिक भाष्य करण्याची गरज नाही, वाढती बेरोजगारी आणि कमालीची आर्थिक विषमता पाहता आपण लोककल्याणकारी समाजवादी धोरणापासून किती अधिक प्रमाणात पी.व्ही. नरसिंहराव ते नरेंद्र मोदी व्हाया वाजपेयी व मनमोहन सिंग, घेतली आहे, हे अधोरेखित होते.

हे आपण भारतीय लोक किती काळ सहन करणार आहोत? निवडणुकीआधी रोख रक्कम कल्याणकारी कार्यक्रम म्हणून मोठ्या प्रमाणात खास करून स्त्री मतदारांना देऊन निवडणुका जिंकल्या जात असतील तर रोजी-रोटीचा व आर्थिक विषमतेचा प्रश्न कसा सुटणार? प्रजासत्ताक भारतात संविधानप्रणित आर्थिक लोकशाहीच्या व कल्याणकारी राजवट या अर्थाने सर्वोच्च न्यायालयाने परिभाषित केलेल्या समाजवाद कधीच का साकार होणार नाही? हा प्रश्न मला संत्रस्त करतो. जोरावर ममदानी परवडणाऱ्या भाड्याचे फ्लॅट्स, स्वस्त वा मोफत बससेवा आणि रास्त भावांची दुकाने या आश्वासनांवर न्यूयॉर्कचा महापौर होतो, पण भारतात तशीच धोरणे राबविणाऱ्या आप पक्षाचा दिल्लीत सपशेल पराभव होतो व बिहारमध्ये प्रशांत किशोरांचे गाव गाव पायी तुडवून मूलभूत प्रश्न लोकांपुढे ठेवून खातेही उघडत नाही... याला काय म्हणायचे? आपण या प्रश्नांबाबत सरकारकडून कशी जबाबदेही अकौंटिबिलिटी मागणार आहोत?

**तीन - संघराज्यवाद**

भारत हे संघराज्य म्हणजे युनियन ऑफ स्टेट आहे. राज्यांना बहुतांश कारभारांचे पूर्ण स्वातंत्र्य आहे व त्यासाठी राज्य सूचीमध्ये विषय निर्धारित केले आहेत, तसेच देशाच्या एकात्मता व संरक्षणासाठी केंद्राला काही विशेष अधिकार दिले आहेत, पण त्या व्यतिरिक्त केंद्रास राज्यात फारशी ढवळाढवळ करता येणार नाही, अशी संविधानाने संघराज्यवादाची व्यवस्था केली आहे.

म्हणजेच 'सहकारी संघराज्यवाद' हा त्याचा मूलमंत्र आहे. पण नेहरूंचा अपवाद वगळता सर्वच प्रधानमंत्र्यांनी त्याची कमी अधिक प्रमाणात पायमल्ली केली आहे. कलम ३५६ चा वापर करून राज्य सरकारे बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू करायची संघराज्य विरोधी कारवाई इंदिरा गांधींच्या काळात मोठ्या प्रमाणात सुरू झाली, पण त्याचा अतिरेक झाला तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने बोमई प्रकरणात निकाल देताना कलम ३५६ चा गैरवापर रोखण्यासाठी विधानसभेत प्रत्यक्ष मतदान फ्लोअर टेस्ट बंधनकारक केली, तसेच अशा प्रकरणात न्यायालय रिव्ह्यू करेल असे बंधन घालून दिले, त्यामुळे उठसूठ कायदा व सुव्यवस्था बिघडली या कारणास्तव राज्यशासन बरखास्त करण्याचे प्रमाण अत्यंत कमी झाले आहे, हे भारतीय प्रजासत्ताकासाठी योग्यच झाले असे म्हणता येईल.

पण सध्याच्या काळात राज्यपालांमार्फत विरोधी पक्षांची सत्ता असणाऱ्या राज्यांच्या कामकाजात आणले जाणारे अडथळे संघराज्यवादास सोडचिट्ठी देणे होय. त्याचा ठळक भाग म्हणजे विधान सभेने मंजूर केलेली विधेयके व कायदे मंजुरी न देता दीर्घ काळासाठी, कधी कधी दोन-दोन, तीन-तीन वर्षे प्रलंबित ठेवणे होय. याबाबत तामिळनाडू सरकारने दाद मागितली असता, दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने कलम १४२ चा वापर करीत राज्यपालांनी तीन महिन्यात व राष्ट्रपतींनी त्यांच्याकडे राज्यपालांनी विधेयक पाठवल्यावर एका महिन्यात ती मंजूर करण्याची कालमर्यादा घालून दिली. पण राष्ट्रपतींनी केलेल्या संदर्भात पाच जणांच्या खंडपीठाने अशी मुदत घालणे योग्य नाही, असे उत्तर दिले आहे. त्यामुळे राज्यपालांवर कोणताही अंकुश असणार नाही. हे स्पष्ट झाले आहे. जर संविधानिक पदावरील राज्यपाल हे पक्षीय धोरणातून व केंद्राच्या सहमतीने बिल मंजूर न करता राज्य सरकारांना काम करू देत नसतील तर सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत संरचना सिद्धान्त राष्ट्रपती संदर्भात सल्ला देताना का विचारात घेतला नाही? हा प्रश्न मला पडलेला आहे. राज्यांशी संघर्ष करून केंद्राचे विकसित भारत २९४७ चे ध्येय साकार कसे होईल? राज्यांची प्रगती हीच देशाची प्रगती असते व त्यातच प्रजासत्ताकचे सौंदर्य असते, पण आजच केंद्र सरकारचे धोरण त्याच्या विपरीत आहे.

**चार - मूलभूत अधिकार**

मूलभूत अधिकार हे मूलभूत व न्यायालयात दाद मागण्याजोगे असतात, पण ते राज्याने बिना अडथळा काही वाजवी नियंत्रणासह विनाशर्त व विनाअट भारतीय नागरिकांना भोगू दिले पाहिजेत, पण नेहरू वगळता सर्वच प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने व अनेक राज्य सरकारांनी त्याचे पुरेसे पालन केले नाही. उलटपक्षी, सहजासहजी बेल वा जामीन मिळणार नाही, असे दहशतवादावर नियंत्रण मिळवण्याच्या कारणास्तव युपा व एन.आय.ए. सारखे कायदे करण्यात आले आहेत. परिणामी निव्वळ संशयावरून पाच-पाच वर्षे अटक होऊनही कोर्टात केस उभी राहात नाही, आणि जामीनही मिळत नाही. 'न्यायालयीन प्रक्रिया हीच जालीम शिक्षा' असे आजच्या सरकारचे संविधान व कायदा विरोधी वर्तन आहे. पण दुर्दैवाने युपा कायदा सर्वोच्च न्यायालयाने संविधानिक ठरवून केंद्राला मनमानी करण्यापासून रोखण्याऐवजी खुली सूट दिली आहे.

कायदे हे धर्मनिरपेक्ष असले पाहिजेत, हे सर्वमान्य तत्त्व आहे. पण सध्याचे सी.ए.ए., एन.आर.सी., लव्ह जिहाद व गोहत्या बंदी सारखे कायदे अल्पसंख्याकांविरुद्ध खास करून मुस्लिमांविरुद्ध गैरवापरासाठीच केले आहेत की काय अशी त्याची रचना व कार्यवाही आहे. सर्वोच्च न्यायालयाने दहशतवाद वा अन्य गंभीर आरोपाखाली अटक केलेल्या माणसांची येथेही पुन्हा मुस्लिमांची घर बुलडोझर लावून पाडण्याला सर्वोच्च न्यायालयाने बंदी केली असली तरी राज्य सरकारे त्याचा वापर दबंगगिरी दाखवत करतात, हे किती अमानवी आहे. पण हे सर्रास होत आहे. त्यामुळे जान आणि मालाचे रक्षण करण्याच्या कर्तव्याचे सरकारकडून पालन होत नाही, हे चिंताजनक आहे. हे जंगलराज नाही का?

मूलभूत अधिकारात अभिव्यक्ती स्वातंत्र्य सर्वांत मौलिक अधिकार आहे, पण सरकारविरुद्ध रास्त व संयमी टीका पण देशद्रोह मानण्यांची नवीनच नीती सध्या विकसित झाली आहे. कुणाल कामरा व वरुण ग्रोव्हर या स्टैंडअप कॉमेडियन वरचे खटले घ्या की पत्रकार बुद्धिमंताला अकारण कैद करणं (उदाहरणार्थ भीमा-कोरेगाव प्रकरणात अटक केलेले बुद्धिमंत) व त्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेणं किती लोकशाही विरोधी आहे. त्याबाबत अधिक तपशीलात जाण्याची गरज नाही. पण भारतीय लोकशाही

प्रजासत्ताकाला हे शोभणारे नाही, हे तर संविधानाने लोकांना दिलेल्या मूलभूत अधिकाराचे सरळ सरळ हनन आहे.

सरकारला कायद्याने व संविधानिक नैतिकतेनं वागलं पाहिजे. पण आज असं घडत नाही. म्हणून तुम्ही-आम्ही भारताचे सार्वभौम लोक का चूप आहोत हा माझा सवाल आहे. महात्मा गांधींचे विचार व त्यांचा सत्याग्रहच आपणास मार्ग दाखवू शकेल, पण आपण गांधींना तसेच संविधानिक नैतिकतेचा आग्रह धरणाऱ्या डॉ. आंबेडकरांना विसरून गेलो तर आपण निर्माण केलेल्या लोकशाही प्रजासत्ताकाचे काय होणार याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे, एवढे अधोरेखित करून लेखणीस विराम देतो.

■ ■ ■

# भारतीय प्रजासत्ताकापुढील आव्हाने आणि स्वयंसेवी संस्थाचे कार्य

❒ डॉ. डी. एस. कोरे

भारतीय संविधान लिहिण्याची प्रक्रिया डिसेंबर १९४६ ला सुरू होऊन ती २६ नोव्हेंबर १९४९ ला संपली. आपले संविधान २६ जानेवारी १९५० पासून लागू झाले, त्याला आता ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. सांसदिय लोकशाही प्रणाली आपण स्विकारुन देश एका नव्या युगात प्रवेश करता झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाचा मसुदा लिहिला त्यामुळे त्यांना संविधानाचे निर्माते म्हटले जाते. भारतीय घटनाकारांनी संघराज्य प्रणाली स्विकारून केंद्र व राज्याना स्वतंत्र अस्तित्व दिले. या दोन्हीमध्ये अधिकारांची विभागणी करुन संघसूची, राज्यसूची आणि मध्यवर्तीसूची निर्माण केली. परंतु राजकीय उलथापालथीमध्ये राज्य हळूहळू केंद्राकडे आर्थिक मदतीसाठी अवलंबून राहू लागली. केंद्रात जर विरोधी पक्षाचे सरकार असेल तर राज्यांना अपेक्षित निधी मिळणे अवघड जाऊ लागले. संघ राज्यामध्ये राज्यांना महत्व आहे. परंतु १९५२ ते २०२४ पर्यंत झालेल्या लोकसभा निवडणूकीत वेगवेगळ्या पक्षांची सरकारे आली. त्यात काँग्रेस आणि भाजपा या दोन पक्षांची सरकारे अधिक काळ देशावर राहिली. आता जरी भाजपा प्रणित सरकार असले तरी ते संविधानांमुळे सत्तेत आले आहे. लोकांनी लोकांसाठी लोकांनी निवडलेले सरकार अशी बिरुदावली लावले जाते. परंतु या पुस्तकी व्याख्येनुसार केवळ सत्ता मिळवून सत्ता राबवतो याला महत्त्व असून जे सरकार बनवू शकले नाहीत असे लोक प्रतिनिधी सुद्धा याच लोकशाही प्रक्रियेचे घटक असतात. राज्यकारभार लोकांच्या संमतीने चालतो आणि तो कारभार नीट चालतो किंवा नाही हे टिकात्मक प्रक्रियेतून मार्गक्रमण करत असतो. प्रत्यक्ष सत्ता हस्तगत करण्याची प्रक्रिया आणि सत्ता

मिळाल्यानंतरची प्रक्रिया यात महद्तंर आहे. लोकशाही मुलतः कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ याबरोबरच वृत्तपत्र/माध्यम हा चौथा खांब म्हणता येईल. लोक आपला प्रतिनिधी कायदेमंडळात निवडून पाठवतात, कार्यकारी मंडळाचा सदस्य सरकार बनवल्यावर सर्व लोकशाही व्यवस्थेवर ताबा मिळवतो व त्याला आपल्या मर्जीने वापरत असतो, असे आतापर्यंतच्या मध्यवर्ती शासकाच्या वर्तनावरुन आढळून आले आहे. लोकशाहीपुढे जी आव्हाने आहेत त्यात स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधूता अशा लोकशाही तत्त्वाची उपेक्षाच होताना दिसत आहे. सामाजिक असमानता (जातीय, धार्मिक कट्टरपणा), प्रादेशिकता, आर्थिक दारिद्रय, भाषेची समस्या, शैक्षणिक दरी, बेरोजगारी, धार्मिक/प्रांतीय झुंडशाही या बाबी देशाच्या एकात्मतेला तडा आणणाऱ्या आहेत. एकेकाळी देशाने फुटीरतेमुळे हिंसाचार, राखीव जागामुळे मंडल आंदोलन, राम जन्मभूमी व आयोध्येतील राममंदिर यामुळे झालेले देशभर आंदोलन. विविध भागात धार्मिक दंगलींचा उच्छाद यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला तडा जाईल की काय अशी स्थिती निर्माण झाली होती. बाबरी मशीद विध्वंसानंतर राम मंदिर तयार होईपर्यंत एक राजकीय पक्ष मागे पडून दुसरा देशाच्या गादीवर आला आहे. जरी निवडणूकीद्वारे सत्तेचे हस्तांतर सुरळीत झाले असले तरी या राजकिय साठमारीत संविधानिक मुल्यांची आणि तत्वांची पायमल्ली ही झालेली आपण पाहत आहोत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नाचा प्रजासत्ताक :**

प्रा. अवयी रामय्या यांनी डॉ. बाबासाहेब यांच्या विचारांना अधोरेखित करताना म्हटले आहे की, यशस्वीरित्या संविधानाची अंमलबजावणी झाल्यास लोकशाही यशस्वी होईल अन्यथा कितीही चांगले संविधान असले तरी ती अंमलात आणणारी व्यक्ती चांगली नसेल तर संविधान चांगले असून काय उपयोग?

शासनाचा असा एक प्रकार आणि पद्धत, ज्याद्वारे लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतीकारी बदल रक्तपात न करता घडवून आणले जातात.[१]

लोक प्रौढ मतदानाद्वारे नियमित होणाऱ्या निवडणूकीद्वारे आपले राजकिय हक्क बजावतात तेव्हा ती लोकशाही असते. परंतु सामाजिक जीवनात लोक

आर्थिकदृष्ट्या वेगवेगळ्या पातळीवर असतील तर ती लोकशाही कितपत यशस्वी होईल? केवळ राजकिय स्वरुपाची लोकशाही लोकांमध्ये एकमेकांप्रती आदर निर्माण करणार नाही. जर सामाजिक लोकशाही असेल तर एकमेकांसोबत आदराने वागतील. हे सामाजिक लोकशाहीचे लक्षण असेल.

डॉ. बाबासाहेब सामाजिक लोकशाहीविषयी म्हणतात की, सामाजिक लोकशाही म्हणजे असा जीवन मार्ग, जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वांवर आधारित असतो. ही तीनही तत्वे त्रयीतील वेगवेगळे घटक म्हणून पाहता कामा नयेत. समता नसल्यास, स्वातंत्र्यामुळे मोजक्या लोकांचे बहुसंख्यावर वर्चस्व निर्माण होईल. स्वातंत्र्याशिवायची समता व्यक्तीची पुढाकार घेण्याची क्षमता नष्ट करेल. बंधुतेच्या अभावात स्वातंत्र्य आणि समता ही तत्वे नैसर्गिकरित्या व्यवहारात येऊ शकत नाहीत. ती लागू करण्यासाठी पोलिसांचा धाक हवा.[२]

थोडक्यात भारतीयामध्ये एकमेकांमध्ये बंधुता नसेल तर लोकशाही हा केवळ उपचार ठरेल. लोकशाही यशस्वी होण्यासाठी त्यांनी काही आवश्यक बाबींची नोंद केली आहे.

**१) मजबूत विरोधक - विरोधी पक्ष**

२) मुक्त व निष्पक्ष निवडणूक - निष्पक्ष निवडणूक आयोग असणे आवश्यक अट आहे. आपला प्रतिनिधी निवडायचे आहे. हे लोकांना याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे.

३) मोठ्या औद्योगिक घराण्यांनी निवडणूकीवर प्रभाव पाडू नये, अशी अपेक्षा केली होती. समाजात कोणत्याही प्रकारची स्पष्ट व तीव्र असमानता नसणे. समाजात समानता हवी.[३]

४) कायदा व प्रशासनात समानता - कायदे करणारे वरिष्ठ जातीचे व श्रीमंत निवडून गेले तर तेथे गरीबांना न्याय मिळणार नाही.[४]

५) संविधानिक नैतिकतेचे पालन. सत्ताधाऱ्यांनी संविधानिक नैतिक मूल्याचे पालन केले पाहिजे.

६) बहुमतातील पक्षाने अल्पमतातील पक्षावर कोणत्याही प्रकारे अन्याय्य वर्चस्व गाजवू नये.

७) धर्माधारित बहुसंख्याक समुदाय हा राजकियदृष्ट्या अल्पमतात आहे

म्हणून वागवला जाऊ नये.

८) समाजात नैतिक मूल्यांची आणि सदाचाराची स्थिती असणे.

९) समाजात सार्वजनिक विवेकबुद्धी किंवा सामुहिक नैतिक जाणीव अस्तित्वात असणे.

१०) लोकांनी आपल्या पंथ, जात, धर्म किंवा संप्रदायापेक्षा देशाला अग्रस्थान द्यावे.

११) लोकशाही टिकविण्यासाठी तीन आवश्यक गोष्टी आहेत.

अ) लोकांनी आपल्या सामाजिक व आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी संविधानिक मार्गाचा अवलंब केला पाहिजे. याचा अर्थ असा की, लोकांनी क्रांतीचा हिंसक मार्ग (जसे असहकार, सत्याग्रह, सविनय कायदेभंग आदी) असंविधानिक मार्गांचा त्याग केला पाहिजे.[५]

ब) नागरिकांनी आपले स्वातंत्र्य एखाद्या महान व्यक्तीच्या पायाशी अर्पण करु नये किंवा त्याच्यावर विश्वास ठेवू नये की, तो आपल्या संस्थाच उलथवू शकेल. देशासाठी आयुष्यभर सेवा केलेल्या महान व्यक्तीबद्दल कृतज्ञता बाळगण्यात काहीच चुकीचे नाही. परंतु राजकारणात "भक्ती" किंवा व्यक्तीपूजा ही अधःपतनाकडे नेणारी आणि अखेर हुकूमशाहीकडे नेणारा मार्ग ठरू शकतो.

क) लोकांनी केवळ राजकिय लोकशाहीवर समाधान मानू नये. त्यांनी राजकिय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीमध्ये रूपांतर केले पाहिजे.

सामाजिक लोकशाहीच्या पायावरच राजकिय लोकशाही टिकू शकते. लोकशाहीमुळेच समाजातील लोकांच्या परस्पर संबंधात, त्यांच्या एकत्र जीवनपद्धतीत (ती) शोधली पाहिजे.[५]

याचा अर्थ असा की डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीसाठी सामाजिक लोकशाही आवश्यक समजतात, मजबूत विरोधी पक्ष असावा. मुक्त व निष्पक्ष निवडणूक व्हाव्यात. निवडणूक आयुक्त निष्पक्ष हवा. आजच्या स्थितीत दोन्हीची ही वानवा आहे.

प्रजासत्ताक सशक्त आणि अधिक मजबूत करण्याचे कार्य स्वयंसेवी संस्था आणि देशप्रेमी व्यक्ती यांनी केले आहे. राजकिय लाभाचे लाभार्थी आजच्या स्थितीत लोकशाहीच्या स्तंभाना खिळखिळे करण्याचे व प्रजासत्ताक कमजोर

कसे होईल यासाठी प्रयत्न करताना दिसत आहे. राजकिय पक्ष केवळ निवडणूक लढवणे व जिंकणे एवढ्या एकाच परिघाभोवती फिरत आहेत. त्यासाठी समाज जात, धर्म, भाषा, प्रांत आणि उपकाराच्या ओझ्याखाली दबलेला आहे. जेव्हा संविधान भारतीय लोकांप्रती अर्पण केलेले आहे. याचा अर्थ हे संविधान लोकांचे आहे व आम जनतेच्या भवितव्याचा तो आद्यग्रंथ आहे. परंतु या संविधानाने निर्मित प्रजासत्ताकाला कमजोर करण्याचे काम राजकिय पक्ष आणि आर्थिक हिताकडे डोळे ठेवून वागणारे उद्योगपती होत. उद्योगपती आणि राजकारणी धर्माचा फार खुबीने वापर करून सत्ता ताब्यात घेत आहेत. या देशाला भेडसावणाऱ्या आजच्या प्रश्नाकडे शहामृगाप्रमाणे वाळूत डोके खूपसून ते बसले आहेत.

**आजचे प्रश्न :**

**अ) राजकीय प्रश्न :**

१) राजकारणातील गुन्हेगारी - राजकारणी व गुन्हेगारांच्यात नेक्सस आहे.

२) निवडणूकीत हेराफेरी - आजकाल मतचोरीचा प्रचार जोरात सुरु आहे. मतदान टक्का अचानक फुगलेला आढळत आहे.

३) राजकीय बांधिलकीचा राजकिय पक्षांना अभाव.

४) पक्षफुटीची लागण - महाराष्ट्रात मागील काळात दोन पक्ष फुटून राजकीय उलथापालथी घडल्या आहेत आणि संविधानिक नैतिकता गुंडाळून ठेवलेली आढळते.

५) जातीय-धार्मिक कट्टरता वाढून दोन धर्मात तेढ वाढवण्यात आले आहे.

६) प्रशासनाची संविधानाशी फारकत - संविधानांतर्गत संस्था खिळखिळ्या केल्या जात आहेत.

७) भ्रष्टाचार - सर्वच क्षेत्रात वाढला आहे.

८) सिद्धांत आणि कृतीत जमीन अस्मानाचा फरक झाला आहे.

९) न्याय व्यवस्थेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह. कारण प्रकरणे दिर्घकाळ रेंगाळत आहेत.

१०) पूर्व भारताचा गंभीर प्रश्न, कश्मिर प्रश्न गुंतागुंतीचा झाला आहे.

कश्मिरची विभागणी करूनही अतिरेकी कारवाया थांबलेल्या नाहीत.

**ब) आर्थिक प्रश्न :**

१) उदारीकरणाचे नकारात्मक परिणाम - देशाच्या जीडीपीत प्रगती अल्प.

२) किमतीमध्ये वाढ - महागाई प्रचंड वाढून सामान्यांना जीवन जगणे अवघड बनले आहे.

३) गरीबीचे सार्वत्रिकरण - गरीब व श्रीमंतांमध्ये वाढते अंतर. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत.

४) वाढती बेरोजगारी - रोजगाराचे घटते प्रमाण व अल्पसंधी यामुळे बेरोजगारी वाढली आहे.

क) सांस्कृतिक समस्या :

जागतिकरणाचे संस्कृतीवर अतिक्रमण - समाजात नैतिक मूल्यांचा ऱ्हास. व्यक्ती अधिक स्वकेंद्री बनला असून समाज आणि कुटूंब याच्या विषयीची समज बोथट बनत चालली आहे.

**ड) सामाजिक प्रश्न :**

१) महिलांवरील वाढते अत्याचार. त्यामुळे महिला असुरक्षित आहेत.

२) शिक्षणाचा दर्जा घसरला. खाजगीकरणामुळे गरीबांना शिक्षण महाग झाले आहे.

३) कुपोषण - मोफत धान्य ८० कोटी लोकांना देऊनही कुपोषण ही समस्या काही राज्यात आजही आहे. कुपोषणामुळे श्रम करणारांचे प्रमाण घटून देशाच्या विकासात ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

**यावरील उपाय :**

१. सामाजिक व राजकीय हक्कासाठी स्वयंसेवी संस्थाचे कार्य महत्वाचे ठरले आहे. स्वयंसेवी संस्था पारंपरिक कार्याबरोबर पुढील प्रकारचे कार्य ही करत आहे.

१) डिजीटल साक्षरता वाढविणे - गरीबांना या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली जात आहे.

२) सायबर क्राईम कमी करणे - जाणीव जागृती कार्यक्रम.

३) ग्रामीण भागात वैज्ञानिक दृष्टिकोण वाढीस लावणे.

४) अंधश्रद्धा निर्मूलन करणे. अंधश्रद्धा निर्मूलन संस्था यासाठी कार्यरत आहेत.

५) गुन्हेगारीचे प्रमाण कमी करणे.

६) व्यावसायिक, सामाजिक जबाबदारी निभावणे.

७) प्रदूषण नियंत्रणासाठी कार्य. वृक्ष तोड थांबण्यासाठी चिपको आंदोलन.

८) आपत्ती काळात स्वयंसेवी मदत. पूर, त्सुनामी इ. काळात मदत.

९) संकटकाळात निधी जमवून मदत करणे.

१०) आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संरक्षण, महिला जागृती, महिला अत्याचाराविरोधी कार्य इ. उपक्रम स्वयंसेवी संस्था हाती घेतात.

११) विविध मानवी हक्काविषयी जाणीव-जागृती करणे आणि प्रसंगी उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात दाद मागणे.

गेल्या ७५ वर्षात स्वयंसेवी संस्थापैकी काही संस्थानी उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात संविधानातील हक्काच्या उल्लंघनाविरुद्ध दावे दाखल केले आहेत. त्यात कुपोषण, तुरुंगातील कैद्यांचे आरोग्य, त्यांचे हक्क आणि पूनर्वसनाकरिता दावे केले आहेत. या प्रकारचे दावे भारतीय प्रजासत्ताकाच्या सशक्तीकरणासाठी मदतकारी ठरले आहेत. निवडणूकीला उभे असणाऱ्या राजकीय व्यक्तींनी आपली खरी व संपूर्ण माहिती जाहिर केली पाहिजे यासाठी दावा केला गेला. सर्वोच्च न्यायालयाने यात आदेश दिल्यामुळे निवडणूक लढवणाऱ्या व्यक्तीची सांपत्तिक, शैक्षणिक, गुन्हेगारीविषयक माहिती भारतीयांना उपलब्ध झाली. दंगलपिडित व्यक्ती, कस्टडीतील मृत्यू व महिलांवरील अत्याचार, समलैंगिक संबंधाविषयीचे गुन्हेगारी कलम असणारे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात अंतिम निर्णयाप्रत गेले. पर्यावरण, स्वच्छ हवा मिळणे हा मुलभूत अधिकार ठरविला. आधार कार्डातील माहिती ही खाजगीपणाच्या अधिकार कक्षेत आणली. आदिवासी यांच्या जंगल जमिनीच्या हक्काची पुनर्स्थापना करता आली. वेठबिगारी विरुद्ध ठोस कृती करण्यास सरकारला न्यायालयाने आदेश दिले. जलद न्याय निवाडा करण्यासारखे, कोठडीतील मृत्यूसाठी योग्य ती भरपाई देण्याचे आदेश दिले. जेल व पोलीस व्यवस्थेत कालबद्ध सुधारणा करण्याचे निर्देश. इंटरनेटवरील अधिकाराचे आणि माहिती अधिकाराचे रक्षण न्यायालयाने आपल्या आदेशाने केले. कुपोषण होऊ नये म्हणून सरकारला

मोफत धान्य व मध्यान्ह भोजनासाठी तरतूद करण्यासाठी स्पष्ट निर्देश दिल्यामुळे सरकारने ८० कोटी लोकांना मोफत धान्य योजना राबवली. शालेय पोषण आहारात सुसुत्रता ठेवून सातत्य ठेवण्याचे निर्देश दिले. महिलांच्या कल्याणाविषयी विशेष उपाय करण्याचे निर्देश वेळोवेळी दिले. वारसा हक्काने महिलांना संपत्तीमध्ये वाटा २००५ पूर्वी दिलेल्या निकालाने सरकारला कायद्यात दुरस्ती/सुधारणा करावी लागली. सरोगेट मदरच्या हितासाठी नियमावली बनवण्याचे निर्देश दिल्यानंतर सरकारने २०२१ मध्ये यासंबंधी कायदा बनवला. मतदार यादीमध्ये नाव नोंदवण्यासाठी ओळखपत्र म्हणून आधारचा समावेश करण्याचे निर्देश दिले.

हे सर्व निर्णय जरी असले तरी सर्वोच्च न्यायालयाने सर्व प्रश्नावर अंतिम निर्णय घेतला नाही. आर्थिक बाबी इत्यादीवर स्वतंत्र निर्णय घेण्यास सरकारला सांगितल्यामुळे काही विषय तसेच प्रलंबित आहेत.

विशेषतः महाराष्ट्रातील पक्षफुटीचे प्रकरण, पक्षाच्या चिन्हाचा वाद, शबरीमाला प्रकरणाची पुन्हा सुनावणी घेण्याचा निर्णय, राखीव जागामध्ये ५० टक्क्याची मर्यादा असल्यामुळे त्याला काही अंतिम तोडगा ना राजकिय प्रक्रियेतून निघू शकला किंवा न्यायालयीन प्रक्रियेतून, यासाठी संविधानात दुरुस्तीतून निघेल असे वाटते. मराठा राखीव जागांचा हा विषय असाच महाराष्ट्रातील कोट्यावधी लोकांच्या जीवनाशी निगडीत आहे.

जेव्हा राजकारणी राजकिय प्रक्रियेतून प्रश्न सोडवत नाहीत व प्रश्न सोडवण्याचे टाळतात तेव्हा अशी काही महत्वाची प्रकरणे न्याय व्यवस्थेपुढे प्रलंबित आहेत. स्वयंसेवी संस्थाचा दबाव महत्वाचा आहे.

पीयुसीएल, कॉमन कॉज, बंधुआ मुक्ती मोर्चा, एम.सी. मेहता, वॉचडॉग, नाझ फाऊंडेशन, पेटा इंडिया प्लस, इंडिया अगेन्स्ट करप्शन, ह्युमन राईट्स लॉ नेटवर्क (जेलमधील कैद्यांच्या मानसिक आरोग्यासाठी दावा करणारी संस्था), एडीआर (इलेक्ट्रॉल बॉंड बेकायदेशीर ठरवले.) पण तो गुन्ह्याच्या कक्षेत आणला नाही.

राजकिय प्रक्रिया जेव्हा टोकाची एकाधिकारशाही बनते तेव्हा स्वयंसेवी संस्था व व्यक्ती भारतीय प्रजासत्ताकची ढासळलेली प्रकृती सुधारण्यासाठी जसे रस्त्यावरची लढाई लढतात. तसेच न्यायालयीन लढाईही लढतात. वरील

संस्था केवळ उदाहरणासाठी दिलेल्या आहेत.

एका महत्त्वाच्या ग्रंथाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

स्टीव्हन लेव्हिट्स्की व डॅनिएला झिब्लॅट यांनी लिहिलेल्या ग्रंथात व्हेनेझुएला, हंगेरी, तुर्की, रशिया, अमेरिकेतील ट्रम्प यांचा प्रथम कार्यकाल यावर लिहिलेल्या ग्रंथात आहे. त्यातील महत्वाचे सूत्र म्हणजे लोकशाही व्यवस्था कोणत्या घटकामुळे मरतात. व्यवस्था कशी ढासहते? यात त्यांनी प्रामुख्याने पुढील घटक कारणीभूत असल्याचे म्हटले आहे.

१) न्यायव्यवस्था - निष्पक्ष नसणे.

२) निवडणूक आयोग - निष्पक्ष नसणे.

३) मुक्त असणारे प्रसार माध्यमे आणि सरकारच्या इशाऱ्यावर काम करणे.

४) कायदा व सुव्यवस्था यांचे सत्ताधाऱ्यासाठी असणारे काम.

वरील चारही व्यवस्था आज आम जनतेच्या अपेक्षा फोल ठरवत आहेत. सत्ताधारी वर्गाने या चारही संस्थाचा ताबा घेतला आहे व आपल्या स्वार्थासाठी राबवून घेत आहेत. त्यामुळे भारतीय प्रजासत्ताक एका वेगळ्या संक्रमण अवस्थेतून मार्गक्रमण करत ७आहे.

**संदर्भ :**


१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे खंड १७(३) : पृष्ठ ४७५

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे खंड ४ : पृष्ठ २८३

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे खंड १७(३) : पृष्ठ ४२७

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे खंड, खंड १७(३) : पृष्ठ ४७५, खंड १ : पृष्ठ ५०, खंड १३ : पृष्ठ १२१४, खंड १७ (३) : पृष्ठ ५१९

5. Avatthi Ramaiah : Challenges to democracy in India : insights of Dr. B. R. Ambedkar Mainstream weekly, Vol 63 No 1, January 4, 2025

6. Steven Levistsky And Daniel Zibaltt : How Democracies Die What history reavels about our future : Penguin Random House : 2019

7. Granville Austin : The Indian Constitution : Cornerstone of a nation Oxford : 2018.

8. Gautam Bhatia : The transformative constitution : A Radical Biography in nine Acts, Harpercollins publishers India : 2021
9. Durgadas Basu : Introduction to the Constitution of India : LexisNexis : 2022
10. Ashok Gopal : A part Apart : The life and thought of B. R. Ambedkar : Navayana publishing house pvt Ltd 2023

■■■

# प्रजासत्ताक भारत

❒ डॉ. विवेक कोरडे

नंदलाल पाठक यांनी लिहिलेले आणि जगदीश सिंग, चित्रा सिंग यांनी गायिलेले 'माँ सुना दे मुझे वो कहानी, जिसमें राजा न हो ना हो रानी' हे गाणं तरुणपणात अधूनमधून कानावर पडायचं, आजही पडतं. त्यावेळी या गाण्यातून गीतकाराला नेमकं काय म्हणायचं आहे, हा विचार तेव्हा केला नाही वा तसा विचार करायची कुवत तेव्हा नसावी. पण आज जेव्हा ते गाणं ऐकतो तेव्हा त्या दोन ओळीतच मला भारतीय प्रजासत्ताकाला नेमकं काय साधायचं आहे, याचे उत्तर सापडतं. अगदी सोप्या पण मनाला भिडणाऱ्या शब्दात प्रजासत्ताकाचा अर्थ माझ्यापुढे उलगडतो.

आमची पिढी आणि कदाचित आमच्या आधीच्या बऱ्याच पिढ्या राजा-राणीच्या गोष्टी ऐकत, वाचत वाढल्या. त्यातल्या राजाला बऱ्याचदा दोन राण्या असायच्या. त्यातली एक आवडती आणि दुसरी नावडती हे ठरलेलंच. मग त्या नावडत्या राणीचं दुःख, ते दुःख एक दिवस कसं संपलं, राजाला कशी उपरती झाली, वगैरे वगैरे. आता नावडतीच्या दुःखाचं निवारण झाल्यावर आवडतीचं काय व्हायचं किंवा मुळात राजाने दोन लग्नच का केली, असले किरकोळ प्रश्न पडण्याचा तो काळ नव्हता. ते प्रश्न गोष्टी सांगणाऱ्यांच्या व ऐकणाऱ्यांच्या कित्येक पिढ्यांना कधी पडले नव्हते. आणि पडण्याची शक्यताही नव्हती.

दुसऱ्या कथा, राजांच्या ऐश्वर्याच्या, त्याच्या दानशूरपणाच्या असायच्या. राजा एखादा यज्ञ करायचा. मग त्या यज्ञात काही मण तूप, धान्य वगैरेंची आहुती पडायची. अजून काय काय घडायचं. मग शेवटी दान द्यायला सुरुवात व्हायची. सोनं, चांदी, हजारो गायी, गावंच्या गावं पुरहितांना दान

केली जायची. यज्ञानं राजा तृप्त व्हायचा आणि दक्षिणेत मिळालेल्या धनसंपत्तीनं पुरोहित म्हणजे ब्राह्मणही तृप्त व्हायचे. राजाने ब्राह्मणांना खुश करायचं आणि ब्राह्मणांनी राजाला भरभरून आशीर्वाद द्यायचे. राजाने ब्राह्मणाला गुरु म्हणायचं आणि ब्राह्मणांनी राजाला भूलोकीचा देव म्हणायचं, राजाच्या आज्ञेचं उल्लंघन करणे म्हणजे पाप आहे असं म्हणायचं. अशी परस्परांना सांभाळत उर्वरितांची लूट करणारी व्यवस्था वर्षानुवर्ष सुखनैव चालली होती. ही सारी संपत्ती एकाच ठिकाणी का आहे आणि काही ठराविक वर्गांकडे संचित का होते हा प्रश्न पडण्याची शक्यताच नव्हती कारण सर्वसामान्य जनता म्हणजे प्रजा, ही काहींची चंगळ करण्याचे धर्मसंमत कर्तव्य निभावण्यासाठीच असते, कष्ट करण्यासाठीच असते, यावर बहुसंख्य वरिष्ठ वर्ण आणि वर्गीयांमध्ये एकमत होते. दुसऱ्या विचाराला स्थान मिळण्याची शक्यता नव्हती. राजसत्ता धर्मसंस्थेचे आशीर्वाद मिळवण्याच्या खटाटोप असायची आणि धर्मसत्ता हक्काचा दानधर्म स्वीकारून राजावर स्तुतीसुमनांचा वर्षाव करायची, असा सारा आनंदकल्लोळ होता.

आज प्राचीन राष्ट्र, उदात्त संस्कृती, सर्वश्रेष्ठ धर्म वगैरे गोष्टी घोळवून घोळवून सांगितल्या जातात. पण देशात राष्ट्रीय भावनेचा पूर्ण अभाव होता. देवाचा भूतलावरील अवतार समजले गेलेले राजे-महाराजे एकमेकांवर चाल करत असत. युद्ध हा व्यवसाय होता. युद्धाने राज्यविस्तार झाला की राष्ट्राच्या व राजाच्या सीमा बदलायच्या. लोक नव्या राजाला सहज स्वीकारत. अशा प्रकारची राजनिष्ठा लोक बाळगत असत. कायदा राजाचा असे. सोयीप्रमाणे वापरला जात असे. मनुस्मृती प्रत्येक वर्णासाठी अलग कर्तव्य आणि अधिकार ठरवून द्यायची. धर्मपीठे मनुस्मृतीचा कायदा वापरण्यासाठी उत्सुक असायची. राजा त्याच्या मनाला वाटेल तसा न्याय द्यायचा. माणसाच्या कष्टाला फारशी किंमत नव्हती तर माणसाला कुठून असणार?

वर्णाश्रम व्यवस्थेप्रमाणे जातीव्यवस्थाही बळकट होती. प्रत्येक जातीचे कर्म, व्यवसाय ठरवून दिले होते. त्या व्यवसायामध्ये त्या जातीचे हितसंबंध होते त्यामुळे ही व्यवस्था एखादी बुलंद तटबंदी असल्यासारखी भक्कम होती. या व्यवस्थेत प्रत्येक जण धर्मपालनाच्या नावे आपापली नेमून दिलेली जबाबदारी निभावत होता. फार मोठ्या समुदायाच्या नशिबी अतीव कष्ट आणि उपासमार

होती. या उपाशी लोकांसाठी आपल्या पत्रावळीत थोडे जास्त उष्टे सोडण्यात औदार्य मानले जात होते. आणि अशी ही संस्कृती महान संस्कृती म्हणून मिरवली जात होती, आजही मिरवली जाते. या सर्वाचा एक परिणाम इतिहासात अनेकदा पाहायला मिळाला, तो म्हणजे, राजा स्वदेशी असला वा विदेशी असला वा कोणीही असला, तरी प्रजा त्याचा स्वीकार करत होती. कारण प्रजेच्या वाट्याला येणारे कष्ट आणि उपासमारीत राज्यकर्त्यांमुळे, अपवाद वगळले, तर फार फरक पडत नव्हता. लाथ स्वकीयाने मारली की मखमली आणि परक्याने मारले की काटेरी असा फरक लाथ खाणारा करू शकत नाही. परिणामी राष्ट्रीय भावना, हा देश आपला असल्याची भावना जवळजवळ नव्हतीच. सामाजिक ऐक्याचाही अभाव होता. परिणामी देश परकीयांच्या ताब्यात गेला. त्याचीही प्रजेला खंत वाटली नाही याचं कारण त्यांना सर्व राज्यकर्ते सारखेच वाटत होते. याचं प्रत्यंतर आपल्याला १७५७ची प्लासीची लढाई रॉबर्ट क्लाइव्हने त्याच्याकडे फार थोडं सैन्य असतानाही स्वकीयांमध्ये झालेल्या फितुरीमुळे जिंकली यातून येतं. एका आत्मचरित्रपर लेखात तो लिहितो, लढाई जिंकल्यावर मी जेव्हा प्लासी गावात जायला निघालो, तेव्हा आम्हाला बघायला रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या संख्येने लोक जमले होते. त्यातील प्रत्येकाने एक एक दगड जरी फेकला असता तरी मी सैन्यासह गाडला गेलो असतो. पण तसं घडलं नाही. घडण्याची शक्यताच नव्हती.

ही झाली सामान्य प्रजेची गोष्ट. जे स्वतःला फार ज्ञानी, गुरु वगैरे समजत होते, लोकांना ब्रह्मज्ञानाचे डोस पाजत होते ते काय करत होते? ते देखील राष्ट्रनिष्ठा वगैरे बाबतीत सामान्य लोकांपेक्षा वेगळे नव्हते. १७५७ची स्थिती आपण पाहिली, आता १८१८ मध्ये म्हणजे साठ वर्षांनी काय परिस्थिती होती ते आपण पाहूया. १८१८मध्ये मुंबईच्या गव्हर्नरने, लॉर्ड एल्फिन्स्टनने पेशव्यांचा पराभव केला. पुण्यातल्या पेशव्यांनी पाळलेल्या भिक्षुक ब्राह्मणांना त्याने बोलवून घेतले. म्हणाला, आता मी शनिवार वाड्यावर युनियन जॅक फडकवणार आहे, तुमचं काय म्हणणं आहे? भूतलावरच्या सर्वश्रेष्ठ ब्राह्मण मंडळींनी त्याला विचारले, आमच्या दक्षिणेचं काय? एल्फिन्स्टनने त्यांना दक्षिणा घरपोच मिळेल असे म्हटले आणि आमच्या ब्राह्मण मंडळींनी

पेशव्यांचा ध्वज उतरवून युनियन जॅक चढवला जात असताना वेदमंत्रांचा घोष केला. यातून तथाकथित उच्चवर्णीयांची मानसिकताही स्पष्ट होते. हे कमी म्हणून की काय भारतीय समाजात आणखी एक दोष होता. भारतीय समाजाला वरिष्ठवर्णीयांनी त्यांचे धर्मराज्य सुवासित चालावे म्हणून विभूतिपूजक बनविले होते. कुणाला तरी आपले सर्वस्व वाहायचे आणि आपण फक्त अज्ञापालन करत. गुलाम बनून राहायचे, ही भारतीय समाजाची मानसिकता होती. अशा मानसिकतेच्या देशात सामाजिक परिस्थिती काय असणार, यावर वेगळं लिहायची गरज नाही. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत देशात गुलामांचे बाजार भरत. ते ब्रिटिशांनी कायदा करून बंद पाडले. बटकी देवदासी, भोग मागत फिरणाऱ्या योगिनींचे तांडे आणि त्या साऱ्यांचे शोषण सुखनैनपणे पाहणारा समाज, ही देशाची एकंदर अवस्था होती. चार्वाकांची नास्तिक परंपरा, समतेची शिकवण देणारी संत परंपरा, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात चालविण्यात आलेल्या सामाजिक सुधारणांच्या चळवळी, याचा थोडाफार परिणाम झाला, पण सामाजिक मानसिकतेत फारसा बदल घडला नाही. ती दैववादी, परंपरावादी, विभूतिपूजकच राहिली. महात्मा गांधींनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातून उभारलेल्या स्वातंत्र्य चळवळीखेरीज अन्य कोणत्या मार्गाने भारत स्वतंत्र झाला असता तर भारत लोकशाही प्रजासत्ताक भारत झाला असता का, या प्रश्नाचे उत्तर फारसे आशादायक येऊ शकत नाही. महात्मा गांधींनी देशातल्या सर्वच घटकांच्या, महिलांच्या, शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या, अस्पृश्यांच्या इतकच नव्हे तर अगदी व्यापारी-भांडवलदारांच्या उत्थानाचा आशय भारतीय स्वातंत्र्य लढ्याशी जोडला. जात, धर्म, प्रांत, भाषा, संस्कृती भिन्न असली तरी आपण सारे भारतीय आहोत ही भावना निर्माण केली. राष्ट्रवाद जागवला आणि राष्ट्रही जागवले म्हणूनच स्वतंत्र, सार्वभौम, भारत निर्माण होणे शक्य झाले. संविधानकारांनी भारताला प्रजासत्ताक घोषित केले. पुन्हा ते संविधानकर्ते लोकांनीच निवडलेले होते. म्हणजे इथे लोकांनी संविधान लिहून ते लोकांनाच अर्पण करून भारताला प्रजासत्ताक घोषित केले. याचे कारणच हा देश महात्माजींच्या सर्व समावेशक स्वातंत्र्य आंदोलनाने स्वतंत्र झाला होता. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळीही ब्रिटिश कृपेवर अवलंबित राजे, महाराजे, बादशहा, नबाब शिल्लक होते. तथाकथित

हिंदुत्ववाद्यांना तर साऱ्या देशावरच पेशव्यांचे राज्य आणायचं होते. पण तसे न होता देश प्रजासत्ताक झाला.

**प्रजासत्ताक अथवा गणराज्य**

(रिपब्लिक) ही अशी शासन व्यवस्था आहे, ज्यामध्ये देश हा जनतेचा, सार्वजनिक प्रकारचा मामला मानला जातो. कोणत्याही एका व्यक्तीचा व गटाचा देशावर हक्क नसतो. देशाचे प्रमुख, (पंतप्रधान, मुख्यमंत्री, आमदार, खासदार वगैरे) सार्वत्रिक निवडणुकीतून निवडले जातात. थोडक्यात ज्या देशाचा प्रमुख एखादा राजा, सम्राट किंवा सुलतान नाही तो देश प्रजासत्ताक स्वरूपाचा असतो. अधिक सोप्या शब्दात सांगायचे असा देश, जिथे सत्ता जनतेच्या हातात असते, म्हणजे लोक निवडणुकीद्वारे आपले प्रतिनिधी निवडतात, जिथे वारसा हक्काने लोकप्रतिनिधी निवडला जात नाही, या देशाला प्रजासत्ताक देश असे म्हणतात. थोडक्यात लोकच देशाचे मालक असतात. डेथ अँड आफ्टरलाईफ ऑफ महात्मा गांधी हे मकरंद परांजपे यांचे पुस्तक काही वर्षांपूर्वी माझ्या वाचनात आले. त्यात त्यांनी स्वातंत्र्य म्हणजे काय ही गोष्ट एका प्रसंगाच्या वर्णनातून फार सुंदरपणे मांडली आहे. लेखक राजघाटावर गेला होता. कोणत्यातरी खेड्यातल्या शाळेची सहल तिथे आली होती. महात्माजींच्या समाधी समोरील हिरवळ या मुलांनी पहिल्यांदाच पाहिली असावी. हिरवळीवर ती मुलं उड्या मारू लागली, नाचूबागडू लागली. लेखकाच्या मनात विचार आला की, ज्या पवित्र जागेत राष्ट्रपित्याची रक्षा विखुरलेली आहे, त्या पवित्र जागेवरही ही मुलं खेळू शकतात कारण त्यांना ती हिरवळ आपली वाटते. अशी आपलं वाटण्याची भावना ही मालकी असल्याची भावना आहे. या प्रमाणेच देश आपल्या मालकीचा आहे असे सर्वसामान्य लोकांना वाटणे, म्हणजेच देश प्रजासत्ताक असणे.

प्रजासत्ताक म्हणून आपण जी संकल्पना समजतो, ती संकल्पना माणसांनी बनवलेली संकल्पना आहे. अर्थात त्यात असलेले दोषही माणसांमुळे राहिलेले आहेत. हे दोष दूर करता येतील हा विश्वास आपण बाळगला तर आपल्याला हा देश खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक करता येईल. दोष शोधण्यापूर्वी खऱ्या अर्थाने आपल्याला स्वातंत्र्याची संकल्पना आत्मसात करून घ्यावी लागेल.

स्वातंत्र्य हे केवळ कुठून तरी आलेले, कायद्यातल्या तरतुदीने मिळालेले

नसते. यासाठी स्वातंत्र्याला अनुकूल मानसिकतेची गरज असते, स्वातंत्र्योत्सुक समाजमन असावे लागते. दैववादी, अंधश्रद्ध, मानसिकता बदलून विज्ञानाधिष्ठित समाजमन जाणीवपूर्वक तयार करावे लागते. हे करण्यात आपण अत्यंत धीमे आहोत. आणि आता तर ती वाटचाल जवळजवळ थांबली आहे, ही गोष्ट नाउमेद करणारी आहे. देशाच्या संरक्षणासाठी आपण राफेल विमाने आणतो आणि मग त्या राफेलच्या रक्षणासाठी त्याला लिंबूमिरची बांधतो आणि हे शासकीय पातळीवर होते. यातून शासन कोणते समाजमन घडवण्याच्या खटपटीत आहे त्याचे प्रत्यंतर येते. यावर टीका करणाऱ्याला 'सेक्युलर' म्हणणाऱ्यांचा, 'देशद्रोही' म्हणणाऱ्यांचा नवा संप्रदाय तयार केला आहे. लिंबूमिरचीने संरक्षण होते, असा भ्रम जनतेत असेल तर ते समजून घेता येऊ शकेल पण शासकीय पातळीवर हा भ्रम जोपासण्याला, जाणीवपूर्वक अंधश्रद्धा पसरविण्याचे घटनाद्रोही कृत्य, याशिवाय काही म्हणता येणार नाही. पण अशा गोष्टी मुद्दाम केल्या जात आहेत.

स्वातंत्र्याची काय वा प्रजासत्ताकाची काय खऱ्या अर्थानं अंमलबजावणी करायची असेल, स्वतःच्या स्वातंत्र्या इतकाच इतरांच्या स्वातंत्र्याचा आदर करावा लागतो. माझ्या स्वातंत्र्यातच इतरांचे स्वातंत्र्य अनुस्युत आहे, हे भावना नसेल तर बलवान लोक स्वार्थाने स्वातंत्र्याचा वापर करू शकतात. 'बळी तो कान पिळी'चा प्रत्यय येऊ शकतो. हा प्रत्यय आपण निरंतर घेत आहोत. कुणी नवे कपडे घातले, कुणी चप्पल घालून कुणासमोर उभा राहिला, कुणी नवरदेव घोड्यावर बसला या कारणांनी झालेली अमानुष मारहाण वा हत्या या देशाला नव्या नाहीत आणि दुर्मिळही नाहीत. स्वातंत्र्य आणि प्रजासत्ताक या संकल्पना राबवण्यासाठी केवळ कायदा नव्हे तर करुणामय समाज निर्मितीची गरज आहे. समाजातील दुर्बल घटकांविषयी सहवेदना म्हणजेच देशभक्ती, ही गोष्ट समाजमनावर बिंबवण्याची गरज आहे.

निवडणुकांतील ध्रुवीकरणाच्या राजकारणानेही या गोष्टी आणखीनच कठीण करून टाकल्या आहेत.

प्रजासत्ताक म्हणजे प्रजेची सत्ता असे म्हटले जाते. पण व्यवहारात, ही प्रजेची सत्ता काय आहे? प्रजेला एकच सत्ता आहे, ती म्हणजे पाच वर्षांनी

एकदा आपले मत देणे. हे मतही बऱ्याचदा लोकशाहीला असंमत असलेल्या उपद्व्यापातून मिळवले जाते. ध्रुवीकरण हा आणखी एक सर्वसंमत मार्ग आहे. त्याचबरोबर भावनिक, जातीय, प्रांतिक, भाषिक आवाहनांही मतपेढी बनविण्यासाठी वापरले जात आहे. मतदारांना आर्थिक प्रलोभने देणे ही जुनी गोष्ट झाली. आता सरकारी पातळीवरच्या 'लाडकी बहीण'सारख्या योजना हे कार्य कायदेशीरपणे करत आहेत. अशा परिस्थितीत निवडून आलेली प्रतिनिधी मंडळी लोकशाही संवर्धनाचे आणि लोकराज्य निर्माण करण्याचे कार्य करतील ही अपेक्षा माकडाने शिस्तीने कवायत करावी, या अपेक्षेसारखी आहे. त्यामुळे जनतेचे राज्य याचा अर्थ पाच वर्षांनी मत द्यायचा अधिकार असा मर्यादित झाला आहे. या अधिकाराला सक्षम करायचं असेल तर लोकप्रतिनिधींना परत बोलविण्याचा हक्क मतदारांना मिळायला हवा. त्याचबरोबर नोटाद्वारे दिलेला अधिकार परिणामकारक बनवायला हवा. म्हणजे यापैकी कोणीच नको असा कौल देणाऱ्या मतांची संख्या सर्वात जास्त असल्यास ती निवडणूक आणि त्या निवडणुकीत उभी राहिलेली महान मंडळी, बाद व्हायला हवीत. हे आणि असे उपाय केले तरच कदाचित प्रजातंत्र या शब्दाला खरा अर्थ प्राप्त होईल.

निवडणुकीत लोकांच्या मताला खरंच प्रतिनिधित्व मिळतं का, हाही एक प्रश्न आहे. निवडणुकीला दहा उमेदवार उभे असतील आणि शंभर मते असतील तर त्या शंभर मतातील बहात्तर मते जरी अन्य उमेदवारांनी मिळवली, तरी सर्वाधिक २८ मते मिळवलेला उमेदवार विजयी घोषित होतो. मतांच्या टक्केवारीचे प्रतिबिंब संसद व विधानसभेत उमटलेले दिसत नाही. काही पक्ष व समाजघटकांना प्रतिनिधित्वच मिळत नाही. मग हे प्रजासत्ताक हे प्रजासत्ताक न राहता बहुसंख्यासत्ताक बनते. समाजातल्या सर्व मतांना आणि घटकांना त्यांना झालेल्या मतदानाप्रमाणे प्रतिनिधित्वाची (प्रपोर्शननेट रिप्रेझेंटेशन) तरतूद यावरचा उपाय असू शकेल. यावर विचार करण्याची गरज आहे. त्यायोगे सर्व समाज घटकांना हा देश आपल्या मालकीचा आहे असे वाटण्याची शक्यता निर्माण होईल.

जसा जनतेचा शासनावर वचक हवा, तसाच तो प्रशासनावरही हवा. तहसीलदार, प्रांत, कलेक्टर, सचिव ही मंडळी अशाप्रकारे वागतात की ते

जणू त्या त्या विभागाचे राजे, संस्थानिक, प्रधान आहेत. पुढाऱ्यांना बरोबर घेतल्याशिवाय या मंडळींचे दर्शनही दुर्लभ असते. खरंतर ही मंडळी जनतेचे सेवक. पण बऱ्याच जणांचे वर्तन जहागीरदारासारखे असते. ही मंडळी जनसेवक असतात पण जनतेला कधीच जबाबदार नसतात. यांच्यावर जनतेचा वचक निर्माण होण्यासाठी त्यांच्या कारभारावर दरवर्षी जनतेकडून शिक्कामोर्तब करून घ्यायची योजना बनवायला हवी. जनतेच्या शिफारशीवर यांची वेतनवाढ व पदोन्नती अवलंबित असायला हवी. अगदी सनदी अधिकाऱ्यांनाही याच पद्धतीने थेट लोकांना जबाबदार ठरविले जायला हवे. तरच ते खऱ्या अर्थाने जनसेवक बनतील व लोक त्यांचे मालक बनतील. प्रजासत्ताक व्यवस्थेला हेच अभिप्रेत आहे. अन्यथा प्रजासत्ताक हा शब्द केवळ अलंकाराचा भाग बनतो.

हा सर्व विचार करत असताना एका महत्त्वाच्या बाबीचा विचार करणेही आवश्यक आहे. ती म्हणजे, देशात जेव्हा लोकशाहीचे नाव घेऊन वेगळेच हितसंबंध जतन करणारे लोक राज्यकर्ते बनतात, त्या देशातील स्वातंत्र्य, लोकशाही, प्रजासत्ताक अशा साऱ्याच बाबी धोक्यात आलेल्या असतात. लोकशाहीवरच नव्हे तर लोकांवरही विश्वास नसलेले लोक लोकशाहीतील निवडणुकीने सत्तेत येतात आणि लोकशाहीच्या गळ्याला नख लावतात. ही गोष्ट आपण अनेक देशांमध्ये पाहिली आहे आणि आता तर आपण ती गोष्ट अनुभवत आहोत. ज्या राज्यकर्त्यांना त्यांचा छुपा अजेंडा ज्या प्रमाणात प्रत्यक्षात आणायचा असतो, त्या प्रमाणात लोकशाही गुंडाळणे भाग असते. असे राज्यकर्ते सत्तेत आल्यानंतर आधी लोकशाही संस्थांना एक तर आपले मिंधे बनवितात किंवा त्या संस्थाना कुचकामी करून लोकांची संस्थांवरची श्रद्धा नष्ट करतात. विरोधकांची बदनामी आणि विरोधी पक्षाचे खच्चीकरण हाच त्यांचा मुख्य कार्यक्रम असतो आणि त्यासाठी सामदामदंडभेदादी प्रत्येक गोष्टीचा ते मुक्तहस्ते वापर करतात. यातून विरोधी पक्ष आणि लोकशाही विषयी जनमानसामध्ये अविश्वास निर्माण केला जातो. परिणामी मूलतत्त्ववादी, विभूतिपूजक बहुसंख्यांकांच्या देशात लोकशाही नष्ट होण्याची वा नाममात्र असण्याची शक्यता वाढू लागते. नेमकी हीच गोष्ट फॅसिस्ट राजवटींना हवी असते.

अशा परिस्थितीत लोकशाही आणि लोकशाही मूल्य समाजमनात रुजवत

ठेवण्याची, असलेल्या मूल्यांचे जतन करण्याची आणि लोकशाहीविरोधी फॅसिस्ट विचारांचा मुकाबला करण्याची जबाबदारी लोकशाही मूल्यांवर निष्ठा ठेवणाऱ्या समाज घटकांना घ्यावी लागते. प्रसंगी त्याग करण्याची हिंमत ठेवावी लागते. लोकशाहीवर नितांत श्रद्धा निर्माण करून लोकशाहीच्या रक्षणासाठी झोकून देणाऱ्या तरुण पिढ्या निर्माण करायला लागतात. सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी लढे, चळवळी उभाराव्या लागतात. अलीकडे एनजीओ कल्चरमुळे सामाजिक कार्यकर्ता हा प्रकारच वेगळा बनवला आहे. लोकांनाही लाभार्थी बनवून चळवळींपासून अलिप्त करून ठेवले आहे. लोकचळवळच नसल्यामुळे शासनकर्त्यांवर वचक राहिलेला नाही. सत्ता जेव्हा निरंकुश बनते तेव्हा लोकशाही प्रजासत्ताकाला सर्वात मोठा धोका निर्माण होतो आणि आज आपण त्याचा सामना करत आहोत.

भारतीय स्वातंत्र्य चळवळ केवळ गोऱ्या राज्यकर्त्यांना घालवून काळ्या-तपकिरी लोकांचं राज्य आणण्यासाठी नव्हती. क्रांतिकारी चळवळींचाही स्वातंत्र्य आंदोलनात महत्त्वाचा वाटा आहे. 'बम के दर्शन' या दस्तावेजात भगतसिंग यांनी क्रांतीची धारणा पुढील शब्दांत व्यक्त केली आहे. क्रांती भांडवलशाही, वर्गवाद तसेच काही लोकांना विशेषाधिकार देणाऱ्या प्रणालीचा अंत करेल. राष्ट्राला आपल्या पायावर उभे करेल. त्याने नव्या राष्ट्राचा आणि नव्या समाजाचा जन्म होईल. क्रांतीने सर्वात मोठी गोष्ट ही होईल की, ती मजूर आणि शेतकऱ्यांचे राज्य कायम करून, जे देशाची राजसत्ता कायम धरून बसले आहेत अशा सर्व अवांछित घटकांना समाप्त करून टाकेल. (भगतसिंग पत्र और दस्तावेज, ले. वीरेंद्र संधू, पृ. ५४)

दिल्लीच्या सत्र न्यायालयाच्या न्यायाधीशांनी भगतसिंगांना क्रांतीचा अर्थ विचारला तेव्हा दिलेल्या उत्तरात ते म्हणाले होते, एकीकडे सर्वांसाठी अन्न उगवणारे शेतकरी परिवारासह उपाशी मरत आहेत, साऱ्या जगाच्या वस्त्रांची पूर्ती करणाऱ्या विणकाराला आपल्या आणि आपल्या मुलांच्या शरीराला झाकण्यासाठी पुरेशी वस्त्रे मिळत नाहीत, गवंडी, लोहार, सुतार, सुंदर महालांचे निर्माण करून घाणेरड्या वस्तीत राहतात आणि मरतात. तर दुसरीकडे भांडवलदार, शोषक आणि समाजावर गोचिडीप्रमाणे जिवंत राहणारे लोक आपले शौक पुरे करण्यासाठी करोडो रुपये पाण्यासारखे वहावत

आहेत. भयंकर विषमता आणि विकासाच्या संधींच्या कृत्रिम असमानता समाजाला आराजकाच्या दिशेने घेऊन जात आहे. अशा परिस्थिती सदैव राहू शकत नाहीत. तसेच हे स्पष्ट आहे की वर्तमान समाजव्यवस्था एका ज्वालामुखीच्या तोंडावर बसून आनंद मानत आहे आणि शोषकांची अबोध मुलेही करोडो शोषित मुलांप्रमाणेच एका धोकादायक दरीच्या काठावर आहेत. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटून गेली तरी तीच परिस्थिती कायम आहे.

ही परिस्थिती बदलायला हवी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वत्रिक मतदानाच्या अधिकारावर बोलताना म्हटले होते की, एक व्यक्ती एक मत आणि एक मत एक मूल्य, ही व्यवस्था आपण आज प्रस्थापित केली आहे. या व्यवस्थेकडून आपल्याला एक व्यक्ती एक मूल्य या दिशेने वाटचाल करायची आहे. नेमका तोच मार्ग आवरुद्ध करण्याचा प्रयत्न केला जात आहे. राज्यकर्त्यांचा हा प्रजासत्ताक लोकशाही विरुद्धचा कट उध्वस्त करून लोकशाही प्रजासत्ताक स्वातंत्र्याचा मार्ग आपण पुन्हा प्रशस्त करणार आहोत का? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हे आपण सर्वस्व पणाला लावून करणार असू तरच आपल्याला महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शहीद भगतसिंगांचे नाव घेण्याचा खरा अधिकार असेल.

■■■

# लोकशाहीचा राजपथ

❒ रोहन चौधरी

**भारताची लोकशाहीचे जागतिक महत्त्व :**

भारतीय प्रजासत्ताक दिनाचे महत्व जितके भारतीय लोकशाहीसाठी आहे तितकेच जागतिक लोकशाहीसाठी देखील आहे. या ऐतिहासिक दस्ताऐवजाने केवळ भारतीय लोकशाहीला दिशा देण्याचे काम केले नाही तर आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची भूमिका काय असेल याविषयीची ठाम भूमिका जगासमोर सादर केली होती. प्रजासत्ताक दिनादिवशी इतर राष्ट्रातील प्रमुखांना मुख्य अतिथी म्हणून आमंत्रित करण्याची रीत हा त्याचाच एक भाग आहे. राजसत्तेने प्रेरित इतिहासाचे अवडंबन आणि त्याचे आंधळेपणाने अंधानुकरण करणारे अनुयायी ही आजच्या भारतीय प्रजासत्ताकासमोरील आव्हाने आहेतच परंतु यामुळे जागतिक राजकारणात लोकशाहीच्या नेतृत्वाची जी पोकळी निर्माण झाली आहे ती भरून काढण्याची ऐतिहासिक संधी आपण गमावणार आहोत का हा प्रश्न विचारणे गरजेचे आहे. सर्वसमावेशक राज्यघटना आणि त्यातून प्रस्थापित झालेली लोकशाही व्यवस्था असून देखील जागतिक लोकशाहीचे नेतृत्व करण्यात एक देश म्हणून आपण कमी पडत आहोत का याचा कृतिशील विचार करणे हे आव्हान आज प्रजासत्ताक दिन साजरा करत असताना आपल्यासमोर आहे.

**वसाहतवादाचे दुष्परिणाम :**

१९५० च्या दशकातील आंतरराष्ट्रीय राजकारण पाहता भारतीय राज्यघटनेचे आगळेवेगळे वैशिष्ट्य दिसून येते. पहिले महायुद्ध असो वा दुसरे महायुद्ध, लीग ऑफ नेशन्स सारख्या जागतिक संघटनेचे अपयश असो, अथवा नाझी जर्मनीचा उदय, या सगळ्याच्या मुळाशी संसदीय लोकशाहीची

जननी म्हणून बिरुद मिरवणाऱ्या ब्रिटनचे वसाहतवादी, साम्राज्यवादी धोरण कारणीभूत होते. स्वतःच्या देशात असणारी लोकशाहीची मूल्ये बाहेरच्या जगात पसरवण्यास ब्रिटन असमर्थ ठरली. ब्रिटनच्या या वसाहतवादी धोरणामुळे झालेला नकारात्मक परिणाम आजही आफ्रिका आणि दक्षिण आशियातील राष्ट्रांमध्ये दिसून येतो. उदाहरणार्थ भारत-पाकिस्तान आणि भारत-चीन संघर्षाचे मूळ हे प्रामुख्याने वसाहतवादात आहे. ब्रिटनच्या ऱ्हासामागील अनेक कारणांपैकी एक कारण म्हणजे जागतिक राजकारणात लोकशाही प्रस्थापित करण्यात आलेले अपयश हे आहे. ब्रिटन नंतर जागतिक राजकारणात शांतता प्रस्थापित करण्याची जबाबदारी जगातील सर्वात जुनी लोकशाही अशी ओळख असणाऱ्या अमेरिकेकडे आली. अमेरिकेच्या लष्करी-आर्थिक सामर्थ्यापेक्षा अब्राहम लिंकन, मार्टिन ल्युथर किंग यांच्या लढ्याचे जास्त आकर्षण जागतिक समुदायाला होते. अमेरिकन समाजात रुजलेला उदारमतवाद अमेरिकेच्या नेतृत्वाखाली जागतिक राजकारणात शांतता प्रस्थापित करेल अशी आशा होती. परंतु दुसऱ्या महायुद्धाचा शेवट हा अमेरिकेच्या विध्वंसक अशा अण्वस्त्र वापराने झाला आणि अमेरिकेच्या नेतृत्वाची आगामी दिशा जपानवरील हल्ल्याने स्पष्ट झाली. दुसरीकडे सोव्हिएत रशिया पुरस्कृत समाजवादाची भुरळ देखील जागतिक समुदायाला आकर्षित करत होती. रशियन क्रांतीमुळे जागतिक विषमता दूर होईल आणि वर्गविरहित समाज व्यवस्था अस्तित्वात येईल असा विश्वास निर्माण झाला होता. परंतु लेनिन-स्टॅलिन यांच्या कार्यकाळात नागरिकांची झालेली अमानुष हत्या पाहता रोगापेक्षा इलाज भयंकर अशी अवस्था निर्माण झाली होती. वास्तविक पाहता अमेरिका आणि सोव्हिएत महासंघ यांच्यातील लढा हा लोकशाही आणि समाजवाद यांच्यातील होता. परंतु विचारधारेची हि लढाई, बघता बघता शस्त्रास्त्रांची लढाई बनली. थोडक्यात ब्रिटनच्या वसाहतवादी धोरणामुळे दोन राष्ट्रांमध्ये युद्ध लढले गेले. अमेरिकेच्या धोरणामुळे देशांतर्गत नागरी संघर्ष निर्माण झाले. व्हिएतनामपासून अफगाणिस्तान, सीरिया, लिबिया, इराक यांच्यातील नागरी संघर्षाला अमेरिकेचे धोरणच कारणीभूत ठरले.

**शीतयुद्धाची सावली आणि जागतिक अस्थिरता :**

लोकशाहीचा मुखवटा धारण करून आपले राष्ट्रीय हित साध्य करण्याच्या

प्रयत्नामुळे जागतिक राजकारणात संघर्ष निर्माण होत गेले. या पार्श्वभूमीवर तेव्हाही भारत प्रजासत्ताक असणे हे जागतिक शांततेसाठी महत्वाचे होते आणि आजही आहे. भारतीय स्वातंत्र्यापासून ते राज्यघटना अस्तित्वात येईपर्यंत जागतिक राजकारणात अत्यंत महत्वाच्या घडामोडी घडल्या. उदाहरणार्थ इस्त्राईलची निर्मिती, नाटो या लष्करी संघटनेची स्थापना, सोव्हिएत महासंघाकडून अण्वस्त्र चाचणी, चीनमधील माओची क्रांती आणि कोरियन युद्ध. यासोबतच आशिया आणि आफ्रिका खंडातील राष्ट्रे वसाहतवादाच्या जोखडातून राजकीयदृष्ट्या मुक्त होऊ लागली होती. परंतु सामाजिकदृष्ट्या अस्थिर होती, तर आर्थिकदृष्ट्या परावलंबी होती. अशा प्रतिकूल परिस्थितीत भारतीय राज्यघटना अस्तित्वात येणे हि साम्राज्यवाद, वसाहतवादविरोधी लढ्यातील एक ऐतिहासिक प्रतिक्रिया होती. १९४७ साली ब्रिटीश संसदेत विन्स्टन चर्चिल यांनी भारतीय स्वतंत्र्याच्या केलेल्या हेटाळणीला एक सणसणीत चपराक होती. यामध्ये पहिल्या प्रजासत्ताक दिनी प्रमुख अतिथी असलेले इंडोनेशियाचे अध्यक्ष सुकार्नो यांना भारताच्या नेतृत्वाखाली जागतिक शांतता निर्माण होण्याची आस होती. अलिप्ततावादी चळवळीच्या व्यासपीठावर भारताने दिलेला लढा हे त्याचे एक मूर्तिमंत उदाहरण होते. परंतु दोन महासत्तांच्या संघर्षात हा लढा अपुरा ठरला आणि जागतिक लोकशाहीचे नेतृत्व करण्याचे भारताचे स्वप्न एक मृगजळच राहिले.

**जागतिक असंतोषाची लाट आणि लोकशाहीतील अनिश्चितता :**

आपण ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत असताना पुन्हा एकदा ती संधी आपल्यासमोर आली आहे. वाढते स्थलांतर आणि शहरीकरण, जागतिक दहशतवाद, हिंसक नागरी संघर्ष, बड्या राष्ट्रांची उदासीनता याचे रूपांतर कडव्या राष्ट्रवादात झाले आहे. याचा थेट परिणाम म्हणजे बहुसंख्याकांच्या लांगुलचालन करणाऱ्या नेत्याला, पक्षाला अधिमान्यता मिळू लागली. त्याचे लोण अगदी ऑस्ट्रेलियापासून ते ब्राझील पर्यंत पोहोचू लागले. ऑस्ट्रिया, हंगेरी, नॉर्वे, पोलंड, नेपाळ, श्रीलंका यासारखी छोटी राष्ट्रेही यातून सुटली नाहीत. दुसरीकडे रशिया आणि चीन यासारखी कम्युनिस्ट राष्ट्रे अधिकाधिक आक्रमक बनत चालली आहेत. अमेरिकेच्या आक्रमक धोरणाचे शिकार बनत चाललेली आफ्रिका, दक्षिणे आशियातील छोटी राष्ट्रेही चीनचे सावज

बनत आहेत. लोकशाही व्यवस्था आपल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्येवर उत्तर नाही अशी भावना या राष्ट्रात निर्माण होत आहे. त्यातूनच लोकशाही राष्ट्रांत देखील हुकूमशहा लोकप्रिय होत आहेत. लोकशाही शासनव्यवस्थेवरचा वाढत जाणारा अविश्वास हे आजच्या घडीला जागतिक राजकारणातील सर्वात मोठे आव्हान आहे. त्यातच चीनचे यश सामावले आहे. याचा परिणाम जागतिक शांततेवर होणार आहे.

**राज्यघटना :** जागतिक शांततेसाठी भारताचा मार्गदर्शक दीपस्तंभ

१९१४ ते १९३९ च्या दरम्यान देखील काहीशी अशाच प्रकारची जागतिक परिस्थिती होती. त्यावेळी ज्यापद्धतीने भारतीय राज्यघटना हि मर्यदित स्वरूपात का असेना दिशादर्शक ठरली होती. त्याची पुनरावृत्ती करणे हे गरजेचे आहे. राज्यघटना निर्माण होण्याची पार्श्वभूमी, भारतासारख्या विविधता असणाऱ्या देशाला एकसंध बांधून ठेवण्याची अवघड कामगिरी, जागतिक समुदायासमोर शांततावादी भारताची प्रतिमा उभी करणे याचे सर्व श्रेय हे राज्यघटनेचे आहे. सर्वसमावेशक राज्यघटनेचा उपयोग जागतिक शांततेसाठी निर्माण करण्याची आणि जागतिक लोकशाहीचे नेतृत्व करण्याची ऐतिहासिक संधी आज भारतासमोर आहे. पाकिस्तान असो वा चीन अथवा प्रतिकूल जागतिक परिस्थिती, भारतीय लोकशाहीचा आजपर्यंतचा प्रवास आणि कामगिरी हेच या समस्यांना उत्तर आहे. भारत ही सामाजिक शास्त्रांची प्रयोगशाळा आहे. भारतीय राज्यघटना हा या प्रयोगशाळेतून निर्माण झालेला एक अलौकिक अविष्कार आहे. या अविष्काराचा योग्य वापर जगात लोकशाहीची मूल्ये प्रस्थापित करण्यासाठी करायचा आहे कि आपली बहुमूल्य ऊर्जा धर्म आणि संसद या विरुद्धार्थी शब्दांना समानार्थी शब्द बनविण्यासाठी खर्च करायचा आहे याचा निर्णय भारतीय जनतेला घ्यावयाचा आहे.

■■■

# बसवेश्वरांचा प्रजासत्ताक : वचनसाहित्य, मानवाधिकार आणि भारतीय संविधानाचे तुलनात्मक अनुशीलन

❒ **डॉ. राहुल बावगे**
प्राध्यापक व विभागप्रमुख राज्यशास्त्र
वनाशाकवसविसं, नागपूर

**सारांश**

हा अभ्यास बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानात आणि अनुभव मंटपच्या प्रथांमध्ये अंतर्भूत असलेल्या सामाजिक समता, न्याय आणि मानवमूल्यांच्या कल्पना आधुनिक मानवाधिकार तत्त्वांशी किती प्रमाणात सुसंगत आहेत, याचा शोध घेतो. वचनसाहित्यातील जातिनिरपेक्षता, लिंगभाव समानता, बंधुभाव आणि कर्तव्यनिष्ठा यांसारख्या मूल्यांचे, तसेच अनुभव मंटपमधील न्यायनिर्णय, विचारमंथन आणि सार्वजनिक चर्चासत्रांच्या प्रक्रियेचे तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले. निष्कर्ष सूचित करतात की बसवेश्वरांचे विचार आणि अनुभव मंटपची लोकाभिमुख प्रथा या आधुनिक मानवाधिकारांच्या पायाभूत तत्त्वांशी अत्यंत अनुरूप आहेत. उपलब्ध ऐतिहासिक पुरावे, वाङ्मयीन दस्तऐवज आणि आधुनिक शास्त्रीय अभ्यास या गृहीतकाला ठोस आधार देतात.

**बीज शब्द :**

बसवेश्वर, अनुभव मंटप, मानवाधिकार, सामाजिक समता, न्याय, तुलनात्मक अभ्यास, जातिनिरपेक्षता, लिंगीय समानता, बंधुभाव

**प्रस्तावना**

मानवाधिकार हे आधुनिक समाजाचे मूलभूत मूल्य मानले जातात. बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान आणि अनुभव मंटप या मध्ययुगीन लोकशाही संस्थांनी समाजात समता, न्याय आणि बंधुभाव यासारखे तत्त्व प्रत्यक्षात आणले. या अभ्यासाचा उद्देश आहे की बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानातील मूल्ये आणि अनुभव मंटप प्रथांमधील निर्णय आधुनिक मानवाधिकार मूल्यांशी किती सुसंगत आहेत, हे स्पष्ट करणे. या तुलनात्मक अभ्यासामुळे प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान

आणि लोकशाही प्रक्रियांचा आधुनिक सामाजिक न्यायाशी संबंध दिसून येतो.

**उद्देश**

बसवेश्वरांच्या वचनसाहित्यातील प्रजासत्ताक मूल्ये आणि भारतीय संविधानातील प्रजासत्ताक तत्त्वे यांतील साम्य-विभेद स्पष्ट करणे, तसेच समाजसुधारणेत बसवेश्वरांच्या योगदानाचे विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धती**

साहित्य-आधारित तत्त्वे, वचनसाहित्याचा विवेचनात्मक अभ्यास आणि भारतीय संविधानातील प्रजासत्ताक तरतुदींचे तुलनात्मक विश्लेषण हे या संशोधनाची मुख्य पद्धत आहे.

**व्याप्ती व मर्यादा**

हा अभ्यास १२व्या शतकातील वचनसाहित्यावर केंद्रित असून, समाजसुधारणेतील ऐतिहासिक संदर्भ आणि समकालीन कायद्यांचा तुलनात्मक अभ्यास मर्यादित स्वरूपात केला आहे.

**पूर्व संशोधन व अभ्यासाचा आढावा**

लोहित डी. नाईकर लिखित Basava and Human Rights हा ग्रंथ १२व्या शतकातील समाज सुधारक व तत्त्वज्ञ बसवेश्वरांच्या वचनसाहित्यातील मूल्ये आणि आधुनिक मानवाधिकार संकल्पनांमधील साम्य स्पष्ट करतो. लेखकाने दाखवले आहे की समता, सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा, बंधुता या तत्त्वांचा विचार आजच्या जागतिक मानवाधिकार दस्तऐवजांमध्ये होत असून, त्याचे मूळ बसवेश्वरांच्या शिकवणीतही आढळते. हा ग्रंथ विद्यार्थ्यांसाठी, संशोधकांसाठी आणि राजकारण, सामाजिक सुधारणे, मानवाधिकार यांचा अभ्यास करणाऱ्यांसाठी उपयुक्त आहे. हा ग्रंथ भारतीय तत्त्वज्ञान आणि मानवाधिकार विचार यामधील संदर्भ समजून घेण्यासाठी आणि पारंपरिक तत्त्वांनाही आधुनिक मानवाधिकाराशी जोडून पाहण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतो.

एस.ए. पालेकर लिखित Basava and Human Rights हा ग्रंथ १२व्या शतकातील समाज सुधारक बसवेश्वर यांच्या तत्त्वज्ञानाचे आधुनिक मानवाधिकार संकल्पनांशी साम्य दाखवतो. लेखकाने बसवेश्वरांच्या वचनसाहित्यातील समता, सामाजिक न्याय, बंधुता, मानवी प्रतिष्ठा आणि समान अधिकार यासारख्या तत्त्वांचा अभ्यास केला आहे आणि हे दाखवले आहे की या मूल्यांचा आधार

आजच्या जागतिक मानवाधिकारांच्या तत्वांशी सुसंगत आहे. हा ग्रंथ विद्यार्थ्यांसाठी, संशोधकांसाठी आणि समाजशास्त्र, राजकारण व मानवाधिकार अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरतो. पालेकर यांचे हे संशोधन पारंपरिक भारतीय तत्त्वज्ञान आणि आधुनिक मानवाधिकार विचार यामधील दुवा समजून घेण्यासाठी महत्त्वाचे आहे.

**अनुभव मंटप आणि भारतीय गणतंत्राची परिकल्पना**

महात्मा बसवेश्वरांनी राज्यधर्मशक्ती आणि संकल्पशक्ती वापरून जनजीवनातील अन्याय, अधर्म आणि अत्याचार नष्ट करण्याचा तसेच उदात्त जीवनमूल्यांवर अधिष्ठित मानवतेस उज्ज्वल भविष्य निर्माण करण्याचा क्रांतिकारी उपक्रम राबविला. वर्णाश्रम व्यवस्था, जातीय भेद, अस्पृश्यता, धार्मिक दंभ, पाखंड, सामाजिक विषमता आणि अत्याचार यांचा उन्मूलन करण्यासाठी त्यांनी अनुभव मंटप स्थापन केले. अनुभव मंटपची स्थापना ११४० ई. ते ११६७ ई. या कालखंडात झाली. त्या काळात बसवेश्वर ३६ वर्षांचे होते आणि ११६७ पर्यंत ते कल्याण राज्याचे मंत्री, म्हणजेच प्रधान मंत्री राहिले. अनुभव मंटपला केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील पहिली सामाजिक धार्मिक संसद म्हणून ओळखले जाते. १२व्या शतकात बसवेश्वरांनी एक लोकतांत्रिक व्यवस्था निर्माण केली, जिथे गरीब, दलित, पीडित, शोषित आणि वंचित नागरिकही मोकळेपणाने आपले विचार मांडू शकत होते. या दृष्टिकोनातून अनुभव मंटप ही जगातील पहिली संसद मानली जाते.

अनुभव मंटपचे आधारतत्त्व म्हणजे व्यक्ती स्वातंत्र्य, समानता, बंधुत्व आणि मानवीयता. त्या काळी जनतेला धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्य मिळालेले नव्हते. बसवेश्वरांचा उद्देश वर्णभेद, आश्रमभेद, वर्गभेद, स्त्री-पुरुष भेद व जातीय भेद नसलेला धर्मसमाज निर्माण करणे होता. त्यांच्या विचारांनी प्रभावित अनेक लोक भारतीय उपखंडाच्या विविध कोपऱ्यांतून कल्याणाकडे आले आणि अनुभव मंटपचे सदस्य झाले, ज्यात ७०० शिवशरण आणि ७० शिवशरणी, म्हणजे एकूण ७७० संसद सदस्य होते. अनुभव मंटपच्या सभांमध्ये सदस्य एकत्र येऊन सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि आध्यात्मिक समस्यांवर मुक्त मनाने विचार-विमर्श करीत, चिंतन-मंथन करून निर्णय घेत होते. येथे कायदे तयार केले जातात आणि

महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. अनुभव मंटपचे अध्यक्ष अल्लमप्रभु (अनुसूचित जाती), सिद्धेश्वर (ओबीसी) आणि महाज्ञानी चेन्नबसवण्णा होते.

अनुभव मंटपामध्ये झालेली चर्चा आणि निर्णय 'वचन' या रूपात नोंदवले जातात. ताडपत्रावर हस्तप्रत करून चरजंगम धर्मप्रसारकांकडे पाठवले जातात आणि देशभर प्रचारित केले जातात. वचन कन्नड भाषेत, लोकांच्या बोलचालीनुसार लिहिले जातात, ज्यामुळे ते प्रत्यक्ष जीवन अनुभव आधारित साहित्य बनले. शिवशरणांचे अनुभव हे वचन म्हणजेच साहित्य, तत्त्वज्ञान ७आणि संस्कार यांचे मिश्रण आहे. हे हिंदी संतांची साखी किंवा मराठी संतांची अभंगसंग्रह यासारखे आहेत. महात्मा बसवेश्वर आणि शरणांना अनेक धार्मिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय आव्हानांना तोंड द्यावे लागले. तथापि, अनुभव मंटपमध्ये झालेल्या सर्व चर्चा आणि निर्णयांमुळे जनतेला सुख-समाधान, समता आणि स्वातंत्र्य लाभले.

**बसव तत्त्वे : लोकशाहीसाठी मार्गदर्शक**

बाराव्या शतकात महात्मा बसवण्णांनी मांडलेली तत्त्वे आजच्या २१व्या शतकाच्या लोकशाहीसाठीही अत्यंत प्रासंगिक आहेत. त्यांनी भेदभाव, अंधश्रद्धा, सामाजिक विषमता आणि खोट्या धार्मिक कल्पनांपासून ग्रासलेल्या समाजाला समता, बंधुत्व, विचारस्वातंत्र्य आणि मुक्त चर्चेतील स्थान यांचा मंत्र दिला. बसवण्णांचे जीवन प्रात्यक्षिक होते; त्यांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी, अस्पृश्यतेच्या विरोधात आणि वर्णव्यवस्थेच्या भेदाभिमानी नात्यांवर प्रगल्भ मार्गदर्शन केले. अनुभव मंटप हे सामाजिक समता, न्याय आणि लोकशाही मूल्यांच्या अंमलबजावणीचे आदर्शस्थान होते. बसवण्णांनी 'कायकवे कैलास' या संकल्पनेतून आर्थिक विषमता कमी करण्याचा आणि श्रमाचे पावित्र्य जपण्याचा यशस्वी प्रयोग केला. त्यांच्या शिकवणुकीनुसार लोकशाही केवळ प्रशासनिक यंत्रणा नाही, तर मानवी मूल्ये आणि नीतिमत्ता यावर आधारित असते. विवेक, त्याग, धैर्य, प्रज्ञा, निष्ठा आणि श्रमावर निष्ठा या गुणांमुळे लोकशाहीची खरी पाया मजबूत होते. बसव तत्त्वे आजही संसदीय लोकशाहीला बळकटी देतात आणि समाजातील अन्याय व भ्रष्टाचार विरोधात दिशादर्शक ठरतात.

बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान आणि भारतीय संविधानातील समता, न्याय व मानवी मूल्यांचे प्रतिबिंब

**समता**

बसवेश्वरांचे समत्ववाद तत्त्व हे केवळ आदर्शवादी विधान नसून सामाजिक रचनेची मूलभूत मागणी होते. जन्मावरून कुणालाही विशेष हक्क नाही आणि मानवी मूल्य सर्वांसाठी समान आहे. वचनसाहित्यातील या समतेच्या संकल्पनेस भारतीय संविधानाने कायदेशीर अधिष्ठान दिले असून कायद्यासमोर समानता, समान संरक्षण आणि अस्पृश्यता समाप्त करणाऱ्या तरतुदींनी भेदभाव कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, प्रत्यक्ष व्यवहारात सामाजिक समता साधण्यासाठी फक्त संविधान पुरेसे आहे का, हा महत्त्वाचा प्रश्न कायम आहे; कारण बसवेश्वरांनी बाह्य कायदेशीर बदलांसोबत अंतर्मनातील परिवर्तनाचीही गरज अधोरेखित केली आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीनेही त्यांचे विचार क्रांतिकारक होते-स्त्रियांना धर्मिक तसेच सामाजिक नेतृत्वात स्थान देत त्यांनी संधी-समानतेचे जिवंत उदाहरण निर्माण केले. संविधानातील कायदेशीर समानता आणि सकारात्मक उपाययोजनांनी आज सशक्तीकरणाची प्रक्रिया गती घेत असली, तरी बसवेश्वरांचा संदेश हे सुचवतो की समानता साधण्यासाठी कायदा, संस्कृती, शिक्षण, आर्थिक संधी आणि सामाजिक दृष्टिकोनातील बदल यांचा एकत्रित समन्वय अपरिहार्य आहे.

**जातिविरहित समाज**

वचनसाहित्याने जातव्यवस्थेवर केलेला आघात हा प्रत्यक्ष सामाजिक क्रांतीचा असून, जन्मावर आधारित विभाजन नाकारण्याचा स्पष्ट संदेश देतो. संविधानाने भेदभावावर बंदी घातल्यामुळे समाजात समता, न्याय आणि समावेशकतेकडे वाटचाल सुरू झाली असून, जातीय प्रभाव व सामाजिक-आर्थिक विसंगती कमी करण्यासाठी सकारात्मक बदलांची जाणीवपूर्वक प्रक्रिया गतिमान होत आहे. बसवेश्वरांच्या दृष्टिकोनात फक्त कायदेशीर निर्बंध पुरेशे नाहीत तर, सामाजिक प्रतिष्ठा, संस्कार आणि लोकमानस बदलूनच खऱ्या अर्थाने जातिनिरपेक्षतेचा आणता लागू शकतो. त्यामुळे राजनीती, अर्थव्यवस्था आणि शिक्षण या क्षेत्रांत दीर्घकालीन हस्तक्षेप आवश्यक आहे.

**धर्मस्वातंत्र्य**

वचनात दिलेला विचार - धर्म म्हणजे अंतर्गत सत्य आणि विवेक - हा धर्माच्या व्यक्तीगत स्वरूपाला वाव देतो आणि बाह्य कर्मकांडाचा निंदक आहे.

संविधानाने व्यक्तीला धर्मनिवडीचा आणि आत्मानुभवाचा व्यापक हक्क दिल्यामुळे धर्म-राज्य संबंध अधिक सुसंवादी बनत असून, सार्वजनिक धोरणेही समावेशकतेकडे उन्मुख होत आहेत. बसवेश्वरांचा तत्त्वधर्म हे वैयक्तिक धार्मिक अनुभव आणि नीतिमत्वावर भर देतो, ज्यामुळे धर्मस्वातंत्र्याचा अर्थ केवळ उपासनेचा नसून नैतिक जीवनाचे स्वातंत्र्य समजायला हवा. त्यामुळे धर्मस्वातंत्र्याची अंमलबजावणी सामाजिक शिक्षण व समता-प्रवर्तना द्वारे अधिक सशक्त होते.

**धर्मनिरपेक्षता**

बसवेश्वर धर्मांच्या नावावर चाललेल्या पाखंडांना आणि वर्चस्ववादी धर्मव्यवस्थांनाही आव्हान देतात; त्यांच्या दृष्टीनुसार नैतिकता ही धर्मापलीकडची आहे. संविधानात्मक धर्मनिरपेक्षता राज्य-धर्म वेगळेपणाला स्पष्ट दिशा देते आणि समाजातील विविध धार्मिक-सांस्कृतिक परंपरांशी सुसंवाद साधत समावेशक व न्याय्य शासनप्रणाली मजबूत करत आहे. बसवेश्वरांचा दृष्टिकोन धर्मनिरपेक्षतेला सामाजिक नैतिकतेशी जोडतो - म्हणजे राज्याने सुद्धा धर्माच्या आड येण्याऐवजी सर्व धर्मांना समान नजरांनी पाहावे आणि तर्क, नैतिकता हे निर्णायक असावे. ह्या दृष्टीने धर्मनिरपेक्षता म्हणजे केवळ कायदा नाही तर सार्वजनिक संस्कृतीचे बदलणे आहे.

**लोकशाही संवाद**

अनुभव मंटप ही खुल्या चर्चेची प्रगत परंपरा होती, जिथे विविध सामाजिक वर्गांतील लोक सभ्य संवाद, विचारमंथन आणि सामूहिक निर्णयप्रक्रियेद्वारे समस्यांचे निराकरण करीत. आधुनिक संसदीय लोकशाही प्रतिनिधित्वावर आधारित असली, तरी स्थानिक स्तरावरील संवादाचे बळकटीकरण लोकशाहीला अधिक जवळचे आणि परिणामकारक बनवू शकते. बसवेश्वरांची पद्धत प्रत्यक्ष सहभागावर आधारित लोकशाहीची प्रेरणा देते-स्थानिक चर्चा, समुपदेशन आणि सामूहिक निर्णयप्रक्रिया शासनप्रणाली अधिक गतिशील, पारदर्शक व उत्तरदायी बनवतात. ग्रामसभा, चर्चासत्रे आणि विचारमंथन मंच सारख्या समकालीन साधनांद्वारे अनुभव मंटपाची मूल्ये आजच्या लोकशाहीमध्ये प्रभावीपणे पुनर्स्थापित करता येऊ शकतात.

**बंधुता**

वचनसाहित्यातील बंधुभाव म्हणजे व्यक्तीगत संबंध आणि सामाजिक एकात्मतेवर भर - केवळ कायदा नव्हे तर मानवी सहवास ही लोकात पसरवण्याचा आग्रह. संविधानाने उद्देशिकेत बंधुता ही अट ठेवली आहे, परंतु विविधतेतील ऐक्य साधणे हे राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक अभ्यास मागते. बसवेश्वरांच्या शिकवणींमध्ये बंधुभाव हा शरणाच्या तत्त्वाशी जोडलेला आहे. परस्पर दयाभाव व समानता हे लोकव्यवहाराचे मुख्य तंत्री आहेत. परिणामतः सामाजिक संघटनांना विविधता सांभाळून सहजीवनाचे व्यवहारिक तंत्र विकसित करावे लागेल.

**स्वातंत्र्य**

बसवेश्वरांचा स्वातंत्र्यबोध म्हणजे विचार आणि आचार यांचे स्वातंत्र्य- विचार करण्याचा, सत्य बोलण्याचा अधिकार. संविधानाने अभिव्यक्ती, विचार, धर्म इत्यादींचे मौलिक हक्क सुनिश्चित केलेत; मात्र या हक्कांचे मर्यादा आणि समाजिक दबाव यामुळे काहीवेळा व्यक्तीगत स्वातंत्र्यावर मर्यादा येतात. वचनांची तत्त्वे व्यक्तीच्या नैतिक स्वतंत्रतेला जोपासतात. त्यामुळे स्वातंत्र्य म्हणजे केवळ व्यक्तिगत अधिकार नव्हे तर त्याची जबाबदारीही आवश्यक आहे. या बाबतीत नागरिक शिक्षण आणि सार्वजनिक संवाद महत्त्वाचा आहे.

**श्रमाची प्रतिष्ठा**

'कायकवे कैलास' हे मत श्रमाला आध्यात्मिक व सामाजिक उंची देते. श्रम, कार्य हा अपमानास्पद नसून पूजनीय आहे. संविधानाने आर्थिक न्यायासाठी योग्य काम, किमान वेतन आणि कामगार संरक्षणाची दिशा दिल्यामुळे श्रमिकांच्या हक्कांबाबत जागरूकता वाढली असून, समावेशक आर्थिक धोरणांमुळे त्यांच्या स्थितीमध्ये सुधारणा घडत आहे. बसवेश्वरांचे श्रमतत्त्व लोकांना कामाचे नैतिक महत्त्व पटवून देऊन श्रमाधारित प्रतिष्ठेची भावना समाजात दृढ करते. या मूल्यांच्या आधारे धोरणनिर्मिती केवळ व्यावहारिक संरक्षणच नव्हे, तर श्रमाबद्दल सकारात्मक सामाजिक मूल्यप्रवर्तनही घडवू शकते.

**न्याय**

आर्थिक आणि सामाजिक न्यायाच्या संदर्भात बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान व संविधानाचे उद्दिष्ट एकमेकांना पूरक ठरतात. वचनसाहित्यात शोषणाविरोध,

श्रमाच्या प्रतिष्ठेचा आग्रह आणि संपत्तीच्या समतोल वितरणाचा नैतिक आग्रह दिसतो, ज्यातून आर्थिक समतेकडे सामाजिक दृष्टिकोन अधोरेखित होतो. संविधानानेही उद्देशिकेत आर्थिक न्याय, कल्याणकारी राज्य आणि संसाधनांचे न्याय्य वितरण यांचा उल्लेख करून या तत्त्वांना कायदेशीर अधिष्ठान दिले; परंतु धोरणात्मक त्रुटी, गैरवितरण आणि अंमलबजावणीतील अपूर्णता ही अजूनही मोठी आव्हाने आहेत. सामाजिक न्यायाबाबत देखील वचनसाहित्यात वंचितांची हक्क, प्रतिष्ठा आणि सामाजिक उन्नतीवर भर देत दीर्घकालीन परिवर्तनासाठी सामाजिक मनोवृत्ती बदलाची गरज अधोरेखित केली आहे. आधुनिक भारतीय संविधानातील सामाजिक न्यायाची संकल्पना-आरक्षण, कल्याणकारी योजना आणि समान सहभाग यांद्वारे याच दिशेने वाटचाल करते. त्यामुळे बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानाचा संदेश स्पष्ट आहे की आर्थिक व सामाजिक न्याय हे केवळ कायदे किंवा आर्थिक धोरणांचे परिणाम नसून, संस्कृती, नैतिकता, सहभाग आणि आत्मसन्मान यांच्या समन्वित प्रक्रियेतूनच टिकाऊ स्वरूपात साध्य होतात.

**नैतिक शासन**

बसवेश्वरांचे राजकीय विचार 'नैतिकतेवर आधारित सत्ता' या तत्त्वावर आधारित असून, नेतृत्वकर्त्यांच्या आचरणावर समाजाचे एकूण हित अवलंबून असते. संविधानाने प्रशासनिक जबाबदाऱ्या आणि जवाबदेहीच्या यंत्रणा प्रदान केल्या आहेत; परंतु नैतिकतेची खरी जबाबदारी ही वैयक्तिक तसेच संस्थात्मक स्तरावरच घट्ट रुजवावी लागते. भ्रष्टाचारविरोधी धोरणांसोबत नैतिक नेतृत्व प्रशिक्षण आणि सार्वजनिक उत्तरदायित्वाची संस्कृती विकसित करणे आवश्यक आहे. बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान प्रशासनात नैतिकता, सेवाभाव आणि पारदर्शकतेला अधोरेखित करते, जे शासन अधिक विश्वासार्ह, जनकेंद्री आणि परिणामकारक बनवते.

**भ्रष्टाचार विरोध**

वचनसाहित्यात लोभ, मोह आणि भोग यांवरील टीका ही नैतिक शिक्षणाची आधाररेषा ठरते आणि भ्रष्टाचाराविरोधातील मूलभूत प्रतिबंधक शक्ती निर्माण करते. संविधानात्मक व्यवस्थेने पारदर्शकता, लेखापरीक्षण आणि जवाबदेहीची यंत्रणा दिली असली, तरी व्यवहारिक पातळीवर भ्रष्टाचाराची कारणे अधिक

गुंतागुंतीची आहेत. बसवेश्वरांचा दृष्टिकोन सामाजिक चेतना वाढवून आणि नेतृत्वातील नैतिकता दृढ करून भ्रष्टाचार कमी करण्यावर भर देतो, म्हणजेच कठोर प्रवर्तनाबरोबरच मनोवृत्ती बदलही आवश्यक आहे. लोकशाहीतील पारदर्शकता, सक्षम लेखापरीक्षण आणि सक्रिय नागरिक सहभाग हे उपाय अधिक प्रभावी सुधारणा घडवू शकतात

**मानवाधिकार**

मानव-प्रतिष्ठा आणि मानवाधिकारांच्या संदर्भात बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान आणि भारतीय संविधानाची मूल्यव्यवस्था एकमेकांना समृद्ध करणारी आहे. वचनसाहित्यात प्रत्येक व्यक्तीत दैवी आणि अनन्य आध्यात्मिक मूल्य असल्याचे मानले गेले असून, मानवी प्रतिष्ठेला सर्वोच्च स्थान दिले आहे; संविधानानेही जीवन, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचा हक्क देऊन या तत्त्वाचे कायदेशीर संरक्षण केले आहे. तरीही गरिबी, वंचना, हिंसा आणि असमानता यांमुळे मानवी मर्यादा आजही त्रस्त होत आहेत. बसवेश्वरांचे विचार व्यक्तीच्या आत्मपरक सन्मानावर भर देतात आणि समाजाने प्रत्येक स्तरावर मानवी प्रतिष्ठेला प्राधान्य द्यावे असे सुचवतात. त्याचप्रमाणे, वचनसाहित्यातील तत्त्वे मानवाधिकारांना नैतिक आधार देत व्यक्तिस्वातंत्र्य, सन्मान आणि समानतेचे महत्त्व अधोरेखित करतात; संविधानातील मूलभूत अधिकारांनी याची संरचना दिली असली तरी अंमलबजावणीतील प्रशासनिक अडथळे आणि सामाजिक असमानता यामुळे त्यांचा प्रत्यक्ष उपयोग मर्यादित राहतो. त्यामुळे बसवेश्वरांचा संदेश स्पष्ट होतो की मानवाधिकार हे केवळ कायदे नसून सामाजिक, आध्यात्मिक आणि नैतिक जबाबदारी आहेत, आणि अधिकार-कर्तव्य संतुलन राखणे हेच खरे लोकशाही मूल्य आहे.

**विवेकवाद**

वचनसाहित्यात अंधश्रद्धा विरोध आणि तर्कशुद्ध विचार यावर भर दिला आहे, ज्यामुळे धार्मिक व्यवहार विवेकाच्या मार्गात अडथळा आणू नयेत, असा संदेश दिला जातो. संविधानिक शिक्षणातील वैज्ञानिक दृष्टिकोन आणि धार्मिक वैविध्य स्वीकारण्याची तत्त्वे यासोबत सुसंगत आहेत. तरीही समाजातील पारंपरिक श्रद्धा आणि आर्थिक-राजकीय स्वार्थामुळे विवेकवादाला आव्हानांचा सामना करावा लागतो. म्हणून शिक्षणात तार्किक विचारसरणीला प्रोत्साहन

देणे आणि सार्वजनिक चर्चेत वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे आवश्यक आहे.

**सामाजिक परिवर्तन**

वचनसाहित्यातील उद्देश समाज बदलण्याचा होता - जुन्या प्रथांवर प्रहार करून नवीन नैतिक-आर्थिक व्यवस्थेची निर्मिती. संविधानाने हीच दिशा कायदेशीर पातळीवर दिली आहे परंतु कायदा बदलून पटकन सामाजिक बदल घडत नाही; सामाजिक बदलासाठी शैक्षणिक, आर्थिक व वैचारिक कामे आवश्यक आहेत. बसवेश्वरांनी समाजाच्या मनात बदल घडवण्यावर भर दिला, त्यामुळे परिवर्तनाला शाश्वत करण्यासाठी स्थानिक नेतृत्व, सामुदायिक शाळा व अनुदान यांचा समावेश आवश्यक आहे. दीर्घकालीन समाजसुधार ही संयोजित प्रक्रिया आहे.

**वंचितांचे सक्षमीकरण**

वचनसाहित्यात दलित, वंचित, शोषित, पीडित, गरिब आणि श्रमिक यांचे सन्मान व सशक्तीकरण केंद्रस्थानी ठेवले आहे. संविधानाने आरक्षण आणि कल्याणकारी उपाययोजना व तरतुदी केल्या आहेत. ज्यामुळे सशक्तीकरणाचा पाया घातला गेला आहे. प्रत्यक्ष परिणाम अधिक प्रभावी होण्यासाठी संसाधने, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आर्थिक समावेश यांचा सकारात्मक विकास आवश्यक आहे. बसवेश्वरांचा दृष्टिकोन सक्षमीकरणाला सामाजिक मान्यता देतो-केवळ कायदेशीर उपाय नव्हे, तर समाजातील प्रतिष्ठा वाढवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी स्थानिक पातळीवरील कार्यक्रम दीर्घकालीन धोरणांसह एकत्रित राबवले जावेत, जे सशक्तीकरणाची प्रक्रिया अधिक प्रभावी आणि टिकाऊ बनवतात.

**राजकीय सहभाग**

अनुभव मंटपने सर्वांच्या सहभागाला स्थान दिले; लोकशाहीचे खरे वैशिष्ट्य म्हणजे सामान्य नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग. संविधानाने सार्वत्रिक मतदान व प्रतिनिधित्वची व्यवस्था केली आहे, परंतु सत्तेच्या निर्णयप्रक्रियेत लोकांचा अर्थपूर्ण सहभाग अनेकदा मर्यादित असतो. बसवेश्वरांची पद्धत स्थानिक स्वराज्य व सहभागात्मक निर्णयप्रक्रिया वाढवण्यास प्रेरणादायी आहे. ग्रामसभा, लोक परामर्श, नागरिक समिती इत्यादींना अधिक वाव दिल्यास लोकशाही अधिक दृढ होईल.

**उदारमतवाद**

वचनपरंपरेत मुक्त चर्चेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. खुल्या विचारांमुळे समाज प्रगत होतो. संविधानाने अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे, तर काळाच्या संदर्भात भाषणाच्या मर्यादा आणि द्वेषप्रसार यांसारख्या बाबींवर संवेदनशील चर्चा आवश्यक आहे. बसवेश्वरांची परंपरा लोकांना सहनशीलतेने विचार मांडायला आणि विरोधाचे आदराने स्वागत करायला शिकवते. त्यामुळे उदारमतवाद टिकवण्यासाठी शैक्षणिक व सार्वजनिक मंचांचे सशक्त आणि संवेदनशील स्वरूपातील महत्त्व अधोरेखित होते.

**निष्कर्ष**

बाराव्या शतकातील अनुभव मंडप ही जगातील पहिल्या संसदीय लोकशाहीची अद्वितीय प्रयोगशाळा होती. येथे सर्व प्रकारच्या सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक विषमता मोडून काढत मानवाधिकारांवर आधारित समतामूलक समाजरचनेची पायाभरणी करण्यात आली. या लोकशाही मंडपात विचारमंथनातून जे निर्णय वचनांच्या रूपाने पुढे आले, ते आजच्या मानवाधिकार तत्त्वज्ञानाचेही द्योतक ठरतात. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या मूलभूत मूल्यांना प्राधान्य देणारी अनेक वचने अनुभव मंडपातून प्रस्तुत झाली. प्रत्येक वचनाने मानवी प्रतिष्ठा, सामाजिक न्याय आणि सार्वत्रिक समानतेचा निर्धारपूर्वक उद्‌घोष केला. ही वचने केवळ आध्यात्मिक नव्हती, तर मानवी हक्कांच्या आधुनिक संकल्पनांना पूर्वसूचना देणारी सामाजिक क्रांतीची घोषवाक्ये होती. याची प्रचिती बसवेश्वरांच्या एका वचनातून येते.

हा कोणाचा, हा कोणाचा, हा कोणाचा म्हणवू नका हो.
हा आमचा, हा आमचा, हा आमचा म्हणवा हो.
कूडलसंगमदेवा,
तुमचा घरचा पुत्र म्हणवा हो.

बसवेश्वरांचे तत्वज्ञान मानवाधिकार, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, श्रमाची प्रतिष्ठा, धार्मिक स्वातंत्र्य, बंधुत्व आणि नैतिक शासन यास प्रोत्साहन देते. त्यांच्या अनुभव मंटपमध्ये केलेल्या लोकशाही प्रयोगांनी आधुनिक भारतीय संसदीय व्यवस्थेतील तत्त्वांचे आध्यात्मिक आणि नैतिक आधार स्पष्ट केले आहेत. त्यामुळे बसवेश्वरांचा विचार केवळ ऐतिहासिक महत्त्वाचा नाही, तर

आजच्या सामाजिक न्याय आणि मानवाधिकाराच्या संदर्भात देखील अत्यंत प्रासंगिक ठरतो.

**संदर्भ :**


1. Naikar, L. D. (2012). Basava and Human Rights. Basava Samithi. https://www.basavasamithi.org/product-page/basava-and-human-rights
2. Palekar, S. A. (2017). Basava and Human Rights. Rawat Publications. https://campuslib. keralauniversity.ac.in/cgi-bin/koha/opac-MARCdetail.pl?biblionumber=486123

३. लंगोटी, स., बसवेश्वर. (२०१८). बसव मार्गः जुलै-सप्टेंबर २०१८ (पृ. ३६-३७).

४. होनराव, द. (२०१८). बसव तत्त्वे आणि लोकशाही मूल्ये. बसव पथ, ८(५), ७-१२.

5. Kalburgi, M. M. (Ed.). (2012). Basava Samiti (1st ed.). Basava Samiti.
6. Government of India. (1950). The Constitution of India. https://legislative.gov.in/constitution-of-india
7. Gubbewad, R. S. (Year). Causes leads for the Vachana philosophys human rights and duties. Review of Research. https://oldror.lbp.world/ColorArticle/1290.pdf
8. Chikmath, P., Khutale, S. (2017). Human value of Mahatma Basaveshwara. International Journal of Researches in Social Sciences and Information Studies. Vishwashanti Multipurpose Society. https://ijrssis.in/upload´papers/020620170545176.pdf
9. Jagannath, K. (2018). Basaveshwar>s philosophy on humanity and social equality. Research Review: International Journal of Multidisciplinary, 7, 387-394. https://www.rrjournals.com
10. Chengte, P. V. (2022). A study of dignity as core value of human rights. IJFANS International Journal of Food and Nutritional Sciences, 11(3), 1657-1663. https://ijfans.in
11. Kaur, A. (2017). Protection of human rights in India: A review. Jamia Law Journal, 2. https://docs.manupatra.in/newsline/articles/Upload/82F6F397-6AE0-4253-940E-58C9B0BDEC32.%20Amartish%20 Kaur´´Human% 20 Rights.pdf
12. Nariman, F./S. (2000). Fifty years of human rights protection in India: The record of 50 years of constitutional practice.

National Law School of India Review, 12(1), Article/6. https://repository.nls.ac.in/cgi/viewcontent.cgi?article=1155context=nlsir

13. VachanaMandara. (2024, March 7). Political philosophy in Vachana literature and its impact on Politics Egalitarianism. VachanaMandara. https://vachanamandara.in/political-philosophy-in-vachana-literature-and-its-impact-on-politics-egalitarianism/

१४. अंबलगे, क. (२०२०). बसवेश्वर समता की ध्वनी (पहिले संस्करण). लोकभारती प्रकाशन.

■■■

# जनहित याचिका : लोकशाही आणि मानवी हक्क

❐ **डॉ. संदीप बी. काळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
यशवंत महाविद्यालय, सेलू जि. वर्धा

**प्रस्तावना (Introduction) :**

भारतातील सर्वोच्च न्यायालयाचा भूतकाळ अतिशय दैदिप्यमान राहिला आहे. 'केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य (१९७३) या खटल्यामध्ये १३ न्यायाधीशांच्या संविधानिक खंडपीठाने दाखविलेली सार्वजनिक कारभाराविषयीची चिकित्सा संविधानाच्या पायाभूत रचनेचे तत्व आखून देणारी होती आणि संविधानावरील न्यायव्यवस्थेचे अस्तित्व सुध्दा त्या माध्यमातून कायम राहिले. न्यायालयाच्या या क्षमतेचा हा केवळ एक झळाळता दाखला आहे. भारतीय सर्वोच्च न्यायालयाने 'संविधानाचा अर्थबोध लावणारा व पालक' ही स्वतःची भूमिका प्रस्थापित केली आहे, असे ग्रॅनव्हिल ऑस्टीन म्हणतात ते योग्यच आहे.

सर्वोच्च न्यायालयाची सुरुवात तटस्थ न्यायालय म्हणून झाली. या संस्थेला राष्ट्राच्या कारभारातील स्वतःची भूमिका संथपणे, पण ठोसपणे आकलन होत गेल्यावर न्यायालयाने स्वतःची अधिसत्ता विस्तारली. त्यामधून भविष्यातील न्यायालयीन कृतीशीलतेचा पाया बातला गेला. 'केशवानंद भारती खटला' ही या सगळ्याची सुरुवात होती. त्यानंतरच्या वर्षामध्ये सर्वोच्च न्यायालयाने आपली ही ओळख मेनका गांधी विरुध्द भारतीय संघराज्य (१९७८), फ्रान्सिस कोरली विरुध्द दिल्ली केंद्रशासित प्रदेश (१९८१) आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरण विरुद्ध आंतरराष्ट्रीय विमानतळे (२०००) अशा अनेकविध खटल्यांदारे बळकट केली. या खटल्यांमध्ये उचित प्रक्रियेचा अवलंब करण्यात आला आणि त्यामधून संविधानातील अनुच्छेद-२१ मध्ये महत्वाचे स्थान देण्यात आलेल्या अधिकारांचा विस्तार झाला.

जनहीत याचिकेच्या शोधामुळे 'समाजवादी न्यायिक' युगाची सुरुवात झाली. यात न्यायालयाची कार्यकर्ता म्हणून भूमिका ठळक झाली. १९९० च्या दशकाअखेरीला न्यायालयाने स्वतःची भूमिका पर्यावरण संरक्षणासारख्या तुलनेने अज्ञात प्रदेशांमध्ये विस्तारली. असे करताना न्यायव्यवस्था कार्यकारी मंडळाच्या प्रांतात शिरली आणि त्याबद्दल न्यायालयावर सर्व बाजूंनी टिका सुध्दा झाली. सर्वोच्च न्यायालयाने चढ-उतार अनुभवले नाहीत असा याचा अर्थ नाहीत. अतिरित जिल्हा दंडाधिकारी, जबलपूर विरुध्द शिवकांत शुक्ला (१९७६) या प्रख्यात प्रकरणामध्ये न्यायालय पदभ्रष्ट झाल्याचे लख्खपणे समोर आले आणि न्यायव्यवस्थेला पुन्हा काहीएक आदराचे स्थान मिळवून देण्यासाठी काही वर्षे जावी लागली. १९८० आणि १९९० च्या दशकांमध्ये न्यायालयाने पुन्ही ही प्रतिष्ठा प्राप्त केली. परंतु आज आपण पुन्हा काही पावले मागे जात असल्याचे दिसते आहे. समकालीन राजकीय व्यवस्थेची कार्यप्रणाली सर्वोच्च न्यायालयाच्या कार्यपद्धतीमध्ये हस्तक्षेप करण्याचे कार्य करीत असल्याची टिका सातत्याने केली जाते. त्यामुळे न्यायव्यवस्था निरपेक्षपणे आपल्या स्वातंत्र्याचा अवलंब करू शकते की नाही ही शंका भारतीय जनमानसात निर्माण झाल्याचे स्पष्ट होते.

**बीज शब्द (Key words) :** जनहित याचिका, लोकशाही, मानवी हक्क, सर्वोच्च न्यायालय, न्यायालयीन सक्रियता, भारतीय संविधान, न्यायालयीन स्वातंत्र्य न्यायालयीन प्रक्रियेचा ऱ्हास, न्यायदान प्रक्रिया व लोकशाहीचा सहसंबंध.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे (Objectives of Research paper):**

१. सर्वोच्च न्यायालयाची कार्यप्रणाली विशद करणे

२. जनहित याचिका आणि मानवी हक्क संदर्भात न्यायालयाची भूमिका स्पष्ट करणे.

३. जनहित याचिका आणि लोकशाही यांच्या सहसंबंधाचे विश्लेषण करणे.

**जनहित याचिका संदर्भात सर्वोच्च न्यायालयाची कार्यप्रणाली : लोकशाही आणि मानवी हक्क :**

स्टीव्हन लेवित्स्की आणि डॅनिअल झिबाल्ट यांनी हाऊ डेमॉक्रसीज् डाय

या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, बहुतांश लोकशाही व्यवस्था कोलमडण्यास तेथील सेनाधिकारी व लष्कर कारणीभूत नसतात, तर लोकनियुक्त शासनेच हे काम करतात. संपूर्ण जगभरात लोकनियुक्त नेत्यांनी लोकशाही संस्थाचा विपर्यास केला, याचे अनेक दाखले त्यांनी नमूद केले आहेत. अशा परिस्थितीमध्ये स्वतःची भरभराट साधणाऱ्या नेत्यांना लेवित्स्की आणि झिबाल्ट यांनी लोकनियुक्त हुकुमशाही असे संबोधले आहे. ही लाट परतवण्याची क्षमता केवळ न्यायव्यवस्थेकडेच आहे. दुर्दैवाने, न्यायव्यवस्था आपल्या वाटेपासून भरकटल्याचे दिसते. आहे. सत्तरहून अधिक वर्षापूर्वी घटनासमितीमध्ये पंडित नेहरू म्हणाले होते की, आपल्याला अत्युच्च सचोटी असलेले न्यायाधीश गरजेचे आहेत. त्यांचे वाटेत कोणीही आले तरी ते कार्यकारी शासनाविरोधात उभे राहू शकतील. पुन्हा एकदा भारतात अशाप्रकारच्या न्यायाधीशांची संख्या वाढीस लागेल अशी अपेक्षा आपण निश्चितच व्यक्त करू शकतो. एडमंड बर्ग यांनी म्हणून असे प्रतिपादन केले आहे की, 'गैरशासन' हेरण्याच्या दृष्टीने भाणि विशेषतः प्रत्येक राजकीय झुळुकीमधून जुलूमशाहीच्या आगमनाचा वास घेता यावा या दृष्टीने न्यायाधीशांना प्रशिक्षण दिले जाते. बहुसंख्याकांच्या जुलुमशाहीपासून अन्यसंख्याकांना संरक्षण देण्याचे अधिकार हा न्यायिक पुनरावलोकनाचा पाया आहे. त्यामुळे संविधानाचा भंग करणारे कायदे रद्द करणे न्यायालयांना शक्य होते. परंतु अल्पसंख्याकांच्या हितसंबंधाचे संरक्षण करणारे प्रति-बहुसंखाक न्यायालय म्हणून काम करण्यात अपयश येणे, हे न्यायालयाच्या ऱ्हासाचे प्रातिनिधीक रूप म्हणावे लागेल. आता हे न्यायालय स्वतःच्या कित्येक दशकांच्या इतिहासाकडेच पाठ फिरवताना दिसते आहे आणि निःसंशयपणे व न अडखळता बहुसंख्याकवादी दृष्टिकोनाशी जवळीक करू लागले आहे. शबरीमाला मंदीराचे प्रकरण आणि अयोध्या प्रकरण या दोन खटल्यांवेळी हे ठळकपणे दिसून आले.

शबरीमाला प्रकरणामध्ये २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल अत्यंत प्रगतीशील होता. केरळमधील शबरीमाला मंदिरात स्त्रियांच्या प्रवेशाला या निकालाद्वारे परवानगी देण्यात आली. परंतु केरळ राज्य शासनाने न्यायालयाच्या निकालाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र शासनाने भाविकांची बाजू लावून धरली. लवकरच

पुनरावलोकनासाठी याचिका दाखल करण्यात आल्या, परंतु त्या प्रलंबित ठेवण्यात आल्या. कारण त्यातील काही संदर्भातील प्रश्नाविषयाचा निर्णय मोठ्या खंडपीठाकडून होणे अपेक्षीत होते. मुख्य निकालास स्थगिती देण्यात आली नाही. परंतु याचिका संदर्भासह पुनरावलोकनासाठी खंडपीठाकडे पाठवण्यात आल्या आहेत, याचा अर्थ निकाल अंतिम नाही असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. त्यामुळे शबरीमालामध्ये सुरक्षित प्रवेश मिळावा, यासाठी करण्यात आलेल्या याचिकेबाबत आदेश देणे न्यायालयाने टाळले. कायद्याचे राज्य आणि अयोध्येसंदर्भातील निकाल हे पुढे सुद्धा चर्चेत आले. मूलतः राजकीय प्रश्नावरचे हे निकालपत्र एकमताने दिलेले असले तरी ते निनावी असणे असाधारण होते. अयोध्येतील मालमत्ता तीन भागांमध्ये विभागण्याचा अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय शांतता राखण्याचा राखण्याच्या दृष्टीने 'व्यवहार्य' नाही. परंतु सर्वोच्च न्यायालयाचा निकाल संपूर्ण न्याय देणारा होता. का? हिंदूनी १९४५ व १९९२ मध्ये केलेल्या बेकायदेशीर कृत्यांची दखल घेत न्यायालयाने अंतिमतः मात्र गैरकृत्ये करणाऱ्यांना बक्षिस दिले, हे निश्चितपणे निःपक्षपातीपणाच्या तत्वाविरोधात होते. 'इंडियन यंग लॉयर्स असोशिएशन विरुध्द केरळ राज्य (२०१८) या प्रकरणात केंद्र शासनाने दंडात्मक कारवाईपासून संरक्षणाची भूमिका घेतली. त्याचप्रमाणे' एम सिद्धिक विरुद्ध मंहत सुरेश दास आणि इतर (२०१९)' या प्रकरणात सुध्दा हिंदूनी मागणी केली की, १९९२ मध्ये बाबरी उध्वस्त करण्यामध्ये आणि हिंसाचारामध्ये सहभागी असलेल्या कारसेवकांविरोधातील फौजदारी गुन्हे मागे घ्यावेत. कारसेवकांना शासकीय भत्ता दिला जावा आणि त्यांची नावे मशिदीच्या जागेवर उभे राहणाऱ्या मंदिरामध्ये यादी स्वरूपात द्यावीत, जणू काही ते स्वातंत्र्य सैनिक आहेत, अशीही मागणी करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने हे फौजदारी प्रकरणे सुरूच ठेवले जातील असे स्पष्ट केले.

भारतीय संविधानातील कलम-२१ मधील न्यायतत्वाच्या अंमलबजावणीबाबत न्यायालयाने घेतलेली भूमिका बघता संविधानाशी कटिबध्द राहण्यात न्यायालयाला अपयश आल्याचे दिसते आणि असे प्रसंग वाढत आहेत. कोव्हिड-१९ मधून उद्‌भवलेल्या प्रचंड मोठ्या सार्वजनिक आरोग्य संकटामुळे स्थलांतरित मजुरांच्या जगण्यात बरीच उलथापालथ झाली आहे; त्यांच्याकडे काम नाही, उत्पन्नाचा

स्त्रोत नाही, प्राथमिक गरजा भागविण्याची साधने उपलब्ध नाहीत आणि घरी पोहोचण्याचे मार्ग उपलब्ध नाहीत, ही परिस्थिती प्रश्नांकित करणाऱ्या याचिका दाखल करून घेण्याऐवजी सर्वोच्च न्यायालयाने या याचिका दाखल करुन घेणे दीर्घकाळ नाकारले किंवा त्यांना स्थागिती दिली. या याचिका नाकारताना किंवा स्थगित करताना न्यायालयाने अनेक शंकास्पद विधाने केली. शासनाने यापूर्वीच मजुरांना दिवसाकाठी दोनदा चौरस आहार मिळण्याची सोय केली आहे. मग याहून अधिक त्यांना काय हवे असणार आहे. रेल्वेरुळांवर झोपलेल्या स्थलांतरित मजुरांचा भयंकर अपघातात मृत्यू झाल्यावर, 'अशा गोष्टी कशा काय थांबवता येणार' अशी टिप्पणी न्यायालयाने केली. न्यायालयाने स्वतःहून या प्रश्नाची दखल घेतली असली तरी तोवर खूप उशीर झाला होता. अशावेळी उच्च न्यायालये बुद्धिप्रामाण्यवाद, धाडस व करुणा अशा मूल्यांची पाठराखण करत पुढे आली. त्यांनी स्थलांतरितांच्या अधिकाराबाबत प्रश्नही विचारले. याउलट भारताच्या महान्याय अभिकर्त्यांनी असा विचित्र दावा केला की, कामगारांचे लोंढे बनावट बातम्यांमुळे उद्‌भवले आहेत. विशेष म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद स्वीकारला आणि माध्यमांनी अधिक जबाबदारीने वार्तांकन करावे असा सल्ला दिला. त्याचप्रमाणे निदर्शनांचा अधिकार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार याबाबतही दडपशाही होताना दिसत आहे. बहुधा आधुनिक भारतामधील ही सर्वांत अभूतपूर्व दडपशाही असावी. उदाहरणार्थ, सीएए विरोधातील निदर्शनांचा विचार करावा. या कायद्याच्या संविधानिकतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले, परंतु न्यायालयाने ठिसूळ कारणे देत ही याचिका सुनावणीसाठी घेणे टाळले. दरम्यान, शासनाने निदर्शकांची मुस्कटदाबी करण्याचा उतावीळ प्रयत्न सुरू ठेवला  हे सगळे घडत असताना न्यायव्यवस्था बघण्याच्या भूमिकेत बाजूला उभी होती. भिन्न राज्यांमध्ये भिन्न व्युहरचना राबविण्यात आल्या आहेत. उत्तर प्रदेशात मुख्यमंत्री म्हणाले की, निदर्शकांवर ते 'सूड' उगवतील आणि 'आझादी' च्या घोषणा देणे देशद्रोहीपणा आहे! शांततापूर्ण निदर्शकांविरोधात दंगलखोरांसारखे वर्तन करण्याचा परवाना पोलीसांना देण्यात आला. निदर्शकांना अटक करणे, वाहनांचे नुकसान करणे, इतकेच नव्हे तर घरात घुसण्यांचाही मुक्त परवाना पोलीसांना मिळाला. यामध्ये तरूण मुस्लीम लक्ष्य ठरल्याचे

दिसते. उत्तर प्रदेशात राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम आणि उत्तर प्रदेश गुंडनियंत्रण अधिनियम १९७० अंतर्गत संयुक्तपणे आरोप ठेवले होते पण दिल्लीतील दंगली हा या संदर्भातील सर्वात धगधगता मुद्दा आहे. पोलीसांनी निःशस्त्र विद्यार्थ्यांवर हल्ला चढवला. प्रस्थापित व्यवस्थेवर टीका करणाऱ्या कोणालाही या प्रकरणात गोवण्याची प्रत्येक संधी साधली गेली. अगदी अपूर्वानंद आणि योगेंद्र यादव यांच्यावरही आरोप झाले. दंगल घडवणे, बेकायदेशीर सभा घेणे, गुन्हेगारी कट रचणे यासारख्या फौजदारी गुन्ह्यांमध्ये व्यक्तींना गुंतवण्याची व्यूहरचना दिल्ली दंगलीवेळी दिसून आली. भयंकर वसाहतीक वारसा असलेला देशद्रोहाचा कायदा सुध्दा वापरण्यात आला. त्याचप्रमाणे युपीएची नवनवीन अर्थनिर्णयने अंमलात आणण्यात आली. एका बाजूला नागरिकांना अशी वागणूक मिळाली, तर दुसऱ्या बाजूला सत्ताधारी भाजपच्या ज्या आघाडीच्या नेत्यांनी जाहीरपणे चिथावणीखोर भाषणे दिली होती, त्यांच्याविरोधात कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यात आली नाही.

दिल्ली दंगलीचा तपास न्याय्य पध्दतीने झाला नाही आणि याचे १९८४ मधील दंगलीशी साधर्म्य दिसते याकडे माजी पोलीस अधिकारी ज्युनिओ रिबेरो यांनी निर्देश केला आहे. 'तत्कालीन राजकीय व्यवस्थेकडून एका घटकाला दंडात्मक कारवाईपासून संरक्षण मिळते, म्हणून भारतात पुन्हा-पुन्हा दंगली होतात, असे रास्त निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मूक बघ्याची भूमिका घेतली नसती आणि सक्रीय हस्तक्षेप केला असता, तर कदाचित एवढे सगळे घडले नसते. परंतु सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करण्याचे सोयीस्कररीत्या टाळले. या काळात न्यायालयाचे वर्तन या समस्या हाताळण्याची कोणतीही निकड नसल्यासारखे होते. अनेक प्रकरणे काही आठवडे स्थगित होत राहिली. ही परिस्थिती आणखी ढासळवण्यासाठी म्हणूनच की काय, सर्वोच्च न्यायालयाने एप्रिल-२०१९ मध्ये 'राष्ट्रीय तपास संस्था विरुद्ध झहूर अहमद शाह वताली' या प्रकरणामध्ये युपीएचे असे अर्थनिर्णयन केले की, या कायद्याचा संदर्भ असलेल्या पूर्वीच्या सर्व निर्णयाना ते लागू झाले आहे. या निर्णयाने नवीन तत्व निर्माण केले. सुनावणीच्या पूर्ण काळात संबंधीत आरोपी कोठडीतच राहायला हवा, त्या व्यक्तिविरोधातील पुरावा स्वीकारार्ह नसल्याचे अंतिमतः सिध्द झाले आणि आरोपीची सुटका

झाली, तरीही हे तत्व लागू असेल अंतिमतः सुटका होणारच असलेल्या आरोपीला तुरूंगातच डांबून का ठेवायचे? न्यायमूर्ती खानविलकर आणि न्यायमूर्ती रस्तोगी यांनी युएपीए अंतर्गत जामीन अर्जाचा विचार करून दिलेल्या निर्णयानुसार न्यायालयानी एफआयआरमधील सर्व आरोप योग्य गृहीत धरावेत. शिवाय, आरोपीने फिर्यादी पक्षाचा दावा खोडणारी सामग्री सादर केली, तरच आता जामीन मिळवता येईल. या निर्णयामुळे जामिनाच्या पातळीवर पुराव्याची स्वीकारार्हता ठरविण्याचा प्रश्न वगळण्यात आला आहे. परिणामी, 'भारतीय सुरक्षा अधिनियम-१८७२' हा कायदाच यामधून वगळण्यात आला. त्यामुळे हा निर्णयच असंविधानिक ठरतो, असे विवादरित्या म्हणता येईल. 'युएपीए' अंतर्गत होणाऱ्या जामिनाचा सुनावण्यांना आता केवळ विडंबनाचे स्थान उरेल आणि कोणत्याही व्यक्तीला अनिश्चिंत काळासाठी तुरूंगात डांबण्यासाठी हे सोयीचे साधन उपलब्ध असेल. विरोधी सुरांची मुस्कटदाबी करण्यासाठी साधन म्हणून यूएपीएचा गैरवापर आणि जामीन अर्ज सातत्याने नाकारणे, या गोष्टी भीमा-कोरेगावशी संबंधीत प्रकरणांमध्ये सर्वाधिक प्रमाणात दिसल्या या प्रकरणांमध्ये केवळ विचारदेखील गुन्हा मानण्यात आला. या प्रकरणात अनेक व्यक्तींना अटक करण्यात आली, तेव्हा पूर्वीच सार्वजनिक अवकाशात उपलब्ध असलेल्या आणि टंकलिखित सही व तारीख नसलेल्या दस्तवेजांना तथाकथित पुरावा म्हणून स्वीकारण्यात आले. प्रस्तुत दस्तावेज वरवरा राव आणि गौतम नवलाखा यांच्याकडील उपकरणांमधून मिळाल्याचे सांगितले गेले. 'भारतीय क्रांतीची बृहस्पना व डावपेच' अशा शीर्षकाचा हा दस्तावेज सहा वर्षापूर्वी प्रकाशित झालेल्या एका पुस्तकातही नमूद आहे तसेच तो सार्वजनिकरित्या ऑनलाईन उपलब्ध आहे. सुधा भारव्दाज यांच्या विरोधातील प्रकरणात ज्या साक्षीदाराच्या, बयानावर विसंबून सुनावणी सुरू झाली, तिथे कलम-१६१ लागू नाही. पण युएपीए कायदा लावल्यामुळे इथे आरोपीला जामीन मिळू शकत नाही. गेली दोन वर्षे सुधा भारव्दाज तुरूंगात आहे. कोव्हिड-१९ चे रुग्ण असलेल्या वरवरा राव यांना तुरंगाबाहेर नेऊन योग्य उपचार मिळू दिले जात नाहीत.

न्यायदानाच्या मूलभूत भूमिकेनुसार कार्य करण्यातही आलेले अपयश सर्वोच्च न्यायालयाच्या ऱ्हासाचे स्पष्ट निर्देश करणारे होते. इंटरनेटवरील

बंदीच्या प्रकरणात अनुराधा भसीन, (२०२०) न्यायालयाचा निकाल अनेक बाबतीत प्रशंसनीय होता, पण प्रत्यक्षात मुख्य मुद्यावर मात्र त्यात काहीच निर्णय दिला गेला नाही. संदेशन सेवा थांबविण्याचा निर्णय आवश्यकता व प्रमाणबध्दता या तत्वानुसार व्हायला हवा, असा निकाल देऊनही न्यायालयाने काश्मीरमधील संदेशन सेवांवरील बंदीची कायदेशीरता ठरवताना मात्र ही तत्वे लागू केली नाहीत. मे-२०२० मध्ये दिलेल्या निकालामध्ये न्यायालयाने अनुच्छेद १४, १९ आणि २१ यांच्याशी निगडीत संविधानिक प्रश्न हाताळले नाहीत, प्रमाणबध्दतेचे मूल्यमापन केले नाही आणि कठोर छाणणी देखील केली नाही. जम्मू-काश्मीरमध्ये 'अनुराधा भसीन विरुद्ध भारतीय संघराज्य (२०२०)' प्रकरणाच्या निकालाची उपयोजितता आहे का आणि तिथे ४ जी सेवा नाकारण्यासंदर्भात कोणता निर्णय घ्यायचा, याचा 'सल्ला' कार्यकारी मंडळाच्या नेतृत्वाखालील विशेष पुनरावलोकन समितीने न्यायालयाला व प्रशासनाला द्यावा, असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने स्वतःचे अंग झटकले हे स्पष्टपणे चुकीच्या दिशेने जाणारे व सांविधानिक दृष्टीने अस्वीकारार्ह पाऊल आहे; येथे कार्यकारी मंडळानी स्वतःच्याच कृतीचे पुनरावलोकन करण्यास सांगण्यात आले. वास्तविक न्यायव्यवस्थेने कार्यकारी मंडळाच्या कृतीचे न्यायिक पुनरावलोकन करणे अपेक्षीत होते. अपेक्षेनुसार पुनरावलोकन समितीने संबंधीत प्रकरणाचे प्रातिनिधीक असणे नाकारले, त्यामुळे जम्मू-काश्मीरमधील संपूर्ण लोकसंख्या अनिश्चित काळासाठी ४-जी सेवापासून वंचित राहिली. ज्येष्ठ वकिल, अरविंद दातार यांच्या मते, या प्रकरणामध्ये न्यायदानाचे काम 'आऊटसोर्स' करण्यात आले, म्हणजेच न्याय नाकारण्यात आला, असे विवाद्यरित्या म्हणता येईल. कार्यकारी मंडळाकडून व क्वचित प्रसंगी कायदे मंडळाकडून भारतातील न्यायिक स्वातंत्र्याला धोका उद्‌भवण्याची शक्यता आहे, असे मानले जाते. पण न्यायव्यवस्थेच्या आतील व्यक्तीच इतर खंडपीठापुढे लीन होत असतील, तेव्हा ही वेगळीच तऱ्हा ठरते. आजच्या परिस्थितीची अटकळ मुख्य न्यायमूर्ती वाय.व्ही. चंद्रचूड यांनी काही दशकांपूर्वी बांधली होती. १९८५ मध्ये त्यांनी असे निरीक्षण नोंदवले होते की, न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यास बाहेरून नव्हे तर आतून जाता धोका आहे.

**मूल्यांकन (Conclusion) :**

सर्वोच्च न्यायालयाच्या सक्रीय कार्यप्रणालीचे ज्वलंत उदाहरण म्हणजे राष्ट्रीय लोकशाही आघाडीने २०१४ मध्ये केंद्र शासनाची सूत्रे हाती घेतल्यानंतर लगेचच राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग अधिनियमच्या मुद्यावरून २०१५ मध्ये राज्यसंस्था व न्यायसंस्था यांच्यात संघर्ष उद्‌भवला. धाडसीपणे स्वतंत्र बाणा दाखवत सर्वोच्च न्यायालयाने हा कायदा रद्द केला. कार्यकारी संस्थेविरोधात न्यायालयाने बहुतांशाने स्वतःचा कणा ताठ ठेवला आणि न्यायिक नियुक्त्यांच्या मुद्यांवर विशेष तेज दाखवले. पण दुदैवाने आज हे सर्व ओसरले आहे. सर्व उच्च न्यायालयांमधील नवीन न्यायाधीशांच्या नियुक्त्या आणि विद्यमान न्यायाधीशांच्या बदल्या याविषयीचा निर्णय कायदा मंत्रालय घेते किंवा घडवून आणते असेही विवाद्यरित्या म्हणता येते. अलीकडच्या काळात न्यायमूर्ती अकील कुरेशी, एस. मुरलीधर आणि जयंत पटेल या न्यायाधीशांच्या बदल्या अत्यंत संशयास्पदरित्या झाल्या, परंतु याविषयी मात्र सर्वोच्च न्यायालयाने एका शब्दानेही प्रश्न उपस्थित केले नाहीत. जानेवारी-२०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयातील चार न्यायाधिशांनी एकत्रितरित्या पत्रकार परिषद घेतली, तो एक संक्षिप्त निर्णायक क्षण येऊन गेला: न्यायिक प्रशासनाच्या आणि व्यवस्थापनाच्या मुद्यावरून न्यायाधीशांनी स्वतःची तक्रार जाहिररित्या मांडण्याची ही घटना अभूतपूर्व होती.

सर्वोच्च न्यायालयाने काही प्रकरणात क्वचितप्रसंगी स्वतःच्या अभिव्यक्तीची चुणूक दाखवली. उदा. न्यायमूर्ती के. एस. पट्टस्वामी (निवृत्त) विरुद्ध भारतीय संघराज्य (२०१८) किंवा श्रेया सिंबल विरुद्ध भारतीय संघराज्य (२०१५) यासारख्या खाजगीपणाच्या अधिकाराविषयीच्या प्रकरणांमध्ये माहिती तंत्रज्ञान 'अधिनियम- २०००' मधील कलम - ६६ (अ) रद्द करण्यात आले. प्रथमतःच संविधानातील कलम-१९ (१) (अ) चा भंग केल्याचे कारण देऊन एखादा कायदा रद्द केला जात होता. शिवाय, समलैंगिकतेला फोजदारी गुन्हा न मानणे किंवा व्यभिचार, तिहेरी तलाक यासारखे लिंगभावविषयक न्यायाचे अनेक खटले तसेच सैन्यदलांमधील बढतीचे प्रकरण अशा काही खटल्यांमध्येही सर्वोच्च न्यायालयाने ठामपणे निकाल दिले. परंतु कलम-६६ (अ) चा अपवाद वगळता इतर प्रकरणांमध्ये कार्यकारी मंडळाच्या खऱ्या अर्थाने काही संबंध नव्हता, हे लक्षात यावे. पण कार्यकारी मंडळ पक्षकार म्हणून सक्रिय रस घेत

असेल आणि लोकांच्या अधिकारांना दडपू पाहत असेल (सर्वसाधारणतः स्वतःचा कार्यक्रम पुढे रेटण्यासाठी असे केले गेले) अशा प्रत्येक प्रकरणात न्यायालयावर दबाव आल्याचे तुम्हाला बघायला मिळेल.

'इंडियन एक्सप्रेस'मधील एका बातमीनुसार; अभिव्यक्ती स्वातंत्र्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अलीकडच्या १० सर्वात महत्वाच्या निकालांमध्ये केवळ चार निकाल अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारावर दावा सांगणाऱ्या व्यक्तीच्या बाजूने दिले गेले. विशेष म्हणजे या चारही प्रकरणांमध्ये शासन याचिकाकर्त्याला पाठिंबा देत होते किंवा आक्षेप घेत नव्हते. याउलट 'शासनविरोधी पक्षकार' असलेल्या सर्व प्रकरणांमध्ये याचिकाकर्त्याचा पराभव झाला. सर्व प्रकरणे न्यायालय अशाच पध्दतीने हाताळताना दिसते आहे. विशेषतः अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मुद्यावर न्यायालय काटेकोर हाताळताना दिसत आहे. अलीकडेच प्रशांत भूषण यांच्या विरोधातील प्रकरणाच्या माध्यमातून अधिक स्पष्ट होते. राजकीय पक्ष चिन्ह आणि अस्तित्व संदर्भात न्यायालयाने निर्णय सातत्याने वादातीत राहिले आहेत. तसेच त्याविषयी सर्व सामान्य नागरिकांमध्ये मतमतांतरे असलेली दिसून येतात. जनहित याचिकांद्वारे सर्वोच्च न्यायालय आपली सक्रियता पार पाडताना निःष्पक्ष भूमिका निभावत आहे की शासन व अराजकीय घटकांच्या प्रभावाद्वारे कार्य करीत आहे याविषयी साशंकता आहे. अर्थात समकालीन युगात सर्वोच्च न्यायालयाची भूमिका बदलली असून राजकीय दबावतंत्राचा न्यायालयाच्या स्वातंत्र्यावरील प्रभाव अधिक वृध्दिंगत होत असल्याचे सातत्याने दिसून येते.

**संदर्भग्रंथ सूची (Bobliography) :**


1. Shukla, V. N. (2017). Constitution of India (13th Edition), Eastern Book Company, Luckhnow.
2. Grover, virender (1997). The Constitution of India. Deep Deep publications.
3. Chakraverti, Suranjan (1973). Natural Justice, Eastern Book Company, Luckhnow.
4. Sharma Gokulesh (2004). Human Rights social Justice. Deep Deep Publications.

५. शर्मा, जी. एल. (२०१५). सामाजिक मुद्दे. रावत पब्लिकेशन्स.

६. लक्ष्मीकांत, एम. (२०१७). इंडियन पॉलिटी. के. सागर पब्लिकेशन्स.

७. भोळे, भास्कर लक्ष्मण (२००३). भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण. पिंपळापुरे ॲन्ड कं पब्लिशर्स
८. बसू, दुर्गा दास (२०१५). भारतीय राज्यघटनेची ओळख. लेक्सीस-नेक्सीस पब्लिकेशन्स.
9. https://en.wikipedia.org
10. https://www.jstor.org
11. https://www.scotusblog.com
12. https://www.aspeninstitute.org

■■■

# भारतीय न्यायपालिकेच्या निर्णयांची मिमांसा

❒ **डॉ. संतोष संभाजी डाखरे**
राजे विश्वेश्वरराव कला-वाणिज्य महा. भामरागड
जि. गडचिरोली

**सारांश :**

जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताची ओळख आहे. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ हे लोकशाहीचे तीन स्तंभ म्हणून ओळखले जातात. लोकशाहीच्या योग्य आणि यशस्वी संचालनामध्ये या तिनही स्तंभाचे विशेष असे महत्व आहे. तसे पाहले तर या तिनही स्तंभाचे कार्य हे वेगवेगळे आहेत. आणि कार्याच्या बाबतीत असे वेगळेपन जपण्यातच लोकशाहीचे हित आहे. संविधानाने या तिनही स्तंभाना त्यांचे कार्यक्षेत्र निश्चित करून दिले आहे. या संदर्भात मॉनटेन्स्क्यूचा सत्ताविभाजनाचा सिध्दांत लागू पडतो. याच सिध्दांतानुसार सत्तेचे विभाजन या तिनही स्तंभामध्ये झालेले आहे. कायदे करणे हे कायदेमंडळाचे त्याची अंमलबजावणी करणे हे कार्यकारी मंडळाचे तर कायद्याचा अर्थ लावणे, न्याय प्रस्थापीत करणे, संविधानाचे संरक्षण करणे हे न्यापालिकेचे कार्य आहे. मात्र हे तिनही स्तंभ जेव्हा आपली जबाबदारी ओळखून वागत नाही आणि आपले कार्यक्षेत्र सोडून इतरांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करतात तेव्हा वाद निर्माण होतो. विशेष करून हा वाद कायदेमंडळ आणि न्यायमंडळ यांच्याबाबतीत वारंवार होताना दिसून येतो. अलीकडे तर न्यायपालिकेचे अनेक निर्णय हे वादग्रस्त ठरत आहे. निष्पक्ष न्याय-निवाड्यासाठी ओळखली जाणारी न्यायपालिका आपला स्वतंत्र बाणा हरवून बसली की काय? असा प्रश्न निर्माण होतो. त्यातच राष्ट्रापतीच्या माध्यमातून सत्ताधारी जेव्हा न्यायपालिकेवर अंकुश ठेवू पाहतात तेव्हा ‘राष्ट्रपती हे रबरी शिक्का असतात’ या विधानावर शिक्कामोर्तब झाल्याशिवाय राहत नाही. याच अनुषंगाने प्रस्तूत शोधनिबंधात न्यायपालिकेच्या काही निर्णयांची

मिमांसा करण्यात आलेली आहे. (विशेषतः १४३ आणि २०० कलमांच्या अनुषंगाने.)

**मुळ शब्द :** लोकशाही, न्यायपालिका, संविधान, कायदेमंडळ, मानवाधिकार.

**उद्देश :**

१) भारतीय न्यायपालिकेच्या निर्णयाचा आढावा घेणे.

२) लोकशाही सक्षमीकरणांमधे न्यायपालिकेच्या योगदानाचा आढावा घेणे.

३ ) न्याय पालिकेवरील दबावाची चर्चा करणे.

**प्रस्तावना :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून तर आजवर भारतीय न्यापालिकेचा प्रवास बघितला तर तो समाधानकारक नसला तरीही खूप असमाधानकारकही नाही असे म्हणता येईल, भारतामध्ये न्याय विलंबाने होत असला तरी तो नाकारला जात नाही. हे मान्य करावेच लागेल. येथे प्रत्येकाला न्यायिक स्वातंत्र्य आहे. आपल्यावर अन्याय झाला आहे किंवा मुलभूत अधिकारांपासून आपल्याला वंचित ठेवण्यात येत आहे, असे कोणाला वाटले तर तो या संदर्भात न्यापालिकेला दाद मागू शकतो. या सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न न्यापालिकेचा असतो. न्यायपालिका ही संविधानाची संरक्षक आहे देशाचा राज्यकारभार हा संविधानानुसारच चालतो की नाही हे पाहण्याचा अधिकार न्यापालिकेला आहे. कायदेमंडळाला कायदे करण्याचा अधिकार असला तरीही असे कायदे हे संविधानाला अनुसरून आहे की नाही हे पाहण्याचा अधिकार न्यायपालिकेचा आहे. असा एखादा कायदा जर संविधानविरोधी असेल तर तो रद्द ठरविण्याचा अधिकार सुध्दा न्यायपालिकेला आहे. यावरूनच न्यायपालिका आणि कायदेमंडळात वाद निर्माण झाल्याचे अनेक उदाहरणे आहेत.

भारतातील न्यायपालिका निःपक्षपणे कार्य करत असते असे म्हटल्या जाते. मात्र न्यायपालिकेतील न्यायाधीशांच्या संदर्भात बोलायचे झाल्यास असे दिसून येते की काही विशिष्ट घराण्यातील लोकांचीच या पदावर नियुक्ती होत असते. एकाच घराण्यातील अनेक लोकांनी न्यायाधीशांचे पद भूषविल्याचे उदाहरणे आहेत. उच्च व सर्वोच्च न्यायालयात मागासवर्गीय आणि दलीत समाजातील लोकांची न्यायाधीश म्हणून संख्या ही नगण्य आहे. अशावेळेला

विशिष्ट घराण्याची परंपरा लाभलेल्या व उच्चवर्णीयातून आलेल्या न्यायाधिशांकडून सर्वसामान्यांसाठी न्याय केला जाईल काय यावर संशयच आहे.

या संदर्भातील उदाहरण येथे घेता येईल की, २०१३ मधील अलाहाबाद कुंभ मेळाव्याच्या कालावधीत अलाहाबाद उच्च न्यायालयातील अधिवक्त्यांनी महामंडलेश्वर यांना न्यायालयात निमंत्रित केले होते. त्यावेळी यांनी अशी घोषणा केली की, ज्या संरचनेत वारंवार संशोधन केले जाते, त्या संरचनानुसार देश चालविला जाऊ शकत नाही. यानुसार भारताचे संविधान त्यांच्या मतानुसार कचऱ्यासमान होते. तर मनुस्मृतीमध्ये निर्माणकाळापासून आजवर कुठलेही परिवर्तन झाले नाही, ती अपरिवर्तनिय आहे, त्यामुळे मनुस्मृती हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ असून त्यानुसार भारताचे संचालन करायला पाहिजे असेही वक्तव्य करण्यात आले होते. यामधून संविधानाविषयी असलेली चिड तर लक्षात येतेच यासोबतच एका विशिष्ट धर्माशी संबंधीत असलेल्या व्यक्तिला न्यायालयामध्ये आमंत्रित करणे म्हणजे, न्यायपालीकेलाही एक विशिष्ट धर्म असतो हे सिद्ध करणारे आहे. माहिताचा अधिकार हा भारतीय नागरिकांना मिळालेला एक महत्वपूर्ण अधिकार आहे. याद्वारे नागरिकांना कोणत्याही विभागाची माहिती जाणून घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. मात्र न्यायपालिकेला यामधून वगळण्यात आले आहे. गोपनियतेच्या नावाखाली नागरिकांना या माहितीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. या संदर्भात अनेक याचिका केल्या गेल्यात मात्र न्यायपालिकेने त्याला दाद दिली नाही.

भारतीय नागरिकांच्या मुलभूत अधिकारांचे संरक्षण करणे हे एकमेव कार्य न्यापालिकेचे नाही. तर निवडणूका निर्भय पध्दतीने आणि प्रामाणिकपणे कशा होतील यासंदर्भातही महत्वपूर्ण निर्णय न्यायपालिकेने घेणे अपेक्षित आहे. काही वर्षांपूर्वी जेव्हा निवडणूक रोखे ही संकल्पना पुढे आली. तेव्हा राजकीय पक्षांना नागरिक, संस्था यांच्याद्वारे निधी प्राप्त करण्याचा अधिकार प्राप्त झाला. याद्वारे मोठ्या प्रमाणात काळा पैसा गोळा करण्याची नामी संधी राजकीय पक्षांना प्राप्त झाली होती. याबाबत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. मात्र राजकीय पक्षांनी याचा विरोध केला, यासंदर्भात न्यायालयाने कोणताही आदेश देऊ नये अशी विनंती केली. न्यायालयाने

सुध्दा यासंदर्भात ठोस असा निर्णय दिला नाही. ज्या राजकीय पक्षांना असा निधी प्राप्त होईल त्यांनी ही माहिती बंद लिफाफ्यामधे निवडणूक आयोगाकडे सादर करावी, असा आदेश न्यायालयाने त्यावेळेस दिला. मात्र निवडणूक रोखे पूर्णपणे रद्द केले नाही.

देशाच्या एकतेच्या दृष्टीने हितकारक ठरतील असे निर्णय घेणे न्यायपालिकेकडून अपेक्षित आहे. मात्र असे होताना दिसून येत नाही. लोकशाहीमध्ये गुप्त मतदान पध्दती असते ती, मतांची गुप्तता राखण्याकरीता. कोणी कोणाला मतदान केले हे राजकीय पक्षांना, उमेदवारांना कळू नये याकरिता. मात्र आता बूथ स्तरावरूनच कोणत्या उमेदवाराला कोणत्या प्रभागातून कोणत्या गावातून किती मते पडलीत हे जाणून घेता येते, त्यामुळे खऱ्या अर्थाने मतदानाची गुप्तता संपुष्टात येत आहे. गावागावातील सामाजिक सालोख्यावर परिणाम होत आहे. अमुक जातीचे, समुदायाचे, धर्माचे मत आपल्याला पडले नाही, असे आकडेवारीवरून राजकीय पक्ष ठरवित असतात. २०१९ लोकसभा निवडणूक कालावधीत मेनका गांधी यांनी मुस्लीम समुदायाला धमकी दिली होती की मला मतदान केले नाही तर निवडून आल्यानंतर मी तुमची कोणतीही मदत करणार नाही, बूथ स्तरावरून माहिती पडणाऱ्या मतावरूनच मेनका गांधीनी हे वक्तव्य केले होते. याबाबत देशभरात व्यापक स्तरावर प्रतिक्रिया सुध्दा बघावयास मिळाल्यात. बूथ स्तरावरून मतांचा निकाल माहित होण्याऐवजी सामूहिक स्तरावर मतमोजणीचा निकाल प्रसिध्द करण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. याद्वारे मतदानाची गुप्तता अबाधित राहू शकेल, मात्र न्यायालयाने सुनावणी न करताच ही याचिका खारिज केली.

ईव्हीएमद्वारे होणाऱ्या मतदानावर आजही अनेक विरोधी पक्षांना आक्षेप आहे. त्यावरून सर्वपक्षीय आंदोलनही देश आणि राज्य पातळीवर उभारण्यात आले होते. निवडणूक आयोगाला यासंदर्भात वारंवार निवेदनही देण्यात आले. तसेच काही वर्षांपूर्वी अनेक राजकीय पक्षांनी एकत्र येऊन यासंदर्भात एक याचिका दाखल केली होती. निवडणूकीदरम्यान अनेक मतदान केंद्रावर निवडणूक यंत्रांमध्ये बिघाड घडवून आणल्या जातो, यंत्र एखाद्या विशिष्ट पक्षासाठी मॅनेज केली जाते असा आरोप करून एका मतदारसंघातील पन्नास

टक्के यंत्रांची मोजणी केली जावी, असा आग्रह या पक्षांनी न्यायालयाकडे केला. मात्र यावर सर्वोच्च न्यायालयाचे मत हे होते की एवढ्या साऱ्या यंत्रातील मतपत्रिकांची मोजणी केल्यास याकरिता खूप वेळ जाईल आणि निकाल उशिराने येईल. तसे पाहू जाता अनेक राज्यात चार ते  पाच टप्यात मतदान घेतले जाते, मग तेव्हा निकालाला उशीर होत नाही काय? २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभांचा निकाल घोषित होऊनही एक महिना सरकार स्थापन होवू शकले नव्हते, त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने निकालाला उशीर होतो या एका सबबीवर राजकीय पक्षांच्या या विनंतीची दखल घेतली नाही हे नक्कीच पक्षपाती वाटते.

राज्य विधानमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांना राज्यपालांनी कायमस्वरूपी मान्यता नाकारण्याचा अधिकार दिल्यास लोकनियुक्त सरकार हे निवडून न आलेल्या राज्यपालांच्या दयेवर अवलंबून राहील, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्ट २०२५ मध्ये केली होती. भारताच्या संविधानातील कलम १४३ अंतर्गत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केलेल्या संदर्भावर घटनापीठासमोर सुनावणी झाली. घटनापिठात सरन्यायाधीश न्यायमूर्ती भुषण गवई, न्या. सूर्यकांत, न्या. विक्रम नाथ, न्या. पी.एस. नरसिंहा आणि न्या. अतुल एस. चंदुरकर यांचा समावेश होता.

सुनावणी दरम्यान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, कलम २०० अंतर्गत राज्यपालांना विधेयकांवर सही न करण्याचा अधिकार आहे आणि त्यामुळे ते विधेयक 'फॉल थ्रू' होते, म्हणजेच पुन्हा विधानमंडळाकडे पाठविण्याची संधीच राहत नाही. यावर निरीक्षण नोंदवत सरन्यायाधीश न्या. गवई म्हणाले होते की, असे झाल्यास राज्यपालांना अमर्याद अधिकार मिळतील. बहुमताने निवडून आलेले सरकार राज्यपालांच्या मनमानीवर अवलंबून राहील. राज्यपाल अनिश्चित काळासाठी विधेयकं प्रलंबित ठेवू शकतील. गेल्या एप्रिलमध्ये सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल देत राष्ट्रपती आणि राज्यपालांनी विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी ठराविक कालमर्यादा पाळावी, असे निर्देश दिले होते. तसेच राज्यपालांनी कलम २०० अंतर्गत कारवाई न केल्यास ती न्यायालयीन पुनरावलोकनाच्या कक्षेत येईल, असेही स्पष्ट केले होते.

**राष्ट्रपती - सर्वोच्च न्यायालय आमनेसामने**

राज्यपाल आणि राष्ट्रपतींना कायदेमंडळांनी मंजूर केलेल्या विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा निश्चित करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या ८ एप्रिलच्या ऐतिहासिक निर्णयावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली होती. सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात निर्णय घेण्यासाठी तामिळनाडूच्या राज्यपालांना मुदतीची अट घातली होती. या मुद्यावरून राष्ट्रपती विरुद्ध सर्वोच्च न्यायालय असा संघर्ष सुरू झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी थेट सर्वोच्च न्यायालयात एक पत्र लिहून १४ प्रश्न विचारले होते. आणि यावर न्यायालयाचा कायदेशीर सल्ला विचारला होता.

सर्वोच्च न्यायालयाने राज्यपाल आणि राष्ट्रपतींना कालमर्यादा घालणे घटनात्मक मूल्ये आणि व्यवस्थांच्या विरुद्ध असल्याचे तसेच सर्वोच्च न्यायालय चौकटीच्या बाहेर जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे पत्रात नमूद होते. भारतीय संविधानाच्या कलम १४३(१) अंतर्गत, राष्ट्रपतींनी चौदा घटनात्मक प्रश्नांवर सर्वोच्च न्यायालयाकडून कायदेशीर मत मागितले. (राष्ट्रपतीच्या खांद्यावर बंदूक ठेवून सर्वोच्च न्यायालयाचा नेम कोणी साधला हे सर्वांनाच ठाऊक आहे.) तामिळनाडूच्या प्रकरणात राज्यपालाने मंजूर केलेले विधेयक परत राष्ट्रपतीकडे पाठविल्याने वाद उत्पन्न झाला होता. या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालय तामिळनाडू सरकारच्या वतीने निर्णय देतील या शक्यतेचा विचार करूनच राष्ट्रपतींनी कायदेशीर मत मागवले होते.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले होते की, राज्यपालांना कोणत्याही विधेयकावर तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा लागेल. या वेळेच्या आत ते मंजूर करा किंवा पुनर्विचारासाठी परत करा. जर विधानसभेने पुन्हा विधेयक मंजूर केले तर राज्यपालांना एका महिन्याच्या आत संमती द्यावी लागेल. जर कोणतेही विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवले गेले तर राष्ट्रपतींनाही तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा लागेल. राष्ट्रपतींनी हा निर्णय संविधानाच्या भावनेच्या विरुद्ध असल्याचे म्हटले आणि सांगितले की कलम २०० आणि २०१ मध्ये अशी कोणतीही कालमर्यादा विहित केलेली नाही. जेव्हा संविधान राष्ट्रपतींना विधेयकावर निर्णय घेण्याचा अधिकार स्पष्टपणे देते तेव्हा सर्वोच्च न्यायालय या प्रक्रियेत हस्तक्षेप कसा करू शकते असा प्रश्नही त्यांनी उपस्थित

केला.

**राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाला विचारलेले चौदा प्रश्न**

१) भारतीय संविधानाच्या कलम २०० अंतर्गत राज्यपालांना विधेयक सादर केले जाते तेव्हा त्यांच्यासमोर कोणते घटनात्मक पर्याय असतात?

२) भारतीय संविधानाच्या कलम २०० अंतर्गत विधेयक सादर केले जाते तेव्हा राज्यपाल त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सर्व पर्यायांचा वापर करताना मंत्री परिषदेने दिलेल्या मदत आणि सल्ल्याला बांधील असतात का?

३) भारतीय संविधानाच्या कलम २०० अंतर्गत राज्यपालांनी संवैधानिक विवेकाधिकाराचा वापर करणे न्याय्य आहे का?

४) भारतीय संविधानाच्या कलम ३६१ ही भारतीय संविधानाच्या कलम २०० अंतर्गत राज्यपालांच्या कृतींशी संबंधित न्यायालयीन पुनरावलोकनावर पूर्णपणे बंदी घालते का?

५) घटनात्मकरित्या निर्धारित कालमर्यादा आणि राज्यपालांनी अधिकार वापरण्याची पद्धत नसल्यास, राज्यपालांनी भारतीय संविधानाच्या कलम २०० अंतर्गत सर्व अधिकार वापरण्यासाठी न्यायालयीन आदेशांद्वारे कालमर्यादा लागू केली जाऊ शकते आणि ती पद्धत विहित केली जाऊ शकते का?

६) भारतीय संविधानाच्या कलम २०१ अंतर्गत राष्ट्रपतींनी संवैधानिक विवेकाधिकाराचा वापर करणे न्याय्य आहे का?

७) संविधानात्मकरित्या निर्धारित कालमर्यादा आणि राष्ट्रपतींनी अधिकार वापरण्याची पद्धत विहित न केल्यास, भारतीय संविधानाच्या कलम २०१ अंतर्गत राष्ट्रपतींनी विवेकाधिकाराचा वापर करण्यासाठी न्यायालयीन आदेशांद्वारे कालमर्यादा लागू केली जाऊ शकते आणि ती पद्धत विहीत केली जाऊ शकते का?

८) राष्ट्रपतींच्या अधिकारांचे नियमन करणाऱ्या संवैधानिक योजनेच्या प्रकाशात, जेव्हा राज्यपाल राष्ट्रपतींच्या संमतीसाठी विधेयक राखून ठेवतात तेव्हा राष्ट्रपतींना भारतीय संविधानाच्या कलम १४३ अंतर्गत संदर्भाद्वारे सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घेणे आणि सर्वोच्च न्यायालयाचे मत घेणे आवश्यक आहे का?

९) भारतीय संविधानाच्या कलम २०० आणि कलम २०१ अंतर्गत

राज्यपाल आणि राष्ट्रपती यांचे निर्णय कायदा अंमलात येण्याच्या आधीच्या टप्प्यावर न्याय्य आहेत का? न्यायालयांना विधेयकातील मजकुरावर कोणत्याही प्रकारे न्यायालयीन निर्णय घेण्याची परवानगी आहे का, कायदा होण्यापूर्वी?

१०) भारतीय संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत संवैधानिक अधिकारांचा वापर आणि राष्ट्रपती/राज्यपालांचे/त्यांनी दिलेले आदेश कोणत्याही प्रकारे बदलले जाऊ शकतात का?

११) राज्य विधिमंडळाने केलेला कायदा हा भारतीय संविधानाच्या कलम २०० अंतर्गत राज्यपालांच्या संमतीशिवाय अंमलात असलेला कायदा आहे का?

१२) भारतीय संविधानाच्या कलम १४५(३) च्या तरतुदीनुसार, या माननीय न्यायालयाच्या कोणत्याही खंडपीठाने प्रथम हे ठरवणे बंधनकारक नाही का की त्याच्यासमोरील कार्यवाहीत समाविष्ट असलेला प्रश्न अशा स्वरूपाचा आहे ज्यामध्ये संविधानाच्या अर्थ लावण्याबाबत कायद्याचे महत्त्वाचे प्रश्न समाविष्ट आहेत आणि तो किमान पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे पाठवणे बंधनकारक नाही का?

१३) भारतीय संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार प्रक्रियात्मक कायद्याच्या बाबींपुरते मर्यादित आहेत का किंवा भारतीय संविधानाच्या कलम १४२ मध्ये संविधानाच्या किंवा लागू असलेल्या कायद्याच्या विद्यमान मूलभूत किंवा प्रक्रियात्मक तरतुदींच्या विरुद्ध किंवा विसंगत निर्देश जारी करणे/आदेश पारित करणे समाविष्ट आहे का?

१४) भारतीय संविधानाच्या कलम १३१ अंतर्गत खटल्याशिवाय केंद्र सरकार आणि राज्य सरकारांमधील वाद सोडवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या इतर कोणत्याही अधिकारक्षेत्राला संविधान प्रतिबंधित करते का?

**भारतीय न्यायपालिका आणि मानवाधिकार**

भारतीय न्यायपालिका, विशेषतः सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये, मानवाधिकारांच्या अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. राज्यघटनेच्या भाग ३ मधील अनुच्छेद १२ ते ३५ मूलभूत हक्क प्रदान करतात, ज्यात समानता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांचा समावेश आहे. न्यायपालिकेने न्यायिक पुनरावलोकन आणि जनहित याचिकांद्वारे हे

हक्क विस्तारित केले आहेत. उदाहरणार्थ, एका प्रकरणात फुटपाथवर राहणाऱ्यांना जीवनाचा हक्क दिला गेला, तर विशाखा प्रकरणात कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाविरोधात मार्गदर्शक तत्त्वे जारी केली गेली. न्यायपालिकेने पर्यावरण, शिक्षण, आरोग्य आणि कैद्यांच्या हक्कांसारख्या क्षेत्रांत हस्तक्षेप करून मानवाधिकार मजबूत केले आहेत. मात्र, न्यायिक विलंब आणि कार्यकारी प्रभाव यामुळे न्यायपालिकेसमोर आव्हाने आहेत.

अनुच्छेद १४३ राष्ट्रपतींना सर्वोच्च न्यायालयाकडून सल्ला मागण्याची परवानगी देतो. यात राष्ट्रपती कोणत्याही कायद्याच्या किंवा तथ्याच्या सार्वजनिक महत्त्वाच्या प्रश्नावर न्यायालयाचे मत मागू शकतात. मात्र ते बंधनकारक नसते. अनुच्छेद २०० राज्यपालांच्या विधेयकांवरील कारवाईशी संबंधित आहे. राज्य विधानमंडळाने पारित केलेले विधेयक राज्यपालांकडे पाठवले जाते, आणि राज्यपाल ते मंजूर करू शकतात, नाकारू शकतात किंवा राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखीव ठेवू शकतात. मानवाधिकारांच्या दृष्टीने, हे अनुच्छेद महत्त्वाचे आहे कारण राज्य कायदे अनेकदा मानवाधिकार प्रभावित करतात, जसे की अल्पसंख्याक हक्क, महिला संरक्षण किंवा सामाजिक न्यायाशी संबंधित विधेयके जर राज्यपाल विधेयक राखीव ठेवत असतील तर ते राष्ट्रपतींकडे जाते आणि नंतर न्यायिक पुनरावलोकनाद्वारे ते आव्हानित केले जाऊ शकते. उदाहरणार्थ, २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी वेळमर्यादा घालून दिली होती, ज्यामुळे अनुच्छेद २०० च्या दुरुपयोगाला आळा बसण्याचे चिन्ह निर्माण झाले होते. मात्र नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने अशी वेळमर्यादा घालून देता येणार नाही असा महत्वपूर्ण निर्णय दिला. मात्र राज्यपालाने किवा राष्ट्रपतीने निर्णय घेताना अधिक वेळ लावू नये अशी अपेक्षा व्यक्त केली होती. खरे तर न्यायपालिकेने कायद्याचा स्पष्ट अर्थ लावणे अपेक्षित आहे. मोघम स्वरुपात वक्तव्य करणे अपेक्षित नाही.

**समारोप**

मागील काही वर्षामध्ये लोकशाहीच्या यशस्वी संचालनासंदर्भात न्यायपालिकेने अनेक चांगले निर्णय दिले आहेत. यात शंकाच नाही. मात्र काही निर्णय देताना न्यायालयाचा वेळकाढूपणा कारणीभूत असल्याचे निदर्शनास येते.

न्यायाधीशांची रिक्त असलेली पदे, प्रलंबित असलेले लाखो खटले हे सुध्दा एक कारण असू शकते. मात्र कधी कधी न्यायपालीका डोळ्यावर पट्टी बांधुनच निर्णय देते की काय असाही संशय बळावतो. १९९४ मध्ये सलमानखानने राजस्थानमध्ये काळविटाची शिकार केली होती, आज या घटनेला पंचवीस वर्ष लोटूनही निकाल लागू शकला नाही, याबरोबरच ड्रिंक ॲन्ड ड्राईव्ह प्रकरणामधेही सलमानखानची तारीख पे तारीखच सुरू आहे.

१९९३ मधील मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणामधे अभिनेता संजय दत्त यांच्याकडे घातक शस्त्रसाठा सापडला होता. बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपीसोबत संजय दत्तचे असलेले संबंधही साऱ्या जगाने बघितले होते. मात्र न्याय देताना बाकी आरोपींना सदोष मनुष्यवधामध्ये फाशी व जन्मठेप सुनावण्यात आली, तर संजय दत्तला केवळ शस्त्र बाळगण्याबद्दल शिक्षा झाली. विकासाच्या नावावर चालू असलेली बेसुमार वृक्षतोड न्यायदेवतेच्या नजरेत येत नाही, मात्र त्याचवेळेस एखाद्या आदिवासीने उपजिवीकेसाठी जंगलातील मारलेला एखादा पक्षी किंवा इंधनासाठी आणलेले एखादे लाकूड फार मोठा गुन्हा ठरतो.

नागरिकाने न्यायालयाच्या एखाद्या निर्णयावर आक्षेप नोंदविणे हा न्यायालयाचा अपमान ठरतो. मात्र त्याचवेळेस निःपक्ष न्यायाधिशांनी पत्रकारपरिषद घेऊन सरकारच्या धोरणावर जाहीर टिका करणे चालते. असे एक ना अनेक उदाहरणे देता येईल. सद्यास्थितीमध्ये महिलांवरील वाढते अत्याचार, बलात्कार, दलित अत्याचार, जातिय दंगली यामध्ये मोठ्याप्रमाणत वाढ होत असतांना हे रोखण्याकरीता न्यायालयाने सक्षम अशी भूमिका घेणे गरजेचे आहे, याकरिता कायदेमंडळ जर कुठे कमी पडत असेल, प्रशासन जर कमी पडत असेल तर त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन देणे न्यायपलिकेचे कार्य आहे. लोकशाहीच्या यशाकरिता हे आवश्यक आहे.

मात्र न्यायालय सक्षम कमी आणि दुर्बल अधिक झाल्याचे चित्र आहे. शासनास अनुकूल आणि समांतर निर्णय घेण्यात अनेक न्यायाधीश धन्यता मानत आहे. शासनाची कृपादृष्टी आपल्यावर सदैव असावी, त्यांचा कोप होऊ नये ही भावना न्यायपालिकेत बळावत चालल्याचे चित्र आहे. निवृत्तीनंतर मिळणारे लाभ किंवा खासदारकी त्यांना खुणावत असते. निवृत्तीनंतर न्यायाधीशांनी कोणतेही लाभाचे पद स्वीकारू नये, अशी सर्वसाधारण अपेक्षा

असताना वर्तमानात अनेक न्यायाधीश निवृत्तीनंतर सत्ताधाऱ्यासोबत संसदेत दिसतात. एखादा न्यायाधीश किवा खंडपीठाने लोकशाहीच्या दृष्टीकोनातून सर्वसमावेशक निर्णय दिला असेल मात्र तोच निर्णय सत्ताधारी वर्गाला खटकणारा असेल तर पुढील वेळेस दुसऱ्या न्यायाधीशाकडून तो निर्णय बदलला जातो. असा पक्षपातीपणा लोकांच्या नजरेतून सुटत नाही. आणि न्यायालयाची प्रतिमा त्यांच्या नजरेत खालावते. न्यायालयाचे असे मिळमिळीत, संदिग्ध निर्णय लोकशाहीच्या निकोप वाढीत अडथळाच ठरणार, यात शंका नाही.

**संदर्भ :**


१. प्रा. बी.वाय. कुळकर्णी, 'भारतीय शासन व राजकारण' पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.

२. सबनीस, नि., 'मानवी हक्क संरक्षण अधिनियम' मुकुंद प्रकाशन, पुणे.

३. गारे गोविंद, 'आदिवासी प्रश्न' ग्रामविकास प्रकाशन, पुणे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 'भारताचे संविधान' दीक्षाभूमी संदेश प्रकाशन नागपूर.

५. प्रा. सेवा सिह बाजवा, 'भारत मे न्यायिक सक्रियता' वैभव प्रकाशन, दिल्ली.

६. डॉ. संतोष डाखरे, 'भारतीय लोकशाही आणि स्वतंत्र न्यायपालिका' रिसर्च नेबुला (जर्नल) २०१९.

6. www.judicialjudgement.com


■■■

# गांधीवादी मूल्यांच्या पार्श्वभूमीवर भारतीय गणराज्यातील मानवी हक्क व संविधानिक संरक्षण : एक अध्ययन

❐ **प्रमोद वाटकर**
सहायक प्राध्यापक
गांधी विचारधारा विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**सारांश :**

गांधीवादी मूल्यांचा भारतीय गणराज्यावर विशेषतः संविधान, मानवी हक्क, नागरिक कर्तव्ये आणि समकालीन प्रशासनात त्यांचे प्रतिबिंब होणारा प्रभाव तपासण्याचे उद्दिष्ट या संशोधनपत्रातून निहित आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने संपूर्ण सार्वभौम लोकशाही गणराज्य म्हणून घोषणा केली, ज्यामुळे राज्यव्यवस्थेचे राजकीय, नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक मूल्यांवर आधारित शासनाचे स्वरूप स्थापित झाले. सत्य, अहिंसा, सामाजिक न्याय, समानता, मानवी प्रतिष्ठा आणि दुर्बलांचे रक्षण हे गांधीजींचे तत्त्व भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारांमध्ये अनुच्छेद २१, १४-१६, १९, २५-२८, १७, २१ आणि कर्तव्यांमध्ये ५१- स्पष्टपणे प्रतिबिंबित झाले आहेत. दलित-आदिवासी अत्याचार प्रतिबंधक कायदा, महिला सुरक्षा कायदे, मनरेगा आणि अन्न सुरक्षा कायदे या सर्वांनी आर्थिक आणि सामाजिक न्याय मजबूत केला. गांधीजीचे 'स्वराज्य', नयी तालीम आणि ग्रामकेंद्रित विकासाचा दृष्टिकोन नागरिकांचे नैतिक जीवन, व्यावसायिक कौशल्य, सामाजिक जबाबदारी आणि शाश्वत जीवनशैली यांसाठी मार्गदर्शन करतो. आधुनिक भारतातील तंत्रज्ञानातील विषमता, पर्यावरणीय संकटे, धार्मिक व जातीय ध्रुवीकरण, बेरोजगारी आणि स्त्री-सुरक्षिततेसारखी आव्हाने गांधीवादी सत्य-अहिंसा मूल्यांच्या पुनर्प्रतिष्ठेची मागणी करतात. सत्य, अहिंसा, न्याय आणि समतेवर आधारित भारत घडवण्यासाठी गांधीवादी तत्त्वांची अंमलबजावणी आजही तितकीच आवश्यक आहे.

**बीज शब्द :** भारतीय गणराज्य, गांधीवादी मूल्ये, मानवी हक्क, सामाजिक

न्याय, अहिंसा

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे नैतिक व आध्यात्मिक नेतृत्व करणारे महात्मा गांधी हे केवळ राजकीय नेता नव्हते, तर मानवी हक्क, न्याय, समता आणि अहिंसा या मूल्यांचे जगाला दिलेले सर्वात महत्त्वाचे दूत होते. गांधीजींच्या सर्व विचारांचा केंद्रबिंदू मानवी प्रतिष्ठा होता.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या दीर्घ संघर्षानंतर २६ जानेवारी १९५० रोजी भारताने स्वतःला संपूर्ण सार्वभौम लोकशाही गणराज्यघोषित करून एक नवीन सामाजिक-राजकीय ओळख दिली. ही संकल्पना केवळ राज्यशासनाची संरचना नाही, तर एक नैतिक, सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक मूल्यव्यवस्था आहे. गांधी खबरदार करतात की अनुशासन आणि विवेकयुक्त जनतंत्र ही जगातील सर्वोत्तम बाब आहे. मात्र राग लोभ अज्ञान आणि अंधविश्वास आदि दुर्गुणांनी त्रस्त जनतंत्र अराजकतेच्या खाईत जातो आणि नाश ओढावतो.[१]

गांधी, आंबेडकर, टागोर, नेहरू, पेरियार, साने गुरुजी, आगरकर, विनोबा भावे अशा अनेक मराठी आणि भारतीय विचारवंतांनी या संकल्पनेचे विविध पैलू स्पष्ट केले आहेत. त्यामुळे भारत गणराज्याचा अर्थ समजण्यासाठी भारतीय इतिहास, राजकारण, समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि संस्कृती या सर्वांचा अभ्यास आवश्यक ठरतो.

भारताचे संविधान १९५० मध्ये अंमलात आले. तेव्हा भारताने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून नवे राष्ट्र उभारण्याचे स्वप्न पाहिले. गांधीजींनी सर्वोदय, नैतिकता, अहिंसा, सत्य, दुर्बलांचे संरक्षण, मानवी प्रतिष्ठा हे आदर्श जीवनपद्धती आणि सामाजिक परिवर्तनाचे आधार मानले.[२] मार्च १९३१ मध्ये कराची येथे आयोजित काँग्रेस अधिवेशनात मांडलेल्या ठरावात भविष्यकालीन स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे संबंधी बाबी प्रामुख्याने अधोरेखित होतात. संघटनेचे स्वातंत्र्य, अभिव्यक्तीचे आणि वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य, विश्वास आणि श्रद्धेचे स्वातंत्र्य, अल्पसंख्याकांना आपली संस्कृती, भाषा आणि लिपी जपण्याचे स्वातंत्र्य, लिंगनिरपेक्ष समानता, सार्वजनिक जागा, रस्ते, शाळा अशा ठिकाणी सर्वांना मुक्त प्रवेश, व्यक्तीच्या स्वातंत्र्यात व संपत्तीच्या अधिकारात राज्याने

ढवळाढवळ न करणे, वेठबिगाराला बंदी, स्त्रियांना संरक्षण, कामगार संघटना स्थापन करण्याचा अधिकार, शेतसारा कमी करणे, बालमजुरीला प्रतिबंध आणि प्रौढ मताधिकार अशा अनेक गोष्टींचा उल्लेख ठरावाद्वारे गांधीजींनीच अधिवेशनात मांडला.[३] या संदर्भात गांधीवादी मूल्यांचे भारतीय संविधानातील प्रतिबिंब, मानवी हक्कांचे संरक्षण, नागरिकांचे कर्तव्य, गणराज्य भारताचा अर्थ-विस्तार, तसेच समकालीन समाजातील आव्हाने आणि उपाय यांचे विश्लेषण महत्वपूर्ण ठरते.

### भारत गणराज्य : अर्थ, व्याप्ती आणि महत्त्व

'भारत गणराज्य' म्हणजे लोकांच्या इच्छेवर चालणारे, जनतेकडून, जनतेसाठी, जनतेचे शासन अशी मुळातून लोकसत्ताक व्यवस्था होय. या संकल्पनेनुसार राज्यसत्ता कोणत्याही राजाच्या किंवा विशिष्ट गटाच्या हातात नसून नागरिकांच्या सार्वभौमत्वावर आधारित असते.[४] मराठी राज्यशास्त्रज्ञ ना.सी. फडके यांच्या मते, गणराज्य ही जनसामान्यांच्या सार्वभौमत्वावर आणि घटनादत्त मूल्यांवर चालणारी शासनसंरचना आहे. जनता सर्वोच्च, संविधान हा अंतिम कायदेचा स्त्रोत, निवडणूक व्यवस्थेद्वारे लोकशाही सहभाग, नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये आणि सामाजिक न्यायावर आधारित समताधिष्ठित व्यवस्था हे भारतीय गणराज्याचे आधारस्तंभ होय. गांधीजींनी मांडलेले 'स्वराज्य' हे ही केवळ राजकीय स्वातंत्र्य नसून नैतिक, ग्रामकेंद्रित आणि मानवकेंद्रित शासनाची कल्पना होती.[५] माझ्या स्वप्नातील भारत पुस्तकात गांधीजी लिहितात की स्वराज्य म्हणजे सर्वांच्या कल्याणाची, ग्रामस्वराज्याची आणि सभ्यतेची पुनर्रचना.[६] भारतीय गणराज्याची खरी ताकद ही जनतेच्या सक्रिय राजकीय सहभागात आणि सत्तेच्या शांततामय हस्तांतरणात आहे, ज्यामुळे लोकशाहीची स्थैर्यपूर्ण आणि सुदृढ परंपरा टिकून राहते.

### गांधीवादी विचार आणि मानवी हक्कांची संकल्पना

मानवाधिकाराच्या सिद्धांतानुसार सर्व मानवांना किमान चांगले जीवन जगता यावे याकरिता आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीचा एक समान आकृतीबंध निश्चित करणे अपेक्षित असते. मानवाधिकार नागरिकांच्या हातातील प्रभावी शस्त्र असून भारतीय राज्यघटनेत याद्वारे मानवी हक्कांची पाठराखण केली आहे.[७] गांधीजींच्या विचारांचा केंद्रबिंदू

मानवी प्रतिष्ठा, समानता, अहिंसा आणि सत्य हा होता.

त्यांनी अस्पृश्यता, दारिद्र्य, हिंसा, शोषण आणि जातीय भेदभावाचा तीव्र निषेध केला.[८] संयुक्त राष्ट्रांच्या १९४८ मधील मानवी हक्क घोषणेपूर्वीच गांधीजींच्या चळवळींनी भारतीय जनतेला मानवतेचे, न्यायाचे आणि सन्मानाचे भान दिले होते. त्यांच्या मानवी हक्कांच्या संकल्पनेचे काही मुख्य स्तंभ म्हणजे जीवनाचा आणि प्रतिष्ठेचा अधिकार, समाजातील दुर्बल घटकांचे संरक्षण, अहिंसक व न्यायाधिष्ठित शासन, स्त्री-पुरुष समानता आणि कामगार, शेतकरी तसेच हरिजन यांचे अधिकार. गांधीजी स्पष्ट म्हणत की हक्क आणि कर्तव्ये या परस्परपूरक संकल्पना आहेत; कर्तव्ये पार पाडल्याशिवाय खरे हक्क निर्माण होत नाहीत.[९] त्यांच्या या दृष्टिकोनामुळे भारतीय समाजात मानवी हक्कांकडे नैतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक अर्थांनी पाहण्याची नवी दिशा प्राप्त झाली.

**भारतीय संविधानातील मानवी हक्क : गांधीवादी दृष्टिकोन**

**अ) जीवनाचा आणि प्रतिष्ठेचा अधिकार - अनुच्छेद २१**

भारतीय संविधानातील मानवी हक्कांची रचना ही गांधीवादी तत्त्वज्ञानाने स्पर्शिलेली आहे. गांधीजींच्या संपूर्ण जीवनकार्यामध्ये मानवी प्रतिष्ठा, स्वावलंबन, समानता आणि सामाजिक न्याय यांना केंद्रस्थानी स्थान होते, आणि हाच विचार संविधाननिर्मितीत प्रतिबिंबित झाला. अनुच्छेद २१ मधील ‘जीवनाचा आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार’ हा केवळ शारीरिक अस्तित्वापुरता मर्यादित नाही तर तो प्रत्येक नागरिकाला सन्मानपूर्वक, सुरक्षित आणि अर्थपूर्ण जीवनाचा हक्क देतो.[१०] हा दृष्टिकोन गांधीजींच्या मानवी प्रतिष्ठा संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे. गांधीजींच्या मते, खरे जीवन तेच ज्यामध्ये भीतीमुक्तता, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, रोजगार, स्वावलंबन आणि नैतिक वातावरण यांचा समावेश होतो.

अनुच्छेद २१ ची आधुनिक न्यायालयीन व्याख्या या गांधीवादी दृष्टीकोनाला आणखी बळ देते. न्यायालयांनी जीवनाचा हक्क विस्तारित करून त्यात स्वच्छ पिण्याचे पाणी, शुद्ध हवा, प्रदूषणमुक्त पर्यावरण, सुरक्षित कार्यस्थळ, आरोग्य सेवा, प्राथमिक शिक्षण, पोषण, निवारा आणि सन्मानाने जगण्याच्या सर्व आवश्यक गरजा समाविष्ट केल्या. याशिवाय समाजातील सर्वात दुर्बलांच्या

कल्याणाशिवाय देशाची प्रगती संभवत नाही. म्हणूनच अनुच्छेद २१ आर्थिक आणि सामाजिक लोकशाहीचे मार्गदर्शन करतो. दारिद्र्य निर्मूलन, संसाधनांचे न्याय्य वितरण, शेतकरी आणि कामगार कल्याण, ग्रामीण विकास, तसेच शिक्षण आणि आरोग्याचा अधिकार या सर्वांचा पाया याच अधिकारात आहे. गांधीजींनी ग्रामस्वराज्याच्या माध्यमातून स्वावलंबी, स्वच्छ, निरोगी आणि नैतिक समाजाची कल्पना केली. म्हणून भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ हा गांधीवादी न्याय, नैतिकता आणि समता यांच्या विचारांचा आधुनिक कायदेबद्ध विस्तार ठरतो. यात स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, प्रदूषणमुक्त पर्यावरण, सुरक्षित जीवन सर्व अभिप्रेत आहे.

**(ब) समानता - अनुच्छेद १४, १५, १६**

अनुच्छेद १४, १५ आणि १६ हे भारतीय संविधानातील समानतेच्या तत्त्वाचे मुख्य आधारस्तंभ आहेत. अनुच्छेद १४ सर्वांना कायद्यापुढे समान वागणूक देतो, तर अनुच्छेद १५ जात, धर्म, लिंग, जन्मस्थान या आधारांवर होणारा भेदभाव प्रतिबंधित करतो. अनुच्छेद १६ सार्वजनिक रोजगारात समान संधीची हमी देतो. गो. नि. दांडेकर यांच्या मते गणराज्याचे उद्दिष्ट केवळ राजकीय लोकशाही नव्हे, तर आर्थिक न्याय ही त्याची किमान नैतिक अट आहे.[११] गांधीजींनी अस्पृश्यता निर्मुलन, सर्वधर्म समभाव आणि स्त्रियांच्या सन्मानासाठी अखंड लढा दिला. त्यांच्या समता आणि बंधुत्वाच्या मूलभूत मूल्यांचा स्पष्ट प्रभाव या संवैधानिक तरतुदींवर दिसतो.[१२] त्यामुळे संविधानातील समानतेची हमी ही गांधीवादी सामाजिक न्यायाच्या संकल्पनेची कायदेशीर अभिव्यक्ती ठरते.

**(क) अभिव्यक्ती स्वातंत्र्य - अनुच्छेद १९(१)(र)**

गांधीनुसार लोकशाही म्हणजे अशी अवस्था नाही कि ज्यामध्ये लोक शेळीसारखा व्यवहार करतील. लोकतंत्रात व्यक्तीचे मतस्वतंत्र्य आणि कार्य स्वातंत्र्य यांचे रक्षण अत्यंत सावधानीपूर्वक होणे अपेक्षित आहे. अर्थात अल्पसंख्यांकांना बहुसंख्यांकांपेक्षा वेगळी भुमिका घेण्याचा अधिकार आहे.[१३] अनुच्छेद १९(१)(र) नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य देतो आणि गांधीजींची सत्याग्रह पद्धती ही या स्वातंत्र्याची सर्वोच्च नैतिक अभिव्यक्ती होती. अहिंसक प्रतिकाराद्वारे त्यांनी विचार, मत आणि सत्य बोलण्याचा हक्क संरक्षित

केला.

त्यांचा विश्वास होता की मुक्त विचार, सत्य आणि अहिंसेच्या प्रभावाने समाज बदलतो. गांधींनी नैतिक मूल्यांच्या जोपासनेतून मानवतावादाचा पुरस्कार केला. राज्यघटनेतून मानवतावादाची बीजे शोधता येतात. मानवतावाद हा व्यक्ती, स्थळ, काळ सापेक्ष नाही. आज सत्य, अहिंसा, न्याय, सद्भाव, शांती, निरपेक्षता अशी मानवी मुल्ये सहजस्मरणीय असून त्यासाठी पवित्र ग्रंथ, प्रेषित, संत महात्मा यांचेही प्रयोजन नाही. कारण प्रत्येक व्यक्तीस ज्ञानसंपादनाचा अधिकार प्राप्त झाला आहे.[१४]

**(ड) धर्मस्वातंत्र्य - अनुच्छेद २५-२८**

अनुच्छेद २५-२८ नागरिकांना कोणताही धर्म स्वेच्छेने मानण्याचा, आचरण करण्याचा आणि प्रसार करण्याचा अधिकार देतात. गांधीजींच्या दृष्टीने धर्म म्हणजे नैतिकता असून त्यांनी सर्वधर्म समभावाचा आग्रह धरला. संविधानातील धर्मस्वातंत्र्य हे त्यांच्या या नैतिक, समन्यायी दृष्टिकोनाचे कायदेशीर रूप आहे.

**(इ) अस्पृश्यता निर्मूलन - अनुच्छेद १७**

अनुच्छेद १७ ने अस्पृश्यतेचे संपूर्ण निर्मूलन जाहीर करून भारतीय समाजातील शतकानुशतकांच्या अन्यायावर निर्णायक प्रहार केला. हे प्रावधान गांधीजींच्या हरिजनउद्धार, सामाजिक समता आणि मानवी प्रतिष्ठेच्या स्वप्नाचे प्रत्यक्ष कायदेशीर रूप मानले जाते. गांधीजी मानत की कोणत्याही मानवाला जन्मामुळे हीन समजणे हे अहिंसा आणि सत्याच्या तत्त्वांना विरोधी आहे. अनुच्छेद १७ समाजातील सर्वांना समान सन्मान देणारी व्यवस्था निर्माण करण्याचा राज्याचा कटिबद्ध हेतू दर्शवतो. यामुळे भारतीय गणराज्याने सामाजिक न्यायाला सर्वोच्च संवैधानिक मूल्य म्हणून स्थान दिले.

**(फ) शैक्षणिक हक्क - अनुच्छेद २१(-)**

अनुच्छेद २१(-) प्रत्येक मुलाला मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची राज्याची जबाबदारी निश्चित करतो. हे गांधीजींच्या मुलभूत शिक्षण तत्त्वाशी पूर्णपणे जुळते, ज्यात शिक्षण म्हणजे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास मानला होता.[१५] या तरतुदीमुळे समान, नैतिक आणि कौशल्याधारित शिक्षणाची गांधीवादी संकल्पना संविधानिक बनली.

**भारतीय संविधानातील कर्तव्ये आणि गांधीवादी तत्त्व**

अनुच्छेद ५१(-) मधील मूलभूत कर्तव्ये गांधीवादी सदाचारावर आधारित आहेत.

**१. समरसता, बंधुता, वैज्ञानिक दृष्टिकोन**

याद्वारे नागरिकांना भेदभावमुक्त समाज, बंधुत्वाची भावना आणि वैज्ञानिक मनोवृत्ती विकसित करण्याचे आवाहन केले आहे. गांधीजींच्या सत्य, अहिंसा आणि सर्वधर्म समभावाच्या मूलभूत तत्त्वांशी ही अपेक्षा पूर्णपणे सुसंगत आहे. यामुळे लोकशाही समाजात विवेक, सहिष्णुता आणि मानवी एकात्मतेला बळ मिळते.

**२. पर्यावरण संरक्षण**

पर्यावरणाचे रक्षण, संवर्धन आणि जीवसृष्टीबद्दल करुणा बाळगणे ही प्रत्येक नागरिकाची मूलभूत जबाबदारी मानली आहे. गांधीजी निसर्गाशी संतुलन, मितव्यय आणि शाश्वत जीवनशैलीचा आग्रह धरत, पर्यावरण नैतिकतेचे प्रणेते ठरतात. या कर्तव्यामुळे शाश्वत विकासाचे गांधीवादी मूल्य संविधानात दृढ होते.

**३. राष्ट्रप्रेम, लोकशाही मूल्यांचे रक्षण**

या तरतुदीद्वारे राष्ट्रध्वज-संविधानाचा सन्मान, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण तसेच लोकशाही आदर्श टिकवण्याची नागरिकांवर जबाबदारी येते. गांधीजींच्या स्वराज्य, नैतिक राजकारण आणि समाजसेवा तत्त्वांचा यामध्ये स्पष्ट प्रतिबिंब दिसते. यामुळे नागरिकत्व केवळ अधिकारांवर नव्हे तर जबाबदाऱ्या आणि नैतिक सहभागावर आधारित राहते. गांधीजीनुसार कर्तव्यांची पूर्तता केल्याशिवाय समाजात स्थैर्य येत नाही.[१६]

**गांधीवादी समाजदर्शन : समता, बंधुता, न्याय**

**(अ) सर्वोदय**

भारतीय संविधानातील अनुच्छेद ३८(१) मध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय प्रस्थापित करणे ही राज्याची मूलभूत जबाबदारी नमूद आहे. हा दृष्टिकोन गांधीवादी तत्त्वांना पूर्णतः पूरक आहे. साने गुरुजी म्हणतात, लोकशाहीचा आत्मा सामाजिक समानतेत आहे. जोपर्यंत समाज एकमेकांना बंधुभावाने स्वीकारत नाही, तोपर्यंत गणराज्याची उभारणी अपूर्ण राहते.[१७]

गांधींच्या दृष्टीने गणराज्य म्हणजे नैतिक शासन, ग्रामस्वराज्य, अहिंसा, सत्य आणि सामाजिक न्याय यांची एकात्मिक रचना. गांधी आणि राष्ट्रनिर्माण या पुस्तकानुसार गांधींच्या नजरेत गणराज्य ही केवळ राजकीय संस्था नव्हती; ती नैतिक समाजनिर्मितीची चौकट होती.[१८] त्यामुळे संविधानातील सामाजिक न्यायाचा कार्यक्रम हा गांधीवादी राष्ट्रदर्शनाचे आधुनिक रूप मानला जाऊ शकतो.

**(ब) अहिंसा आणि शांततामय सहअस्तित्व**

भारताची परराष्ट्रनीती मूलतः अहिंसा, शांतता, न्याय आणि परस्पर आदराच्या तत्त्वांवर उभी आहे, ज्यावर गांधीवादी विचारांचा ठसा स्पष्टपणे दिसतो. पंचशीलचे पाच तत्त्व परस्पर सन्मान, परस्पर हस्तक्षेप न करणे, समानता, शांततामय सहअस्तित्व आणि आक्रमणविरहितता हे गांधींच्या अहिंसेच्या जागतिक रूपासारखेच आहेत. अलिप्ततावादी चळवळीतून भारताने दाखवून दिले की नैतिकता राखूनही राष्ट्र सन्मानाने राहे शकते. या सर्व धोरणांतून भारताने जगासमोर शांततामय सहअस्तित्वाचा गांधीवादी संदेश व्यवहारात आणून दाखवला. गांधी मानतात, "अहिंसावर आधारित स्वराज्यात सर्व आपलं ज्ञान वृद्धी करू शकतात. कोणीही कोणाचा शत्रू नसतो. सर्व जनता भलेपणासाठी आपले योगदान देतात. बिमारी आणि रोग कमी कमी होत जातात. कोणीही दरिद्री राहत नाही. तसेच शरीरश्रम करणाऱ्यास काम अवश्य मिळते. अशा शासन व्यवस्थेत व्यसनाधीनता, दुराचार तसेच वर्गद्वेष याला स्थान नाही. अशा अहिंसक स्वराज्यात न्यायपूर्ण अधिकारांचे कधीही अतिक्रमण होत नाही"[१९] पंचशीलमधील हस्तक्षेप, शांततापूर्ण सहअस्तित्व आणि समता हे गांधींच्या अहिंसा-सत्यधर्माचेच राजनैतिक रूप आहे. कोणत्याही गटात न जाता भारताने नैतिक नेतृत्व स्वीकारले. म्हणूनच परराष्ट्र धोरणात नैतिकता आणि शांततेचा आग्रह हा स्पष्टपणे गांधीवादी वारसा आहे.[२०]

**(क) सामाजिक न्याय**

SC/ST अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९; बालकामगार प्रतिबंध कायदा; आणि POSH कायदा हे सर्व समाजातील सर्वात दुर्बल घटकांचे संरक्षण करण्यावर केंद्रित आहेत, जे गांधीवादी दुर्बल संरक्षण तत्त्वाशी खोलवर जोडलेले आहे. गांधीजींचा विश्वास होता की राष्ट्राची नैतिकता ते राष्ट्र

दुर्बल, पीडित आणि वंचितांसाठी किती उभे राहते यावर ठरते. या कायद्यांद्वारे राज्याने जातीय अत्याचार, बालशोषण आणि लिंगभेदाविरुद्ध स्पष्ट संरक्षणात्मक भूमिका घेतली आहे. यामुळे सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठेचे गांधीवादी मूल्य आधुनिक कायद्यात संस्थात्मक रूपात दृढ झाले.

**जातीय, लिंग, आर्थिक अत्याचाराविरुद्ध संविधानिक उपाय**

**(अ) ओसीटी कायदा १९८९**

ओसीटी कायदा १९८९ द्वारे दलित-आदिवासींवर होणाऱ्या जातीय अत्याचारांना कठोर शिक्षा देऊन राज्याने सामाजिक अन्यायाविरुद्ध शून्य सहनशीलतेची भूमिका घेतली. हा कायदा गांधीवादी हरिजनसेवा, करुणा आणि सामाजिक समतेच्या मूलभूत मूल्यांचे कायदेशीर संरक्षण आहे.गांधीजी मानत की समाजातील सर्वात शेवटच्या व्यक्तीचे रक्षण हेच राष्ट्राच्या नैतिकतेचे मोजमाप आहे.या कायद्यामुळे दुर्बल समुदायांच्या सुरक्षिततेला व सन्मानाला संविधानिक आणि नैतिक दोन्ही आधार मिळतो.

**(ब) महिला संरक्षण कायदे**

घरगुती हिंसा कायदा २००५, महिला आरक्षण विधेयक २०२३ आणि POSH कायदा २०१३ हे सर्व स्त्रियांच्या सन्मान, सुरक्षितता आणि समान हक्कांची हमी देणारे महत्त्वाचे कायदे आहेत.गांधीजींनी स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरत स्त्रियांना शक्तीचा स्रोत म्हटले होते. म्हणून हे कायदे त्या मूल्यांचे आधुनिक प्रतिबिंब ठरतात. घरगुती, सामाजिक आणि संस्थात्मक पातळीवरील शोषणाविरुद्ध स्त्रियांना कायदेशीर संरक्षण देणे हे राष्ट्राच्या नैतिकतेचे प्रतीक ठरते.यामुळे भारतीय लोकशाही स्त्री-समानतेकडे अधिक सशक्त, समावेशक आणि न्यायपूर्ण दिशेने पुढे जाते.

**(क) आर्थिक शोषणविरोधी उपाय**

प्रजासत्ताक भारतात घटनेद्वारे जनतेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सामाजिक न्याय तत्त्वानुसार सक्षम, सुदृढ व एकात्म भारत आकारास आणण्याचे प्रयत्न केले गेले. १९५० मधील सामुदायिक विकास कार्यक्रम ते २०११ चे अन्नसुरक्षा विधेयक द्वारे शासनाने दारिद्र्याचा नष्ट करण्याचा गंभीर प्रयत्न केला.[२१] मनरेगा २००५ मजुरी व रोजगाराची हमी देत स्वावलंबन वाढवतो तर अन्नसुरक्षा विधेयक २०१३ उपासमाराविरुद्ध सुरक्षा

कवच तयार करते. हे कायदे गरीब, कामगार आणि ग्रामीण दुर्बलांसाठी आर्थिक संरक्षणाची हमी देतात, ज्यातून मूलभूत जीवनसुरक्षेचा अधिकार मजबूत होतो. गांधीजींच्या 'अंत्योदय' म्हणजे सर्वात शेवटच्या व्यक्तीचे कल्याण तत्त्वाचे हे अत्यंत व्यावहारिक रूप आहे. या उपाययोजनांमुळे आर्थिक न्याय, समानता आणि मानवी प्रतिष्ठेचे गांधीवादी मूल्य भारतीय शासनव्यवस्थेत अधिक दृढ झाले.

**नागरिकत्व, जीवनशैली आणि व्यावसायिक कौशल्ये : गांधीवादी दृष्टी**

सहकार, सहयोग आणि परस्पर विश्वास या त्रिसूत्रीतून 'अहिंसक दिलेरी' निर्माण करून विकास साधणे हे गांधीजींच्या कल्पनेतील कार्याचे सूत्र होते. गांधींचे विधायक कार्यक्रम हे तरुणांच्या स्फोटक शक्तीचे असे 'सॅल्वेज ऑपरेशन' आहे.[२२] राज्यघटनेच्या माध्यमातून तरुणाई विधायक कार्यक्रमात अग्रेसर होऊन मूल्याधिष्ठित आचारविचार स्वीकारतील असे गांधींना अपेक्षित होते. गांधीजींचे शिक्षणतत्त्व माणूस घडवा हे जीवनाचा केंद्रीय विचार आहे, ज्यात केवळ ज्ञान नव्हे तर चरित्र आणि नैतिकता वाढवणे ही प्राथमिकता आहे. त्यांनी माणसाच्या जीवनशैलीत नैतिकता, श्रमशीलता, समाजहिताची वृत्ती, स्वावलंबन आणि साधेपणा या पाच गोष्टी अत्यावश्यक मानल्या. गांधीजींच्या नई तालीम आणि रचनात्मक कार्यांमध्ये कौशल्याधिष्ठित शिक्षणावर विशेष भर आहे, ज्यामुळे व्यक्ती स्वावलंबी आणि समाजोपयोगी बनतो.[२३] या दृष्टिकोनातून शिक्षण केवळ शैक्षणिक ज्ञान पुरवण्यापुरते मर्यादित नसून व्यक्तिमत्त्व, व्यावसायिक कौशल्ये आणि सामाजिक जबाबदाऱ्यांवर केंद्रित असते. अशा प्रकारे गांधीवादी शिक्षण नागरिकत्व, जीवनशैली आणि आर्थिक स्वावलंबन या तिन्ही पैलूंना संतुलित करून समाजातील न्याय आणि समतेची पायाभरणी करते.

**आधुनिक भारतातील मानवी हक्कांसमोरील आव्हाने**

आधुनिक भारतात मानवी हक्कांसमोरील आव्हाने बहुविध आहेत. तंत्रज्ञानातील विषमता आणि डिजिटल हक्कांचे उल्लंघन नागरिकांच्या समान संधींवर आघात करते. पर्यावरणीय संकटे, धार्मिक व जातीय ध्रुवीकरण आणि बेरोजगारी यामुळे सामाजिक आणि आर्थिक असमानता वाढते. स्त्री-सुरक्षिततेच्या समस्यांमुळे लैंगिक समानतेचा मूलभूत अधिकार डावलला जातो.

ही सर्व आव्हाने गांधीवादी 'सत्य-अहिंसा' मूल्यांच्या पुनर्प्रतिष्ठेची तीव्र मागणी करतात. कारण फक्त अहिंसात्मक, नैतिक आणि न्यायाधिष्ठित दृष्टिकोनातूनच समतामूलक समाज निर्माण होऊ शकतो. गांधीवादी तत्त्वांचे मार्गदर्शन हे आधुनिक काळातील हक्क संरक्षणासाठी आणि सामाजिक समतेसाठी अत्यावश्यक ठरते.[२४]

**भविष्याची दिशा : गांधीवादी मानवाधिकार दृष्टिकोन**

भविष्यात मानवी हक्कांच्या सुरक्षेसाठी गांधीवादी दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा ठरतो. नागरिक शास्त्राद्वारे नैतिकता, संविधानाचे ज्ञान, तसेच हक्क आणि कर्तव्यांची समज समाजात रुजवली पाहिजे. संवाद आणि अहिंसक संघर्षनिवारणाच्या पद्धतींचा वापर सामाजिक समस्यांचे न्यायसंगत समाधान देतो. मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक न्याय यांचे धोरण प्रत्येक निर्णयात प्रतिबिंबित केले पाहिजे, जेणेकरून दुर्बल घटकांचा संरक्षण आणि सन्मान सुनिश्चित होईल. पर्यावरण जागरूक विकासाचा समावेश करून शाश्वत आणि नैतिक प्रगती साधता येईल. अशा प्रकारे गांधीवादी मानवाधिकार दृष्टिकोन समाजाला न्याय, अहिंसा आणि समतेच्या मार्गावर नेतो.

**निष्कर्ष**

भारत हे गणराज्य केवळ राजकीय संरचना नव्हे, तर गांधीवादी मूल्यांवर आधारित एक नैतिक, समताधिष्ठित आणि मानवकेंद्रित राष्ट्र आहे. संविधानातील अधिकार-कर्तव्ये, सामाजिक न्याय, समानता, बंधुत्व आणि शांततामय सहअस्तित्व हे सर्व गांधीजींच्या तत्त्वांचे आधुनिक प्रतिरूप आहेत. गांधीवादी दृष्टिकोन नागरिकांना नैतिकतेवर आधारित निर्णय घेण्यास आणि समाजातील दुर्बल घटकांचे रक्षण करण्यास प्रेरित करतो. एक समताधिष्ठित, मानवकेंद्रित आणि नैतिक भारत घडवण्यासाठी गांधीवादी मूल्यतत्त्वांचे पालन आजही प्रासंगिक ठरते.

**संदर्भ :**


१. गांधी, मो. क. (२०२१). मेरे सपनो का भारत. नई दिल्लीः सस्ता साहित्य प्रकाशन. पृ. २६.

२. देशमुख, सुरेश. (२००१). गांधीविचार आणि भारतीय संविधान. मनोविकास प्रकाशन. पृ. ५८-६२.

३. चपळगावकर, नरेन्द्र. (पु.स). (समकालीन प्रकाशन). महात्मा गांधी आणि भारतीय राज्य घटना. पुणे, समकालीन प्रकाशन. पृ. ६४-६५.
४. जोशी, पद्माकर. (२०१८). लोकशाही व भारतीय गणराज्य : सिद्धांत आणि प्रवृत्ती. प्रतिभा प्रकाशन. पृ. २७-३०.
५. फडके, ना.सी. (१९९८). भारतीय राज्यशास्त्र : सिद्धांत आणि व्यवहार. पुणे, श्रीविद्या प्रकाशन. पृ. ४५-४७.
६. गांधी, मोहनदास करमचंद. (१९४७). India of My Dreams (आर.के. प्रभू, संपादक), अहमदाबाद, नवजीवन प्रकाशन मंदिर. पृ. १३६.
७. तुन्डूरवार, संदीप. (पु.स). (मेहेरबाबा पब्लिशर्स), समकालीन प्रश्न आणि मानवी हक्क. नागपूर. पृ. ७.
८. तेंडुलकर, द.ग. (१९९८). महात्मा : लाइफ ऑफ मोहनदास करमचंद गांधी (खंड १). भारत सरकार, प्रकाशन विभाग, माहिती व प्रसारण मंत्रालय. पृ. १७२-१७५.
९. गांधी, मोहनदास करमचंद. (१९७७). गांधी लेखसंग्रह (खंड ६८). भारत सरकार, प्रकाशन विभाग, माहिती व प्रसारण मंत्रालय. पृ. ५९.
१०. रेगे, शर्मिला. (२०१४). अगेन्स्ट द मॅडनेस ऑफ मनूः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ब्राह्मणवादी पितृसत्तेविषयी लेखन. नवयाना प्रकाशन. पृ. ३५-३८.
११. दांडेकर, गो.नि. (१९७४). लोकशाहीः तत्त्व आणि व्यवहार, कॉन्टिनेन्टल प्रकाशन. पृ. ५४-५६.
१२. तुलसीराम, के.ए. (२००९). गांधी आणि आधुनिक भारतीय समाजः समता, बंधुत्व आणि सामाजिक सुधारणा. मुंबई, हिंदुस्थान प्रकाशन. पृ. १०२-१०४.
१३. गांधी, मो.क. (२०२१). मेरे सपनो का भारत. नई दिल्लीः सस्ता साहित्य प्रकाशन. पृ. ७.
१४. कुसनाळे, सचिन. (२०२१). विश्ववाद. मिरज. पृ. १२३.
१५. जोशी, शांताराम. (२०१०). आधुनिक भारतीय शिक्षणः सिद्धांत आणि विकास. फडके प्रकाशन. पृ. ८८-९२.
१६. गांधी, मोहनदास करमचंद. (२०१२). विधायक कार्यक्रम (नारायण

देसाई, अनुवादक). अहमदाबाद, नवजीवन प्रकाशन मंदिर. पृ. १४.
१७. साने, गुरुजी. (१९५२). संपूर्ण मानवतेचा आदर्शः सामाजिक समानता आणि लोकशाही. पुणे, महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान. पृ. ५८.
१८. देशमुख, वसंतराव. (१९९६). गांधी आणि राष्ट्रनिर्मिती. कॉन्टिनेन्टल प्रकाशन. पृ. ४१-४३.
१९. गांधी, मो. क. (२०२१). मेरे सपनो का भारत. नई दिल्लीः सस्ता साहित्य प्रकाशन. पृ. २३.
२०. कुलकर्णी, सु. गो. (२००६). भारतीय विदेशनीतीः सिद्धांत आणि विकास, मानविकास प्रकाशन. पृ. १०२-१०५.
२१. तुन्डूरवार, संदीप. (पु.स). (मेहेरबाबा पब्लिशर्स). समकालीन प्रश्न आणि मानवी हक्क. नागपूर. पृ. १०५.
२२. आमटे, बाबा. (२००६). उद्याच्या भविष्यासाठी. पुणे, रसिक आंतरभारती. पृ. ३५.
२३. कांबळे, प्रफुल्ल. (२०१६). गांधीवादी शिक्षणः नई-तालीम आणि कौशल्याधारित विकास. डायमंड पब्लिकेशन्स. पृ. ६७-७०.
२४. शिंदे, संजय. (२०२२). गांधीवादी मूल्ये आणि लैंगिक न्यायः सत्य-अहिंसा आणि आधुनिक भारत, प्रभात प्रकाशन. पृ. १२१-१२४.

■■■

# भारतीय संघराज्यातील मूलगामी परिवर्तन

❐ **प्रा. डॉ. प्रशांत विघे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, अमरावती

**प्रस्तावना :**

भारतीय संविधानाची रचना अत्यंत जटिल ऐतिहासिक पार्श्वभूमीत झाली. देशाचे विभाजन, भाषिक-धार्मिक विविधता आणि सामाजिक-आर्थिक विषमता लक्षात घेऊन भारताने केंद्राभिमुख संघराज्य स्वीकारल गेले. त्यामध्ये एकेरी नागरिकत्व, एकात्मिक न्यायव्यवस्था, अखिल भारतीय सेवा आणि केंद्राचे आपत्कालीन अधिकार यामुळे भारताचे स्वरूप 'अर्धसंघराज्य' स्वरूप ठरले. मात्र स्वातंत्र्यानंतर संघराज्यावर गठबंधन राजकारण, आर्थिक उदारीकरण, वस्तू आणि सेवा कर, न्यायालयीन हस्तक्षेप, डिजिटल शासन आणि जागतिकीकरणाचा प्रभाव पडत गेला. आज भारतीय संघराज्य सहकारी मॉडेलच्या पलीकडे जाऊन स्पर्धात्मक, धोरण-चलित आणि तंत्रज्ञानाधारित बहुआयामी स्वरूप धारण केले आहे.

**भारतीय संघराज्याची संकल्पना :**

भारतीय संघराज्याची संकल्पना संविधानाच्या भाग XI आणि XII मध्ये केंद्र, राज्य आणि समवर्ती सूचीद्वारे स्पष्ट केली आहे. संरक्षण, परराष्ट्र धोरण, अणुऊर्जा हे विषय केंद्राकडे तर पोलीस, आरोग्य, शेती राज्यांकडे राहतात; समवर्ती सूचीवर दोन्ही स्तरांचे अधिकार असून अनुच्छेद २५४ केंद्राला प्राधान्य देतो. एकात्मिक न्यायव्यवस्था, अखिल भारतीय सेवा, राष्ट्रपती राजवट आणि अवशिष्ट अधिकारांमुळे संघराज्य केंद्राभिमुख बनले. उदारीकरण, GST, डिजिटल शासन आणि न्यायालयीन व्याख्यांनी केंद्राचे वर्चस्व वाढले आहे. राज्यांना मुभा असली तरी अंतिम अधिकार केंद्राकडे झुकत असल्याने भारतीय संघराज्य अर्धसंघराज्य स्वरूपाचे मानले जाते.

स्वातंत्र्योत्तर १९५०-७५ काळात राष्ट्रनिर्माण, भाषिक वैविध्य आणि प्रादेशिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर केंद्राने निर्णयक्षमता वाढवली. १९५६ च्या राज्य पुनर्रचना कायद्याने भाषिक प्रांत तयार झाले, तर अनुच्छेद ३५६ च्या वारंवार वापरामुळे संघराज्य अधिक केंद्राभिमुख बनले. आपत्कालीन काळात (१९७५-७७) ४२ व्या दुरुस्तीद्वारे केंद्राची शक्ती वाढवली; ४४ व्या दुरुस्तीनंतरही वर्चस्व कायम राहिले. १९९१ नंतर उदारीकरण, प्रादेशिक पक्षांचा प्रभाव, गठबंधन सरकारे आणि ७३-७४ व्या संविधान दुरुस्त्यांमुळे विकेंद्रीकरणाला बळ मिळाल्यामुळे भारतीय संघराज्य बहुआयामी, गतिशील स्वरूपाचे बनले.

### २०१४ नंतरचा नवउदारीकरणयुक्त मजबूत केंद्रवाद

२०१४ नंतरचा कालखंड भारतीय संघराज्यासाठी अत्यंत निर्णायक ठरला. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच केंद्रात सलग व स्थिर बहुमताचे नेतृत्व मिळाले. शासननिर्णयांची दिशा एकसंध, केंद्रीत आणि वेगवान झाली. या काळात नवउदारीकरण, तंत्रज्ञानाधारित प्रशासन, राष्ट्रीय सुरक्षेचा वाढता प्रभाव आणि बिग-डेटा गव्हर्नन्स यांच्या संयोगातून संघराज्याची राजकीय व आर्थिक संरचना मोठ्या प्रमाणावर बदलली. या बदलाचा मुख्य प्रवाह म्हणजे नवउदारीकरणयुक्त मजबूत केंद्रवादाचा उदय होय.

### अ ) आर्थिक व धोरणीय केंद्रीकरणाचे नवे स्वरूप

२०१४ नंतर नियोजन आयोग रद्द करून निती आयोगाची स्थापना करण्यात आला. नियोजन आयोगाकडे असलेली निधी वाटपाची अंतिम शक्ती वित्त मंत्रालयाकडे गेली, ज्यामुळे राज्ये अधिका-अधिक केंद्राच्या आर्थिक धोरणांवर अवलंबून राहिली आहे.

### ब ) GST : आर्थिक संघराज्याचे मूलगामी पुनर्रचना

२०१७ नंतर वस्तू आणि सेवा कर GST व्यवस्थेने भारतात 'एक कर-एक बाजार' संकल्पना लागू केली. राज्यांकडे असलेले अनेक कराधिकार अप्रत्यक्षपणे केंद्र-राज्य संयुक्त नियंत्रणाखाली गेले. त्यामुळे केंद्राकडे असलेले मतांचे वजन, महसूल भरपाईवरील दबाव आणि वेळोवेळी उद्भवलेले वाद दर्शवतात की, आर्थिक अधिकारांचे संतुलन केंद्राच्या बाजूने झुकले आहे. त्यामुळे राज्यांची वित्तीय स्वायत्तता घटली.

**क ) केंद्रीय तपास यंत्रणांचा वाढता वापर : संघराज्यातील राजकीय-प्रशासकीय तणाव**

२०१४ नंतर CBI- Central Bureu of Investingation (केंद्रीय अन्वेषण ब्युरो) ED- Enforenement Directorte (अंमलबजावणी निदेशालय) NIA- National Investgation Agency (राष्ट्रीय तपास संस्था) सारख्या संस्थांचा राज्यांत वाढलेला हस्तक्षेप हे केंद्रवादाचे आणखी एक रूप मानले जाते. अनेक राज्यांनी या संस्थांचा वापर राजकीय दबावासाठी होत असल्याचा आरोप केला. काही राज्यांनी केंद्रीय अन्वेषण ब्युरो (CBI) साठी दिलेला 'जनरल कॉन्सेंट' मागे घेतला, यावरून केंद्र-राज्य संबंधांतील अविश्वास उघड झाला. राष्ट्रीय सुरक्षा, दहशतवाद निरोधक कारवाई आणि मनी लॉन्डरिंग विरोधी मोहिमांच्या नावाखाली केंद्राचा कायदेशीर व कार्यकारी प्रभाव अधिकाधिक दृढ होत गेला आहे.

**ड ) कलम ३७० रद्द :**

२०१९ मध्ये कलम ३७० रद्द करून जम्मू-कश्मीरचे दोन केंद्रशासित प्रदेशात रूपांतर झाले. राज्याची संमती न घेता त्याचे पुनर्रचना करण्यात आल्याने हे भारतीय संघराज्याच्या इतिहासातील अभूतपूर्व केंद्रीकरणाचे उदाहरण ठरले. या निर्णयाने 'राष्ट्रीय एकसंघता' आणि 'सुरक्षा' यांना केंद्रस्थानी ठेवून केंद्राने संविधानातील उपलब्ध अधिकारांचा पूर्ण उपयोग केला.

**ई ) सहकारी-स्पर्धात्मक संघराज्य :**

केंद्राने सहकारी संघराज्यासोबत स्पर्धात्मक संघराज्य ही संकल्पना पुढे आणली. राज्यांना गुंतवणूक, Ease of Doing Business पायाभूत सुविधा, निर्यात क्षमता या निकषांवर एकमेकांशी स्पर्धेत उतरवण्यात आले. परिणामी, आर्थिकदृष्ट्या मजबूत राज्यांना अधिक संधी मिळाल्या, तर संसाधन-गरीब राज्ये अधिक मागे पडली. हे संरचनात्मक विषमतेला बळ देणारे ठरले.

**फ ) केंद्र-प्रायोजित योजना (CSS) आणि वित्तीय नियंत्रणाचा विस्तार :**

केंद्र-प्रायोजित योजना पूर्वीपेक्षा कमी संख्येत असल्या तरी त्यांची निगराणी, अटी आणि निधी-वाटपाचे नियंत्रण केंद्राकडे अधिक आले. त्यामुळे राज्यांच्या विकास अजेंड्यावर केंद्राच्या प्राधान्यांचा प्रभाव वाढला. राज्यांचे वित्तीय

नियोजन **CSS** च्या मानकांशी बांधले गेले. २०१४ नंतरचा भारत हा नवउदारीकरण, डिजिटल गव्हर्नन्स, राष्ट्रीय सुरक्षा, वित्तीय केंद्रीकरण आणि संस्थात्मक नियंत्रण या पाच घटकांनी आकारलेला आहे. त्यामुळे भारतीय संघराज्याचे स्वरूप सहकारी, पण अधिक केंद्रीत; निर्णयक्षम, पण राज्यांवर प्रभाव टाकणारे; आर्थिकदृष्ट्या उदारीकृत, पण राजकीयदृष्ट्या एकसंघ असे झाले आहे. या कारणांनी हा कालखंड भारतीय संघराज्यातील मूलगामी परिवर्तनाचा सर्वात प्रभावी टप्पा म्हणून नोंदविला जातो आहे.

**२) आर्थिक संघराज्यातील परिवर्तन :**

भारताच्या संघराज्य संरचनेत आर्थिक संबंध हा केंद्र-राज्य सत्तासंतुलनाचा सर्वात निर्णायक घटक मानला जातो. २०१४ नंतरच्या काळात आर्थिक संघराज्यात ज्या प्रकारचा आमूलाग्र बदल घडला. विशेषतः वस्तू आणि सेवा कर (GST), १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशी आणि केंद्र-प्रायोजित योजना यामुळे राज्यांची आर्थिक स्वायत्तता मोठ्या प्रमाणावर पुनर्रचित झाली.

**अ ) GST- सेवा कर-२१व्या शतकातील सर्वात मोठे आर्थिक परिवर्तन**

२०१७ मध्ये वस्तू आणि सेवा कर (GST) लागू झाला. हा कर एक राष्ट्र-एक कर-एक बाजार हा मंत्र घेऊन आला असला, तरी त्याचा राज्यांच्या आर्थिक स्वायत्ततेवर खोल परिणाम झाला. वस्तू आणि सेवा कर (GST) मुळे आधी राज्यांच्या नियंत्रणाखाली असलेले अनेक कर जसे की Value Added Tax (VAT) मूल्यवर्धित कर, एनी टॅक्स, ऑकी, मनोरंजन कर रद्द झाले. त्यामुळे राज्यांच्या महसुलाचे प्रमुख स्रोत केंद्राच्या आणि जीएसटी परिषदेच्या सामायिक चौकटीत आले. यामुळे राज्यांचे कर निर्धारणाचे स्वातंत्र्य कमी झाले. आज राज्ये स्वतंत्रपणे कर दर वाढवू वा कमी करू शकत नाहीत; त्यांनी केंद्रासोबत सहमतीनेच निर्णय घ्यावा लागतो. वस्तू आणि सेवा कर (GST) परताव्याचा विलंब हा राज्यांसाठी सर्वात मोठा ताण निर्माण करणारा घटक ठरला आहे.

**ब ) १५वा वित्त आयोग : अनुदान वितरणाचे नवीन सूत्र -**

१५व्या वित्त आयोगाने अनुदान वितरणात दोन महत्त्वाचे बदल केले. पहिले, लोकसंख्या निकष १९७१ वरून २०११ वर नेल्याने तमिळनाडू,

केरळ, आंध्रप्रदेश, कर्नाटक यांसारख्या लोकसंख्या नियंत्रित करणाऱ्या राज्यांना नुकसान झाले, तर वाढती लोकसंख्या असलेल्या राज्यांना तुलनेने लाभ मिळाला. दुसरे, 'कार्यक्षमता', स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासन, करसंकलन क्षमता असे नवे निर्देशक लागू करून केंद्राला अनुदानांवर अधिक अटी लावण्याचे सामर्थ्य मिळाले. परिणामी राज्यांच्या वास्तविक वित्तीय गरजांपेक्षा 'कार्यक्षमता' हे निकष महत्त्वाचे ठरले. या बदलांमुळे केंद्राचे वित्तीय नियंत्रण वाढले आणि अनेक राज्यांमध्ये असंतोष निर्माण झाला.

**क) केंद्र-प्रायोजित योजनांचा प्रभाव :**

केंद्र-प्रायोजित योजना (CSS) वाढल्यामुळे आर्थिक संघराज्यात केंद्राचे वर्चस्व लक्षणीयरीत्या मजबूत झाले आहे. प्रधानमंत्री ग्रामीण मार्ग योजना, जलजीवन मिशन, पोषण अभियान यांसह बहुतेक योजनांचे डिझाइन, अटी, अंमलबजावणी आणि ऑडिट केंद्र नियंत्रित करते, तर राज्ये फक्त अंमलबजावणीपुरती मर्यादित राहतात. त्याचवेळी वस्तू आणि सेवा कर (GST), १५ वा वित्त आयोगाची नवी सूत्रे आणि FRBM द्वारे कर्जमर्यादांवरील नियंत्रण यामुळे राज्यांची आर्थिक स्वायत्तता कमी झाली आहे. परिणामी, भारतीय आर्थिक संघराज्य सहकारी स्वरूपातून अधिक केंद्रीकृत आणि स्पर्धात्मक दिशेने वळले असून राज्यांची वित्तीय नियोजन क्षमता केंद्राच्या धोरणांवर अधिक अवलंबून झाली आहे.

**३) प्रशासकीय संघराज्यातील बदल :**

२०१४ नंतर प्रशासकीय संघराज्यात केंद्राचे नियंत्रण वाढवणारे महत्त्वाचे बदल दिसतात. अखिल भारतीय सेवा कॅडर नियमांतील प्रस्तावांमुळे केंद्रीय deputation साठी राज्यांच्या संमतीची शक्ती कमी होण्याची शक्यता निर्माण झाली. JAM, DB, आधार सत्यापन, CoEIN, PM-Gatishakti आणि e-Office सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे प्रशासनिक कार्यक्षमता वाढली, परंतु राज्यांची स्वायत्तता संकुचित झाली.

राष्ट्रीय सुरक्षा व दहशतवादविरोधी कायद्यांच्या वाढत्या वापरामुळे ED, CBI, NIA यांचा राज्यांमध्ये हस्तक्षेप वाढला. अनेक राज्यांनी उइख ची सामान्य संमती मागे घेतली. परिणामी प्रशासकीय संघराज्य अधिक केंद्रीकृत आणि डेटा-आधारित बनले आहे.

**४) सहकार स्पर्धात्मक संघराज्य :**

२०१४ नंतर केंद्राने 'सहकारी संघराज्या'चा नारा दिला. त्यात निती आयोग, GST परिषद, अंतरराज्य परिषद यांच्या माध्यमातून राज्यांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न झाला. परंतु प्रत्यक्षात स्पर्धात्मक संघराज्य अधिक प्रबळ झाले. FDI, उद्योग, Ease of Doing Business पर्यटन आणि निर्यात धोरणांत राज्ये परस्पर स्पर्धेत उतरली. केंद्राच्या कार्यक्षमता-आधारित योजनांमध्ये काही राज्यांना अधिक लाभ,तर संसाधन-अभावी राज्यांना मर्यादित फायदा मिळाला. राजकीय मतभेद असलेल्या राज्यांना निधी व प्रकल्पांवर अडथळयांच्या तक्रारी वाढल्या. परिणामी २०१४ नंतर भारत सहकारापेक्षा अधिक स्पर्धात्मक संघराज्याकडे झुकलेला आहे.

**५) राज्यांच्या अधिकारक्षेत्रातील हस्तक्षेपांची :**

२०१४ नंतर केंद्राकडून राज्यांच्या अधिकारक्षेत्रातील हस्तक्षेप वाढला. जम्मू-कश्मीरचे राज्य दोन केंद्रशासित प्रदेशांत विभाजन, कृषी कायदे २०२० आणि NEP-2000 यांमुळे राज्यांची धोरणात्मक स्वायत्तता कमी झाली. CBI, ED, NIA, IT, DRI यांच्या वाढत्या कारवायांवर राजकीय हस्तक्षेपाचे आरोप तीव्र झाले; अनेक राज्यांनी CBI ला दिलेली सामान्य संमतीही मागे घेतली. राज्यपालांच्या बिल मंजुरी, विद्यापीठ नियुक्त्या आणि कायदे प्रक्रियेत हस्तक्षेपामुळे केंद्र-राज्य ताण अधिक वाढला. या घडामोडींमुळे २०१४ नंतर भारतीय संघराज्य अधिक केंद्रीकृत, राजकीयदृष्ट्या नियंत्रित आणि प्रशासकीयदृष्ट्या केंद्राभिमुख होताना दिसते.

**केंद्र-राज्य तणाव :**

२०१४ नंतरचा काळ भारतीय संघराज्यात केंद्र-राज्य तणावाच्या वाढत्या प्रकटीकरणाचा काळ ठरला आहे. बहुमताधारी केंद्र शासन, प्रादेशिक पक्षांनी सत्तेवर असलेली राज्ये, विचारधारात्मक टोकाची राजकीय विभागणी या तिन्ही कारणांनी केंद्र-राज्य संबंध अधिक संघर्षमय झाले आहेत.

**अ) केंद्रीय तपास यंत्रणांचा हस्तक्षेप -** Central Bureau of Investingation - CBI (केंद्रीय अन्वेषण ब्युरो), Enforcement Directorate-ED (अंमलबजावणी संचालनालय), National Investingation Agency - NIA राष्ट्रीय तपास संस्था आदींच्या कारवाया अनेक राज्यांनी

राजकीय उद्देशाने प्रेरित असल्याचा आरोप केला. अनेक गैर-भाजप राज्यांनी CBI ची सामान्य संमती मागे घेणे हा संघराज्यात्मक ताणाचा मोठा संकेत होता.

ब) राज्यपाल-मुख्यमंत्री संघर्ष-तामिळनाडू, केरळ, बंगाल, पंजाब, महाराष्ट्र, तेलंगणा आदी राज्यांमध्ये राज्यपालांनी विधेयके रोखणे, विद्यापीठ नियुक्त्यांमध्ये हस्तक्षेप करणे, सभागृहाचे अधिवेशन पुढे ढकलणे अशा प्रकारच्या दबावामुळे केंद्र शासन प्रादेशिक स्वायत्ततेवर नियंत्रण ठेवत असल्याची टीका होत आहे.

**क) आर्थिक संघराज्य :** GST परतावा, वित्त आयोगाच्या वाटपाधारित सूत्रामुळे दक्षिणेकडील राज्यांचे नाराजी, केंद्र-प्रायोजित योजनांच्या वाढत्या प्रमाणामुळे राज्यसंस्थांवरील आर्थिक दडपण-या सर्व बाबी केंद्र-राज्य संघर्षाला उघड करतात.

ड) समवर्ती व राज्यसूचीतील क्षेत्रांवरील कायदे-कृषी कायदे (२०२०), विद्यापीठ कायदे, NGO नियमन, पोलीस-अधिकार, आरोग्य व्यवस्थापन, महामारी नियंत्रण-यांत केंद्राच्या अधिसत्तावादी प्रवृत्तीमुळे राज्यांनी आपले अधिकार कमी होत असल्याचे प्रतिपादन केले. एकूणच, २०१४ नंतर केंद्र-राज्य तणाव राजकीय, आर्थिक, प्रशासकीय आणि न्यायालयीन सर्व स्तरांवर वाढला असून भारतीय संघराज्याच्या मूलभूत संतुलनाच्या नव्या व्याख्या उदयास येत आहेत.

**६) पर्यावरणीय संघराज्य : नवे वाद**

२०१४ नंतर पर्यावरणीय धोरणांचे केंद्रीकरण वाढले. पर्यावरण समवर्ती सूचीतील विषय असला तरी EIA २०२० मसुदा, वनसंवर्धन अधिनियम २०२३, CAMPA निधी, वन्यजीव अभयारण्य नियोजन, कोळसा खाण लिलाव अशा निर्णयांत केंद्राचा प्राधान्यकेंद्रीत हस्तक्षेप दिसला. अनेक निर्णय राज्यांच्या सल्ल्याविना घेतल्याने असंतोष वाढला. दक्षिण व खनिजसमृद्ध राज्यांनी मंजुरी प्रक्रियेत राजकीय पक्षपातीपणाचे आरोप केले. हवामान धोरणातील राष्ट्रीय कार्बन लक्ष्यांनी राज्यांच्या औद्योगिक गरजांशी विसंगती निर्माण झाली. नदी-जोड, पर्यावरणीय मंजुरी व जंगल व्यवस्थापनात राज्यांची भूमिका दुय्यम ठरल्याने पर्यावरणीय संघराज्य अधिक केंद्राभिमुख झाले आहे.

**७) न्यायालयीन संघराज्यातील बदल :**

२०१४ नंतर न्यायालयीन संघराज्यात केंद्राभिमुख प्रवृत्ती स्पष्ट झाली आहे. अनुच्छेद ३७० रद्द करण्यास सर्वोच्च न्यायालयाने वैधता दिली, मराठा आरक्षण प्रकरणात ५०% मर्यादा कायम ठेवली आणि राज्यांच्या आरक्षणनिर्णय क्षमतेवर निर्बंध आणले. दिल्ली सरकार-केंद्र वादात IAS, DANICS व प्रशासनावर काही अधिकार दिले तरी Public Ordes, Polic आणि Land वर केंद्राचे प्राधान्य राहिले; GNCTD (Amendment) द्वारे LG ला निर्णायक अधिकार देण्यात आले. पर्यावरणीय मंजुरी, जमिनीचे संपादन आणि दहशतवादविरोधी कायद्यांमध्ये न्यायालयाचा दृष्टिकोन केंद्राच्या धोरणांना पाठिंबा देणारा दिसला. परिणामी, राज्यांच्या पारंपरिक स्वायत्ततेपेक्षा केंद्राभिमुखता दृढ झाली आहे..

**८) राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020) :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP)-2020 लागू झाल्यानंतर शिक्षण क्षेत्रातील निर्णय प्रक्रिया अधिक केंद्राभिमुख झाली. शिक्षण समवर्ती सूचीतील विषय असला तरी ५+३+३+४ शैक्षणिक संरचना, PARAKH मूल्यांकन प्रणाली, डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्म, शिक्षक प्रशिक्षण आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम चौकट या सर्व उपक्रमांनी राज्यांसाठी बंधनकारक रूप घेतले. राज्य पाठ्यपुस्तक मंडळांची स्वायत्तता आणि स्थानिक भाषा-संस्कृतीनुसार अभ्यासक्रम तयार करण्याचा अधिकार कमी झाला. तमिळनाडू, केरळ, महाराष्ट्र यांसारख्या राज्यांनी विरोध केला, तरी अंमलबजावणीत केंद्रनिर्मित धोरणच प्रभावी ठरले. परिणामी, शिक्षण क्षेत्रात केंद्र-नियंत्रित एकसंधता वाढून राज्यांचा निर्णयाधिकार मर्यादित झाला.

**समारोप :**

भारतीय संघराज्याचा ७५ वर्षांचा प्रवास केंद्राभिमुखतेकडून बहुआयामी आणि स्पर्धात्मक संघराज्याकडे वळलेला दिसतो. प्रारंभी केंद्रीकरण राष्ट्रनिर्मितीसाठी आवश्यक होते; पुढे आर्थिक उदारीकरण, प्रादेशिक पक्षांचा उदय व स्थानिक स्वराज्य संस्थांचा विस्तार यामुळे विकेंद्रीकरण वाढले. मात्र २०१४ नंतर GST, वित्त आयोग, NEP 2020 यांसारख्या धोरणांनी केंद्राचे वर्चस्व अधिक दृढ केले. न्यायालयीन निर्णय, पर्यावरण व शिक्षणातील

केंद्रनिर्मित मानके यांमुळे राज्यांची स्वायत्तता मर्यादित होत आहे. त्यामुळे सहकारी संघराज्य अस्तित्वात असले तरी निर्णयक्षमता प्रामुख्याने केंद्राकडे केंद्रीत झालेली दिसते. त्यामुळे भारतीय संघराज्यातील मूलगामी परिवर्तन झाले आहे.

**संदर्भ सूची :**


1. Austin, Granvilie, The Indian Constirution, Comestone of a Nation, Oxford Univeardity Press.
2. Basu, D.D. Intriduction to the Constitution of India.
3. Wheare, K.C. Federal Government, Oxford Univeardity Press.
4. Baxi, Upendra, Judical Federalism and the Supreme Court, Economic and Political Weekly (EPW).
5. Manor, James, Centre-state Relations in India: A Review, Economic and Political Weekly (EPW).

६. विघे प्रशांत- मॉडेल इंडियन पॉलिटी, श्री साईनाथ प्रकाशन, धरमपेठ नागपुर, प्रथमावृत्ती २०२०

७. विघे प्रशांत- भारतीय संविधानातील तरतुदी; श्री साईनाथ प्रकाशन, धरमपेठ नागपुर, २०२१


■■■

# भारतीय लोकशाही : प्रजासत्ताक मूल्ये आणि मूलभूत अधिकार

❐ डॉ. अमर कृष्णराव बोंदरे
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग ,
व्ही. एम. व्हि. वाणिज्य, जे. एम. टी. कला आणि
जे. जे. पी. विज्ञान महविद्यालय, नागपूर

**प्रस्तावना :**

'भारतीय प्रजासत्ताक दिन' हा दिवस प्रत्येक भारतीय नागरिकांसाठी फार महत्त्वाचा आहे. भारत हे एक मोठे लोकशाही राज्य म्हणजे हे लोकांचे लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य आहे. हा अधिकार भारताच्या राज्यघटनेनुसार २६ जानेवारी १९५० रोजी प्रत्येक भारतीय नागरिकाला मिळाला आणि प्रजेची सत्ता सुरू झाली. हा समस्त भारतीय जनतेच्या जीवनातील एक महत्त्वाचा मौल्यवान तसेच भाग्याचा दिवस आहे. भारतीय संविधान म्हणजे भारतीय जनतेसाठी घालून दिलेली जणू आचारसंहिताच आहे. घटना समितीच्या अथक प्रयत्नातून घटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विद्वत्तापूर्ण अध्ययन आणि भारतीय समाज व्यवस्थेचा अभ्यास करून तयार केलेल्या संविधानाच्या मसुद्यातून भारतीय संविधान जन्माला आले. इतर व्यक्ती स्थळ, महात्म्य अशा कुठल्याही गोष्टींना महत्त्व न देता केवळ भारतीय नागरिकांना स्वतंत्र भारताच्या प्रत्येक नागरिकांना अर्थात या स्वतंत्र भारतातल्या प्रत्येक जनतेला २६ जानेवारी १९५० रोजी हे संविधान समर्पित करण्यात आले. आणि भारत देशाला प्रजासत्ताक देश म्हणून ओळख निर्माण झाली ती या दिवसापासून. या ऐतिहासिक दिवसापासून भारतीय राष्ट्राने राजेशाही आणि वंशपरंपरा अधिपत्य ऐवजी लोकांच्या सार्वभौमत्वावर आधारित शासन व्यवस्था स्वीकारली. त्यादृष्टीने आवश्यक असणारी न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या मूल्यांना प्रत्यक्षात आणण्यासाठी भारतीय संविधान निर्मात्यांनी नागरिकांना काही अविचल व न्यायालयीन संरक्षण असलेले मूलभूत अधिकार (Fundamental

Rights) प्रदान केले आहेत. मूलभूत अधिकार भारतीय समाज व्यवस्थेचे नैतिक अधिष्ठान, राजकीय संस्कृतीचे दिशा नियंत्रण आणि सामाजिक न्यायाचा पाया आहेत.

प्रजासत्ताक भारत आणि मूलभूत अधिकार हे भारतीय लोकशाहीचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत प्रजासत्ताक किंवा गणराज्य म्हणजे असा देश जिथे राष्ट्राचा प्रमुख निवडलेला असतो आणि नागरिकांचे अधिकार संविधानात नमूद केलेल्या मूलभूत हक्कातून येतात. हे मूलभूत हक्क भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ या अंतर्गत नमूद केलेले आहेत. त्यामुळे समता, स्वातंत्र्य, शोषण विरुद्ध अधिकार, धार्मिक स्वातंत्र्य, सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार आणि मूलभूत अधिकारांचा आत्मा म्हणून संबोधित केल्या जाणाऱ्या घटनात्मक उपायांचा अधिकार यांचा समावेश आहे.

प्रजासत्ताक म्हणजे असा देश जिथे राष्ट्रप्रमुख म्हणजेच राष्ट्रपती वंशपरंपरागत नसून लोकांद्वारे निवडलेल्या प्रतिनिधींकडून अप्रत्यक्षपणे निवडला जातो. या व्यवस्थेत सत्ता कोणत्याही राजघराण्यात किंवा कुटुंबात कायमस्वरूपी केंद्रित राहत नाही, लोकांचे प्रतिनिधी लोकांच्या इच्छेनुसार शासन चालवतात आणि सत्तेचे स्रोतही जनता हेच मानले जातात. म्हणजेच प्रजासत्ताक देशात जनतेला सर्वोच्च स्थान असते कायद्यापुढे सर्व नागरिक समान असतात आणि कोणताही व्यक्ती राजपद वा विशेष अधिकार घेऊन येत नाही, याच आधारावर प्रजासत्ताक भारत म्हणजे केवळ शासन पद्धतीत बदल नव्हे तर सार्वभौमत्वाची स्थापना, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता, जनतेच्या इच्छेला सर्वोच्च मान्यता, राष्ट्रपती हा लोकांचा प्रतिनिधी आणि लोकशाहीचे बळकटीकरण या संबंधात झालेली मोठी क्रांती आहे. परिणाम स्वरूप लोकसत्ता आणि समानतेवर आधारित भारताचे प्रजासत्ताक आज देशाच्या प्रगतीचा पाया आहे.

**भारतीय संविधानातील मूलभूत अधिकाराचे स्वरूप व उद्दिष्टे :**

संविधानातील मूलभूत अधिकार नागरिकांना राज्याच्या हस्तक्षेपापासून व वैयक्तिक स्वातंत्र्यांचे संरक्षण प्रदान करून त्या समतेची व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे आश्वासन देते. प्रजासत्ताक तत्त्वज्ञानानुसार नागरिकांचे अधिकार हे केवळ कायदेशीर तरतुदी नसून त्यांचा संबंध शासनाच्या नैतिक

व वैचारिक आधारांशी आहे. म्हणूनच संविधान निर्मात्यांनी लोकशाही व प्रजासत्ताक मूल्यांना एक सूत्रात बांधून ठेवण्यासाठी भाग तीन मध्ये मूलभूत अधिकारांचा स्पष्ट समावेश केला आहे.

**१. समतेचा अधिकार कलम १४ ते १८ :** कायद्यापुढे समानता भेदभाव नष्ट करून सामाजिक समतेला महत्त्वपूर्ण स्थान, समान संधी अस्पृश्यता निर्मूलन आणि पदव्या ज्या विषमतेवर आधारित आहे त्याला रद्द करणे यांचा समावेश यात करण्यात आला.

**२. स्वातंत्र्याचा अधिकार कलम १९ ते २२ :** भारतीय संविधानाने स्वातंत्र्याच्या अधिकारांतर्गत भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततेने एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, निवास स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य आणि जीवन व व्यक्तिगत स्वातंत्र्याचा हक्क बहाल केला.

**३. शोषणाविरुद्धचा अधिकार कलम २३ ते २४ :** मनुष्य खरेदी विक्री वेठबिगारी आणि बालमजुरी बंदी.

**४. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार कलम २५ ते २८ :** कोणत्याही धर्माचे पालन, आचरण आणि प्रचार करण्याचे स्वातंत्र्य.

**५. सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार कलम २९ ते ३० :** भाषा लिपी आणि संस्कृती जपण्याचा आणि शैक्षणिक स्थापन करण्याचा हक्क.

**६. संविधानिक उपायांचा अधिकार कलम ३२ :** मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास न्यायालयात दाद मागण्याचा हक्क यात आहेत.

एकूणच हे मूलभूत अधिकार नागरिकांचा विकास आणि लोकशाहीच्या बळकटीसाठी अत्यंत आवश्यक असून राज्याच्या म्हणजे सरकारच्या अधिकाऱ्यावर मर्यादा घालून नागरिकांना संरक्षण प्रदान करतात.

**मूलभूत अधिकाराचे बदलते स्वरूप :**

**संपत्तीच्या हक्काचे हस्तांतरण व कायदेशीर दर्जा :** सुरुवातीला असलेला संपत्तीच्या हक्काचे हस्तांतरणः सुरुवातीला असलेला संपत्तीचा मूलभूत हक्क (कलम ३१) ४४ व्या घटनादुरुस्तीने (१९७८) रद्द करून तो कायदेशीर हक्क बनवला गेला.

**गोपनीयतेचा हक्क (Right to Privacy) :** न्यायालयांनी, विशेषतः के.एस. पुट्टस्वामी प्रकरणात, गोपनीयतेच्या हक्काला कलम २१ (जीवन

आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क) अंतर्गत मूलभूत हक्क मानले आहे, ज्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याची व्याप्ती वाढली आहे.

**मूलभूत कर्तव्यांचा समावेश :** ४२ व्या घटनादुरुस्तीने (१९७६) नागरिकांसाठी मूलभूत कर्तव्ये (Fundamental Duties) जोडली, ज्यामुळे हक्कांसोबत जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित झाले.

**न्यायालयीन सक्रियता :** केशवानंद भारती खटल्यासारख्या निकालांनी संविधानाच्या 'मूलभूत संरचने'ची संकल्पना दिली, ज्यामुळे संसदही मूलभूत हक्क बदलू शकत नाही, हे स्पष्ट झाले.

**संकट काळातील मर्यादा :** आणीबाणीच्या काळात काही हक्क स्थगित होऊ शकतात, पण कलम २० आणि २१ (जीवन आणि स्वातंत्र्याचा हक्क) कधीही निलंबित करता येत नाहीत, असे स्पष्ट झाले आहे.

थोडक्यात, भारतीय प्रजासत्ताक आणि मूलभूत हक्क हे स्थिर नसून, वेळोवेळीच्या कायदेशीर आणि सामाजिक बदलांमुळे ते अधिक लवचिक आणि व्यापक बनले आहेत, जेणेकरून ते आजच्या काळातील नागरिकांच्या गरजा पूर्ण करू शकतील.

**आव्हाने :**

मूलभूत अधिकारांची अंमलबजावणी करताना भारतीय प्रजासत्ताकाला अनेक नवीन आव्हानांचा सामना करावा लागतो.

- आज तंत्रज्ञान युगातील गोपनीयता धोके हे मूलभूत अधिकाराच्या अंमलबजावणीला संकुचित करीत आहेत.
- बदलत्या तंत्रज्ञानानुसार देशात परिवर्तन येणे स्वाभाविक आहे. वाढते सायबर गुन्हे आज मूलभूत अधिकारांसाठी घातक सिद्ध होत आहेत.
- सामाजिक माध्यमांवरील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे प्रश्न हे तर गाजलेले मुद्दे बनत चाललेले आहेत.
- जात, धर्म, भाषा यांच्या आधारे निर्माण होणारे ताणतणाव आणि त्यातून दिवसेंदिवस निर्माण होणारे प्रश्न सामाजिक विषमतेचे धोके निर्माण करीत आहेत.
- वाढती आर्थिक विषमता आणि सामाजिक अन्याय संविधानातील मूल्यांना बाधक ठरत आहेत.

भारतीय प्रजासत्ताकाची मूळ शक्ती म्हणजे मूलभूत अधिकारांची हमी. संविधानाने जे आदर्श मांडले आहेत, ते न्यायालये, विधिमंडळ, कार्यपालिका आणि नागरिक यांच्या समन्वयातून प्रत्यक्षात येतात. बदलत्या काळानुसार मूलभूत अधिकारांचे स्वरूप विस्तारत आहे; तंत्रज्ञान, जागतिकीकरण आणि सामाजिक समस्यांमुळे नवीन प्रश्न उद्भवत आहेत. म्हणूनच, भारतीय प्रजासत्ताकाने भविष्यात अधिक समतावादी, न्याय आणि अधिकार-संरक्षक होण्यासाठी मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीत नवनवीन धोरणे, तंत्रज्ञान आणि संवेदनशील प्रशासनाचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे.

**निष्कर्ष :**

स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता हे मूल्य स्वीकारलेले प्रजासत्ताक राज्य अस्तित्वात आले. परंतु मूल्यांच्या खरोखर स्वीकार झाला का असा प्रश्न होणे स्वाभाविक आहे. संविधानाची अंमलबजावणी होऊन ७५ वर्षे पूर्ण झाले आणि या वर्षात देशाने केलेल्या विकासाच्या विचार झाल्यास सकारात्मक बदल झाल्यास दिसेल ही दुसरी बाजू सुद्धा लक्षात घेतली पाहिजे. भारत प्रजासत्ताक किंवा गणराज्य झाले असे म्हटले तरी त्याचा मूळ संदर्भ किंवा उद्देश बदलत नाही. स्वतंत्र भारताचे स्वतंत्र संविधान लागू झाले. त्याला आज ७५ वर्ष पूर्ण झाले, परंतु प्रजासत्ताक राज्याचे महत्त्व माहीत नसणाऱ्या तरुणांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. आज नैराश्यात जगणारी तरुणाई पाहिल्यानंतर प्रजासत्ताक राज्याचे अस्तित्व महत्त्व माहीत नसणाऱ्या अंधाराच्या सावलीखाली गेल्यासारखे दिसून येते. देशाचे सामाजिक आरोग्य खालावल्याचे आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच झाल्याची चर्चा सुद्धा प्रसार माध्यमातून दररोज होताना दिसून येते. या परिस्थितीच्या कारणांच्या शोध घेणे तेवढेच गरजेचे आहे. देशाचा कारभार योग्य पद्धतीने चालवण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित झालीत, मूलभूत अधिकार बहाल करण्यात आले. तरीसुद्धा स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता ही मूल्य भारतीयांनी मनोमन स्वीकारली का असा प्रश्न उपस्थित होतो. परिणामस्वरूप भारतीय प्रजासत्ताक हे केवळ राजकीय रचना नाही तर प्रत्येक नागरिकाला समान मान देणारी मूल्यप्रणाली आहे. या मूल्यांचे केंद्र म्हणजे मूलभूत अधिकार. न्यायपालिका, शासन आणि नागरिक यांच्या परस्पर सहकार्यामुळेच हे अधिकार प्रत्यक्षात

उतरतात. म्हणूनच भारतीय प्रजासत्ताकाची खरी ताकद मूलभूत अधिकारांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये आहे. हेच आपल्या लोकशाहीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे.

**संदर्भ :**


१. भारताचे संविधान, निशिगंधा बुक एजन्सी, नागपूर. २४ ऑक्टोबर २०२३
२. भारताचे संविधान, मधुश्री पब्लिकेशन्स, पुणे. मे २०२४
३. डॉ. भोळे भा.ल. भारताचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर. २०१७
४. डॉ. भोळे भा.ल. शासन आणि राजकारण (तौलनिक अध्ययन), पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर. २०२१
५. डॉ. देशमुख अलका, भारतीय लोकशाही प्रक्रिया, साईनाथ प्रकाशन, नागपूर. २०१४.
६. शर्मा ब्रजकिशोर, भारत का संविधान : एक परिचय, पीएचआय, पब्लिकेशन्स, जनवरी २०१९
७. दैनिक महाराष्ट्र टाइम्स


■■■

# शेती, भारतीय संविधान आणि जागतिकीकरणाचा परिणाम

❐ **डॉ. राजू पा. लिपटे**

सहयोगी प्राध्यापक आणि राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
यशवंतराव गुडधे (पाटील) स्मृती कला महाविद्यालय, नागपूर

**प्रस्तावना :**

भारतीय समाजरचनेच्या पायाभूत क्षेत्रांमध्ये शेतीला अद्यापही केंद्रस्थानी स्थान आहे. स्वातंत्र्यानंतरच्या भारतात आधुनिक राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत कृीक्षेत्राला केवळ आर्थिक उत्पादनाचा स्रोत मानण्याऐवजी सामाजिक न्याय, आर्थिक संरचनात्मक परिवर्तन, जीवननिर्वाहाचा हक्क व ग्रामीण स्वायत्ततेचा स्तंभ म्हणून अधोरेखित करण्यात आले. संविधानकर्त्यांनी भारतातील ग्रामीण जीवनाचे वस्तुनिष्ठ स्वरूप ओळखून भूमिसुधारणा, संसाधनांचे समतामूलक वितरण, शेतकरी सक्षमीकरण, अन्नसुरक्षा आणि शेतीच्या वैज्ञानिक आधुनिकीकरणासाठी राज्याला दिशादर्शक तत्त्वांच्या स्वरूपात विशिष्ट जबाबदाऱ्या दिल्या. परंतु जागतिकीकरणानंतर भारतीय आर्थिक धोरणांची वाटचाल बाजारकेंद्रित, व्यापाराभिमुख, बहुराष्ट्रीय प्रभावाने संचालित अशी बनू लागली आणि यामुळे संविधानातील कल्याणकारी राज्याच्या आदर्शावर नवीन आव्हाने उभी राहिली.

आज भारतीय शेती अनेक संकटांच्या तळ्यात अडकलेली दिसते. हवामानबदलाचे परिणाम, मजुरी अभाव, कर्जबाजारीपणा, आत्महत्यांची शोकांतिका, उत्पादनखर्चातील प्रचंड वाढ, आंतरराष्ट्रीय व्यापाराची अनिश्चितता, आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कृषनिर्भर बाजारातील हस्तक्षेप. या संपूर्ण पर्यावरणाचा राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केल्यास भारतीय संविधानाची मूल्यव्यवस्था, शासनसंस्थांची धोरणनिर्मिती, स्थानिक लोकशाहीचे रूपांतर, आणि शासन-बाजार-नागरिक यांच्या परस्परावलंबी नात्यातील बदल दिसून येतात. त्यामुळे या संशोधन लेखाचा उद्देश केवळ कृषीस्थितीचे वर्णन करणे

नव्हे, तर संविधान, जागतिकीकरण, धोरणनिर्मिती, कृीसंरचना आणि समाजातील शक्तिसमीकरण यांचे सखोल पुनरावलोकन करणे हा आहे.

**भारतीय संविधानातील कृषीविषयक तत्त्वज्ञान**

भारतीय राज्यघटनेत शेतीला 'मूलभूत अधिकार' म्हणून दर्जा नसला तरी राज्य धोरणाच्या निदेशक तत्त्वांमध्ये कृषी विकासाची तत्त्वे राष्ट्रनिर्मितीच्या अनिवार्य घटक म्हणून अंतर्भूत आहेत. कलम ३८, ३९(b), ३९(c), ४१, ४७ आदी कलमांमधून संसाधनांचे न्याय्य विभाजन, आर्थिक विषमता कमी करणे, रोजगारनिर्मिती, पोषणसुरक्षा आणि लोककल्याणाचे लक्ष्य राज्यावर बंधनकारक स्वरूपात सोपवले आहे. कृषीशी निगडित कलम ४८ मध्ये आधुनिक व वैज्ञानिक शेतीची तरतूद स्पष्टपणे नमूद केली आहे, जी तांत्रिक प्रगती आणि वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करण्यासाठी राज्याला प्रोत्साहित करते. संविधानाने कृती हा राज्य विषय म्हणून घोषित केला असला तरी केंद्राला धोरणनियोजन, किमान समर्थनभाव, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय व्यापार करार यांच्या माध्यमातून प्रभावी हस्तक्षेप करण्याचे अधिकार उपलब्ध आहेत. जमिनीची मालकी, टेनन्सी सुधारणा, जमीनसील पद्धती, आणि भूमिसुधारणा यासंबंधी अनेक महत्त्वाच्या राज्य कायद्यांना न्यायालयांनी संविधानिक वैधता दिली आणि सामाजिक न्यायाच्या व्यापक चौकटीत ते समाविष्ट मानले. परंतु संविधानाच्या आदर्श आणि वास्तव यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दरी दिसते. सामाजिक स्तरावर जातीय श्रेणीव्यवस्था, जमीनदारी परंपरा, लिंगन्यायाचा अभाव, आणि ग्रामीण सत्तासंरचनेतील वर्गीय शक्तीसमिकरणांमुळे भूमिसुधारणा अपेक्षित परिणाम देऊ शकल्या नाहीत. त्यामुळे संविधानाचा उद्देश 'समतामूलक कृषी संस्था' घडवण्याचा असला तरी त्याची अंमलबजावणी सामाजिक रचनेतील अडथळ्यांमुळे मर्यादित राहिली, हे राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून महत्त्वाचे निरीक्षण बनते.

**जागतिकीकरण आणि भारतीय शेती**

१९९१ नंतर उदारीकरण-खाजगीकरण-जागतिकीकरण धोरणे लागू झाल्यानंतर भारतीय कृीव्यवस्थेवर बहुआयामी परिणाम झाला. जागतिक बाजारपेठेतील प्रवेशामुळे तंत्रज्ञान हस्तांतरण, सुधारीत बियाणे, आधुनिक सिंचन सुविधा, निर्यातक्षमतेत वाढ, मूल्यवर्धित उत्पादनांचा विकास आणि

कृतीउद्योगांचा विस्तार अशा सकारात्मक संधी उपलब्ध झाल्या. तथापि, या संधींच्या आड अनेक गंभीर आव्हानेही निर्माण झाली. कृषी करारांनुसार सबसिडी कपात, बाजार खुलेपणा, आयात शुल्क कमी करणे आणि स्पर्धात्मकता वाढवणे ही अपेक्षा भारतीय कृषी संरचनेस अनुकूल नव्हती कारण भारतीय शेती मुख्यतः लहान व सीमांत शेतकऱ्यांवर आधारित आहे. जागतिकीकरणामुळे किंमत अस्थिरता, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा बियाणे व कीटकनाशक बाजारातील एकाधिकार, शेतमालाच्या दरातील चढउतार आणि शेतकऱ्यांच्या उत्पादन निर्णयांवर बाजाराचा प्रभाव वाढणे अशी परिस्थिती निर्माण झाली. बाजारव्यवस्थेच्या या अनिश्चिततेमुळे आर्थिक ताण वाढत गेला आणि शेतकरी कर्जबाजारीपणा व आत्महत्यांची समस्या अधिक तीव्र झाली. जागतिकीकरणाच्या चौकटीत 'शेती' ही सामाजिक सुरक्षेची व्यवस्था नसून केवळ बाजारातील स्पर्धेचा घटक बनली आणि संविधानातील कल्याणकारी दृष्टिकोनाशी तिचा विसंवाद उभा राहिला.

**संवैधानिक कायदे आणि कृषीविषयक धोरणे**

भारतीय कृषीवर विविध कायद्यांचा दूरगामी प्रभाव राहिला आहे. भूमिसुधारणा कायदे शेतमालक आणि भाडेकरू संबंध सुधारण्यासाठी महत्त्वाचे ठरले, परंतु राजकीय आंतरसत्ता, स्थानिक सत्ताकेंद्रांचे हितसंबंध, आणि जातीय-आर्थिक बंधने यांमुळे त्यांच्या अंमलबजावणीत मर्यादा आल्या. AMPC कायद्यांनी बाजारपेठेतील पारदर्शकता वाढवण्याचा प्रयत्न केला परंतु कालांतराने AMPC मंडईंवर दलालांचे वर्चस्व वाढून शेतकऱ्यांसाठी स्पर्धात्मक बाजारपेठ निर्माण होऊ शकली नाही. नंतर केंद्राने AMPC मुक्तता कायदे केले ज्यामुळे केंद्र-राज्य सत्तासंघर्ष वाढला आणि सहकारी संघराज्यव्यवस्थेच्या मूल्यव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. बौद्धिक संपदा हक्क (IPR) कायद्यानंतर हायब्रिड व GM बियाण्यांचे पेटंटिंग शक्य झाले आणि यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांची बाजारातील पकड वाढली. हे संविधानातील सामान्य लोकांसाठी साधनसंपत्तींवरील समान अधिकार या तत्त्वाशी विसंगत ठरते. वनाधिकार कायदा आदिवासी व वनवासी समुदायांना जमीनहक्क प्रदान करणारा ऐतिहासिक उपक्रम असला तरी अंमलबजावणीत अनेक अडचणी आल्या.

अन्न सुरक्षा कायदा (२०१३) हा संविधानातील जीवनाच्या अधिकाराची

आधुनिक व्याख्या ठरतो. परंतु सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गळती, भ्रष्टाचार आणि शेतकऱ्यांसाठी MSP च्या अनिश्चित धोरणांमुळे अन्न सुरक्षा आणि शेतकरी सुरक्षा या दोन्ही उद्दिष्टांमध्ये विसंगती निर्माण होते.

**कृषीशी संबंधित मूलभूत संवैधानिक कायदे व धोरणे**

भारतीय कृषीव्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या संवैधानिक कायद्यांचे विश्लेषण करताना पुढील कायदे अत्यंत महत्त्वाचे ठरतातः

**भूमिसुधारणा कायदे** (१९५०-१९७५) : जमीन मालकीतील असमानता कमी करण्यात काही प्रमाणात यश, परंतु राजकीय अर्थसत्तेच्या गठबंधनामुळे पूर्ण परिणाम साध्य झाला नाही.

**आवश्यक वस्तू अधिनियम** (१९५५) : साठेबाजी रोखणे व किंमत स्थैर्य; परंतु जागतिकीकरणानंतर सुधारित आवृत्त्यांमध्ये बाजारपेठेच्या हिताला अधिक प्राधान्य दिले गेले.

**कृषी उत्पन्न बाजार समिती AMPC कायदे** : दलाल व अनधिकृत मध्यस्थांवरील नियंत्रण, परंतु नंतरच्या सुधारणा केंद्र-राज्य संघर्षाचे केंद्रबिंदू बनल्या.

**जैवतंत्रज्ञान व बौद्धिक संपदा हक्क कायदे** (१९९९-२००५) : बियाणे बाजारात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे नियंत्रण वाढले; शेतकऱ्यांच्या बियाणे सार्वभौमत्वाला धक्का बसला.

**वनाधिकार कायदा** (२००६) : आदिवासी व वनवासी शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक हक्कांची मान्यता.

**अन्न सुरक्षा कायदा** (२०१३) : संवैधानिक कल्याणकारी तत्त्वांची आधुनिक अभिव्यक्ती.

या सर्व कायद्यांचे विश्लेषण करताना दिसते की संविधानातील सामाजिक न्याय, समता, जीवनाचा अधिकार (कलम २१) आणि वंचित वर्गांच्या कल्याणाची जबाबदारी ही तत्त्वे केंद्रस्थानी ठेवूनही प्रत्यक्ष अंमलबजावणीत आर्थिक व राजकीय दबावांचे वर्चस्व अधोरेखित होते.

**शाश्वत कृषी आणि संविधानाचा पुनर्विचार**

आज भारतीय कृषी हवामानबदल, अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर, प्रदूषण, मातीची रासायनिक हानी, भूगर्भजल संकट, आणि कृषी-कार्बन

उत्सर्जन यांसारख्या जागतिक समस्यांशी थेट जोडली गेली आहे. पीक विमा योजनांमध्ये पारदर्शकतेचा अभाव, बाजारात मोठ्या कंपन्यांची एकाधिकारशाही, शेतकऱ्यांची उत्पादन खर्च-उत्पन्न असमानता, ग्रामीण पायाभूत सुविधांची कमतरता आणि शेतमाल साठवणुकीतील त्रुटी यामुळे कृषी उत्पादन खर्च प्रचंड वाढतो. या परिस्थितीचा संविधानाशी संबंध जोडला असता स्पष्ट होते की कल्याणकारी राष्ट्राचा मूलभूत विचार आजही शासनाच्या प्रत्येक निर्णयामध्ये मार्गदर्शक ठरायला हवा. ग्रामीण स्वायत्तता, पंचायत राज संस्थांचे सक्षमीकरण, शेतकरी उत्पादक कंपनी मॉडेल, सहकारितेचा विकास, सेंद्रिय-शाश्वत कृषी, स्थानिक बियाणे सार्वभौमत्व, आणि पाणी व्यवस्थापन या क्षेत्रांत राज्याने सक्रिय हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे. शाश्वत विकास हे आज केवळ पर्यावरणीय संकल्पना नसून संविधानाच्या कल्याणवादी तत्त्वांची आधुनिक आवृत्ती आहे. शेतकऱ्यांच्या जीवनमान सुधारण्यासाठी आर्थिक सुरक्षा, सामाजिक सुरक्षा, पर्यावरणीय सुरक्षा आणि उत्पादन सुरक्षा ही चार स्तरांची सुरक्षा प्रणाली विकसित करण्याची वेळ आली आहे.

**निष्कर्ष :**

भारतीय संविधानाने रेखाटलेला समतामूलक, न्यायनिष्ठ, लोककल्याणवादी राष्ट्राचा आदर्श आजही भारतीय कृषीव्यवस्थेचे मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ आहे. जागतिकीकरणाने संधींची दारे उघडली असली तरी त्याचवेळी भारतीय शेतीला असुरक्षित भविष्य, अवघड स्पर्धा, आणि बाजारसत्तेचा दबाव दिला आहे. त्यामुळे संविधानाच्या मूल्यव्यवस्थेशी सुसंगत, शाश्वत, शेतकरी-केंद्रित, स्थानिक गरजांवर आधारित, आणि सामाजिक-आर्थिक न्यायाला अग्रक्रम देणारी नवी कृषीनीती आवश्यक ठरते. भारतीय कृषीचे भविष्य केवळ उत्पादनवाढीत नाही, तर शेतकऱ्यांचा सन्मान, जीवनाच्या अधिकाराची हमी, ग्रामीण स्वायत्ततेची बळकटी, आणि संविधानिक मूल्यांशी सुसंगत विकास या चारही घटकांच्या समन्वयात आहे.

जागतिकीकरणाने कृषीक्षेत्रात आधुनिकता, निर्यात वृद्धी, स्पर्धात्मकता आणि गुंतवणुकीची नवी दालने खुली केली असली, तरी त्या संधींचा लाभ सर्व स्तरांपर्यंत पोहोचू न शकल्याने असमान लाभ वाटपाची रचना अधिक तीव्र झाली. मोठे भूदारक, कृषीउद्योग, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि भांडवलप्रधान

खेळाडू जागतिक व्यापारप्रवाहाशी सहज जुळवून घेतात परंतु लहान व सीमांत शेतकरी सतत कर्जबाजारीपणा, खर्चवाढ, किंमत-घट आणि बाजारातील अनिश्चिततेच्या चक्रात अडकलेले राहतात. कृषी करार, पेटंट कायदे, बीज कंपन्यांचे नियंत्रण, आणि अन्नधान्यांच्या जागतिक किंमतीतील अस्थिरता यामुळे शेतकऱ्यांची पारंपरिक शेतीवरील स्वायत्तता कमी झाली आहे. हे संविधानाच्या मूलभूत मूल्यांशी-समता, संधी-समानता, जीवनाचा अधिकार, आणि सामाजिक न्याय-यांच्याशी विसंगत ठरते. भारतीय राष्ट्रघटनेचा उद्देश केवळ कायदे निर्माण करणे नव्हे, तर त्यामागील तत्त्वज्ञानानुसार असा समाज उभारणे होय की जिथे प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त होईल. कृषी ही भारतातील बहुसंख्य नागरिकांच्या उपजीविकेची कणा असल्याने, संविधानाच्या मूल्यांचा सर्वात व्यापक परीक्षेचा विषय शेतीच ठरते. जर शेतकऱ्यांचे जीवनमान उन्नत होत नसेल, कृषी उत्पादनावर त्यांचे नियंत्रण राहात नसेल, बाजारव्यवस्थेत त्यांना न्याय मिळत नसेल आणि पर्यावरणीय हानीमुळे त्यांचे भविष्य धोक्यात येत असेल, तर भारतातील लोकशाहीचे मूलभूत तत्त्वसुद्धा अपूर्ण राहतात.

राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहताना, हे स्पष्ट होते की कृषी हा केवळ आर्थिक विषय नसून लोकशाही, विकास, मानवाधिकार, आणि सामाजिक न्याय यांचा मूलस्तंभ आहे. कृषीतील संकट हे केवळ अर्थव्यवस्थेचे संकट नसून ते लोकशाहीतील असमतोल, सत्ताकेंद्रीकरण आणि अपर्याप्त सामाजिक सुरक्षा यांचे द्योतक आहे. शाश्वत कृषी व्यवस्थेची गरज आज अधिक तीव्र झाली आहे. पर्यावरणीय हानी, हवामानबदल, मातीचा ऱ्हास, जलसंकट आणि जैवविविधतेचे नुकसान यामुळे शेतीचे भविष्य धोक्यात आले आहे. ही स्थिती संविधानातील कलम ४८- व ५१-(स) च्या पर्यावरणरक्षणाशी संबंधित व्यापक चौकटीशी जोडली गेल्याशिवाय संपूर्ण उपाय शोधणे शक्य नाही.

**संदर्भग्रंथसूची :**

१. मोहिते, शंकरराव. (२०१७). भारतीय संविधान आणि कृषी विकास. पद्मश्री प्रकाशन, पुणे.
२. लोंढे, सदाशिव. (२०१९). जागतिकीकरण आणि भारतीय शेती. यशवंतराव प्रतिष्ठान, औरंगाबाद.

३. पाटील, म. ब. (२०१६). शेतीचे अर्थशास्त्र. नवल प्रकाशन, सातारा.
४. काळे, शिवाजी. (२०२०). शाश्वत शेतीचे तत्वज्ञान. मौज प्रकाशन, मुंबई.
५. पाटील, सुभाष. (२०१४). शेतकरी चळवळीचा इतिहास. लोकवाङ्मय गृह, मुंबई.
६. काळे, प्रतीक. (२०१८). ग्रामीण विकासाची राजकीय अर्थव्यवस्था. ज्ञानदीप प्रकाशन, लातूर.
७. देशमुख, अशोक. (२०१३). भूमिसुधारणा आणि सामाजिक न्याय. सुगावा प्रकाशन, पुणे.
८. पवार, संजय. (२०२१). भारतातील कृषी आणि जागतिक व्यापार. कोकण साहित्य गृह, रत्नागिरी.
९. कदम, प्रभाकर. (२०१९). शेती, बाजार व्यवस्था आणि शेतकरी-राजकारण. नवल प्रकाशन, सातारा.

■■■

# लोकशाहीचा अमृत महोत्सव आणि निवडणूक आयोग

❐ **डॉ. विनोद को. गायकवाड**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
ग. भि. मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय, शेगांव

**सारांश :**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतर संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. मतदार आणि राजकीय पक्ष हे दोन लोकशाहीचे स्तंभ आहेत. प्रतिनिधिक लोकशाहीमध्ये पारदर्शक निवडणुका खूप महत्त्वाच्या असतात. म्हणूनच ती जबाबदारी स्वतंत्र व स्वायत्त असलेल्या निवडणूक आयोगाकडे संविधानाने सोपविली. निवडणूक आयोगाने आधुनिकतेची कास धरत बॅलेट पेपरद्वारे होणाऱ्या निवडणुका ईव्हीएम द्वारे घेण्याचा निर्णय घेतला. निवडणूक प्रक्रियेत सुलभता आणण्याच्या दृष्टीने घेतलेला निर्णयच वादात अडकला. तेव्हापासूनच विरोधी पक्ष ईव्हीएम द्वारे घेण्यात येणाऱ्या निवडणुक पद्धतीलाच विरोध करीत आहेत. २६ जानेवारी १९५० रोजी संविधान लागू झाले. संविधानाने प्रतिनिधिक लोकशाही स्वीकारली. त्या लोकशाहीला ७५ वर्षे पूर्ण झालीत. २५ जानेवारी हा निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस 'मतदार दिन' म्हणून साजरा होतो. म्हणूनच मतदार, राजकीय पक्ष आणि निवडणूक आयोग यांच्या वाटचालीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

संविधानाचा अमृतमहोत्सव म्हणजेच निवडणूक आयोगाचा अमृतमहोत्सव, या प्रदीर्घ काळात प्रतिनिधिक लोकशाही मजबूत होणे काळाची गरज होती. प्रतिनिधिक लोकशाहीमध्ये निवडणूक प्रक्रियेला अधिक महत्त्व असते, मात्र ही निवडणूक प्रक्रियाच वादात अडकली. स्वायत्त संस्था असलेल्या निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर घेण्यात येणारी शंका निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करतात. सत्ताधारी विरुद्ध विरोधकांच्या राजकीय संघर्षाने निवडणूक आयोग मतचोरीच्या विळख्यात अडकला. निवडणुकीची दिशा

बदलली का? मतदार यादीत गडबड आहे का? निवडणूक प्रक्रिया भरकटली का? परिणामी लोकशाहीची दिशा बदलली का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे लोकशाहीच्या बरकटीकरिता गरजेचे बनले. म्हणूनच लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी या विषयावर तटस्थपणे चर्चा होणे गरजेचे वाटते.

**बीज शब्द -** अमृत महोत्सव, मत चोरी, भूमिका, लोकशाही, विरोधी पक्ष

**संशोधनाची उद्दिष्टे -**

१) निवडणूक आयोगाच्या अधिकारांचा आढावा घेणे.

२) निवडणूक आयोगावर होणाऱ्या आरोपांचा शोध घेणे.

**गृहीतके -**

१) पारदर्शक निवडणुका घेण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे.

२) निवडणूक आयोगावर मत चोरीचे आरोप विरोधी पक्ष करीत आहेत.

मतदार आणि राजकीय पक्ष ही निवडणूक रुपी रथाची दोन चाके आहेत. या रथाची धुरा निवडणूक आयोगाच्या हातात आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाचा ताण वाढत असल्याने ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्याकरिता घटकराज्यनिहाय राज्य निवडणूक आयोगाची स्थापना केली. सहा ते आठ वर्षानंतर होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ईव्हीएम सोबत व्हीव्हीपॅट वापरण्यात येणार नसल्याची घोषणा महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने केल्यानंतर पुन्हा विरोधी पक्षाने विरोध सुरू केला. सत्ताधारी पक्ष निवडणूक आयोगाची बाजू घेत असतात, तर विरोधी पक्ष निवडणूक आयोगाच्या भूमिकांवर प्रश्न उपस्थित करीत असतात. निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवर उपस्थित होणारी शंका तसेच सत्ताधारी पक्षाच्या इशाऱ्यावर निवडणूक आयोग काम करीत असल्याचा होणारा आरोप लोकशाहीला मारक ठरू शकतो. एका मतदारांचे दोन ते चार घटकराज्यातील मतदार यादीत असलेली नावे, मृत व्यक्तींचे मतदार यादीतील नावे, ओळखपत्रावर फोटो नसणे, पत्ता नसणे, ज्येष्ठ नागरिकांचे पहिल्यांदा मतदार यादीत आलेली नावे, घराच्या क्षमतेपेक्षा कितीतरी पटीने अधिक घरात राहत असलेले मतदार, कमी कालावधीत वाढलेले मतदार, संध्याकाळी पाचनंतर वाढलेले मतदान तसेच विधानसभा निवडणुकीपूर्वीच १६० जागा जिंकून देण्याची दोन व्यक्तींनी दिलेली हमी असे काही मुद्दे पुढे आलेत.

म्हणूनच हा संघर्ष निवडणूक आयोग विरुद्ध विरोधी पक्ष असा असला तरी त्यामध्ये सत्ताधारी पक्षही भूमिका मांडत आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या लोकसभा मतदारसंघातील नातेवाईकांसह काही मतदारांची नावे वगळल्याचा आरोप यापूर्वीच केला होता. [३]

मतदार आणि राजकीय पक्षांच्या भूमिकांवर लोकशाहीची दिशा अवलंबून असते. ज्याप्रमाणे लोकशाहीचे वय वाढत आहे त्याचप्रमाणे मतदार आणि राजकीय पक्ष्यांच्या संखेत वाढ होत आहे, मात्र ती गुणात्मक आहे का? हा संशोधनाचा विषय बनला. या दोघांच्या बदलत्या भूमिकांमूळे लोकशाहीची दिशा बदलली. लोकशाही निवडणुकांपूरती मर्यादित बनल्याने लोकशाहीतील मूल्ये आणि आयुधे लोप पावत चाललीत. राजकीय पक्षांच्या सभागृहातील आणि सभागृहाबाहेरील संघर्षाला तसेच आरोप-प्रत्यारोपांना मर्यादा उरल्या नाहीत. सभागृहात आणि विधान भवनाच्या परिसरात मारामाऱ्या होत आहेत. राजकीय पक्षांचे जाहीरनामे मतदारांना प्रलोभने दाखविणारे असल्याने मतदारांच्या अपेक्षा वाढल्यात. प्रत्येक निवडणूक मतदारांना दिवाळी वाटायला लागली. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीदरम्यान महायुती आणि महाविकास आघाडीने लाडक्या बहिण योजनेतील मानधनात वाढीचे दिलेले आश्वासन हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. एकीकडे अशा योजना तर दुसरीकडे मतांच्या होणाऱ्या खरेदी-विक्रींमूळे निवडणुका महागड्या झाल्यात. महत्वाचे म्हणजे आदर्श निवडणूक आचारसंहिता असतांना हे सर्व घडते. परिणामी लोकशाहीसमोरील आव्हाने वाढलीत.[५] राजकीय पक्षांना निवडणुका जिंकून सत्ता प्राप्त करायची असते, तर मतदारांना प्रलोभने हवे असतात. म्हणून दोघेही आचारसंहितेचा भंग करून चुकीच्या मार्ग स्वीकारतात. अशा प्रकारांना नियंत्रित करणाऱ्या निवडणूक आयोगाला लोकशाही स्थिर करावयाची असल्याने त्याला लगाम लावण्याची जबाबदारी आयोगाचीच आहे. स्थानिक स्तरावर जिल्हाधिकारी आणि तहसीलदार मतदार नोंदणी प्रक्रिया राबवीत असले तरी अंतिम जबाबदारी आयोगाचीच असते. म्हणूनच मतदार यादीत दिसत असलेल्या गोंधळाची उत्तरेही आयोगालाच द्यावी लागेल. निवडणूक आयोगाच्या सध्याच्या आकडेवारीनुसार २५२० पक्ष आहेत. निवडणूक आयोगाला राजकीय पक्षाला मान्यता देणे, निवडणूक चिन्ह देणे तसेच निवडणूक विषयक खटल्यांचा

निर्णय देण्याचा अधिकार असल्याने निवडणूक प्रक्रियेसंदर्भात ज्या काही अडचणी आहेत त्याचे न्यायिक निरसन आयोगाने करणे अपेक्षित आहे. त्याकरिता प्रत्येकदा न्यायालयाच्या निर्देशांची गरज पडू नये. लोकप्रतिनिधी कायदा १९५१ हा सर्वच निवडणुका निष्पक्ष आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यास मदत करीत असला तरी लोकशाहीची मजबूत पायाभरणी झाली असे म्हणणे धाडसाचे ठरेल.[१]

**निवडणूक आयोग मतचोरीच्या विळख्यात?**

आयोगाकडे स्वतःचा कर्मचारी वर्ग नसल्याने मतदार यादी तयार करणे, जिल्हा आणि तालुका निहाय निवडणुकांचे संचालन करणे इत्यादी कामे जिल्हाधिकारी, उपविभागीय, अधिकारी आणि तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक कर्मचारी करीत असतात. मतदार नोंदणी करणे आणि मृत मतदारांचे नाव कमी करण्याची कामे बी.एल.ओ. करतात. कमी कालावधीत बहुसंख्य झालेली मतदार नोंदणी, वाढलेले मतदान तसेच एका मतदाराचे नाव एकापेक्षा अधिक मतदारसंघात असल्याने मतचोरीचा आरोप लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी करीत आहेत. या आरोपांची निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील एस.आय.टी. द्वारे तपास करण्याची मागणी करणारी जनहित याचिका रोहित पांडे या वकिलाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत बंगरूळ सेंटर लोकसभा मतदारसंघातील मतदार यादीत मोठ्या प्रमाणात फेरफार झाल्याचा आरोप गांधींनी केला होता. त्यावर न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या प्रकरणाचा तपास करण्याची मागणी करणारी याचिका फेटाळली. याचिकाकर्त्याने याबाबत भारतीय निवडणूक आयोगाशी संपर्क साधण्याचा पर्याय अवलंबवा असा सल्ला न्यायालयाने दिला. निवडणूक आयोग स्वायत्त संस्था असल्याने याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाचा आहे. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने याबाबत निवडणूक आयोगाकडे न्याय मागण्याचा सल्ला दिला.[२]

लोकसभेच्या निवडणुकीनंतर मतचोरी विरोधकांची एक चळवळ बनली, त्याला सर्वच विरोधी पक्ष पाठिंबा देत आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगानंतर मुंबईतील राज्य निवडणूक आयोगाकडे विरोधकांनी मोर्चा वळविला. लवकरच

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असल्याने या आंदोलनाला महत्त्व आले. उद्धव ठाकरे, राज ठाकरे, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे जयंत पाटील, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ इत्यादींसह शेकापच्या नेत्यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन निवडणूक याद्यांमध्ये प्रचंड मोठा घोळ असल्याची तक्रार दिली. राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅटचा वापर न करण्याचा निर्णय घेतला. त्यावर महाराष्ट्रातील सर्वच विरोधी पक्षाने आक्षेप घेत राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करीत व्हीव्हीपॅट शिवाय निवडणुका नको अशी मागणी केली. इलेक्शनपेक्षा सिलेक्शन करून मोकळे व्हा असा सल्ला देत मतदार यादींबाबत सुप्रीम कोर्टाने सुमोटो केस घ्यावी असा सल्ला उद्धव ठाकरे यांनी दिला. मोजणीला उशीर लागू द्या, मात्र निवडणुका बॅलेटवरच घ्या अशी मागणी करीत आठ टर्म आमदार असलेले थोरात कसे पडले? असा प्रश्न मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी उपस्थित केला. एकूणच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पारदर्शक होण्याकरिता विरोधी पक्ष एकवटल्याचे दिसते. महाविकास आघाडीसोबत मनसेचा सहभाग पुढील तडजोडीची दिशा स्पष्ट करते.

१९९३ मध्ये झालेल्या ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार राज्य निवडणूक आयोगाचे गठण केले असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे.[४] महत्त्वाचे म्हणजे लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता एकच मतदार यादी असते. मतदार याद्या तयार करण्याची जबाबदारी केंद्रीय निवडणूक आयोगावर आहे. म्हणूनच निवडणूक यादीतील बदल आमच्या अधिकार कक्षेत येत नसल्याचा खुलासा राज्य निवडणूक आयोगाने केला. लग्न झालेल्या अनेक महिलांचे नावे दोन ठिकाणी दिसतात हे खरे आहे. मात्र असे मतदार एकाच ठिकाणी मतदान करीत असल्याचा खुलासा सत्ताधारी पक्ष करीत असतात.[३]

**समापन -**

मतदार आणि राजकीय पक्ष निवडणूकरुपी रथाची दोन चाके आहेत. या दोघांच्या समातंर वाटचालीवर लोकशाहीचे भविष्य अवलंबून असते. जेव्हापासून निवडणुकांमध्ये ईव्हीएमचा वापर सुरू झाला तेव्हापासूनच विरोधी पक्ष त्यावर

आक्षेप घेतांना दिसतात. ईव्हीएम सत्ताधारी पक्षाला पारदर्शक वाटते तर विरोधी पक्षाला अपारदर्शक वाटते. म्हणून निवडणुका सुरू झाल्या किंवा संपल्या की ईव्हीएम विरोधात संघर्ष सुरू होतो. या संघर्षात निवडणूक आयोगांवर आरोप केले जातात. निवडणुकांचे संचालन, मार्गदर्शन, नियंत्रण यासह निवडणूक आयोगाची न्यायिक कार्ये आहेत. त्या आधारावर निवडणुका मुक्त आणि निःपक्षपणे घेण्याची जबाबदारी आयोगाची आहे. म्हणूनच कोणत्याही क्षेत्रातील जागृक मतदारांच्या तक्रारीची दखल घेतली जाईल अशी हमी आयोगाने दिली. प्रतिनिधी लोकशाहीतील निवडणुकीची चौकट स्थिर करण्याची जबाबदारी संविधानाने निवडणूक आयोगावर सोपविली. भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही असून निवडणूक प्रक्रिया हा आत्मा आहे. म्हणूनच निवडणूक आयोगाने कायद्याच्या चौकटीत विरोधकांच्या आरोपांचे निरसन करणे अपेक्षित आहे.

ब्रिटिशांविरुद्ध दीडशे वर्षे संघर्ष केल्यानंतर स्वातंत्र्य मिळाले. संविधानाने लोकशाही मूल्ये जपणारी व्यवस्था निर्माण केली. मात्र काही संस्थांनी लोकशाहीचे स्वातंत्र्यच धोक्यात आणले. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, तर उचित बंधनाची व्यवस्था होय, मुळात याचाच विसर नागरिकांसह संवैधानिक संस्थांना पडला. परिणामी राजकीय स्वैराचार वाढला. स्वातंत्र्याऐवजी मास विक्रीवर झालेली चर्चा हे त्याचे उदाहरण होय. म्हणूनच अधिकारांचा दुरुपयोग करणारी व्यवस्था वाढत आहे. भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही असून तरुणांचा देश आहे. तरुणांच्या दिशेवरच लोकशाहीची दिशा अवलंबून आहे. म्हणूनच तरुणांनी झेंडे नाचविण्याऐवजी लोकशाही सबळ करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे, तसेच संविधानाने शांततेच्या मार्गाने आंदोलने करण्याचा अधिकार दिला असला तरी ते आंदोलने लोकशाहीवर परिणाम करणारे आहेत का? हे शोधणे काळाची गरज बनले. या देशावरील कर्जाचा डोंगर हा प्रत्येक भारतीय नागरिकांच्या डोक्यावर आहे. म्हणूनच आपल्याला आपले आर्थिक व सामाजिक भविष्य सुरक्षित करायचे असेल तर राजकीय वर्तमानाला लोकशाही मार्गाने दिशा द्यावी लागेल हे मात्र खरे.

**संदर्भसूची :**

१. आंबेडकर, बाबासाहेब (२ ऑक्टोबर २०२५). 'भारताचे संविधान'.

आंबेडकर मीडिया, पास पब्लिकेशन कंपनी, नागपूर.
२. पळशीकर, सुहास. (जुलै २००७). नितीन बिरमल- महाराष्ट्राचे राजकारण. प्रतिमा प्रकाशन, पुणे.
३. वृत्तपत्रातील लेख.
४. गवई, विघे, चकवे. (मार्च २०१२). महाराष्ट्रातील पंचायत राजची वाटचाल. वेद मुद्रा प्रकाशन, अमरावती.
५. देशमुख, अलका. (ऑगस्ट २००३). भारतीय शासन आणि राजकारण. श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

■■■

# प्रजासत्ताक भारतीय समाजातील असमानता आणि मानवी हक्क

❒ **डॉ. नितीन सुरेशराव कायरकर**
समाजशास्त्र विभाग,
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**सारांश (Abstract) :**

प्रजासत्ताक भारतातील मानवी हक्कांच्या संकल्पनेचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे. भारतीय राज्यघटना प्रत्येक नागरिकाला मूलभूत स्वातंत्र्य आणि समानतेची हमी देते, तरी वास्तव जीवनातील मानवी हक्कांची अधोगती सामाजिक असमानता, जात, वर्ग, लिंगभेद, धार्मिक विभेदीकरण आणि आर्थिक विषमता अशा विविध सामाजिक घटकांनी निर्धारित होते (Ambedkar, 2014). या अध्ययनात भारतीय समाजातील हक्कांचे अनुभव सामाजिक परिस्थिती, सत्तासंबंध, सांस्कृतक मूल्ये आणि प्रशासकीय संरचना यांच्या माध्यमातून कसे आकार घेतात याचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच, माध्यमे, डिजिटल आंदोलन, नागरी समाज आणि न्यायालयीन सक्रियता या घटकांनी मानवी हक्कांच्या संरक्षणात कसा सकारात्मक हस्तक्षेप केला याचे विश्लेषण केले आहे (Baxi, 2012). प्रस्तुत अध्ययनातून स्पष्ट होते की संविधानिक हक्क आणि सामाजिक वास्तव यामध्ये मोठे अंतर आहे. भविष्यात ही दरी भरून काढण्यासाठी समानताधिष्ठित सामाजिक सुधारणा, पारदर्शक प्रशासन आणि जागरूक नागरिकत्व अत्यावश्यक ठरणार आहे. या अध्ययनात भारतातील मानवी हक्कांच्या स्थितीचे सखोल, विविधांगी आणि समाजशास्त्रीय विश्लेषण सादर करण्यात आले आहे.

**बिजशब्द :** प्रजासत्ताक भारत, मानवी हक्क, सांस्कृतक विविधता, आधुनिक भारत, सामाजिक संरचना

**प्रस्तावना :**

प्रजासत्ताक भारताची ओळख सामाजिक न्याय, समानता, स्वातंत्र्य आणि

बंधुता या मूल्यांवर आधारलेली आहे. भारतीय संविधानाने नागरीकांना मूलभूत हक्क प्रदान करून मानवी स्वातंत्र्याचा स्पष्ट पुरस्कार केला असला, तरी भारतीय समाजातील ऐतिहासिक, धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतक विविधतेमुळे या हक्कांचा उपभोग सर्वांना समान प्रमाणात मिळत नाही. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास मानवी हक्क ही केवळ कायदेशीर संकल्पना नसून ती सामाजिक संरचना, सत्ता-संबंध, सामाजिक ओळख आणि समूहांमधील असमानता यांच्याशी घट्ट जोडलेली प्रक्रिया आहे.

भारतातील जातीव्यवस्था, लिंगभेद, धार्मिक अल्पसंख्याकांचे प्रश्न, आदिवासींचे विस्थापन, आर्थिक विषमता आणि आधुनिक माहिती-तंत्रज्ञानामुळे उद्‌भवलेले हक्क आणि आव्हाने हे सर्व घटक मानवी हक्कांच्या प्रत्यक्ष अनुभूतीवर प्रभाव टाकतात. म्हणूनच प्रजासत्ताक भारतातील मानवी हक्कांचा अभ्यास करताना समाजशास्त्रीय विश्लेषण आवश्यक ठरते. हे संशोधन या विविध सामाजिक स्तरांतील मानवी हक्कांच्या अनुभवांचे विश्लेषण करून संविधानिक मूल्ये आणि वास्तवातील फरक शोधण्याच्या प्रयत्न करते.

**सैद्धांतिक चौकट :**

मानवी हक्क ही संकल्पना इतिहास, संस्क्री, समाज आणि सत्ता यांचे परिणाम म्हणून विकसित झालेली आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मानवी हक्कांचा अर्थ केवळ संविधानिक किंवा कायदेशीर चौकटीत मर्यादित न राहता; ते व्यक्ती आणि समाज यांच्यातील संबंध, सामाजिक संरचना, संघर्ष आणि सामाजिक बदल या सोबत जोडलेले असतात. मानवी हक्कांची संकल्पना ही नैसर्गिक हक्क व सामाजिक हक्क या दोन भागात विभागण्यात येतात.

**१) नैसर्गिक हक्क (Natural Rights Perspective)**

नैसर्गिक हक्कांनुसार मानवी हक्क हे जन्मजात, सार्वत्रिक आणि अपरिवर्तनीय असल्याचे मानले जाते. व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा मूलभूत आधार म्हणून हे हक्क ओळखले जातात. भारतीय संविधानातील मूलभूत हक्क याच नैसर्गिक हक्काचा विचार मांडतात.

**२) सामाजिक हक्क (Social Rights Perspective)**

सामाजिक हक्कांची संकल्पना हे समाजाने घडवलेल्या सामाजिक संरचनांचे परिणाम असतात. सामाजिक परिस्थिती, आर्थिक संसाधनांचे वितरण,

सांस्कृतिक मान्यता व समूहातील सत्ता-संबंध यांवर हक्कांचे स्वरूप ठरतो.

**समाजशास्त्रीय सिद्धांत आणि मानवी हक्क**

**संरचनात्मक - कार्यात्मकता सिद्धांत :**

संरचनात्मक-कार्यात्मकता या सिद्धांतानुसार समाज हा परस्परावलंबी घटकांनी बनलेली व्यवस्था आहे. मानवी हक्क समाजातील एकात्मता, सुव्यवस्था आणि स्थिरता टिकविण्याचे साधन मानले जातात, कारण ते प्रत्येक व्यक्तीस मूलभूत संरक्षण आणि समान संधी देतात. शिक्षण, कायदा, कुटुंब आणि सामाजिक संस्था हक्कांचा प्रसार करून सामाजिक भूमिकांची स्पष्टता आणि सहकार्य वाढवतात. शिक्षण मनुष्याला नागरिक घडवते, कायदा सुव्यवस्था राखतो आणि कुटुंब मूल्यांचे हस्तांतरण करते. त्यामुळे लोकशाही मूल्ये व सामाजिक शिस्त यांचे सुयोग्य वातावरण तयार होऊन समाजाची स्थिरता मजबूत होते.

**संघर्ष सिद्धांत :**

संघर्ष सिद्धांतानुसार समाजातील संरचना या सत्ता, संसाधने आणि असमानता यांवर आधारित असते. मानवी हक्कांचा मुद्दा हा सामाजिक समूहामधील संघर्षाचे प्रारूप मानला जातो, कारण सत्ताधारी गट हक्कांची मांडणी आपल्या हितसंबंधांनुसार घडवतात. दलित, स्त्रिया, कामगार, अल्पसंख्याक यांसारखे वंचित गट संघर्ष आणि आंदोलनांद्वारे स्वतःचे हक्क प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करीत असतात. कायदे, धोरणे आणि सामाजिक बदल हे या संघर्षांचे परिणाम असल्याचे दिसून येते. त्यामुळे मानवी हक्क समता स्थापित करण्यामध्ये आणि सामाजिक संतुलन बदलण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका निभावतात.

**भारतीय समाजातील असमानता आणि मानवी हक्क :**

भारतीय समाज ऐतिहासिकदृष्ट्या अनेक स्तरांमध्ये विभागलेला आहे. या विभाजनाचे स्वरूप जात, वर्ग, लिंग, धर्म, भाषा आणि भूभाग यांसारख्या अनेक परिमाणांवर आधारित आहे. त्यामुळे मानवी हक्कांची उपलब्धता आणि त्यांचा प्रत्यक्ष अनुभव सर्व समाजघटकांसाठी समान नसतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता सामाजिक असमानता ही केवळ आर्थिक प्रश्न नसून ती सत्ता-संबंध, सांस्कृतक मूल्ये, सामाजिक ओळख आणि संस्थात्मक पद्धतींशी

जोडलेली प्रक्रिया आहे. भारतातील विविध प्रकारच्या असमानतेचे आणि त्यांच्या मानवी हक्कांवर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण खालील प्रमाणे करण्यात आले आहे.

**जातीय स्तरिकरण आणि मानवी हक्क :**

भारतीय समाजातील जातीव्यवस्था ही इतिहासात खोलवर रुजलेली आणि आजही समाजाच्या अनेक स्तरांवर परिणाम करणारी सामाजिक स्तरीकरणाची सर्वाधिक सखोल पद्धती मानली जाते. वर्णव्यवस्था आणि असंख्य उपजातींवर आधारित ही सामाजिक रचना व्यक्तीचे सामाजिक स्थान, प्रतिष्ठा, व्यवसाय, तसेच संसाधनांवरील प्रवेश पूर्वनियोजित करते. समाजशास्त्रीय दृष्टीने, ही एक वंशपरंपरागत व बंद सामाजिक व्यवस्था (closed, hereditary system) असून, व्यक्तीची गतिशीलता (social mobilty) अत्यंत मर्यादित करते.

दलित, आदिवासी आणि इतर मागास गटांवरील भेदभाव ही जातव्यवस्थेची सर्वात गंभीर अभिव्यक्ती आहे. अनेक ग्रामीण आणि अर्ध शहरी भागांमध्ये दलितांवर सामाजिक बहिष्करण, मंदिर-प्रवेश किंवा सार्वजनिक सुविधांवरील प्रतिबंध, शारीरिक हिंसा, आणि जातीआधारित नावे आजही ठेवतांना आढळतात. आदिवासी समूहांना जंगलातील पारंपरिक हक्क, जमीन अधिग्रहण, वने-वनीकरण धोरणे आणि विकास प्रकल्पांमुळे वारंवार हक्क गमावण्याची वेळ येते. आर्थिकदृष्ट्या मागास गटांना रोजगार बाजारात भेदभाव, असुरक्षित मजुरीसंबंध, व कर्जपुरवठ्यातील अडथळे यांना सामोरे जावे लागते.

शिक्षण, आरोग्य, जमीन मालकी, रोजगार आणि न्यायप्रवेश या क्षेत्रांमध्ये देखील मोठे अंतर दिसून येते. दलित व आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमध्ये होणारा छळ आणि अप्रत्यक्ष_(subtle) भेदभाव त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळा निर्माण करतो. आरोग्य सेवेतील असमानता, पोषणाची कमतरता आणि स्वच्छतेचे प्रश्न त्यांच्या जीवनमानावर परिणाम करतात. न्यायव्यवस्थेत तक्रार नोंदवण्यापासून ते निर्णय मिळेपर्यंत अनेकदा विलंब होतांना आणि अडथळे निर्माण होत असतांना दिसून येतात.

जातीय स्तरीकरण केवळ आर्थिक वा सामाजिकच नव्हे, तर मानवी हक्कांचा विषय आहे. मानवी हक्कांच्या मूलभूत तत्त्वांमध्ये समानता, गौरव, स्वातंत्र्य, आणि भेदभावरहित समाज यांचा समावेश आहे. जातीव्यवस्था ही

तत्त्वे प्रत्यक्षात ढासळवते, कारण ती व्यक्तीच्या जन्माला सामाजिक मूल्याशी जोडते. परिणामी, काही गटांना संरचनात्मकदृष्ट्या संसाधने कमी मिळतात, तर काहींना प्राधान्य मिळतात. त्यामुळे हक्कांची प्रत्यक्षातली अंमलबजावणी असमान राहते.

अलीकडच्या दशकांमध्ये संविधानिक तरतुदी, सकारात्मक कृषी धोरणे (reservations), स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक चळवळींमुळे परिस्थितीत सुधारणा झाल्या आहेत; तरीही सांस्कृतिक, मानसिक आणि संरचनात्मक स्तरांवरील जातीय पूर्वग्रह अद्याप दृढ आहेत. म्हणूनच, समाजाने जातीय भेद टाळणे, समान संधी उपलब्ध करून देणे आणि मानवी हक्कांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे अत्यावश्यक आहे.

**लिंगभाव असमानता आणि स्त्रियांचे मानवी हक्क :**

भारतीय समाजात लिंगभाव असमानता ऐतिहासिकदृष्ट्या खोलवर रुजलेली आहे. पितृसत्ताक संरचनेमुळे स्त्रियांना शिक्षण, रोजगार, आरोग्य, मालमत्ता आणि निर्णयप्रक्रियेत निम्न  स्थान दिले जाते. स्त्री-भ्रूणहत्या, कौटुंबिक हिंसा, लैंगिक छळ, बालविवाह, मानहानी हत्या अशा घटना स्त्रियांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करतात. विवाह, कुटुंब आणि समुदाय मान्यतेमुळे स्त्रियांवर सामाजिक नियंत्रण अधिक असते.

समाजशास्त्रीयदृष्ट्या, लिंगभाव ही फक्त जैविक रचना नसून सामाजिक बांधणी (social construct) आहे, जी हक्कांच्या अनुभवात महत्त्वाची भूमिका बजावते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनानुसार 'स्त्री' आणि 'पुरुष' या भूमिकांना, अपेक्षांना आणि मूल्यांना समाजात सातत्याने पुनरुत्पादित केले जाते. या प्रक्रियेतून निर्माण होणारी विषमता स्त्रियांच्या मानवी हक्कांच्या अनुभवाला आकार देते.

पितृसत्ताक संरचनेने स्त्रियांना दुय्यम स्थानात ठेवले आहे. कुटुंब, धर्म, अर्थव्यवस्था, कायदा आणि माध्यमे यांसारख्या संस्थांमध्ये पुरुषसत्ताक मूल्यांना प्राधान्य दिले गेले. परिणामी, स्त्रियांना शिक्षण, रोजगार, आरोग्य, राजकीय प्रतिनिधित्व, मालमत्तेचा हक्क आणि निर्णयप्रक्रियेतील सहभाग या सर्व क्षेत्रांत मर्यादित संधी उपलब्ध झाल्या. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हे सर्व संरचनात्मक विषमतेचे (structural niequality) रूप आहे.

भारतामध्ये स्त्रियांवरील अत्याचारांच्या अनेक स्वरूपांमधून मानवी हक्कांचे उल्लंघन निदर्शनात येते. स्त्री-भ्रूणहत्या ही केवळ एका जीवाचा अंत नसून, मुलगा-मुलगी यातील सामाजिक मूल्यभेदाचे प्रारूप आहे. कौटुंबिक हिंसा, दाम्पत्य-संबंधांमधील असमानता पुरुषसत्ताक मूल्य दर्शवते. लैंगिक छळ, स्त्रियांना सार्वजनिक क्षेत्रात मुक्तपणे वावरण्याच्या अधिकारावर बंधन लादतो. अनेक समाजांमध्ये आढळणाऱ्या मानहानी हत्यांमध्ये (honour kilings) स्त्रीची स्वायत्तता पुरुषसत्तेच्या प्रतिष्ठेला धोका मानली जाते.

विवाह, कुटुंब आणि समुदाय यांच्या माध्यमातून स्त्रियांवर सामाजिक नियंत्रण लादले जाते. विवाहसंबंधांतून स्त्रीची लैंगिकता, वर्तनसंहिता, पोशाख, बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य, मित्रपरिवार या सर्वांवर समाजाने ठरवलेल्या संस्कारांचे बंधन असते. त्यामुळे स्त्रियांचे वैयक्तिक अधिकार केवळ कायद्याने मिळतात, परंतु त्यांची सामाजिक अमलबजावणी होत असतांना दिसून येत नाही.

सद्यःच्या काळात शिक्षण, कायदे, स्वयंसेवी संस्था आणि स्त्रीवादी चळवळींनी परिस्थितीत काही सकारात्मक बदल घडत असतांना दिसून येत आहे. मात्र, लिंगभाव हा समाजाने घडवलेला असल्यामुळे, मानसिकता बदलल्याशिवाय आणि सामाजिक संस्था या समतेने नव्याने रचल्याशिवाय खरी लिंगभाव न्यायप्राप्ती होने अशक्य आहे.

स्त्रियांचे मानवी हक्क फक्त संरक्षणाचे नाहीत, तर समान संधी, स्वायत्तता आणि आदर प्राप्त होणे देखील महत्वाचे आहेत. म्हणूनच भारतीय समाजाला संरचनात्मक, सांस्कृतिक आणि वैयक्तिक पातळीवर बदल घडवून आणणे गरजेचे आहे.

**धार्मिक, भाषिक आणि सांस्कृतिक अल्पसंख्याकांचे हक्क :**

भारताची सांस्कृतिक आणि सामाजिक विविधता ही त्याची ओळख आणि अभिमान मानला जातो. तथापि, हीच विविधता काही वेळा धार्मिक, भाषिक आणि सांस्कृतिक अल्पसंख्यकांना वंचितता आणि भेदभावाचा अनुभव देत असतांना दिसून येते. समाजशास्त्रीय दृष्टीने, अल्पसंख्याक हे केवळ संख्यात्मकदृष्ट्या कमी नसतात; तर ते असे गट असतात ज्यांच्याकडे सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक शक्ती कमी असते. अशा परिस्थितीत त्यांचे हक्क विशेषतः सांस्कृतिक स्वातंत्र्य, समानता आणि सामाजिक सन्मान यांच्याशी

संबंधित असतात.

धार्मिक अल्पसंख्याकांसाठी भारताचा घटनात्मक तरतुदी व्यापक संरक्षण पुरवितात; तरीही प्रत्यक्ष व्यवहारात मात्र त्यांना अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागते. काही समुदायांना सार्वजनिक क्षेत्रात भेदभाव, तसेच कधीकधी हिंसेचा धोका जाणवतो. सामूहिक हिंसा, सक्तीचे स्थलांतर, धार्मिक स्थळांवरील हल्ले किंवा सांप्रदायिक ध्रुवीकरण यांसारख्या घटनांमुळे त्यांच्या सुरक्षेच्या आणि प्रतिष्ठेच्या हक्कांचे उल्लंघन होते. या प्रकारचे वातावरण अल्पसंख्याकांच्या राजकीय सहभागाला मर्यादा आणते आणि त्यांच्या प्रतिनिधित्वावर प्रतिकूल परिणाम करते.

भाषिक अल्पसंख्याकांची परिस्थितीही तशीच गुंतागुंतीची आहे. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून सांस्कृतिक ओळखीचा मुख्य आधार आहे. काही भाषिक गटांना शैक्षणिक अभ्यासक्रमात स्वतःच्या भाषेतील शिक्षणाची कमतरता जाणवते. प्रशासकीय प्रक्रियांमध्ये प्रमुख भाषांना प्राधान्य मिळाल्याने अल्पसंख्याक भाषिकांना नोकरी, कोर्ट, कार्यालयीन कागदपत्रे यांसारख्या क्षेत्रांत अडथळे येतात. परिणामी, त्यांच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीवर मर्यादा येऊ शकतात आणि भाषेचा अस्तित्व धोक्यात येते.

सांस्कृतिक अल्पसंख्याक विशेषतः आदिवासी आणि विशिष्ट परंपरा जपणारे समुदाय यांना त्यांच्या जीवनशैली, रूढी, जंगलाशी व जमिनीशी नाते, सण-उत्सव जपण्यासाठी विशेष संरक्षणाची गरज असते. विकास प्रकल्प, जमीन अधिग्रहण, किंवा प्रमुख संस्कृतीचा प्रभाव यांच्या दडपणाखाली त्यांची परंपरा आणि ओळख लोप पावण्याची भीती असते. अशा गटांसाठी मानवी हक्क म्हणजे केवळ मूलभूत सुविधा नव्हे, तर सांस्कृतिक अस्तित्व टिकवण्याचे स्वातंत्र्य देखील आहे.

अल्पसंख्याक हक्कांचा मूलभूत आधार असा की, प्रत्येक समुदायाला स्वतःची ओळख, भाषा, श्रद्धा आणि जीवनपद्धती जपण्याचा अधिकार आहे. सामाजिक सन्मान, भेदभावमुक्त वागणूक आणि समान संधी या मानवी हक्कांच्या मुख्य मूल्यांची अंमलबजावणी अल्पसंख्याकांसाठी विशेषतः महत्त्वाची आहे. भारताचा लोकतांत्रिक आराखडा हे हक्क मान्य करतो, परंतु त्यांची प्रभावी अंमलबजावणी समाजातील जागरूकता, परस्पर आदर आणि समावेशक

धोरणांवर अवलंबून आहे.

**आर्थिक विषमता आणि हक्कांचे वितरण :**

भारतामध्ये गेल्या काही दशकांत आर्थिक वाढ झपाट्याने झालेली असली तरी, आर्थिक विषमता त्याच वेगाने वाढत असल्याचे दिसते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आर्थिक विषमता ही केवळ उत्पन्नातील फरक नसून, ती संसाधनांवरील प्रवेश, संधी, सत्तासंबंध आणि जीवनमान यामधील असमतोलाची जटिल रचना आहे. या विषमतेमुळे मानवी हक्कांची प्रत्यक्ष अंमलबजावणी मर्यादित होते. कायद्याद्वारे हक्क उपलब्ध असले तरी, सर्व नागरिकांना ते समान प्रमाणात उपभोगता येत नाहीत.

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना शिक्षण, आरोग्य, पोषण आणि सुरक्षित निवारा यांसारख्या मूलभूत सेवां प्राप्त होण्यासाठी गंभीर अडथळे येतात. कमी उत्पन्नामुळे बालकांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होतो शाळा सोडण्याचे प्रमाण वाढते आणि मुलांना लवकर मजुरीत ढकलले जाते. आरोग्याच्या क्षेत्रात खाजगी सेवांच्या खर्चिक स्वरूपामुळे गरीब कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक ताण येतो; त्यामुळे अनेक आजार उपचार न होवू शकल्यामुळे गंभीर होतात. कुपोषण, स्वच्छतेचा अभाव आणि असुरक्षित निवास या समस्या मानवी हक्कांतील आरोग्य, सन्मान आणि सुरक्षित जीवन या मूल्यांना धोका पोहोचवतात.

ग्रामीण आणि शहरी भागांमधील संधींची दरी सतत वाढत आहे. शहरी भागात शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा आणि तंत्रज्ञान-आधारित संधी अधिक उपलब्ध असतात, तर ग्रामीण भागात पायाभूत सुविधा, आर्थिक गुंतवणूक आणि चांगल्या सार्वजनिक सेवा यांचा अभाव जाणवतो. यामुळे ग्रामीण लोकसंख्येची सामाजिक गतीशीलता (social moblity) मर्यादित राहते. शहरांकडे होणारे स्थलांतर वाढते; परंतु येथील झोपडपट्ट्या, असुरक्षिता आणि अनौपचारिक रोजगार लोकांच्या जीवनमानाला सुधारण्याऐवजी अधिक अस्थिर बनवतात. असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा, आरोग्य विमा, कामगार कायद्यांचे संरक्षण किंवा सुरक्षित कामाच्या सुविधा मिळत नाहीत. हंगामी, तात्पुरती आणि कमी मजुरीची कामे त्यांना दारिद्र्याच्या रेषेतच ठेवतात. कामगारांच्या हक्कांतील हे अंतर आर्थिक विषमतेला अधिक

मजबूत करते.

आर्थिक असमानता अनेकदा मूलभूत हक्कांना केवळ सैद्धांतिक स्वरूपात उपलब्ध ठेवते. उदाहरणार्थ, प्रत्येक नागरिकाला शिक्षण किंवा आरोग्याचा हक्क असला तरी, संसाधनांची कमतरता, सामाजिक परिस्थिती आणि आर्थिक बंधने यांमुळे सर्वांनाच त्या प्रत्यक्षात अनुभवास मिळत नाही. यामुळे मानवी हक्कांची अंमलबजावणी केवळ कायदेशीर किंवा संवैधानिक पातळीवर न राहता, आर्थिक न्याय, समान संधी आणि संसाधनांचा समतोल या व्यापक चौकटीत विचार करण्याची गरज आहे.

**आधुनिक भारतातील मानवी हक्कांचा सामाजिक प्रतिसाद :**

भारतात मानवी हक्कांविषयीची जागरूकता, चर्चा आणि कृती गेली दोन दशकांत लक्षणीयपणे वाढली आहे. सामाजिक संरचना, तंत्रज्ञान, माध्यमे, नागरी समाज आणि नवीन राजकीय प्रक्रियांमुळे हक्कांविषयीची जनजागृती आणि त्यावरील सार्वजनिक प्रतिसाद अधिक दृढ झाले आहेत. समाजशास्त्रीयदृष्ट्या हा प्रतिसाद संवाद, संघर्ष, सहकार्य आणि सामाजिक परिवर्तन अश्या अनेक पातळ्यांवर दिसून येतो. आधुनिक भारतातील मानवी हक्कांच्या प्रश्नांवर समाजाच्या विविध घटकांचा प्रतिसाद इथे अभ्यासण्यात आला आहे.

**माध्यमे आणि मानवी हक्कांची सार्वजनिक धारणा :**

प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि विशेषतः डिजिटल माध्यमे मानवी हक्कांविषयीची सार्वजनिक धारणा घडवण्यात निर्णायक भूमिका बजावतात. मानवी हक्कांचे उल्लंघन तात्काळ प्रसारमाध्यमांत येत असल्यामुळे, घटनांना सामाजिक चर्चेचे केंद्रस्थान मिळते आणि जनमत लवकर तयार होते. तत्पर रिपोर्टिंग, माहितीचा वेगवान प्रसार आणि सोशल मीडियावरील चर्चांमुळे शासन, न्यायव्यवस्था आणि प्रशासनावर सामाजिक दबाव निर्माण होतो.

डिजिटल माध्यमांनी स्त्रियांचे हक्क, LGBTQ + अधिकार, पोलिस अत्याचार, पर्यावरणीय न्याय, आदिवासी हक्क यांसारख्या मुद्यांना लोकप्रिय कथानक (popular narrative) म्हणून स्थान दिले आहे. यामुळे नागरिकांमध्ये जागरूकता वाढून, आंदोलन, सहकार्य आणि धोरणात्मक बदल घडून येत असतांना दिसून येत आहे.

**सोशल मीडिया, डिजिटल आंदोलन आणि लोक सहभाग (Digital Activism)**

आधुनिक भारतात सोशल मीडिया हे एक प्रभावी लोकशाहीचे माध्यम म्हणून उदयास आले आहे. ट्विटर, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि यूट्यूबसारख्या प्लॅटफॉर्मवरील हॅशटॅग मोहिमा #MeToo, #DalitLivesMatter, #Right To Privacy मानवी हक्कांच्या प्रश्नांना राष्ट्रीय चर्चेत आणतात. ऑनलाइन याचिका, डिजिटल स्वाक्षरी मोहिमा आणि थेट (Live) चर्चांमुळे नागरिक, विशेषतः तरुण वर्ग, मोठ्या प्रमाणात सक्रिय होऊ लागला आहे.

डिजिटल आंदोलनांनी सामान्य लोकांनाही हक्कांवरील संवाद, निषेध आणि जनमतनिर्मितीत थेट सहभागाची संधी दिली आहे. ही प्रक्रिया सामाजिक उत्तरदायित्व आणि जागरूकता वाढवते; मात्र त्याचवेळी भ्रामक माहिती आणि टोलिंग यांसारखी आव्हानेही निर्माण करते.

**नागरी समाज संघटना आणि स्वयंसेवी संस्थांची भूमिका**

भारतातील मानवी हक्कांच्या संरक्षणात नागरी समाज संघटना आणि स्वयंसेवी संस्था अत्यंत महत्वाची भूमिका निभावतात. या संस्था वंचित गटांना कायदेशीर मदत, सल्ला, तसेच न्यायप्रवेशात सहकार्य करतात. मानवाधिकार उल्लंघनांचे दस्तऐवजीकरण, सत्य शोधन अहवाल आणि सार्वजनिक चौकशीद्वारे त्या शासन आणि न्यायव्यवस्थेला जबाबदार धरण्याचे काम करतात.

जनजागृती मोहीमा, प्रशिक्षण कार्यक्रम, तसेच धोरणनिर्मितीवरील हस्तक्षेपाद्वारे या संस्था सार्वजनिक मतप्रवाहावर प्रभाव टाकतात. उदा. (People Union for Civil (PUCL), Human Rigsts Law Network (HRLN) आणि पूर्वी सक्रिय असलेली Ammnesty Intemational-India यांसारख्या संस्थांनी सामाजिक न्याय, भेदभावविरोध, कारागृह सुधारणा, स्त्री-हक्क आणि अल्पसंख्याक संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण चळवळी उभारल्या आहेत.

**न्यायालयीन सक्रियता (Judicial Activism) आणि सामाजिक प्रतिसाद**

भारतीय न्यायव्यवस्थेने मानवी हक्कांच्या संरक्षणात अनेकदा सक्रिय आणि हस्तक्षेपात्मक भूमिका निभावली आहे. सार्वजनिक हित याचिका (PIL)

या साधनाद्वारे न्यायालयांनी नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करताना शासनाला जबाबदार धरले. गोपनीयता हक्क (२०१७), LGBTQ + समुदायासाठी समलैंगिकतेचे अपराधीकरण रद्द करणे (२०१८), कामगार आणि कारागृह सुधारणा, पर्यावरणीय संरक्षण यांसारख्या अनेक ऐतिहासिक निर्णयांनी न्यायव्यवस्थेची मानवी हक्कांप्रती बांधिलकी दिसून येते.

संविधानातील मूलभूत रचना सिद्धांतही हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वाचा आधार आहे. या निर्णयांमुळे नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास वाढला आणि हक्कांविषयीची सामाजिक जनचळवळ, जनजागृती व नागरी सहभाग अधिक मजबूत झाला.

**शिक्षण आणि मानवी हक्कांचे समाजीकरण**

आधुनिक भारतात शिक्षण क्षेत्र मानवी हक्कांच्या सामाजिकरणाचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये मानवी हक्क, सामाजिक न्याय, लिंगभाव समानता, संविधानिक मूल्ये आणि लोकशाही प्रक्रिया यांचा पाठ्यक्रमात समावेश वाढत आहे. युवक संघटना, वादविवाद मंडळे आणि कॅम्पस उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समता, लिंगभाव संवेदनशीलता आणि नागरिकत्वभावना मजबूत होत आहे. या प्रक्रियेने विद्यार्थी आंदोलनांचे पुनर्निर्माण झाले असून, तरुण पिढी मानवी हक्कांविषयी अधिक सजग होवून सहभाग दर्शवत आहे. शिक्षणामुळे तयार होणारी ही नवचेतना समाजात सकारात्मक बदल, उत्तरदायित्व आणि लोकशाही मूल्यांला मजबूत करत आहे.

समाजाचा मानवी हक्कांवरील प्रतिसाद विविधांगी आहे. जागृती, आंदोलन, न्यायालयीन हस्तक्षेप आणि माध्यमांमधील चर्चांमुळे सकारात्मक बदल होत असले तरी, माहितीचे ध्रुवीकरण आणि सामाजिक विभाजन आव्हान निर्माण करतात. तरीही समकालीन भारतात मानवी हक्कांविषयीची सामाजिक जाणीव वेगाने वाढत आहे, आणि ही प्रवृत्ती अधिक लोकशाहीवादी आणि संवेदनशील समाजनिर्मितीच्या दिशेने मार्ग दर्शविते.

**निष्कर्ष :**

प्रजासत्ताक भारतातील मानवी हक्कांचा समाजशास्त्रीय अभ्यास दर्शवितो की संविधानाने दिलेली समानता, स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि सामाजिक न्यायाची

मूल्ये भारतीय लोकशाहीचे मजबूत आधारस्तंभ आहेत. तरीदेखील, या अधिकारांचे प्रत्यक्ष स्वरूप सामाजिक संरचना, आर्थिक विषमता, परंपरा, सत्तासंबंध आणि सांस्कृतक मान्यतांशी गुंतागुंतलेले आहे.

या अध्ययनातून स्पष्ट होते की भारतात मानवी हक्कांच्या अंमलबजावणीतील मुख्य अडथळे जातीय विभाजन, लिंगभेद, आर्थिक विषमता, धार्मिक तणाव, तसेच ग्रामीण-शहरी तफावत या सामाजिक परिमाणांमधून उदयास येतात. त्यामुळे मानवी हक्कांचे उल्लंघन हे केवळ कायदेशीर समस्या नसून सामाजिक संरचनात्मक समस्या देखील आहेत.

आजच्या डिजिटल युगात माध्यमे, सोशल मीडिया आणि नागरी समाज संघटना मानवी हक्कांच्या प्रश्नांना अधिक मान्यता देत आहेत. यामुळे जागरूकता वाढत आहे, सामाजिक चर्चा वाढत आहे आणि तरुण पिढी उत्तराधिकारी नागरिक म्हणून पुढे येत आहे. न्यायालयीन सक्रियरण (Judicial activism) आणि सार्वजनिक हित याचिकांच्या माध्यमातून अनेक हक्कांना कायदेशीर संरक्षण मिळते. हे सर्व प्रवाह भारतीय लोकशाहीला अधिक संवेदनशील आणि प्रतिसादक्षम बनवतात.

तथापि, चुकीची माहिती, सामाजिक ध्रुवीकरण, डिजिटल सर्व्हेलन्स, आणि वाढती असमानता या आधुनिक आव्हानांमुळे मानवी हक्कांचे भविष्य गुंतागुंतीचे बनत आहे. या समस्यांशी लढण्यासाठी व्यापक सामाजिक सुधारणा, संवेदनशील प्रशासन, शिक्षणातील मूल्याधिष्ठित बदल आणि नागरी समाजाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

भारतातील मानवी हक्कांना दृढ करण्यासाठी तीन प्रमुख घटक महत्त्वाचे ठरतात ते म्हणजे समानताधिष्ठित सामाजिक संरचना, उत्तरदायी व पारदर्शक प्रशासन, आणि जागरूक, सक्रिय नागरिकत्व यांच्या एकत्रित प्रयत्नानेच संविधानिक मूल्यांमध्ये आणि प्रत्यक्ष सामाजिक वास्तवात असलेल अंतर कमी होऊ शकते. शेवटी, प्रजासत्ताक भारतातील मानवी हक्कांचा प्रवास हा कायदेशीर खात्री पासून सामाजिक न्यायापर्यंतचा आहे, आणि हा प्रवास सतत सुधारणा, संघर्ष आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतूनच पुढे जात राहील.

■■■

# इतर मागास प्रवर्गाचे हक्क आणि आरक्षणाची तरतूद

❒ डॉ. भास्कर सुभाष वघाळे
महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय हाशिवरे, ता अलिबाग, जि. रायगड

**प्रस्तावना :**

भारतातील बहुजन समाजाच्या सामाजिक विकासाकरिता इतिहासाच्या विविध टप्प्यांवर अनेकदा प्रयत्न करण्यात आले आहे. पण १९ व्या शतकातच पहिल्यांदा ब्रिटीशांनी व काही संस्थांनिकानी यासंबंधी कायदेशीर तरतूदी केलेल्या दिसून येतात. यामध्ये आरक्षणाचा प्रामुख्याने समावेश होतो. आरक्षण हा शब्द संरक्षणात्मक भेदभाव, क्षतीपूर्ती धोरण किंवा अफर्मेटिव्ह ॲक्शन किंवा प्रोटेक्टिव डिस्क्रीमिनिशेन या नावाने संबोधला जातो.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, ज्यांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळाले नाही, किंवा ज्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात पर्याप्त प्रतिनिधीत्व मिळाले नाही, त्यांना प्रतिनिधीत्व मिळण्याकरिता केलेली तरतूद म्हणजे आरक्षण होय. भारतीय समाजात देण्यात येणाऱ्या आरक्षणाचा आधार हा सामाजिक असून आर्थिक नाही. आरक्षणातून विषमतेऐवजी समता, अन्यायाऐवजी न्याय, गुलामगिरी ऐवजी स्वातंत्र्य असे मूल्यांतर घडत असते. म्हणून आरक्षण हे क्रांतीकारक परिवर्तनाकडे टाकलेले महत्वाचे पाऊल आहे. भारत देश विषमतेचे माहेर घर आहे. ही विषमता सामाजिक भेदभावामुळे अस्तित्वात आली. मागासवर्गीय बहुजन समाजाला दर्जाची व संधीची समानता प्राप्त करून देणेसाठी फुले-शाहू-आंबेडकरांनी प्रतिपादन केलेले कांतिकारी धोरण म्हणजे आरक्षण होय. तसेच भारतात समानता प्रस्थापित करण्यासाठी आरक्षण एक महत्वाचा मार्ग आहे.

भारतीय राज्यघटनेत ‘मागासवर्गीयांसाठी’ खास सवलती देण्याबाबतची तरतूद कलम क्र. १६ (४) यात नमूद केलेली आहे. परंतु, संविधानात कुठेही

'मागासवर्ग' या शब्दाची व्याख्या दिलेली नाही. संविधानाच्या कलम ३४० अन्वये राष्ट्रपतींना आयोग नेमता येतो. या आयोगाने 'सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग' कोणते आहेत व त्यांच्या उन्नतीकरिता कोणते खास उपाय योजावेत हे सुचवावे, असे नमुद केले होते.[१]

**इतर मागासवर्गीय व आरक्षण :**

भारतीय राज्यघटनेच्या संबंधित कलमात 'जात' असा शब्द नसून 'वर्ग' अशा शब्दाचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे 'वर्ग' म्हणजे नेमके काय? आणि 'सामाजिक व मागासलेपणा' म्हणजे काय? या दोन्ही गोष्टी आयोगाला निश्चित कराव्या लागतात. हे वर्ग कोणते आहेत ते नमूद करावे लागते. या प्रश्नांवर उच्च व सर्वोच्च न्यायालयांनी खूप चर्चा करून त्यांचे अर्थ लावलेले आहेत. घटना समितीद्वारा निर्मित संविधानात १५ (४) हे कलम नव्हते. सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयाने मागासवर्गासाठी केलेल्या खास तरतूदी रद्द ठरल्या तेव्हा १५ (४) हे जादा कलम समाविष्ट करावे लागले. त्यासाठी संविधानात पहिली दुरूस्ती १९५१ साली करण्यातं आली. त्यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांना विशेष संरक्षण देण्याचा अधिकार शासनास प्राप्त झाला.[२] राष्ट्रपतींच्या आज्ञेने व घटनेच्या ३४० व्या कलमान्वये २९ जानेवारी १९५३ साली काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिला 'मागासवर्गीय आयोग' नियुक्त करण्यात आला.

**पहिला मागासवर्गीय आयोग :**

राष्ट्रीय स्तरांवर मागासवर्गीयांचा अभ्यास करण्यासाठी काकासाहेब कालेलकर आयोग सर्वप्रथम नेमण्यात आला होता. काकासाहेब कालेलकर आयोगाने देशातील २३९९ मागास जाती व जमातींची यादी तयार केली होती. त्यांची लोकसंख्या १९५१ सालच्या जनगणनेनुसार ११.५ कोटी एवढी होती. तसेच १९६१ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार जातीनिहाय इतर मागासवर्गीयांची लोकसंख्या निश्चित करण्याची शिफारस केली होती, यावरून इतर मागासवर्गीय जातीच्या लोकसंख्येत मोठी तफावत असलेली दिसून येते. या आयोगाने विभिन्न जातींची तसेच ९३० मागासवर्गीय समुदायांची लोकसंख्यांसंबंधी माहिती मिळविली.

एकत्रित झालेल्या माहितीचे संकलन व छाननी करून, सामाजिक तसेच

शैक्षणिक दृष्टिकोनातून मागासवर्गीयांची ओळख होण्याच्या दृष्टीने काही निकष ठरविले होते. त्यानुसार माहिती संकलित करून देशभरातील २३९९ इतर मागासवर्गीय जातींची एकच यादी तयार केली होती. या यादीची छाननी करून त्यापैकी ८३७ जातींचा समावेश 'अति मागास वर्ग' या गटामध्ये करण्यात आला होता. या आयोगाने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग कोणते आहेत त्यांची पाहणी करून, त्यानुसार यादी तयार करण्याची आवश्यकता होती. परंतु, आयोगाने कोणकोणत्या निकषांच्या आधारावर २३९९ मागासवर्गीयांची यादी तयार केली, याचा उल्लेख अहवालात करण्यात आला नव्हता, केंद्रीय शिक्षण खात्याने शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांना अनुदान देण्याची व्यवस्था केली होती व १९४९ साली राज्य शासनाने केलेल्या शिफारशीच्या आधारावर आयोगाने मागासवर्गीयांची यादी तयार केली होती.[३] काकासाहेब कालेलकर आयोगाने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेपणाचे निकष ठरविले, म्हणजेच मागासलेल्या जातीत सर्वाधिक मागास कोणाला म्हणावे, असे सांगून इतर मागासवर्गात पोटभेद निर्माण केला होता.

इतर मागासवर्गामध्ये समाविष्ट केलेल्या सर्वच जाती सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या एका पातळीवर नाहीत. तुलनात्मकदृष्ट्या काही जाती इतरांपेक्षा पुढारलेल्या किंवा सुस्थितीत आहेत. मागासवर्गीयांच्या विकासासाठी या आयोगाने संकलित केलेली माहितीची व्यापकता खूप होती. यामध्ये जमीन सुधारणा, ग्रामीण अर्थव्यवस्थेची फेररचना, भूदान आंदोलन, पशूधन विकास, मत्स्यपालन, दुग्ध उत्पादन, मधमाश्यापालन, प्रौढ, साक्षरता, ग्रामीण कुटीर उद्योगांचा विकास, ग्रामीण भागातील निवास, आरोग्य, विद्यापीठीय शिक्षण, मागासवर्गीयांना सरकारी सेवेमधील प्रतिनिधीत्व, इत्यादी विचार केला गेला होता.[४]

या आयोगाने इतर मागासवर्गीयासाठी खूप व्यापक प्रमाणात सुधारणा सुचविल्या होत्या. इतर मागासवर्गीयांना सर्व तांत्रिक व व्यावसायिक, शैक्षणिक सस्थांमध्ये ७० टक्के जागा राखीव ठेवाव्यात. सरकारी व निमसरकारी नोकऱ्यांत प्रथम वर्गात २५ टक्के, द्वितीय वर्गात ३३ टक्के, तृतीय वर्गात आणि चतुर्थ वर्गात ४० टक्के किमान राखीव जागा ठेवाव्यात. या आयोगाने आपला अहवाल दिनांक ३० मे १९५५ साली राष्ट्रपतींना सादर केला.

कालेलकरांनी अहवाल सादर केल्यानंतर त्यांनी स्वतःच छेद देणाऱ्या ३० पानी पत्रात अहवालातील शिफारशींबाबत विरोधी मत नोंदविले, अहवालातील उद्देशानुसार अपेक्षा कालेलकर आयोगाने पूर्ण केलेल्या नसल्याने, संसदेने हा अहवाल फेटाळला.

**महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय आयोग :**

भाषावार प्रांतरचनेनुसार जुन्या मुंबई राज्याचे विभाजन होवून १९६० साली महाराष्ट्र राज्य उदयास आले. सरकारने नोव्हेंबर १९६१ साली 'बी.डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली 'मागासवर्गीय आयोग' नेमण्यात आला. या आयोगाने आपला अहवाल १९६४ साली राज्य सरकारकडे सादर केला. या मागासवर्गीयांना शैक्षणिक संस्था आणि सरकारी नोकऱ्यातील पदांकरिता राज्यातील त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्यात यावे अशी शिफारस केली होती. या आयोगाच्या शिफारशीवरून पहिल्या तीन वर्गांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार अनुसूचित जातींसाठी १३ टक्के, अनुसूचित जमातींसाठी ७ टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी ४ टक्के प्रतिनिधीत्व देण्याचे मान्य केले. परंतु, चौथ्या वर्गातील इतर मागासवर्गीयांना त्यांची लोकसंख्या ही ५२ टक्के असताना देखील त्यांना केवळ १० टक्के आरक्षणाची शिफारस केली होती.[५]

महाराष्ट्र सरकारने १९७९ सालापासून बी.डी. देशमुख आयोगाच्या आरक्षणाच्या शिफारशी स्वीकारून अंमलबजावणी केली. यामुळे या आरक्षण पध्दतीनुसार इतर मागासवर्गीयांना महाराष्ट्रात १० टक्के तरी आरक्षण मिळाले, काही कालावधीनंतर इतर मागासवर्गीयांना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण नाकारण्यासाठी आर्थिक निकषांच्या आधारावर सवलती देण्याचे धारेण शासनाने मान्य केले. मागासवर्गीयांच्या ३४ टक्के आरक्षणाखेरीज ४६ टक्के आरक्षण आर्थिक दुर्बलांसाठी जाहीर केले. यामध्ये सेवानिवृत्त सैनिकांसाठी १५ टक्के, अपंगांसाठी ३ टक्के व आर्थिक दुर्बलांसाठी २८ टक्के आरक्षण लागू करण्यात आले. त्यासाठी कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रू. ४०००/- पर्यंत ठेवण्यात आली.

महाराष्ट्र शासनाने, आर्थिक निकषांवर मोठ्या प्रमाणात आरक्षण ठेवल्याच्या निर्णयाविरूध्द १९८७ साली 'शिवाजीराव गरजे' यांनी उच्च न्यायालयात

आव्हान दिले. या प्रकरणात उच्च न्यायालयाने शासनाचे ४६ टक्के असणारे आरक्षण अवैध ठरवून राज्यातील इतर मागासवर्गीयांची लोकसंख्या विचारात घेवून, त्यांच्यासाठी १० टक्क्यांऐवजी ३१ टक्के आरक्षण ठेवण्याची शिफारसही केली होती.

**दुसरा मागासवर्गीय आयोग (मंडल आयोग) :**

२० डिसेंबर १९७८ रोजी बिदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या अध्यक्षतेखाली घटनेतील ३४० कलमास अनुसरून तत्कालीन पंतप्रधानांनी दुसरा केंद्रीय मागासवर्गीय आयोगाची नियुक्ती केली. देशातील सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय असलेले व ज्या मागासवर्गीयांना शासकीय नोकऱ्यात उचित प्रतिनिधीत्व प्राप्त झालेले नाही, त्यांचा शोध घेवून अशा मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी कोणकोणत्या उपाययोजना करता येतील, याचा अभ्यास करण्यासाठी हा आयोग नेमण्यात आला होता.

लोकशाहीत न्यायाच्या दृष्टीने प्रत्येक व्यक्तीला आणि समाज घटकालाही या देशाच्या सत्तेत वाटा मिळणे, हा न्याय हक्क आहे. या देशातील सुमारे ५२ टक्के जनतेचा असा हक्क कोणत्याही परिस्थितीत डावलला जात असेल, तर त्यात सुधारणा करण्याचे उपाय आयोगाने योजणे आवश्यक आहे. मंडल आयोगाने ज्या शिफारशी केल्या आहेत त्या केवळ तत्कालिक सुधारणा करण्यापुरत्या मर्यादित स्वरूपाच्या नसून, त्या व्यापक स्वरूपात समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेला चालना देणाऱ्या आहेत, मंडल आयोगाने सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण निश्चित करताना 'जात' हा घटक मानावा लागतो, असे सुचविले. इतर मागासलेले वर्ग निश्चित करताना जात हा प्राथमिक घटक धरणे बरोबर आहे, हे उच्च न्यायालयाने सुध्दा अनेक वेळा मान्य केले आहे आणि जात जर शैक्षणिक व सामाजिक मागासलेली असेल तर ती सपूर्ण 'जात' सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला 'वर्ग' म्हणून निश्चित करता येवू शकतो. त्या जातीतील ठराविक काही व्यक्ती सर्वसाधारण सरासरीच्या वरच्या पातळीत असल्या तरी त्या जातीसाठी आरक्षण ठेवणे योग्य आहे, असे आयोगाचे मत होते.[६] हा मूलभूत उद्देश मनात ठेवून त्याची रचना केली आहे. असे नमूद करून, त्यांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी खालील शिफारशी केल्या.

**मंडल आयोगाच्या शिफारशी**

मंडल आयोगाने इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी अनेक शिफारशी केल्या आहेत. यामध्ये शैक्षणिक शिफारशी, नोकरीमध्ये आरक्षणाच्या बाबतच्या शिफारशी आणि इतर महत्वाच्या शिफारशींचा समावेश होतो.[७]

**शैक्षणिक शिफारशी :**

१. फी-माफी, मोफत पुस्तके आणि कपडे, दुपारचे जेवण, विशेष वसतिगृहे आणि शिष्यवृत्ती अशा प्रकारच्या विविध सवलती राज्य सरकारे इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देत असले तरी त्या पुरेशा नाहीत. अशा विद्यार्थ्यांकरिता खरी आवश्यकता आहे, योग्य शैक्षणिक वातावरण तयार करून गांभीर्याने आणि उद्देशपूर्ण शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देण्यासाठी योजना बनविणे.

२. सांस्कृतक वातावरण सुधारणे ही अतिशय मंदगतीची प्रक्रिया आहे. अशा मुलांना उच्च सांस्कृतक वातावरणात वाढविणे देशाच्या आर्थिक आवाक्याबाहेरचे काम आहे.

**नोकरीतील आरक्षणासंबंधी शिफारशी**

१. केंद्र आणि राज्य सरकारांचे सार्वजनिक उद्योग आणि राष्ट्रीयकृत बँका यांनाही वरीलप्रमाणे राखीव जागांची पध्दती पूर्णांशाने लागू करावी.

२. सरकारकडून या ना त्या मार्गाने आर्थिक मदत मिळालेल्या सर्व खाजगी क्षेत्रातील उद्योगांनाही वरीलप्रमाणे राखीव जागांची पध्दत लागू करावी. सर्व विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्नीत महाविद्यालयांनाही राखीव जागांच्या योजनेत आणावे.

**मंडल आयोगाच्या इतर महत्वाच्या शिफारशी**

मंडल आयोगाच्या मते, शासकीय व निमशासकीय शैक्षणिक संस्थेत इतर मागासवर्गीयांसाठी २७ टक्के जागा राखीव ठेवून व सर्व प्रकारची आर्थिक, तांत्रिक मदत करून इतर मागासवर्गीयांना सामाजिक, आर्थिक व राजकीय गुलामगिरीतून सोडविण्याचा प्रयत्न करण्यात यावे, अशी शिफारस केली.[८]

१. सरकारी, निमसरकारी, शासकीय अनुदान घेणाऱ्या खाजगी संस्था, शिक्षण संस्था, इत्यादींमधील नोकऱ्यात इतर मागासवर्गीयांसाठी २७ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

२. जे उमदेवार गुणवत्तेच्या आधारे निवडण्यात येतील त्यांचा समावेश या आरक्षण कोट्यात करण्यात येवू नये.

३. पदोन्नतीसाठी वरीलप्रमाणे २७ टक्क आरक्षणाचे प्रमाण कायम ठेवण्यात यावे.

४. आरक्षणाच्या जागा शिल्लक राहिल्यास त्या आगामी तीन वर्षापर्यंत राखून ठेवण्यात याव्यात.

५. नोकरभरतीसाठी अनुसूचित जाती तसेच जमातींप्रमाणे वयाची अट शिथिल करण्यात यावी.

६. बदलीसाठी अनुसूचित जाती व जमातीसाठी जशी रोस्टर पध्दती सुरू आहे त्याचंप्रकारच्या पध्दती इतर मागासवर्गासाठी असावी.

७. इतर मागासवर्गीयांची संख्या अधिक प्रमाणात केंद्रीत असणाच्या विभागात प्रौढ शिक्षण वर्ग सुरू करण्यात यावेत तसेच या विभागात इतर मागासवर्गीय मुला मुलीसाठी निवासी शाळा सुरू करण्यात याव्यात.

८. केंद्राच्या व राज्याच्या तांत्रिक, औद्योगिक व वैज्ञानिक शिक्षण संस्थेत इतर मागासवर्गीयांसाठी' २७ टक्के आरक्षण असावे.

९. इतर मागासवर्गीयांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीसाठी केंद्र व राज्य सरकारने विकास मंडळे स्थापन करावीत.

१०. इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी वेगळे मंत्रालय किंवा स्वतंत्र खाते केंद्र व राज्य शासनाने निर्माण करावे.

तत्कालीन पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी ऑगस्ट, १९९० मध्ये मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे जाहिर केले. या शिफारशीपैकी फक्त ओबीसींसाठी २७ टक्के आरक्षण आणि जास्तीत जास्त ५० टक्के आरक्षणाची मर्यादा या मंडल आयोगाचा शिफारशीचा याने स्वीकार केला गेला. परंतु मंडल आयोगाने ३७४३ जातींची गणना मागासवर्गीयात केली होती. त्याऐवजी फक्त केंद्र सरकारच्या आणि राज्यसरकारच्या ओबीसी यादीमध्ये सामाईक असणाऱ्या मागासवर्गीय जातींचाच या आरक्षणासाठी विचार करण्यात आला. मंडल आयोग लागू करण्याचा निर्णय १९९० साली जाहीर केला. या निर्णयाच्या विरोधात इंद्रा साहनी व इतर ३० उच्च वर्णीयांनी कोर्टात याचिका दाखल केली. या खटल्याचा निकाल १९९२ साली लागला.

या निकालाव्दारे इतर मागासवर्गीयाना क्रिमिलेअरची अट लागू करण्यात आलेली आहे.[९]

क्रिमिलेअर म्हणजे उच्च उत्पन्न असणारा वर्ग होय. ज्या इतर मागासवर्गीय किंवा भटक्या जाती व जमाती कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न २ लाखांपेक्षा जास्त आहे. (सध्या ८ लाखापेक्षा जास्त आहे) त्यांना क्रिमिलेअर संबोधले गेले आहे. अशा कुटूंबाना ते इतर मागासवर्गीय जातीमधील असले तरी आरक्षणाचा लाभ मिळणार आहे, असे सांगितले गेले. न्यायालयाचा हा निर्णय भटक्या जाती जमाती व इतर मागासवर्गीयांचे आरक्षण डावलणाऱ्यांना हातभार लावणारा ठरला. विशेषतः वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्रात जाणारे इतर मागासवर्गीय विद्यार्थी हे विशेषतत्वाने आर्थिकदृष्ट्या सधन कुटूंबातून जात होते, त्यांना या नियमाने प्रतिबंध करण्यात आला आहे.[१०]

**मागास प्रवर्गाचे राजकीय आरक्षण**

१९९२ साली देशात मंडल आयोग लागू झाला. त्यानंतर १९९४ साली 'महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१' मध्येही दुरुस्ती करण्यात आली आणि कलम १२ (२) (सी) समाविष्ट करून इतर मागासवर्गीयांना २७ टक्के राजकीय आरक्षणाची तरतूद करण्यात आली. म्हणजेच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत २७ टक्के उमेदवार हे इतर मागासवर्गीयांमधून (OBC) असणं बंधनकारक करण्यात आलं.

SC/ST प्रवर्गाचं आरक्षण हे 'घटनात्मक' आहे, तर ओबीसींचं राजकीय आरक्षण हे राज्याच्या विधिमंडळानं दिलेलं 'वैधानिक' आरक्षण आहे, असं सुप्रीम कोर्टानं सांगितलं आहे. वैधानिक म्हणजे राज्याच्या कायदेमंडळानं कायद्याद्वारे तयार केलेलं आरक्षण होय.

२९ मे २०२१ रोजी सुप्रीम कोर्टाचा एक निकाल आला. यामध्ये सुप्रीम कोर्टानं वाशिम, भंडारा, अकोला, नागपूर आणि गोंदिया या पाच जिल्ह्यांमधील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी उमेदवारांचं आरक्षण रद्द केल्याचं म्हटलं. कलम १२(२) (सी) नुसार ओबीसींना २७ टक्के आरक्षणाची तरतूद तर आहे, पण पाच जिल्ह्यांमध्ये ओबीसींनी २७ टक्के आरक्षण दिल्याने आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा राखली जात नव्हती. यावर आक्षेप घेत विकास कृणराव गवळी यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती. या

याचिकेवर ४ मार्च २०२१ रोजी सुप्रीम कोर्टानं अंतिम निर्णय दिला. सुप्रीम कोर्टाच्या ४ मार्च २०२१ रोजीच्या या निर्णयाविरोधात महाराष्ट्र सरकारनं पुनर्विचार याचिका दाखल केली. मात्र, पुनर्विचार याचिकाही २९ मे २०२१ रोजी सुप्रीम कोर्टानं फेटाळली आणि ४ मार्च २०२१ रोजीचा निर्णय कायम ठेवत, ओबीसींचं महाराष्ट्रातलं अतिरिक्त राजकीय आरक्षण संपुष्टात आणलं. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आणि एससी/एसटींचे मिळून ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण देता येणार नाही, असं म्हणत सुप्रीम कोर्टानं ओबीसी उमेदवारांची निवडणूकच रद्द केली.

**मराठा समुदायांचे इतर मागासवर्गीय आरक्षण**

मराठा समाजाला कुणबी प्रवर्गातून ओबीसी आरक्षण देण्यासाठी सरकारने एक निर्णय (GR) जारी केला आहे. या निर्णयानुसार, मराठवाड्यातील मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र दिले जाऊ शकते, ज्यामुळे त्यांना इतर मागासवर्गीय (OBC) श्रेणीतील आरक्षणाचे लाभ मिळतील. याउलट, काही मूळ ओबीसी नेते आणि संघटनांचा असा आरोप आहे की, यामुळे ओबीसींचे आरक्षण धोक्यात येईल, कारण मराठा समाज ओबीसीत आल्यास आरक्षणाचा मोठा वाटा त्यांना मिळेल आणि लहान जातींना संधी कमी मिळेल असे वाटते.

**संदर्भ :**

१. फडके, य. दि. (१९८५). राखीव जागा : वस्तुस्थिती, पुणे महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान.
२. फडके, य. दि. (२००६). राखीव जागांचे शंभर वर्षे, पुणे सुगावा प्रकाशन.
३. देवरे, श्रावण. (२००८). मराठा समाजाचे ओबीसीकरण आणि जातीअंताचे धोरण, पुणे सुगावा प्रकाशन.
४. बुटे, नंदू. (२०१०). ओबीसी समाज समस्या व उपाय. पुणे जिजाई प्रकाशन.
५. देवरे, श्रावण. (२०१२). ओबीसींच्या संघर्ष वाटा, पुणे सुगावा प्रकाशन.
६. वाघमारे, वसंत. (२०१४). जातिव्यवस्था निर्मिती आणि स्वरूप, पुणे. सुगावा प्रकाशन.
७. कांबळे, उत्तम. (२०१५). ओबीसींचे राजकारण. मुंबई लोकवाङ्मय

गृह.
८. गायग्कवाड, प्रदीप. (२०१५). मागासवर्गीयांच्या विकास योजना, नागपूर संत प्रकाशन.
९. थोरात, सुखदेव. (२०१६). आरक्षण धोरणाबाबत गैरसमज कसे व का? पुणे सुगावा प्रकाशन.
१०. भणगे, रविंद्र. (२०१६). आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसीं आरक्षण, पुणे डायमंड पब्लिकेशन्स.

■■■

# भारतीय संघराज्याचे बदलते स्वरूप : आकलन आणि समीक्षा

❒ **डॉ. राहुल प्रकाश चुटे**
राज्यशास्त्र विभाग,
स्व. एन.पी.डब्लू. कला व विज्ञान महाविद्यालय मुरमाडी/तूप.

**प्रस्तावना :**

भारताचे संविधान देशाला Union of States म्हणून परिभाषित करते-ही संकल्पना भारतातील संघराज्याचे स्वरूप समजून घेण्याची गुरुकिल्ली आहे. भारतीय संघराज्यवाद हा पारंपरिक संघराज्याच्या नमुन्यांप्रमाणे दोन समकेंद्रित सत्ताकेंद्रांचा कठोर विभाग नसून, तो लवचिक, बहुआयामी आणि भारतीय सामाजिक-सांस्कृतिक विविधतेच्या अनुभवातून आकारलेला आहे. भारताच्या संघराज्याची रचना एकीकडे राज्यांना स्वायत्तता प्रदान करते, तर दुसरीकडे केंद्राला एकात्मिकता, सुरक्षा आणि राष्ट्रीय नियोजनाच्या गरजांमुळे प्रबळ स्थान देते. त्यामुळे भारतातील संघराज्यवाद हा संघीय-एकात्मिक (federal-unitary blend) असा द्वैतस्वभाव धारण करतो.

स्वातंत्र्यानंतरची परिस्थिती-राष्ट्रनिर्मितीची ऐतिहासिक गरज, भाषिक-प्रादेशिक वैविध्याचे सांभाळ, आर्थिक विकासाचे केंद्रीकृत नियोजन, तसेच राजकीय स्थैर्य यांसारख्या घटकांनी भारतीय संघराज्याची प्रारंभिक दिशा ठरवली. संविधान निर्मात्यांनी अमेरिकेसारखे अत्यंत स्वायत्त राज्यांचे संघराज्य स्वीकारण्याऐवजी, विविधतेत एकता राखणाऱ्या स्वायत्त राज्यांसह मजबूत केंद्र या मार्गाचा अवलंब केला. यामागे राष्ट्रीय अखंडतेच्या संदर्भात, विभाजनाच्या वेदनेनंतर पुन्हा विघटनाची भीती होती; तसेच आर्थिक असमानता कमी करण्यासाठी केंद्राचा समन्वयकारी भुमिका आवश्यक मानली गेली.

परंतु भारतीय संघराज्याचे स्वरूप स्थिर नाही-ते राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि न्यायालयीन प्रक्रियांच्या परस्परसंबंधातून सतत बदलत राहते. एका काळात केंद्रात्मकता अधिक प्रबळ दिसते, तर दुसऱ्या काळात

राज्ये अधिक प्रभावी ठरतात. काँग्रेसच्या दीर्घकालीन वर्चस्वाच्या काळात केंद्राकडे अधिकार केंद्रीत राहिले, तर आघाडी सरकारांच्या युगात प्रादेशिक पक्षांची ताकद वाढल्याने संघराज्य अधिक सहकार्यात्मक दिसू लागले. २०१४ नंतरच्या काळात 'सहकार्यात्मक संघराज्यवाद' घोषणांद्वारे केंद्र-राज्य सहयोगाला महत्त्व देण्यात आले, तरी वित्तीय आणि प्रशासकीय केंद्राभिमुखतेमुळे संघराज्याच्या संतुलनावर नव्या प्रश्नांची मालिका उभी राहिली.

यामुळे भारतीय संघराज्याचे स्वरूप हे केवळ संविधानिक तरतुदींनी ठरत नाही; ते राजकीय सत्ता-समीकरणे, केंद्र-राज्य संबंधातील ताण-सामंजस्य, न्यायालयीन व्याख्या, आर्थिक धोरणे, तसेच केंद्र आणि राज्य सरकारांच्या कार्यकाळातील विविध कृतींमधून सतत घडत राहते. भारतातील संघराज्यवादाचे बदलते स्वरूप हे या सर्व घटकांचे प्रतिबिंब आहे. कधी मजबूत केंद्राची गरज अधोरेखित करणारे, तर कधी राज्यांच्या स्वायत्ततेचे महत्त्व दर्शविणारे.

या बदलांचा अभ्यास केल्यास भारतीय संघराज्याच्या स्वरूपात संघीयतेपासून केंद्रीकरणाकडे आणि पुन्हा विकेंद्रीकरणाकडे होत गेलेल्या प्रवासाचे दर्शन घडते.

**भारतीय संघराज्याचे स्वरूप**

भारतीय संघराज्य हे पारंपरिक अमेरिकन किंवा ऑस्ट्रेलियन संघराज्यापेक्षा वेगळे आहे. संविधान निर्मात्यांनी संघराज्याची संकल्पना स्वीकारताना भारतीय वास्तव आणि विविधता लक्षात घेतली. भारतीय लोकशाही व्यवस्थेत संघराज्यवाद हा केवळ एक प्रशासकीय ढाचा नसून तो भारताच्या भू-सांस्कृतिक विविधतेला सुसंगत ठरलेला राजकीय तत्त्वज्ञानाचा पाया आहे. भारतीय राज्यघटनेने देशाला Union of States अशी संज्ञा दिली आहे. या संज्ञेमध्ये भारतीय संघराज्याकडे पाहण्याचा मूलभूत दृष्टिकोन अंतर्भूत आहे. भारत हे केवळ राज्यांचे संघटन नसून, एक अविभाज्य राजकीय एकक आहे ज्यात केंद्र व राज्ये परस्परावलंबी आहेत.

भारतीय राज्यघटना स्वीकारत असलेल्या संघराज्याची रचना ही आधुनिक राज्यशास्त्रीय दृष्टिकोनातून एक अद्वितीय आणि बहुपरिमितीय प्रयोग मानला जातो. संघराज्याचा मूलभूत सिद्धांत म्हणजे दोन पातळ्यांवरील सत्तावाटप-केंद्र आणि राज्ये परंतु भारतातील संघराज्यता पारंपरिक अमेरिकन मॉडेलपेक्षा

भिन्न आहे. भारताची संघरचना ही संघात्मक परंतु केंद्राभिमुख (Centralised Federation) स्वरूपाची आहे. कारण संविधानाने संघाला मजबूत आणि अधिक अधिकारयुक्त स्थान दिले आहे; तथापि, राज्यांनाही स्वायत्ततेची, स्थानिक गरजांनुसार धोरणात्मक निर्णय घेण्याची मोठी संधी दिली आहे. त्यामुळे भारतीय संघराज्य हे Quasi-Federal (अर्ध-संघराज्य) किंवा संयुक्त संघराज्य म्हणून ओळखले जाते.

भारतीय संघराज्याचे स्वरूप समजून घेण्यासाठी राज्यघटनेतील सत्तावाटपाचे तत्त्वज्ञान, राज्ये व केंद्राचे परस्परसंबंध, वित्तीय संघराज्य, प्रशासकीय नियंत्रण, न्यायालयीन मध्यस्थीची भूमिका, तसेच राजकीय पक्षप्रणालीचा प्रत्यक्ष परिणाम या सर्वांचा एकत्रित अभ्यास आवश्यक ठरतो. संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील विषयसूची ही संघराज्याच्या मूलरचनेचा केंद्रबिंदू आहे. यामध्ये केंद्रसूची, राज्यसूची आणि समवर्ती सूची यांद्वारे अधिकारांचे वाटप केले आहे. विशेषतः समवर्ती सूचीमुळे सहकार्यात्मक संघराज्याला चालना मिळते.

तसेच राष्ट्राची भौगोलिक, भाषिक, सांस्कृतिक विविधता आणि प्रादेशिक अपेक्षा यामुळे केंद्र व राज्यांमधील परस्परावलंबित्व अनिवार्य बनते. संघराज्य हे संघर्षाचे नव्हे तर सहकार्याचे तत्त्व आहे, हे भारतीय संघराज्याने गेल्या सात दशकांत सिद्ध केले आहे. आर्थिक उदारीकरणानंतर वित्तीय अधिकारवाटप, संविधानिक संस्थांची भूमिका, जीएसटी परिषद, केंद्रीय अनुदानांची रचना, निवडणूक-राजकारणातील बदल आणि प्रादेशिक पक्षांचे वाढते प्रभाव यांमुळे भारतीय संघराज्य अधिक गतिमान स्वरूप धारण करत आहे. आर्थिक उदारीकरणानंतर केंद्र-राज्य संबंध अधिक बहुआयामी झाले आहेत.

त्यामुळे भारतीय संघराज्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दिसून येतात.

**१. संविधानिक विभाजन :** केंद्र आणि राज्यांमधील अधिकारांचे विभाजन तीन याद्यांद्वारे - संघ, राज्य आणि समवर्ती याद्या करण्यात आले आहे.

**२. बलवान केंद्र :** आपत्कालीन तरतुदी (कलम ३५२ ते ३६०), राज्यपालांची नियुक्ती, राष्ट्रपती राजवट आणि वित्तीय अधिकार यांमुळे

केंद्राला वर्चस्व प्राप्त आहे.

**३. स्वायत्ततेचा तडजोडीचा प्रकार :** राज्यांना काही प्रमाणात स्वायत्तता दिली असली, तरी त्यावर केंद्राचे नियंत्रण आहे.

**४. संविधानाचे सर्वोच्चत्व :** राज्यघटना हे सर्वोच्च आहे; केंद्र किंवा राज्य कोणत्याही स्तरावरचे कायदे त्याच्या विरोधात जाऊ शकत नाहीत.

**५. एकात्मिक वैशिष्ट्यांसह संघराज्य :** भारतीय संघराज्याला Quasi-Federal म्हणजेच अर्ध-संघराज्य म्हणणे योग्य ठरते.

**काँग्रेसच्या कार्यकाळातील भारतीय संघराज्याचे स्वरूप**

भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही दशकांत भारतीय राजकीय व्यवस्था काँग्रेस पक्षाच्या प्रमुख नेतृत्वाखाली आकार घेत होती. ही प्रारंभीची वर्षे संघराज्यात्मक संरचनेच्या व्याख्या, प्रयोग आणि विस्ताराची निर्णायक अवस्था होती. भारताचे संविधान Union of States असा उल्लेख करते (Art. 1), ज्यामध्ये संघीय व एकात्मिक तत्त्वांचा मिश्रण आहे. या मिश्र संरचनेची व्यावहारिक अंमलबजावणी मोठ्या प्रमाणात केंद्रातील शासनपद्धती, पक्षव्यवस्था आणि राष्ट्रीय नेतृत्वावर अवलंबून होती. काँग्रेसच्या दीर्घकाळाच्या सत्ताकाळात भारतीय संघराज्याचे कार्यरूप केंद्राभिमुख, परंतु राज्यांच्या विकासासाठी सहकारात्मक (Co-operative) अशा दोन्ही दिशांनी विकसित झाले.

**१. एकात्मिक संघराज्याचा पाया :**

स्वातंत्र्यानंतर भारतात राष्ट्रीय एकात्मता टिकवण्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा होता. प्रांतिक भाषा, विविधता, प्रांतांची ऐतिहासिक ओळख आणि विभाजनानंतरची अस्थिरता लक्षात घेता, काँग्रेस नेतृत्वाने केंद्र बळकट ठेवण्याची धोरणात्मक भूमिका घेतली. संविधान निर्मितीच्या (१९४६-४९) काळात नेहरू-पटेल-आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली केंद्राकडे व्यापक अधिकारांची मांडणी करण्यात आली. ग्रॅनव्हिल ऑस्टिन यांच्या मते, भारतीय संविधानाने एकता टिकवून ठेवण्यासाठी मजबूत केंद्रीकरण प्रवृत्ती असलेले संघराज्य निर्माण केले.

**२. देशी संस्थानांचे विलीनीकरण :**

काँग्रेसच्या प्रारंभीच्या दशकांत सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे देशी संस्थानांचे

विलिनीकरण. सरदार पटेल आणि वी.पी. मेनन यांनी ५६५ संस्थानांचे भारतात एकत्रीकरण केले. हे संपूर्णपणे केंद्राभिमुख क्रियाशील संघराज्याचे उदाहरण होते. डी.डी. बसू म्हणतात, केंद्रीय एकत्रिकरणातील पहिले आणि सर्वात निर्णायक पाऊल म्हणजे संस्थानांचे एकत्रीकरण.

३. १९५०-७० : **एकपक्षीय वर्चस्व आणि संघराज्याचा केंद्राभिमुख स्वरूप :**

१९५२ ते १९७७ या काळात राष्ट्रीय व राज्यस्तरावर काँग्रेसचे स्पष्ट बहुमत होते. एकपक्षीय वर्चस्वामुळे केंद्र-राज्य संबंधांना सहमती-आधारित सहकार (cooperative federalism) मिळाले, कारण केंद्र आणि राज्यांमध्ये समान पक्ष शासनात असल्याने संघर्ष कमी होते. बळवीर अरोरा यांचे मत आहे कि, एकपक्षीय वर्चस्वामुळे संघराज्याचे अर्ध-एकात्मक कामकाज वाढले, जिथे राजकीय सहमतीने घटनात्मक निर्बंधांनी जागा घेतली. यासंबंधित महत्त्वपूर्ण पैलूंचा अभ्यास करता येईल.

**(अ) नियोजन आयोगाचे केंद्रीकृत नियोजन**

१९५० मध्ये स्थापन केलेल्या नियोजन आयोगाने आर्थिक नियोजनातील केंद्राचे वर्चस्व मजबूत केले. राज्यांना अनुदान, योजना, निधी हे केंद्रावर अवलंबून होते. त्यामुळे आर्थिक संघराज्यवादात केंद्राचा प्रभाव स्पष्ट झाला. राव आणि सिंग यांच्या मतानुसार- केंद्रीय नियोजनामुळे केंद्र सरकारचा आर्थिक फायदा वाढला, ज्यामुळे आर्थिक संघराज्यवाद पूर्णपणे संघ-केंद्रित झाला.

**(ब) राष्ट्रीय सुरक्षा आणि अंतर्गत स्थैर्य**

१९६२, १९६५ आणि १९७१ च्या युद्धकाळात केंद्रसरकारने राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली केंद्राधिकार वाढवले. राज्य पोलिसांच्या तुलनेत केंद्रीय दलांची भूमिका वाढली. ऑस्टिन यांनी नमूद केले आहे की राष्ट्रीय संकटाच्या काळात अपवादात्मक केंद्रीय हस्तक्षेपाचे समर्थन केले गेले.

**(क) आपत्कालीन तरतुदींचा वापर**

१९६०-७० च्या दशकात Article 356 (Presidents Rule) चा वारंवार वापर झाला. काही प्रकरणांत तो राजकीय हेतूसाठी वापरल्याच्या टीका झाल्या. व्हेअर भारताला quasi-federal ©हणताना केंद्राधिकारांच्या

आपत्कालीन स्वरूपाचा उल्लेख करतात.

**४. भाषावार राज्यांचे पुनर्गठन** (१९५६)

States Reorganisation Act, १९५६ हे भारतीय संघराज्यवादाचे ऐतिहासिक पाऊल. भाषा आणि सांस्कृतिक ओळख जपूनही देशाची एकात्मता टिकविण्यासाठी केंद्राने विस्तृत अभ्यास व समितीची रचना केली. ऑस्टिन यांच्या मते, एकतेशी तडजोड न करता विविधतेला सामावून घेऊन पुनर्रचनेमुळे संघराज्यवाद मजबूत झाला.

**५. काँग्रेस व राज्यांचे शासन : सहकारात्मक संघराज्यवाद**

विविध राजकीय, आर्थिक योजनांमधून केंद्र-राज्यांमध्ये सहकार्य वाढले. यामध्ये मुख्य क्षेत्रे : Five-Year Plans, Green Revolution (केंद्र-राज्य समन्वयामुळे यशस्वी), Education Public Health Policy, Central Schemes Special Assistance इत्यादी. सहकारी संघराज्यवाद हा काँग्रेसच्या वर्चस्वाचा आणि विविध स्तरांवर गुंतलेल्या राजकीय नेतृत्वाचा नैसर्गिक परिणाम होता.

**६. १९७५-७७ आपत्कालीन कालखंड : संघराज्याची केंद्रीकरणाकडे झुकलेली दिशा**

इंदिरा गांधी युगातील Emergency (१९७५-१९७७) हे काँग्रेसच्या काळातील संघराज्यवादातील सर्वात वादग्रस्त पान आहे. या काळात केंद्राने राज्यांवरील नियंत्रण वाढवले, Article ३५२, ३५६ वारंवार वापरले, प्रसारमाध्यमे, न्यायव्यवस्था व प्रशासकीय नियंत्रण केंद्रित झाले. डी.डी. बसू यांनी लिहिले आहे की या काळात भारतीय संघराज्याचे सर्वात एकात्मक कार्य प्रतिबिंबित झाले.

**७. १९८०-९० प्रादेशिक पक्षांचा उदय आणि बदलती संघराज्यात्मक समीकरणे**

१९८० नंतर प्रादेशिक पक्षांनी राजकीय क्षेत्र व्यापू लागले-DMK, AIADMK, TDP, अकाली दल, शिवसेना, AGP (आसाम गण परिषद) इत्यादी. यामुळे राज्यांच्या मागण्या केंद्रापर्यंत ठळकपणे पोहोचू लागल्या, निधी-वाटप व राजकीय प्रतिनिधित्वात बदल, आंतरराज्य परिषद (Inter-State Council) सक्रिय करण्याची गरज जाणवली (श्रीकृष्ण आयोग). सिंग

आणि राव यांच्या मते प्रादेशिक पक्षांच्या उदयामुळे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील केंद्राला संघराज्यीय संबंधांना दिशा देण्याऐवजी वाटाघाटी करण्यास भाग पाडले.

काँग्रेसच्या सत्ताकाळात भारतीय संघराज्यवादाने केंद्राभिमुख परंतु सहकारात्मक स्वरूप धारण केले. सुरुवातीच्या दशकात राष्ट्रीय एकात्मता, संस्थानांचे विलिनीकरण, भाषा-आधारित पुनर्गठन, आर्थिक नियोजन यांनी केंद्राची भूमिका बळकट ठेवली. Emergency सारख्या घटनांमुळे संघराज्यात्मक संतुलन ढळले, परंतु त्याच कालावधीत भाषिक विविधतेचे मान्यीकरण, पंचवार्षिक योजना, हरित क्रांती, विकास, राज्यातील सहकार यामुळे संघराज्याचा सहकार्यात्मक पाया मजबूत झाला.

**भाजपाच्या कार्यकाळातील भारतीय संघराज्याचे स्वरूप**

भारतीय संघराज्यवादाचा इतिहास सतत बदलत्या राजकीय परिस्थितींशी जोडलेला आहे. १९९० नंतरच्या गठबंधन युगात प्रादेशिक पक्षांची भूमिका महत्त्वाची होती, परंतु २०१४ नंतर भाजपाच्या नेतृत्वाखाली केंद्रात स्पष्ट बहुमताची पुनर्स्थापना घडली. यामुळे केंद्र-राज्य संबंधांच्या स्वरूपात नवे प्रवाह दिसून आले. संघराज्यवादाचे केंद्राभिमुख, सहकारात्मक व कधी-कधी संघर्षात्मक असे मिश्र स्वरूप भाजपाच्या कार्यकाळात पुढे आले. संविधानाने भारताला Union of States म्हटले असले तरी त्याची व्यावहारिक अंमलबजावणी राजकीय पक्षरचना, केंद्रातील नेतृत्वाची भूमिका, धोरणप्रक्रिया आणि आर्थिक वाटप यांवर अवलंबून राहते. भाजपाच्या कारकिर्दीत या चारही आयामांमध्ये लक्षणीय परिवर्तन दिसून आले.

**१. बहुमताधारित केंद्रीकरण : राजकीय संघराज्यवादाची नवी दिशा**

२०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर भारत एकपक्षीय केंद्रशासनाकडे परतला. १९९०-२०१४ या काळातील युती संघराज्यवाद मध्ये केंद्र-राज्यांचे संबंध अधिक संवादाधारित होते; परंतु बहुमत मिळाल्यामुळे केंद्राने नीतिनिर्मितीमध्ये निर्णायक नेतृत्व घेतले. राजकीय विश्लेषक अरोरा लिहितात, केंद्रातील बहुसंख्य सरकारे संघीय बाबींमध्ये अधिक मजबूत अधिकार वापरतात, ज्यामुळे राज्यांची वाटाघाटीची शक्ती कमी होते.

भाजपाच्या सत्ताकाळात अनेक राज्यांमध्येही त्याच पक्षाचे सरकार असल्याने केंद्र-राज्यांचे राजकीय संबंध अधिक केंद्रीकृत आणि सुसंगत दिसले. मात्र ज्या राज्यांत प्रादेशिक पक्ष सत्तेत होते, तिथे संघर्षात्मक परिस्थिती निर्माण झाल्याची नोंद राजकीय अभ्यासकांनी घेतली आहे.

**२. सहकारात्मक संघराज्यवादाचा दावा आणि GST नंतरचे वास्तव**

**(अ) GST ची अंमलबजावणी** (२०१७)

GST हा भारताच्या आर्थिक संघराज्यवादातील सर्वात मोठा बदल मानला जातो. GST Council मध्ये केंद्र व सर्व राज्यांचे प्रतिनिधी निर्णयप्रक्रियेत सहभागी असतात. हे संघराज्यवादातील सहकार्याचे उदाहरण असले तरी करनिर्णयातील अंतिम नियंत्रण केंद्राकडे अधिक असल्याची टीका झाली. राव आणि सिंग यांचे विश्लेषण असे सूचित करते की, उग्ग संरचनात्मकदृष्ट्या सहकारी संघराज्यवादाचे प्रतिनिधित्व करते, परंतु त्याचे व्यावहारिक कार्य केंद्रीय राजकोषीय लाभ वाढवते.

**(ब) उग्ग क्षतिपूर्तीचा प्रश्न** (२०२०-२२)

राज्यांनी महसूल भरपाईबाबत केलेल्या मागण्या, निधी मिळण्यात झालेला विलंब व केंद्र-राज्यांतील तणाव यामुळे आर्थिक संघराज्यवादात संघर्षाचे घटक दिसून आले.

**३. प्रशासकीय संघराज्यवादातील बदल : नीती आयोग आणि केंद्रीकृत धोरणनियोजन**

नियोजन आयोग रद्द करून निती आयोग (२०१५) स्थापन करण्यात आले. या संस्थेचे उद्दिष्ट सहकारावर आधारित धोरणनिर्मिती असे असले तरी महत्त्वाच्या धोरणांबाबत केंद्राचे प्राबल्य वाढल्याचे अभ्यासकांचे मत आहे. ऑस्टिन म्हणतात, केंद्रीय संस्थांनी ऐतिहासिकदृष्ट्या घटनात्मक मजकुरांपेक्षा संघराज्यीय संतुलनाला अधिक खोलवर आकार दिला आहे. निती आयोगकडे राज्यांवरील आर्थिक नियंत्रण नियोजन आयोग इतके औपचारिक नसले तरी केंद्रप्रेरित योजनांमधून त्याचा प्रभाव लक्षणीय राहतो.

**४. विधायी केंद्रीकरण : काही महत्वाच्या कायद्यांमधून दिसणारा प्रवाह**

भाजपाच्या सत्ताकाळात काही महत्त्वाचे केंद्रीय कायदे करण्यात आले, ज्यामुळे संघराज्याच्या संरचनेबाबत राज्यांनी प्रश्न उपस्थित केले.

**(अ) कृषी कायदे** (२०२०)

कृषी हा राज्य विषय असला तरी केंद्राने कृषी विपणनविषयक कायदे केले. अनेक राज्यांनी हे अधिकारक्षेत्राच्या अतिक्रमणाचे उदाहरण मानले. नंतर हे कायदे मागे घेण्यात आले.

**(ब) नागरिकत्व दुरुस्ती कायदा (CAA)**

काही राज्यांनी या कायद्याची अंमलबजावणी न करण्याचे राजकीय निवेदन केले, यामुळे राजकीय संघराज्यवादात संघर्षाची स्थिती दिसली.

**(क) जम्मू-कश्मीरचे पुनर्गठन** (२०१९)

कलम ३७० रद्द करून राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशात विभाजन करण्यात आले. केंद्राने संविधानातील तरतुदींनुसार ही प्रक्रिया केली, परंतु हा निर्णय भारतीय संघराज्यवादातील एक ऐतिहासिक केंद्रीकरणाचा टप्पा मानला जातो. बासू लिहितात, कलम ३ अंतर्गत संघटन पुनर्रचना शक्ती ही संविधानातील सर्वात मजबूत केंद्रीकरण तरतुदींपैकी एक आहे.

**५. वित्त आयोग, कर-वाटप आणि विशेष निधी : आर्थिक संघराज्यवादाचे रूपांतर**

१५व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनंतर काही दक्षिणेकडील राज्यांनी कर-वाटप सूत्रांबाबत आक्षेप नोंदवले. जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यांना जास्त निधी आणि कार्यक्षम राज्यांना तुलनेने कमी वाटा मिळत असल्याचा मुद्दा पुढे आला.

**६. कायद्याची अंमलबजावणी संस्था आणि राज्ये : सहकार्य आणि तणाव**

केंद्राच्या CBI, ED, NIA सारख्या संस्थांच्या कार्यपद्धतीबाबत काही राज्यांनी अतिक्रमणाची टीका केली. अनेक राज्यांनी CBI ला general consent मागे घेण्याचा निर्णय घेतला. यातून प्रशासनिक आणि कायदेशीर संघराज्यवादातील ताण स्पष्ट होतो.

**७. प्रादेशिक राजकारणाचे नवे स्वरूप : केंद्रीय पक्ष व राज्य पक्षातील संबंध**

भाजपाच्या सत्ताकाळात अनेक राज्यांत प्रादेशिक पक्ष सत्तेत असल्याने संवाद, संघर्ष आणि सहकार या सर्व प्रवृत्ती एकत्र दिसल्या. भारतातील

राजकीय संघराज्यवाद केंद्र आणि राज्य पातळीवर पक्षाच्या स्थानानुसार सहकार्य आणि संघर्ष यांच्यात बदलतो.

भाजपाच्या कार्यकाळात भारतीय संघराज्याचे स्वरूप पुढील वैशिष्ट्यांसह विकसित झाले. बहुमताधारित केंद्रीकरणामुळे धोरणनियोजन आणि कायदे प्रक्रियेमध्ये केंद्राचे प्राबल्य वाढले. निती आयोग, GST परिषद सारख्या यंत्रणा सहकार वाढवतात, परंतु केंद्र-राज्य आर्थिक मतभेद, कायदे व अधिकारक्षेत्रावरील वाद संघर्ष निर्माण करतात. उग्ग, वित्त आयोग, केंद्रीय निधीवाटपामुळे राज्यांची आर्थिक स्वायत्तता तुलनेने मर्यादित होत असल्याची टीका वाढली. जम्मू-कश्मीरचे पुनर्गठन, राष्ट्रीय सुरक्षा कायदे, आणि केंद्रीय तपास संस्थांची भूमिका वाढली.

एकूणच, भाजपाच्या शासनकाळात भारतीय संघराज्यवादाने केंद्राभिमुख-सहकारात्मक-संघर्षात्मक असे त्रिस्तरीय मिश्र स्वरूप ग्रहण केले. हे स्वरूप भारतीय संघराज्याच्या गतिमान व परिवर्तनशील स्वभावाचे दर्शन घडवते.

**संघराज्याच्या बदलत्या स्वरूपाची समीक्षा :**

भारतीय संघराज्याचा प्रवास हा स्थिर नसून सतत बदलता आहे. खालील मुद्द्यांमधून त्या बदलांचा मागोवा घेता येतो:

**राजकीय संघराज्य :** प्रादेशिक पक्षांच्या उदयामुळे संघराज्य अधिक बहुरंगी झाले, पण अलीकडे पुन्हा एकमुख केंद्रीकरणाचा प्रवाह दिसतो.

**आर्थिक संघराज्य :** १४ वा व १५ वा वित्त आयोग, GST, आणि केंद्राच्या अनुदान धोरणांमुळे राज्यांची वित्तीय स्थिती केंद्रावर अवलंबून राहिली आहे.

संविधानिक संघराज्यः सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये (Gtå. SR Bommai vs Union of India, 1994) संघराज्याच्या आत्म्याचे संरक्षण केले.

**प्रशासकीय संघराज्य :** नीती आयोग आणि अंतराज्य परिषदांद्वारे संवादात्मक प्रशासनाची गरज अधोरेखित झाली आहे.

**निष्कर्ष :**

भारतीय संघराज्य हे स्थिर स्वरूप नसून एक गतिशील प्रक्रिया आहे. काळ, परिस्थिती, आणि राजकीय नेतृत्वानुसार त्याचे स्वरूप बदलत गेले

आहे. काँग्रेसच्या काळात संघराज्याचा पाया मजबूत झाला, पण केंद्रीकरण वाढले. भाजपा नेतृत्वाखाली सहकार्यात्मक संघराज्याची संकल्पना पुढे आली, मात्र त्यातही राजकीय आणि आर्थिक केंद्रीकरणाचे नवे प्रकार दिसतात. आजच्या काळात संघराज्याचे यश हे केवळ संविधानिक तरतुदींवर नव्हे, तर राजकीय परिपक्वता, परस्पर विश्वास आणि संवादाच्या संस्कृतीवर अवलंबून आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**


१. व्हेअर, के.सी., (१९६३). संघराज्य शासन. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. पृ.. २७-३६..

२. ऑस्टिन, ग्रॅनविले. (१९९९). भारतीय संविधानः राष्ट्राचा आधारस्तंभ. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. पृ. १८६-२१०.

3. Rao, M. Govinda Singh, Nirvikar. (2005). The Political Economy of Federalism in India. Oxford University Press. pp. 10-15.

४. ऑस्टिन, ग्रॅनविले. (१९९९). भारतीय संविधानः राष्ट्राचा आधारस्तंभ. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. पृ. १८६-१८८.

५. बसू, डी.डी., (२०१५). भारतीय संविधानाचा परिचय. प्रेंटिस हॉल. पृ. १३५-१३८.

६. अरोरा, बलवीर. (१९९५). भारतीय संघराज्य. कोणार्क पब्लिशर्स. पृ. २२-२४.

7. Rao, M. Govinda Singh, Nirvikar. (2005). Political Economy of Federalism in India. Oxford University Press. pp. 88-95.

8. Austin, Granville. (2003). Working a Democratic Constitution. Oxford University Press. pp. 215-218.

९. ऑस्टिन, ग्रॅनविले. (१९९९). भारतीय संविधानः राष्ट्राचा आधारस्तंभ. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. पृ. २७२-२८०.

१०. फडिया, बी.एल. (२०१४). भारतीय सरकार आणि राजकारण. साहित्य भवन. पृ. ३५१-३६०.

११. बसू, डी.डी., (२०१५). भारतीय संविधानाचा परिचय. प्रेंटिस हॉल. पृ. १४५-१५०.

12. Rao, M. Govinda Singh, Nirvikar. (2005). The Political

Economy of Federalism in India. Oxford University Press. pp. 112-115.
१३. अरोरा, बलवीर. (१९९५). भारतीय संघराज्य. कोणार्क पब्लिशर्स. पृ. २२-२४.
14. Rao, M. Govinda  Singh, Nirvikar. (2005). Political Economy of Federalism in India. Oxford University Press. pp. 112-114.
15. Austin, Granville. (2003). Working a Democratic Constitution. Oxford University Press. pp. 215-218.
१६. बसू, डी.डी., (२०१५). भारतीय संविधानाचा परिचय. प्रेंटिस हॉल. पृ. १४५-१४८.
१७. फडिया, बी.एल., (२०१४). भारतीय शासन आणि राजकारण. साहित्य भवन, पृष्ठे. पृ. ३५१-३६०.

■■■

# पर्यावरणीय मानवी हक्क आणि भारतीय संविधान : अनुच्छेद २१ चे पर्यावरणीय न्यायाकडे रूपांतर

❒ **प्रा. किशोर एन. नैताम**
राज्यशास्त्र विभाग
रा.तु.म.नागपूर विद्यापीठ, नागपूर

**सारांश :**

भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ जीवनाच्या अधिकाराची व्यापक व्याख्या करताना पर्यावरणाच्या गुणवत्तेला अनिवार्य घटक मानतो. गेल्या काही दशकांत सर्वोच्च न्यायालयाने आपल्या न्यायिक सक्रियतेतून 'जीवनाचा अधिकार' हा फक्त अस्तित्वाचा अधिकार नसून आरोग्यदायी, स्वच्छ आणि सुरक्षित पर्यावरणाचा अधिकार आहे, असे अधोरेखित केले आहे. पर्यावरणीय मानवी हक्कांची संकल्पना आंतरराष्ट्रीय स्तरावर विकसित होत असताना भारतातील न्यायालयीन निर्णयांनी पर्यावरणीय न्याय ही लोकशाहीच्या मूल्यांची आणि मानवी प्रतिष्ठेची मूलभूत अट बनवली आहे. वेगाने वाढणारे शहरीकरण, औद्योगिक प्रदूषण, हवामान बदल, जैवविविधतेचे ऱ्हास, आदिवासी व उपेक्षित समुदायांवरील पर्यावरणीय अन्याय यामुळे अनुच्छेद २१ चे पर्यावरणीय न्यायाकडे रूपांतर समजून घेण्याची आवश्यकता वाढली आहे. या संशोधन लेखात संविधानिक तरतुदी, पर्यावरणीय न्यायशास्त्र, न्यायालयीन सक्रियता, तसेच पर्यावरणीय मानवाधिकारांच्या सध्याच्या आव्हानांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**विषय प्रवेश :**

जगण्याच्या प्रत्येक श्वासात निसर्गाचे स्पंदन,
त्याच्याविना अपूर्ण प्रत्येक मानवी स्वप्न;
म्हणूनच न्यायालये म्हणती-पर्यावरण म्हणजे जीवन,
अनुच्छेद २१ ठरतो निसर्ग-मानव नात्याचा शाश्वत बंदन.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात मानवी हक्कांची व्याप्ती केवळ

नागरी व राजकीय हक्कांपुरती मर्यादित राहिलेली नाही.तर सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय हक्क हे आधुनिक मानवी हक्कांच्या चर्चेचे केंद्रबिंदू झाले आहेत. पर्यावरणाचे संरक्षण, स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी, सुरक्षित निवारा, जैवविविधतेचे संवर्धन हे सर्व मानवी प्रतिष्ठेचे मूलभूत घटक म्हणून स्वीकारले जात आहेत. मानवाचे अस्तित्व निसर्गाशी अभिन्नरित्या जोडलेले असून पर्यावरणाचा ऱ्हास हा मानवी आरोग्य, उपजीविका, अन्नसुरक्षा आणि सामाजिक न्यायाला थेट धोका निर्माण करतो. स्वच्छ व आरोग्यदायी पर्यावरणाशिवाय मानवी जीवनाची गुणवत्ता, स्वातंत्र्य आणि संभाव्यता यांचा पूर्ण विकास अशक्य आहे. त्यामुळे पर्यावरण हा केवळ एक संसाधन नसून मानवी प्रतिष्ठेचा पाया आहे.

भारतामध्ये औद्योगिकीकरण, नागरीकरण, वनक्षय, जलप्रदूषण, हवेतील वाढते प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापनातील त्रुटी, नदीपात्रांचे अतिक्रमण आणि हवामान बदलाचे तीव्र परिणाम यामुळे पर्यावरणीय संकट तीव्र होत आहे. विशेषतः उपेक्षित व आदिवासी समाजांवर पर्यावरणीय अन्यायाचे दुष्परिणाम अधिक प्रमाणात पडतात. अशा पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे संरक्षण हे विकास धोरणाचा केवळ पूरक भाग नसून न्यायव्यवस्थेचे केंद्रस्थान बनले आहे.

भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ हा जीवन आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार सुनिश्चित करतो. सर्वोच्च न्यायालयाने सुभाष कुमार विरुद्ध बिहार राज्य (१९९१) खटल्यांच्या निकाला मध्ये स्वच्छ पाण्याचा आणि प्रदूषणमुक्त पर्यावरणाचा अधिकार हा जीवनाच्या अधिकाराचा भाग असल्याचे निरीक्षण नोदवले. तर १९८७ ला एम.सी. मेहता विरुद्ध भारतीय संघ खटल्यात पर्यावरण संरक्षणासाठी सक्रिय न्यायिक हस्तक्षेप व पर्यावरणीय न्यायालय स्थापना संदर्भात निर्देश दिले. त्यानंतरच्या वेल्लोर सिटिझन्स वेलफेअर फोरम वि. युनियन ऑफ इंडिया (१९९६) 'शाश्वत विकास' हे भारतीय पर्यावरणीय न्यायशास्त्राचे तत्त्व म्हणून मान्य केलेले दिसून येतो. या सर्व निर्णयांनी अनुच्छेद २१ ला पर्यावरणीय न्यायाचा संवैधानिक आधार दिला आहे. ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद २१चे विस्तृत आणि उद्देशपूर्ण व्याख्या करत जीवनाच्या अधिकारात स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी, प्रदूषणमुक्त वातावरण, पर्यावरण संतुलन, सार्वजनिक आरोग्य, निसर्ग संसाधनांवरील हक्क यांचा

समावेश केला आहे.

पर्यावरणीय हक्कांना मानवी हक्क म्हणून स्वीकारण्याची प्रक्रिया भारतात न्यायव्यवस्थेच्या माध्यमातून विकसित झाली आहे. वाढते पर्यावरणीय संकट, हवामान बदल, आदिवासी समाजांवरील परिणाम, संसाधनांचा असमान वापर आणि पर्यावरणीय न्यायाची गरज लक्षात घेता, अनुच्छेद २१ च्या परिवर्तनाचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते. हा अभ्यास पर्यावरणीय न्यायशास्त्राच्या विकासाची दिशा, धोरण-निर्मितीतील कमतरता, आणि नागरिकांच्या पर्यावरणीय हक्कांचे संवैधानिक संरक्षण या सर्वांचा सखोल अध्ययन प्रस्तुत संशोधनामध्ये करण्यात आला आहे.

**पर्यावरणीय मानवी हक्क :**

पर्यावरणीय मानवी हक्क ही आधुनिक काळातील मानवी हक्कांची एक विस्तारित व तिसऱ्या पिढीची (Third Generation Rights) संकल्पना आहे. ज्यामध्ये स्वच्छ पाणी, स्वच्छ हवा, आरोग्यदायी पर्यावरण, सुरक्षित अन्नसाखळी, जैवविविधतेचे संरक्षण, प्रदूषणविरहित परिसर आणि निसर्गसंपत्तींच्या न्याय्य वापराचा अधिकार हे सर्व पर्यावरणीय हक्कांचे प्रमुख घटक समावेश आहेत. हे हक्क केवळ निसर्गाच्या संरक्षणापुरते मर्यादित नसून मानवाच्या आरोग्य, उपजीविका, प्रतिष्ठा आणि जीवनगुणवत्तेशी थेट संबंधित असतात. त्यामुळे पर्यावरणीय हक्क हे मानवी जीवनाच्या सुरक्षिततेचे व टिकावाचे मुळाधार मानले जातात.

आंतरराष्ट्रीय समुदायाने पर्यावरणीय हक्कांना मानवी हक्काचा दर्जा गेल्या चार दशकांत मजबूतपणे मान्यता दिली आहे. १९७२ च्या स्टॉकहोम घोषणा पत्रात प्रथमच 'मनुष्याला आरोग्यदायी पर्यावरणात जगण्याचा मूलभूत अधिकार आहे' असे घोषित करण्यात आले होते. त्यानंतर विविध स्तरातून पर्यावरण संदर्भात उद्घोष करण्यात आलेला दिसून येतो ज्यामध्ये महत्वपूर्ण १९९२ चा रिओ डी जेनोरो घोषणा-शाश्वत विकास आणि पर्यावरणीय जबाबदारी यावर भर देत, राज्यांनी पर्यावरणीय हक्कांचे संरक्षण करणे हे कर्तव्य असल्याचे स्पष्ट केले. २०२१ मध्ये संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेने स्वच्छ, निरोगी आणि शाश्वत पर्यावरण हा सर्वांचा मूलभूत मानवी हक्क आहे अशी ऐतिहासिक घोषणा केली. तर २०२२ मध्ये यू.एन. जनरल

असेंब्लीचा पर्यावरणीय हक्कांना सार्वभौमिक मान्यता देऊन ते जागतिक मानवी हक्कांच्या चौकटीत समाविष्ट.करण्याचा महत्वपूर्ण ठराव पास केला. त्यामुळे हे निर्णय पर्यावरणीय हक्कांना 'मुलभूत मानवाधिकार' म्हणून दृढ करतात. संयुक्त राष्ट्रांनी पर्यावरण आणि मानवी हक्क यांना जोडणारी अनेक तत्त्वे विकसित केली. ज्यामध्ये जीवनाच्या अधिकारात पर्यावरणीय घटकांचा समावेश, आरोग्यासाठी स्वच्छ पर्यावरण आवश्यक. पर्यावरणीय हक्कांचे स्वरूप, राज्यांची जबाबदारी आणि पर्यावरणीय न्यायाचे निकष स्पष्ट केले. आरहूस अधिवेशन (१९९८) मध्ये पर्यावरणीय माहितीचा हक्क, सहभागाचा हक्क आणि न्यायप्रवेशाचा हक्क मान्यता देण्यात आली. या चौकटीमुळे पर्यावरणीय हक्क आता जागतिक मानवाधिकार व्यवस्थेचा महत्त्वाचा स्तंभ बनले आहेत.

पर्यावरणीय हक्कांच्या प्रश्नात सामाजिक न्याय हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कारण प्रदूषण, संसाधनांची लूट, जमीन अधिग्रहण, जंगलनाश यांचे दुष्परिणाम दुर्बल, आदिवासी, महिलांवर आणि गरीब समुदायांवर अधिक प्रमाणात पडतात. अशा अन्यायाला पर्यावरण असमानता किंवा पर्यावरण अन्याय असे म्हटले जाते. त्यामुळे पर्यावरणीय हक्क हे समता, न्याय, वंचित समुदायांचे अधिकार, उपजीविका आणि मानवाच्या प्रतिष्ठेशी जोडलेले आहेत. हवामान बदलाच्या दुष्परिणामांमध्येही गरीब व आदिवासी समुदाय सर्वाधिक प्रभावित होतात; त्यामुळे पर्यावरणीय न्यायाशिवाय मानवी हक्क संपूर्ण होऊ शकत नाहीत. पर्यावरणीय हक्क म्हणजे केवळ निसर्गाचे संरक्षण नव्हे, तर न्याय्य, समावेशक आणि मानवी मूल्यांवर आधारित विकासाची मागणी आहे.

भारतामध्ये पर्यावरणीय हक्कांना संविधानिक संरक्षण असल्याचे दिसून येतो. त्यामुळेच भारतामध्ये पर्यावरणीय मानवी हक्कांचा कायदेशीर विकास झालेला दिसून येतो. प्रामुख्याने पर्यावरणीय मानवी हक्कांचा दोन प्रमुख मार्गांनी विकसित झाला आहे. १. संविधानिक तरतुदी, २. न्यायालयीन निर्णय. भारतीय घटनाकारांनी घटनेमध्ये अनेक पर्यावरण सबंधित तरतुदी विविध अनुच्छेदामध्ये दिसून येत्तात. त्यामध्ये अनुच्छेद २१ जीवनाचा अधिकारची सर्वोच्च न्यायालयाने विस्तृत व्याख्या करून पर्यावरणाचा समावेश

केला आहे. अनुच्छेद ४८A मध्ये पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा राज्याचे कर्तव्य तरतूद केली आहे. तर अनुच्छेद ५१ A(g) नुसार पर्यावरणाचे रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य. त्या सोबतच सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी विविध खटल्याच्या आणि जनहित याचिकांवर निर्णयावेळी अधोरेखित केलेले दिसून येतात. १. एम.सी. मेहता विरुद्ध भारतीय संघ - प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण संरक्षणासाठी सक्रिय भूमिका. २. सुभाष कुमार विरुद्ध बिहार राज्य (१९९१) - स्वच्छ पर्यावरण हा जीवनाच्या अधिकाराचा भाग. ३.वेल्लोर सिटिझन्स वेलफेअर फोरम (१९९६) - शाश्वत विकास, प्रतिबंधात्मक तत्त्व (सावधिक तत्त्व). ४. इंडियन कौन्सिल फॉर एन्व्हायरो-लीगल क्शन (१९९६) - प्रदूषण भरपाई करेल (प्रदूषण देणारे तत्व). ५. टी.एन. गोदावर्मन (वन प्रकरण) - वने आणि जैवविविधतेच्या संरक्षणासाठी न्यायिक हस्तक्षेप. इत्यादी खटल्यामध्ये पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणासंदर्भात निरीक्षण नोदवलेले दिसून येतात. संविधानिक तरतुदी आणि न्यायालयीन निर्णय मागोवा घेऊन सरकारनी अनेक पर्यावरणीय कायद्याची निर्मिती केलेली आहे. १. पर्यावरण संरक्षण कायदा १९८६, २. हवा प्रदूषण निवारण कायदा १९८१, ३. पाणी प्रदूषण निवारण कायदा १९७४, ४.जैविक विविधता कायदा २००२ इत्यादी अनेक पर्यावरणीय कायद्याची निर्मिती करण्यात आली. संविधानिक तरतुदी, न्यायालयीन निर्णय आणि त्यातून निर्माण झालेले पर्यावरणीय कायदे या सर्वांनी मिळून भारतातील पर्यावरणीय मानवी हक्कांची मजबूत कायदेशीर चौकट तयार केली आहे.

**भारतीय संविधानातील पर्यावरण संरक्षणाचा आधार :**

भारतीय संविधानाने पर्यावरण संरक्षणाला अप्रत्यक्ष व नंतर थेट अशा दोन्ही पद्धतीने दृढ आधार दिला आहे. पर्यावरणीय अधिकारांची उभारणी ही आजच्या भारतीय पर्यावरणीय न्यायशास्त्राची केंद्रबिंदू ठरली आहे. प्रस्तावना, मूलभूत हक्क, राज्याची मार्गदर्शक तत्त्वे आणि नागरिकांचे कर्तव्य या चार विभागातून संपूर्ण संविधान पर्यावरण संरक्षणाची व्यापक, नैतिक व कायदेशीर चौकट निर्माण करते.

**अ. संविधान प्रास्ताविका :** भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि प्रतिष्ठा (Justice, Liberty, Equality and Dignity)

हे मूलभूत मूल्ये दिलेले आहेत. सामाजिक न्याय आणि आर्थिक न्याय या संकल्पना प्रदूषण, संसाधनांचा अन्याय्य वापर याविरुद्ध संरक्षण देतात. जीवनातील प्रतिष्ठा (Dignity of the Individual) ही संकल्पना स्वच्छ पर्यावरणाशिवाय अपूर्ण आहे. अनुच्छेद २१ च्या विस्तृत अर्थलक्षणात न्यायालयाने स्पष्ट केले की, प्रस्तावनेतील प्रतिष्ठा व समता या मूल्यांमुळे स्वच्छ व सुरक्षित पर्यावरणाविना मानवाचे जीवन सन्माननीय राहू शकत नाही. म्हणूनच प्रस्तावना ही पर्यावरणीय मानवी हक्कांची मूल्याधिष्ठित पायाभूत चौकट आहे.

**ब. अनुच्छेद २१ - जीवनाचा अधिकार व पर्यावरण -** अनुच्छेद २१ कायद्याने स्थापित केलेल्या प्रक्रियेशिवाय कोणालाही त्याचे जीवन किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य काढून घेता येणार नाही. हा आज भारतीय पर्यावरणीय हक्कांचा मूलाधार मानला जातो. सर्वोच्च न्यायालयाने जीवनाच्या अधिकाराची व्याख्या करताना स्पष्ट केले की, 'मानवी प्रतिष्ठेला सुसंगत असे जीवन, आरोग्यदायी व प्रदूषणमुक्त वातावरण, स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी, स्वच्छ परिसर' हे सर्व घटक जीवनाच्या अधिकाराच्या परिघात येतात. त्यामुळे अनुच्छेद २१ मुळे भारतीय पर्यावरणीय न्यायशास्त्राला संवैधानिक बळ मिळाले आहे.

**क. अनुच्छेद ४८-A : राज्याचे पर्यावरण संरक्षण कर्तव्य -**१९७६च्या ४२ घटनादुरुस्तीद्वारे संविधानामध्ये अनुच्छेद ४८ अ समावेश करण्यात आला. ४८-अ नुसार राज्याने पर्यावरणाचे तसेच देशातील वन व वन्यजीवांचे संरक्षण आणि सुधारणा करण्याचे प्रयत्न करावेत. ४८-अ हे राज्याच्या सकारात्मक कर्तव्यांचे घोषणापत्र आहे. याचा प्रभाव पर्यावरण संरक्षणासाठी धोरणे व कायदे तयार करणे. सोबतच प्रदूषण नियंत्रण मंडळे, वनसंरक्षण धोरण, हरित न्यायालये निर्माण करणे. पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) सारख्या प्रक्रियांचे कायदेशीरकरण करून जनतेच्या पर्यावरणीय मुलभूत हक्काचे संरक्षणकरण्याशी कटिबद्ध करतो. ज्यातून जनतेच्या पर्यावरण हक्काचे संरक्षण आणि पर्यावरणाचे संवर्धन होईल.त्यामुळेच अनुच्छेद ४८-A हे राज्याच्या धोरणनिर्मितीचे पर्यावरणीय तत्त्व बनले आहे.

**ड. अनुच्छेद ५१ -A(g) - नागरिकांचे पर्यावरणीय कर्तव्य -** अनुच्छेद

५१ - A (g) नुसार घटना  नागरिकांना वन, सरोवर, नदी आणि सर्व प्राण्यांचे संरक्षण व सुधारणा करणे आणि सजीव जगताप्रती करुणाभाव राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. अधोरेखित करतो. यामुळे पर्यावरण संरक्षण हे केवळ राज्याचे नव्हे तर जनतेचेही सांविधानिक कर्तव्य झाले. न्यायालयांनी अनेक प्रकरणांत नागरिकांच्या या कर्तव्याचा उल्लेख करून पर्यावरणीय जबाबदारीवर भर दिल्यामुळे  शाळा, महाविद्यालयांत पर्यावरण शिक्षणाचा पाया मजबूत झाला. त्यामुळे संविधान नागरिकांमध्ये सहभागी संरक्षण (Partvipatory Environmentalism) ची भावना दृढ करीत आहे.

या चौकटीमुळे पर्यावरण संरक्षण हे नैतिक कर्तव्य, कायदेशीर बंधन, मूलभूत हक्क आणि लोकशाही न्यायाची अट अशा चार स्तरांवर स्थापित झाले आहे. ज्यातून पर्यावरणीय न्याय प्रस्तापित करता येईल.

**अनुच्छेद २१ चे रूपांतर : 'जीवनाचा अधिकार' ते 'पर्यावरणाचा अधिकार' -**

भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ हा सुरुवातीला केवळ जीवन आणि व्यक्तिगत स्वातंत्र्य यापुरता मर्यादित होता. तथापि, १९८० नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या सक्रिय व उद्देशपूर्ण अर्थलक्षणामुळे या अनुच्छेदात पर्यावरण संरक्षण, आरोग्य, हवा-पाणी शुद्धता, सुरक्षित निवास, स्वच्छ परिसर, सार्वजनिक आरोग्य अशा संकल्पनांचा समावेश होत गेला. या प्रक्रियेमुळे अनुच्छेद २१ चे 'जीवनाचा अधिकार' ते 'पर्यावरणाचा अधिकार' पर्यावरणीय न्यायाचा अधिकार असे रूपांतर झाल्याचे दिसून येते.

१९८० नंतर सर्वोच्च न्यायालयाने विस्तारित व मानवी मूल्यांशी सुसंगत अर्थलक्षण स्वीकारले. या व्याख्यांमुळे जीवनाचा अधिकार फक्त अस्तित्व नसून गुणवत्तापूर्ण जीवनाचा अधिकार म्हणून अस्तिवात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने १९८१ च्या फ्रान्सिस कोरली मुलिन वि. यूटी ऑफ दिल्ली खटल्यामध्ये जीवनाचा अधिकार म्हणजे मानवी प्रतिष्ठेला सुसंगत जीवन असे निरीक्षण नोदवून पर्यावरण आणि जीवनचा सहसबंध स्पष्ट केल्याचे दिसून येतो. सुभाष कुमार विरुद्ध बिहार राज्य (१९९१) खटल्यात स्वच्छ पाणी व सुरक्षित हवा हे जीवनाचा अविभाज्य भाग. असल्याचे निरीक्षण नोदवल तर वीरेंद्र गौर विरुद्ध हरियाना राज्य१९९५ मध्ये  'पर्यावरणाचा

ऱ्हास हा अनुच्छेद २१ चे उल्लंघन आहे.' त्यासोबतच १९८७ ला एम.सी. मेहता विरुद्ध भारतीय संघ खटल्यात वाहतूक, नदी प्रदूषण, औद्योगिक प्रदूषण, ओझोन थर संरक्षण इत्यादी क्षेत्रांत मोठे निर्णय. पर्यावरण संरक्षणासाठी सक्रिय न्यायिक हस्तक्षेप व पर्यावरणीय न्यायालय स्थापना संदर्भात निर्देश दिले. त्यानंतरच्या वेल्लोर सिटिझन्स वेलफेअर फोरम वि. युनियन ऑफ इंडिया (१९९६) खटल्यामध्ये न्यायालयाने शाश्वत विकास, प्रतिबंधक तत्त्व आणि प्रदूषकाकडून भरपाई हे पर्यावरणीय कायद्यातील तत्त्व म्हणून मान्य करून 'शाश्वत विकास' हे भारतीय पर्यावरणीय न्यायशास्त्राचे तत्त्व म्हणून मान्य केलेले दिसून येते.

मानवी प्रतिष्ठेशिवाय जीवन हे संवैधानिक जीवन नाही. आणि मानवी प्रतिष्ठा ही स्वच्छ, सुरक्षित व निरोगी पर्यावरणाशिवाय शक्य नाही. प्रदूषित हवा, दूषित पाणी, ध्वनीप्रदूषण, अतिक्रमण, घनकचरा समस्या, औद्योगिक कचरा या सर्वांचा परिणाम थेट मानवी प्रतिष्ठेवर होतो; म्हणूनच अनुच्छेद २१ अंतर्गत पर्यावरणाचा अधिकार हा प्रतिष्ठेचा मूलाधार आहे. न्यायालयाने पर्यावरणाचा अधिकार हा मानवाच्या Right to Dignified Life चा अविभाज्य घटक ठरवला.१९८०-२००० या काळात भारतीय न्यायव्यवस्थेने पर्यावरण संरक्षणासाठी उल्लेखनीय सक्रियता दाखवली.त्यामध्ये सरकारच्या निष्क्रियतेवर टीका करणे, धोरणनिर्मितीत मार्गदर्शन करणे, प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर थेट निर्बंध लादणे, पर्यावरण संरक्षणासाठी विशेष निर्देश देणे, राज्यांना अहवाल व कृती आराखड्यांची सक्तीकरणे इत्यादी क्षेत्रात सक्रियता दाखवल्यामुळे सरकारी धोरणावर नियंत्रण प्रस्तापित झाले. व पर्यावरणीय धोरणे बनविणे अनिवार्य झाले. उदा. १. दिल्लीतील वाहन प्रदूषण नियंत्रणे (CNG आदेश), २. गंगा व यमुना नदी प्रदूषणावर प्रतिबंधक आदेश, ३. ताजमहाल परिसरातील उद्योगांचे स्थलांतर इत्यादी. न्यायालयीन सक्रियतेने Environmental Governmance मध्ये न्यायपालिकेची महत्त्वपूर्ण भूमिका निर्माण केली.

भारतात पर्यावरणीय मानवी हक्कांचा विकास मुख्यतः न्यायपालिका-प्रणीत आहे. संसदीय कायदे जरी महत्त्वाचे असले तरी अनुच्छेद २१ ची पर्यावरणाभिमुख व्याख्या, लोकहित याचिका, आणि सर्वोच्च न्यायालयाची

न्यायिक सक्रियता यांनीच Right to Environment ला मूलभूत हक्काचा दर्जा प्रदान केला. विविध ऐतिहासिक निर्णयांनी पर्यावरण न्यायाचे तत्त्व, पर्यावरणीय शासनाची मर्यादा, तसेच विकास विरुद्ध पर्यावरण या वादाचा संतुलित मार्ग आखला. १९८० नंतरच्या पर्यावरणीय न्यायनिर्मितीत PIL हा सर्वात मोठा बदल घडवणारा घटक ठरला आहे. कुणीही वंचित, पीडित, उपेक्षित वर्गासाठी याचिका दाखल करू शकतो. पर्यावरणीय समस्यांकडे न्यायालयाचे लक्ष वेधणे सोपे झाले. वृत्तपत्रांची कात्रणे, NGOs, नागरिकांचे पत्र यांच्याही आधारे याचिका स्वीकारल्या गेल्या. जनपक्षीय पर्यावरणीय हक्कांना बळ मिळाल आहे. PIL मुळे पर्यावरण संरक्षणात जनहित याचिका (Environmental Public Interest Litigation) हा नवा कायदेविषयक विभाग निर्माण करण्यात आला. त्यामुळेच अनुच्छेद २१ चा विस्तार वाढलेल्या दिसून येतो. अनुच्छेद २१ मधील खालील पर्यावरणीय घटकांचा समावेश होतो.

१. स्वच्छ हवा व पाण्याचा अधिकार

२. प्रदूषणमुक्त पर्यावरणाचा अधिकार

३. आरोग्यावर परिणाम होणार नाही असा पर्यावरणीय समतोल (Ecological Balance)

४. नैसर्गिक संसाधनांचा नैसर्गिक हक्क (Public Trust Doctrine)

५. सुरक्षित निवास व आरोग्यदायी जीवनशैली

६. वनसंरक्षण, जलस्रोत संरक्षण, साहित्यिक व सांस्कृतिक संपत्तीचे रक्षण

या सर्वांचा परिणाम म्हणजे अनुच्छेद २१ आज भारतीय पर्यावरणीय न्यायाचा संवैधानिक स्तंभ बनला आहे.

या न्यायिक परंपरेमुळे अनुच्छेद २१ च्या व्याप्तीत पर्यावरणीय हक्कांचा समावेश झाला.

**पर्यावरण न्याय आणि भारतीय संदर्भ -**

भारतातील पर्यावरणीय प्रश्न हे केवळ नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण किंवा प्रदूषण नियंत्रणापुरते मर्यादित नाहीत, ते न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठा या मूलभूत संवैधानिक तत्वांशी निगडित आहेत. पर्यावरण न्याय (Environmental Justice) ही संकल्पना या सर्व स्तरांवरील विषमता दूर

करण्याचा प्रयत्न करते आणि पर्यावरणीय संसाधने सर्वांसाठी समान उपलब्ध व्हावीत, पर्यावरणीय धोके कोणत्याही विशिष्ट सामाजिक समूहावर असमान प्रमाणात पडू नयेत, याची हमी देते. पर्यावरण न्याय म्हणजे १. पर्यावरणीय संसाधनांचा समान, न्याय्य आणि भेदभावरहित वापर २. पर्यावरणीय निर्णय प्रक्रियेत समान सहभाग ३. पर्यावरणीय धोके आणि विषमता कुठल्याही दुर्बल समुदायावर disproportionate पद्धतीने पडू नयेत आणि ४. प्रत्येक व्यक्तीला स्वच्छ, सुरक्षित आणि निरोगी पर्यावरणाचा हक्क देणे, या सर्व घटकांचा समावेश पर्यावरणीय न्याय या संकल्पनेत होतो. पर्यावरण न्याय ही संकल्पना अमेरिकेतील पर्यावरण न्याय चळवळ (१९८०) मधून आली, परंतु भारतीय संदर्भात ती मानवी हक्क + सामाजिक न्याय + पर्यावरणीय संरक्षण या त्रिसूत्रीवर आधारित विकसित झाली आहे.

भारतात पर्यावरणीय विषमता मुख्यतः पुढील गटांना सर्वाधिक प्रभावित करते. त्यामध्ये झोपडपट्ट्यांमध्ये राहणारे लोक सर्वात जास्त हवा व पाणी प्रदूषणाला सामोरे जातात. कचरा डेपो, ड्रेनेज, औद्योगिक झोन या वस्त्यांच्या जवळ असल्याने आरोग्य धोक्यात असतो. पाणी, इंधन, जंगल संपत्ती यांची जबाबदारी महिलांवर असल्याने त्यांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो. पेयजलाचा अभाव, वनक्षेत्रांचा ऱ्हास, जैवइंधनाच्या धुरामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. दूषित पाणी, हवेतील सूक्ष्म धूळकण, कुपोषण, उष्णतेची लाट मुलांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होतो.

ग्रामीण भागात पर्यावरणीय नुकसानाचे प्रमाण जास्त असून प्रतिबंधात्मक उपायांची कमतरता जास्त प्रमाणात आहेत. भारताच्या पर्यावरण न्याय चर्चेचा मूलभूत केंद्रबिंदू आदिवासी आणि वनाधारित समुदायांवरील अन्याय हा आहे. आदिवासी ८०% पेक्षा जास्त प्रमाणात आपली उपजीविका जंगल आणि नैसर्गिक संपत्तीवर अवलंबून ठेवतात. वनक्षेत्रांवरील अतिक्रमण, उद्योग प्रकल्प, खाणकाम, धरणे यांच्या कारणांनी मोठ्या प्रमाणात विस्थापन होते. नेमके ज्यांचे जंगलाशी नाते सर्वाधिक, त्यांना जंगल संरक्षणाच्या नावाने हटवले जाते. भारतात १९५० पासून आतापर्यंत लाखो आदिवासी, दलित, गरीब शेतकरी लोकांना विकास प्रकल्पांमुळे विस्थापित व्हावे लागले. खाणकाम, स्टील प्लांट, धरणे, रोड-कॉरिडॉर, इको-टुरिझम, टायगर रिजर्व या सर्वांनी

आदिवासींच्या जीवनाधिकारावर आघात होत असतात. हे संघर्ष दाखवतात की पर्यावरणीय संसाधनांवरील मालकी, व्यवस्थापन आणि संरक्षण यात आदिवासींना निर्णय प्रक्रियेपासून दूर ठेवले जाते हा पर्यावरणीय अन्यायाचा ठोस नमुना आहे. विस्थापनामुळे होणारे मानवी हक्कांचे उल्लंघन होते.त्यातून घर, जमीन, उपजीविका हरवणे, सांस्कृतिक ओळख गमावणे, आरोग्यावर परिणाम होतो, सामाजिक विस्थापन होऊन महिला-मुले अधिक असुरक्षित होतात. अनेक प्रकल्पांचे पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (Environmental Impact Assessment) अपुरे, पक्षपाती किंवा सल्लामसलतीशिवाय केल्या जातात. त्यामुळे समुदायांचा सक्षमी सहभाग नसेल तर पर्यावरण न्याय साध्य होत नाही. त्यातून आदिवासी, दलित शेतकरी वर्गाला पर्यावरणीय अन्यायाला समोर जावे लागते. त्यामुळे भारतात पर्यावरण न्याय ही संकल्पना फक्त निसर्ग संरक्षणाचा प्रश्न नाही, तर ती सामाजिक न्यायाची आवश्यक अट म्हणून अस्तित्वात येते.

**निष्कर्ष :**

न्याय आणि निसर्ग यांचा संगम हा अजरामर,
मानवाच्या प्रतिष्ठेतच आहे त्यांचा अविभाज्य स्वर;
मूलभूत हक्कांची व्याप्ती तेव्हाच होते सुंदर,
जेव्हा वाचतो निसर्ग-धरणी, झाडे, नद्या आणि सागर

भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ ने जीवनाचा अधिकार या मूलभूत हक्काचा व्याप्त अर्थ विस्तारत स्वच्छ, निरोगी आणि सुरक्षित पर्यावरणाचा अधिकार हा मानवी हक्क म्हणून भारतात दृढपणे स्थापित केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सुभाष कुमार विरुद्ध बिहार राज्य, एम.सी. मेहता वि. युनियन ऑफ इंडिया, वेल्लोर सिटिझन्स वेलफेअर फोरम वि. युनियन ऑफ इंडिया इत्यादी प्रकरणांत मानवी प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार हा पर्यावरणाच्या गुणवत्तेशी निगडित असल्याचे स्पष्ट केले. या न्यायिक व्याख्यांनी अनुच्छेद २१ चे पर्यावरणीय न्यायाकडे रूपांतर घडवून आणले आणि पर्यावरण संरक्षणाला संविधानिक नैतिकता, जबाबदारी आणि हक्कांचा पाया दिला. भारतातील पर्यावरणीय मानवी हक्कांचे सामाजिक वास्तव अधिक गुंतागुंतीचे आहे. औद्योगिकीकरण, विकास प्रकल्प, जंगल-खनिज क्षेत्रांवरील दाब, शहरी

प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय विषमता यामुळे दुर्बल समुदाय-विशेषतः आदिवासी, दलित, ग्रामीण व वनाधारित समाज-सर्वाधिक प्रभावित होतात. हा विषम अनुभव पर्यावरणीय न्याय = सामाजिक न्याय या तत्त्वाला अधोरेखित करतो. यासाठी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (NGT) सारख्या संस्थांची भूमिका महत्त्वाची असली तरी अंमलबजावणीतील त्रुटी, शासकीय यंत्रणांवरील दबाव, पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (Environment Impact Assessment) प्रक्रियेतील कमतरता आणि नागरिक सहभागाचा अभाव ही मोठी आव्हाने आहेत.

एकंदरीत, अनुच्छेद २१ ने पर्यावरणाला मानवी हक्कांच्या मध्यवर्ती स्थानी आणले असले, तरी पर्यावरणीय न्यायाचा संपूर्ण उद्देश प्रत्यक्षात साकारण्यासाठी न्यायालयीन सक्रियता, सशक्त प्रशासन, लोकशाही सहभाग, ग्रामसभा-आदिवासी हक्कांची मान्यता, शाश्वत विकास धोरणे आणि पर्यावरणीय जनजागृती अत्यावश्यक आहे. संविधानातील हक्क-कर्तव्यांच्या एकत्रित चौकटीत, नागरिक-समाज-राज्य यांनी समन्वयाने काम केल्यासच भविष्यकालीन पिढ्यांसाठी पर्यावरणीय न्याय हा वास्तवातील संवैधानिक मूल्य बनू शकतो.

**संदर्भ सूची :**

1. United Nations Human Rights Council, "Human Right to a Clean, Healthy and Sustainable Environment," UNHRC Resolution, 2021.
2. Amartya Sen, Development as Freedom, Oxford University Press, 1999.
३. विज्ञान आणि पर्यावरण केंद्र (CSE), भारताचा पर्यावरण अहवाल, नवी दिल्ली, २०२३.
4. सुभाष कुमार विरुद्ध बिहार राज्य, AIR 1991 SC 420..
5. एम.सी. मेहता वि. युनियन ऑफ इंडिया, AIR 1987 SC 1086
6. वेल्लोर सिटीझन्स वेलफेअर फोरम वि. युनियन ऑफ इंडिया, AIR 1996 SC 2715.
7. shyam divan and armin rosencranz, environmental law and policy in india,oxford university press2001 p.18
8. संयुक्त राष्ट्र, स्टॉकहोम घोषणा, 1972.
9. संयुक्त राष्ट्र, पर्यावरण आणि विकासावरील रिओ घोषणा, 1992.

10. UNHRC 48/13, 2021..
11. UN General Assembly Resolution A/RES/76/300, 2022.
12. मानवाधिकार आणि पर्यावरणावरील संयुक्त राष्ट्र विशेष वार्ताहर पंचवार्षिक अहवाल, 2018-2023..
13. Schlosberg, David, Environmental Justice: Theory and Practice, Oxford.2007.p.03
14. फ्रान्सिस कोरली मुलिन वि. केंद्रशासित प्रदेश दिल्ली, AIR 1981 SC 746 .
15. Basu, D. D., Introduction to the Constitution of India, 25th Edition (Lexis Nexis, 2022), p. 125-35
16. ओल्गा टेलिस वि. मुंबई महानगरपालिका, AIR 1986 SC 180..
17. Ghosh, S. (Ed.). (2019). Indian environmental law: Key concepts and principles (Foreword by P. B. Mehta). Orient Blackswan Private Limited.p.67-76
18. S.P. Sathe, (2002) Judicial Activism in India, Oxford University Press.p27-35
19. United States EPA, Environmental Justice Concept,1992.
20. Ministry of Environment, Forest and Climate Change,State of Environment Report, 2021.

■■■

# प्रजासत्ताक भारतातील मानवी हक्कांची संकल्पना आणि त्याचा विकासात्मक प्रवास : एक चिकित्सक अध्ययन

❐ **डॉ. भूपेंद्र ईश्वर घरत**
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग (स्वायत्त)
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**सारांश :**

हा संशोधन निबंध  भारतीय प्रजासत्ताकातील मानवी हक्कांच्या संकल्पनेचा ऐतिहासिक, वैधानिक आणि न्यायिक दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करतो. भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारांची रचना, त्यातील मर्यादा व न्यायालयांनी केलेले विस्तारीकरण यांचा यात सविस्तर आढावा घेतला आहे. तसेच राष्ट्रीय व राज्य मानवाधिकार आयोगांसारख्या संस्थांचा उदय, त्यांची कार्यप्रणाली आणि प्रभाव यांचेही विश्लेषण केले आहे. समकालीन भारतासमोर उभ्या राहणाऱ्या सामाजिक विषमता, प्रशासनिक अडथळे, सुरक्षिततेचे प्रश्न, तंत्रज्ञानाच्या युगातील गोपनीयता आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे आव्हान या सर्वांचा चिकित्सक अभ्यास या निबंधात मांडला आहे.

मात्र अभ्यासाचा उद्देश केवळ कायदे समजावून सांगणे नाही; तर मानवी हक्कांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी घडते, वास्तवात कोणत्या समस्या आणि अडथळे उभे राहतात, तसेच सुधारणा कोणत्या दिशेने व्हाव्यात, याचेही विश्लेषणात्मक स्पष्टीकरण यात समाविष्ट आहे. हे अध्ययन हक्करक्षणाच्या प्रवासातील यश-अपयश दोन्हींचा संतुलित वेध घेते.

**बीज शब्द :** मानवी हक्क, मूलभूत अधिकार, संविधान, न्यायालयीन व्याख्या, NHRC, संरक्षण कायदे, सामाजिक न्याय

**प्रस्तावना :**

मानवी हक्क हे आधुनिक लोकशाही राज्यव्यवस्थेचे मूलस्तंभ मानले जातात. प्रत्येक व्यक्तीचा सन्मान, स्वातंत्र्य आणि समत्व यांची खात्री देणे ही कोणत्याही प्रजासत्ताकाची प्राथमिक जबाबदारी असते. भारत हा जगातील

सर्वात मोठा लोकशाही देश असून त्याच्या प्रजासत्ताक रचनेत मानवी हक्कांना केंद्रस्थानी स्थान देण्यात आले आहे. १९५० साली लागू झालेल्या भारतीय संविधानाने न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूलभूत मूल्यांच्या आधारे मानवी हक्कांचे संरक्षण दृढ केले.

संविधानातील मूलभूत अधिकार, राज्याचे मार्गदर्शक तत्त्वे, तसेच विविध कायदे आणि संस्थात्मक रचना या सर्वांद्वारे नागरी व मानवी हक्कांची एक सुदृढ चौकट उभी राहिली. परंतु ही चौकट स्थिर नसून काळानुसार बदलणाऱ्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीशी सुसंगत राहण्याची आवश्यकता भासते. न्यायालयीन व्याख्या, संसदीय सुधारणा, सामाजिक चळवळी आणि प्रशासनिक हस्तक्षेप यांमुळे हक्कांची व्याप्ती सतत विस्तारत राहिली आहे.

या संशोधन निबंधात मानवी हक्कांच्या संकल्पनेचा भारतातील विकासात्मक प्रवास, त्यातील टप्पे, आव्हाने आणि त्यावर न्यायालये व राज्य यंत्रणांची प्रतिक्रिया यांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे. उद्देश केवळ सैद्धांतिक माहिती देणे नसून, प्रत्यक्ष व्यवहारात हक्कांची अंमलबजावणी कितपत प्रभावी ठरते याचे विश्लेषण करणे हा आहे.

**भारतीय संविधान आणि मानवी हक्कांची मूलभूत रचना :**

भारतीय संविधानातील भाग-३ हा देशातील मानवी हक्कांच्या संरक्षणाचा मुख्य आधार मानला जातो. या भागात समाविष्ट केलेले मूलभूत हक्क प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार, अभिव्यक्ती व हालचालीचे स्वातंत्र्य, जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अविभाज्य हक्क, शोषणाविरुद्ध संरक्षण, तसेच अल्पसंख्याक समुदायांना सांस्कृतिक व धार्मिक स्वातंत्र्य प्रदान करतात. हे हक्क केवळ सैद्धांतिक नाहीत, तर त्यांना विधिसंमत रचना आणि अंमलबजावणीची प्रभावी साधने संविधानाने उपलब्ध करून दिली आहेत.

या अधिकारांचे उल्लंघन झाल्यास नागरिकांना थेट सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार दिला आहे, ज्यामुळे राज्यावर जबाबदारी येते की ते नागरिकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करतील. या न्यायिक हस्तक्षेपाच्या यंत्रणेमुळे मूलभूत हक्क अधिक मजबूत, गतिशील आणि लोकाभिमुख बनले आहेत. अशा प्रकारे भारतीय संविधानाने मानवी हक्कांना केवळ कायदेशीर

चौकट दिली नाही, तर त्यांच्या प्रत्यक्ष संरक्षणासाठी एक सशक्त मार्गही निर्माण केला आहे.

**न्यायालयीन व्याख्या आणि हक्कांचा विस्तार :**

भारतीय सर्वोच्च न्यायालयाने आपल्या ऐतिहासिक निर्णयांमधून मूलभूत हक्कांची व्याप्ती मोठ्या प्रमाणात विस्तारली आहे. संविधानात जीवन हा शब्द केवळ अस्तित्वापुरता मर्यादित नसून, सन्मानपूर्ण आणि सुरक्षित जीवन जगण्याच्या सर्व गरजांचा समावेश करतो, अशी व्यापक व्याख्या न्यायालयाने दिली. त्यामुळे आजीविका, आरोग्य, स्वच्छ वातावरण, शिक्षण आणि गोपनीयता यासारख्या घटकांनाही जीवनाधिकाराचा अविभाज्य भाग मानले गेले.

या प्रक्रियेमुळे हक्कांची व्याख्या स्थिर न राहता सतत विकसित होत असल्याचे स्पष्ट होते. समाजातील बदल, तांत्रिक प्रगती, नव्या समस्यांचा उद्‌भव या सर्वांचा विचार करून न्यायालयांनी हक्कांचे संरक्षण अधिक सक्षम केले आहे. न्यायव्यवस्थेची ही गतिशील भूमिका मानवी हक्कांचे स्वरूप अधिक व्यापक, आधुनिक आणि लोककेंद्रित बनवते. अशारितीने न्यायालयीन हस्तक्षेपामुळे संविधानातील हक्कांचा अर्थ अधिक जिवंत आणि कालसुसंगत ठरला आहे.

**इतिहासिक प्रवास : स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळ :**

स्वातंत्र्यपूर्व भारतात मानवी हक्कांची संकल्पना आजच्या अर्थाने विकसित झालेली नव्हती. ब्रिटिश वसाहती शासनमान्यतेखाली नागरिकांच्या स्वातंत्र्यावर अनेक निर्बंध होते आणि राजकीय हक्कांचे उल्लंघन ही सामान्य बाब होती. या अन्यायकारक परिस्थितीतून स्वातंत्र्यलढा उभा राहिला आणि याच संघर्षातून व्यक्तिस्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय यांसारख्या मूल्यांची बीजे पेरली गेली.

स्वातंत्र्यानंतर या मूल्यांनी संविधाननिर्मितीला दिशादर्शन केले. १९५० मध्ये संविधान अमलात आल्यानंतर मूलभूत हक्कांची अंमलबजावणी प्रत्यक्षात सुरू झाली. न्यायालयांनी या हक्कांचा अर्थ, व्याप आणि त्यांच्या सीमांचे विश्लेषण करताना अनेक नवे दृष्टिकोन मांडले. सामाजिक बदल, आर्थिक वास्तव आणि लोकशाहीच्या गरजा यांनुसार हक्कांचे पुनर्व्याख्यनही झाले.

या प्रवासात संविधानातील अधिकार हे केवळ पुस्तकातील तत्त्व न

राहता, न्यायिक हस्तक्षेप आणि नागरिकांच्या हक्क जागृतीमुळे एक जिवंत आणि सतत विकसित होणारी व्यवस्था बनली.

**राष्ट्रीय मानवाधिकार संरचना (NHRC) आणि कायदे :**

भारतामध्ये मानवाधिकारांचे संरक्षण अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने १९९३ मध्ये राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची (NHRC) स्थापना करण्यात आली. 'मानवाधिकार संरक्षण अधिनियम, १९९३'द्वारे या आयोगाला विधिसंगत स्थान प्राप्त झाले आणि केंद्र व राज्य स्तरावर मानवाधिकार रक्षणासाठी एक सुसंगत संस्थात्मक चौकट उभी राहिली. NHRC चे मुख्य कार्य म्हणजे मानवाधिकार उल्लंघनांच्या तक्रारींची चौकशी करणे, सरकारला संबंधित प्रकरणांवर शिफारसी देणे, तसेच समाजात मानवाधिकारांविषयी जनजागृती वाढवणे.

याशिवाय, पोलीस अत्याचार, ताब्यातील मृत्यू, महिला-अल्पसंख्याकांवरील अत्याचार, बालमजुरी, कुपोषण, विस्थापन अशा विषयांवर आयोग नियमित अहवाल आणि अभ्यास सादर करतो. त्यामुळे शासनाला धोरणे सुधारण्यास आणि दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास मदत होते.

तथापि आयोगाची कार्यक्षमता आणि अधिकारमर्यादा याबाबत अनेक वेळा प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. NHRC प्रामुख्याने सल्लागार संस्था असल्याने त्याच्या निर्णयांना न्यायालयीन आदेशांसारखी सक्ती नसते. आयोग शिफारसी देऊ शकतो, पण त्यांची अंमलबजावणी सरकारवर अवलंबून असते. यामुळे काही गंभीर प्रकरणांत आयोगाचे हस्तक्षेप प्रभावी ठरत नाहीत, अशी टीका केली जाते.

तरीही, NHRC ने मानवी हक्कांच्या संरक्षणाला राष्ट्रीय स्तरावर एक महत्त्वाची दिशा दिली असून, लोकशाहीतील जबाबदार शासनासाठी त्याची भूमिका अनिवार्य मानली जाते.

**महत्त्वाचे न्यायिक निर्णय आणि त्यांचे परिणाम :**

न्यायप्रथेमुळे काही ठळक तत्त्वे भारतात रुजली ती पुढीलप्रमाणे-

हक्कांचा व्याप्ति-विस्तारः जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याच्या उल्लंघनाविरुद्ध केसेसमध्ये न्यायालयाने व्यापक व्याख्या स्वीकारली ज्यात आजीविका, आरोग्य, निवास आदी समाविष्ट झाले.

गोपनीयता व वैयक्तिक स्वातंत्र्यः तंत्रज्ञानाच्या वाढत्या उपयोगामुळे गोपनीयतेचे संरक्षण महत्त्वाचे बनले.

**सामाजिक अधिकारांचा न्यायालयीन स्वीकार :** आरोग्यसेवा, शिक्षण, पाच वेळचे कर्ज व इतर सामाजिक आवश्यकता यांसाठी अधिकारात्मक दृष्टिकोन अधिक दृढ झाला.

या निर्णयांचा परिणाम केवळ कायद्यापुरता मर्यादित राहिला नाही तर प्रशासकीय धोरणे व कायदेही प्रभावित झाले.

**समकालीन आव्हाने :**

**१. अंमलबजावणीची कमतरता :** कागदावर अनेक अधिकार अस्तित्त्वात असले तरी त्यांची नितांत कार्यवाही अनेक वेळा भ्रष्टाचार, प्रशासकीय दुर्लक्ष आणि संसाधने नसल्यामुळे अपूर्ण राहते.

**२. राजकीय व सामाजिक दबाव :** मानवाधिकार विषयक निर्णयांवर अनेकदा राजकीय आक्षेप येतात; समाजातील मनोवृत्ती बदलणे हाही एक मोठा आव्हान आहे.

**३. नवीन तांत्रिक आव्हाने :** डिजिटल हक्क, डेटा सुरक्षा, आणि गोपनीयतेचे प्रश्न हे नवनिर्मित न्यायव्यवहार मागतात.

**४. अत्याचार व असमानता :** सामाजिक-आर्थिक विषमतेमुळे काही समाजघटक हक्कांपासून वंचित राहतात.

**चिकित्सक विश्लेषण :**

**१. वैधानिक संरचनेची मजबुती परंतु क्रियान्वयनाची जाणीव हवी :** संविधानाने मजबूत तत्त्वे दिली आहेत परंतु राज्यस्तरावर त्या तत्त्वांची अंमलबजावणी सुधारण्याची गरज आहे.

**२. न्यायालयीन सक्रियता उपयुक्त परंतु सीमाबद्ध :** सुप्रीम कोर्ट व उच्च न्यायालयांनी हक्कांच्या विस्तारात महत्त्वाची भूमिका बजावली; मात्र न्यायालयीन हस्तक्षेपाला नियमन व संतुलनाची आवश्यकता आहे, कारण केवळ न्यायालयीन आदेशांनीच सामाजिक परिवर्तन शक्य नाही.

**३. संस्थात्मक सुधारणा आवश्यक :** NHRC व राज्य आयोगांच्या शक्ती वाढविणे, स्वतंत्र तपास यंत्रणा व क्षतिपूर्ती प्रक्रियेची स्पष्टता गरजेची आहे.

**४. समावेशी धोरण व जनजागृती :** स्थानिक पातळीवरील जनजागृती,

शैक्षणिक कार्यक्रम व लोकशाही प्रक्रियेतील सहभाग वाढवणे अत्यावश्यक आहे.

**शिफारशी :**

१. NHRC च्या अधिकारात सुधारणा करून अधिक प्रभावी तपास व शिफारशीची अंमलबजावणी अनिवार्य करणे.

२. मानवाधिकार शिक्षणाला शाळा-विश्वविद्यालयांचे कोर्ससिलबसमध्ये समाविष्ट करणे.

३. डिजिटल हक्कांसाठी स्वतंत्र कायदा किंवा नियमन Framework तयार करणे (डेटा संरक्षण, गोपनीयता व एआयवरील प्रभावांच्या बाबतीत).

४. सामाजिक असमानता कमी करण्यासाठी लक्षित धोरणे जसे की, आरोग्य, शिक्षण व आजीविका या क्षेत्रात विशेष निधी व कार्यक्रम.

५. न्यायालयीन प्रक्रियेचे वेग व सुलभता सुधारण्यासाठी पर्यायी विवाद निवारण आणि विशेष मानवाधिकार अदालत/फास्ट-ट्रॅक पथ.

**निष्कर्ष :**

भारतीय प्रजासत्ताकात मानवी हक्कांची भक्कम चौकट संविधानाने प्रदान केली असली तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी ही सततची प्रक्रिया आहे. हक्कांचे खरे सामर्थ्य केवळ त्यांच्या कायदेशीर अस्तित्वात नसून ते समाजात प्रत्यक्ष किती प्रमाणात लागू होतात, यावर अवलंबून असते. संस्थात्मक सुधारणा, पारदर्शक प्रशासन आणि न्यायप्रणालीतील संतुलित हस्तक्षेप यामुळे हक्कांची अंमलबजावणी अधिक बळकट होऊ शकते. त्याचबरोबर, सामाजिक जागरूकता आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग हा हक्कसंरक्षणाचा महत्त्वाचा आधार आहे. मानवाधिकारांच्या यशस्वी भविष्यासाठी न्यायालये, विधिमंडळ, प्रशासन आणि समाज या सर्वच स्तरांत समन्वयाची गरज आहे. या अध्ययनातून स्पष्ट होते की मानवी हक्क ही केवळ सैद्धांतिक संकल्पना नसून लोकशाहीच्या सातत्यपूर्ण विकासाची आणि नागरिकांच्या सन्मानाची मूलभूत अट आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. Indian Constitution. (१९५०). The Constitution of India. Government of India.
2. Protection of Human Rights Act. (1993). The Protection of Human Rights Act, 1993. Government of India.

३. भारताच्या संविधानातील मूलभूत हक्क (Fundamental Rights) भाग-३ (Articles 12-35) मध्ये दिलेले आहेत. (MEA India)
४. Maneka Gandhi v. Union of India, 1978 AIR 597 (Supreme Court of India). या निर्णयाने Article 21 (जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याची व्याख्या विस्तारीत केली आहे. (Manupatra Academy)
5. K. S. Puttaswamy v. Union of India, (2017) 10 SCC 1. या सुप्रीम कोर्टच्या मोठ्या बेंचने गोपनीयतेचा (Right to Privacy) मौलिक हक्क म्हणून मान्य केला. Wikipedia)
6. Olga Tellis v. Bombay Municipal Corporation, 1985 SCR Supl. (2) 51. प्रकरणात न्यायालयाने Article 21 च्या अंतर्गत आजीविका (right to livelihood) शी संबंधित संरक्षणाची ओळख मान्य केली. (LawBhoomi)
7. Protection of Human Rights Act, 1993 द्वारे राष्ट्रीय मानवाधिकार आयोग (NHRC) ची स्थापना करण्यात आली. (Ministry of Home Affairs)
8. National Human Rights Commission. (Various years). Annual Reports. Government of India.

■■■

# भारतीय संविधान आणि मुस्लिम महिलांचे प्रतिनिधित्व

❐ **शबिना अंजुम शेख**
संशोधक विद्यार्थिनी
राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
❐ **डॉ. वकील शेख**
प्रोफेसर आणि राज्यशास्त्र विभाग प्रमुख
तायवाडे कॉलेज महादुला, नागपूर

**प्रस्तावना :**

भारतीय संविधान हे जगातलं सर्वात व्यापक आणि लोकशाही मूल्यांवर आधारित विधान आहे, ज्याने देशातील सर्व सामाजिक, धार्मिक आणि लैंगिक समूहांना न्यायकारक स्वरूप दिले. मुस्लिम महिलांचे प्रतिनिधित्व हा विषय सामाजिक न्यायाच्या अनुषंगाने अत्यंत महत्त्वाचा आहे. संविधानाने महिला आणि अल्पसंख्याकांचे समान अधिकार जाहीर केलं असलं तरीही व्यवहारात त्यांच्या हक्कांचे संपूर्ण रक्षण व साधनं अजूनही मर्यादित लाभतात. या संशोधन लेखात भारतीय संविधानातील मुस्लिम महिलांच्या हक्कांचा इतिहास, त्यांचे कायदेशीर व सामाजिक स्थान, तसेच त्यांचे प्रतिनिधित्व या विषयाचा सखोल अभ्यास करण्यात येईल

**भारतीय संविधानातील मुस्लिम महिलांचे हक्क आणि समानता**

भारतीय संविधानाने १९४९ मध्ये सर्व नागरिकांसाठी मूलभूत समान अधिकार व न्याय दिला. त्यात महिलांच्या समानतेवर विशेष भर देण्यात आला. मुस्लिम महिलांसाठी हे मूलभूत अधिकार अत्यंत महत्वाचे आहेत जसे की:

**कलम १४ (Equality Before Law) :** राज्यात सर्वांना कायद्यापुढे समान दृष्टीकोन दिला जातो, त्यामुळे मुस्लिम महिलांचे धार्मिक व्यथा वूढ परंतु राज्याची समता सर्वोच्च.

**कलम १५ (Prohibition of Discrimination) :** धर्म, लिंग, वंश या आधारावर कोणताही भेदभाव होऊ नये असा आदेश.

**कलम १६ (Equal Opportunity) :** नोकऱ्या, शिक्षण आणि सार्वजनिक सेवांमध्ये समान संधी मिळणे.

**कलम ३९ (Uniform Standard of Living) :** स्त्री-पुरुषांना समान वेतन व सुखसंस्कृती मिळावी.

महिला सशक्तीकरणसाठी कलम ४२ (just and humane working conditions) आणि कलम ५१ अ (Fundamental Duties).

या सहित अनेक आधुनिकीकरणात्मक कायदे मुस्लिम महिलांसाठी तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, instantaneous triple talaq वर बंदी घालणारा Muslim Women (Protection of Rights on Marriage) Act, 2019, जो मुस्लिम महिलांचे वैयक्तिक प्रतिष्ठान व आर्थिक सुरक्षा वाढवतो.

**मुस्लिम महिलांचे सामाजिक आणि कुटुंबिक हक्क**

**मुस्लिम महिलांचे कुटुंब नियोजनाचे हक्क भारतात मुस्लिम पर्सनल कायद्यांतर्गत येतात, परंतु त्या संविधानिक नियमानुसार असले पाहिजेत.**

**प्रमुख मुद्दे :**

मुस्लिम महिला (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम, १९८६ घटस्फोटानंतर महिला व मुलांना आर्थिक आधार (maintenance) व संरक्षणाचा अधिकार देतो.

विवाहात दिला जाणारा पोटगी (Mahr) हा विवाहकालीन व घटस्फोटानंतर मुस्लिम महिलांचा हक्क आहे.

मुस्लिम महिलांना वारसा हक्क दिला जातो, जरी पारंपरिक इस्लामिक कायदे आणि स्थानिक प्रथा यामध्ये फरक असेल तरी संविधानीनुसार सर्व महिलांना समान हक्क मिळतात.

सुप्रीम कोर्ट आणि उच्च न्यायालयांनी संबंधित प्रकरणात मुस्लिम महिलांच्या हक्कांची पुष्टी केली असून, triple talaq, polygamy, आणि maintenance संबंधित गैरव्यवहारांवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

या सर्व कायद्यांनी मुस्लिम महिलांच्या आर्थिक व सामाजिक सुरक्षेत मोठे बदल घडविले असून त्यांच्या हक्कांचे सुनिश्चित करणारे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. तथापि, या हक्कांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी सामाजिक जागृती आणि सांस्कृतिक बदलांची आवश्यकता आहे.

**मुस्लिम महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व**

भारतात मुस्लिम महिलांच्या राजकीय, लोकशाही प्रतिनिधित्वावर खूप मर्यादा आहेत. यासाठी प्रमुख बाबी :

लोकसभेत मुस्लिम महिलांचे प्रमाण खूपच कमी आहे, त्यांचा लोकसंख्येप्रमाणे प्रतिनिधित्व तुलनेने कमी दिसून येतो. स्वतंत्रतेनंतर केवळ १८ मुस्लिम महिलाच लोकसभेचा भाग बनल्या आहेत, ज्यांपैकी जास्तीत जास्त १३ महिलांचा संबंध राजकीय परिवारांशी होता.

पंचायत राज संस्थांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश (३३%) जागा आरक्षित असले तरी मुस्लिम महिलांचे प्रतिनिधित्व अजूनही कमी आहे.

सामाजिक रूढी, घरगुती बंधने, आर्थिक दुर्बलता आणि राजकीय पक्षांचा कमकुवत पाठिंबा हे या प्रतिनिधित्वाच्या मर्यादेचे प्रमुख कारणे आहेत.

परंतु, जागतिक माध्यमे, स्वयंसेवी संघटना, आणि महिला चळवळींमुळे मुस्लिम महिलांच्या राजकीय सहभागात वाढ झाली आहे.

विविध राज्यांनी महिलांना आरक्षण देऊन पुढाकार घेतला आहे, उदाहरणार्थ महाराष्ट्रात ३३ टक्के आरक्षण आहे, ज्यामुळे स्थानिक पातळीवरील मुस्लिम महिलांचे सहभाग वाढविण्यास मदत झाली आहे. परंतु, अधिक जागरूकता, सामाजिक पाठिंबा आणि शैक्षणिक सुधारणांशिवाय मुस्लिम महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व त्यांच्या पूर्ण क्षमतेने वाढवणे कठीण आहे. त्यामुळे या क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी बहुआयामी प्रयत्नांची गरज आहे.

**इतिहासातील प्रभावी मुस्लिम महिला नेतृत्व**

संविधान सभेत मुस्लिम महिला सदस्यांची संख्या खूप कमी होती. परंतु बेगम अजाज रसूल या एकमेव मुस्लिम महिला सदस्य होत्या ज्यांनी मसुदा समितीत मौलिक भूमिका बजावलीबेगम अजाज रसूल.

दुर्गाबाई देशमुख या प्रसिद्ध महिला नेत्यांनी महिलांच्या हक्कांसाठी काम केले, जिथे त्यांनी मुस्लिम महिलांच्या सामाजिक व शैक्षणिक मागण्यांना पाठिंबा दिला.

या महिला नेत्यांनी मुस्लिम महिलांसाठी सामाजिक सुधारणांसाठी वकीली केली आणि संविधानाच्या निर्मितीत महिलांच्या हक्कासाठी आवाज उठवला.

**मुस्लिम महिलांना येणाऱ्या सामाजिक-सांस्कृतिक अडचणी**

मुस्लिम महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी आव्हाने मोठी आहेत :

मुलींची साक्षरता कमी असणे या अडचणींमध्ये मुख्य आहे, ज्यामुळे त्यांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात संधी मिळण्यास अडथळे येतात.

घरातील व धार्मिक प्रतिबंध, विशेषतः परदा प्रथेच्या कारणाने महिलांसाठी खुले सामाजिक संवाद मर्यादित होतो, ज्यामुळे त्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि सामाजिक सहभाग कमी होतो.

आर्थिक स्वावलंबनाचा अभाव देखील मोठे आव्हान आहे कारण बऱ्याच मुस्लिम महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याची संधी मिळत नाही.

तंत्रज्ञान, आर्थिक साधने आणि नेतृत्वासाठी आवश्यक संसाधनांची कमतरता असल्यामुळे त्यांचे राजकीय आणि सामाजिक नेतृत्व सूक्ष्म होते. शिवाय, राजकीय पक्षांकडून अपल्या पाठिंब्याचा अभाव असून, अनेकदा मुस्लिम महिलांचा आवाज कमी आढळतो.

या अडचणींवर मात करण्यासाठी शिक्षण, आर्थिक सशक्तीकरण, सामाजिक प्रतिबंध दूर करणे आणि राजकीय पक्षांच्या अधिक पाठिंब्याची गरज आहे, ज्यामुळे मुस्लिम महिलांचे प्रतिनिधित्व आणि सशक्तीकरण होईल.

**कायदे आणि न्यायालयीन निर्णय**

भारतीय संविधान व कायद्यानुसार मुस्लिम महिलांना अनेक आर्थिक, सामाजिक व कुटुंबिक हक्क दिले गेले आहेत, जे न्यायालयीन निर्णयांनी अधिक बळकट झाले आहेत.

instantaneous triple talaq या प्रथेवर निर्बंध घालणारा कायदा (२०१९) महिला मुक्तीसाठी विशेष महत्वाचा ठरला या कायद्याने मुस्लिम महिलांना अचानक व अत्यंत तलाकापासून सुरक्षा मिळाली आहे.

अनेक सुप्रीम आणि उच्च न्यायालयीन निर्णया मुस्लिम महिलांच्या आर्थिक, सामाजिक अधिकारांना अधोरेखित केलं.

न्यायालयांनी स्पष्ट केले आहे की तलाकशुदा महिलांना त्यांच्या पतींकडून भरणपोषण (maintenance) व मुलांच्या काळजी (custody) बाबतीत न्यायालयीन संरक्षण मिळावे, ज्यामुळे त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुरक्षित राहील.

१९८५ च्या शाह बानो केस मध्ये सुप्रीम कोर्टाने हे ठरवले की दंड प्रक्रिया संहितेची धारा १२५ सर्व महिलांसाठी लागू आहे आणि मुस्लिम महिलांना देखील या अंतर्गत समान भरणपोषणाचा दावा करण्याचा हक्क आहे. पुढील निर्णयांमध्ये ही भूमिका मजबूत झाली असून, मुस्लिम महिला (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम, १९८६ आणि संबंधित कायदे, न्यायालयीन प्रक्रियेद्वारे महिलांच्या अधिकारांचे संरक्षण करतात.

**मुस्लिम महिलांसाठी सशक्त शुभारंभासाठी उपाय**

शिक्षण आणि कौशल्य विकास वाढवण्यावर विशेष भर देऊन महिलांना शैक्षणिक व व्यावसायिक ज्ञान प्राप्त करून देणे आवश्यक आहे. आर्थिक स्वावलंबनासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम आणि स्वरोजगार योजनांचा विस्तार करावा, ज्यामुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र बनण्याची संधी मिळेल.

राजकीय नेतृत्वात महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे आणि आरक्षणाच्या माध्यमातून अधिक संधी उपलब्ध कराव्यात.

सामाजिक आरोग्य, मानसिक आरोग्य आणि सुरक्षिततेशी संबंधित जागरूकता अभियान राबवून महिलांच्या जीवनमानात सुधारणा करणे गरजेचे आहे.

तसेच, धार्मिक व सामाजिक रूढींपेक्षा सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी कार्यशाळा, चर्चासत्रे व जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करावे, ज्यामुळे महिलांना त्यांच्या अधिकारांची जाणीव होईल आणि समाजात त्यांचे स्थान अधिक मजबूत होईल.

**निष्कर्ष**

भारतीय संविधान Muslim महिलांना समानता आणि न्याय यांची हमी देतो, मात्र सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांत त्यांचे प्रतिनिधित्व अजूनही कमी आहे. instantaneous triple talaq या प्रथेवर निर्बंध घालणारा मुस्लिम महिला (विवाह अधिकार संरक्षण) अधिनियम २०१९ हा या महिलांसाठी एक महत्त्वाचा कायदेशीर टप्पा आहे, ज्याने त्यांच्या न्याय आणि स्वातंत्र्याचा सन्मान वाढविला. अनेक सुप्रीम कोर्ट आणि उच्च न्यायालयीन निकालांनी मुस्लिम महिलांचे आर्थिक, सामाजिक आणि कुटुंबिक अधिकार अधोरेखित केले आहेत, ज्यात maintenance आणि custody बाबतीतील संरक्षण

विशेष महत्वाचे आहे. शाह बानो केस १९८५ ने देखील मुस्लिम महिलांना त्या काळातील अनेक अन्यायांपासून वाचा दिली होती. तथापि, या कायदेशीर सुधारणा आणि फैसल्यांच्या विरोधात अजूनही सामाजिक आणि धार्मिक पातळीवरील अडथळे असले तरी सतत काम करून आणि जनजागृती करून मुस्लिम महिलांचे सशक्तीकरण साधणे आवश्यक आहे. त्यांच्या अधिकारांना पूर्वपदवी देण्यासाठी समाजाचे सर्वांगीण सहकार्य आणि राजकीय इच्छाशक्ती आवश्यक आहे. अशा प्रकारे मुस्लिम महिलांचा विकास आणि समानतेची हमी पूर्ण करण्यासाठी कायदा, समाज आणि शासन एकत्र येऊन काम करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

**संदर्भ :**


१. वर्मा, आर. पी. (२०२३). भारत में मुस्लिम महिलाएं और लैंगिक न्याय. श्री पब्लिशर्स एंड डिस्ट्रीब्यूटर्स
२. भारतीय संसद. (२०१९). मुस्लिम महिला (विवाह अधिकार संरक्षण) अधिनियम, २०१९. https://www.indiacode. nic.in/bitstream/123456789/11564/2/H2019-20.pdf
३. मलिक, इ. (२०२०). Rights of Muslim Women. ऑक्सफोर्ड यूनिवर्सिटी प्रेस.
४. कौर, र. (२०२५, जुलाई २०). मुस्लिम महिलाएं लोकसभा में चुनौतियों से जूझ रही हैं. नवभारत टाइम्स. https://navbharattimes.indiatimes. com/india/only-18-muslim-women-have-reached-lok-sabha.
५. झा, पी. (२०२४). मुस्लिम महिला सामाजिक आर्थिक स्थिति : एक आलोचनात्मक अध्ययन. भारतीय सामाजिक विज्ञान जर्नल, १२(३), ४५-६०.
६. सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया. (१९८५). शाह बानो बनाम संघ लोक सेवा आयोग (न्यायालयीन निर्णय).
७. खान, मी. (२०१९). मुस्लिम महिलाओं के विवाह और तलाक अधिकार. इंडियन लॉ रिव्ह्यू, १०(१), १०२-११०.
८. भारतीय महिला आयोग. (२०२२). मुस्लिम महिलाओं की स्थिति और सुरक्षाhttps://wcd.nic.in/sites/default/files/MuslimWomen StatusReport2022.pdf.


■■■

# संविधान कलम ३७१ आणि
# विदर्भ विकास मंडळ

❒ **डॉ. रायन त्र्यंबकराव महाजन**
महिला अध्ययन आणि विकास केंद्र,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

भारताचे संविधान भारतीयांनीच तयार करावे यामागे एक विशिष्ट हेतु होता तो म्हणजे भारतीय जनतेचे एकसमान हित साध्य करणे होय. परकीयांकडून जर भारतीय संविधानाची निर्मिती केली तर भारतीयांच्या हितांचे रक्षण होणार नाही. संविधानामध्ये अंतर्भूत असणाऱ्या तरतुदी स्वतः मध्ये एक तत्वज्ञान आहे. ९ डिसेंबर १९४६ ते २६ नोव्हेंबर १९४९ हा संविधानाचा प्रवास एक सक्षम संविधान निर्माण करून देशाला प्रजासत्ताक करणारा होता. २६ जानेवारी १९५० ला भारत प्रजासत्ताक होऊन आणि वसाहतीक कायद्याच्या बेड्यातून मुक्त होत होता. भारतीय संविधानाच्या अमलबजावणीने भारत स्व अस्तित्व आणि विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे. भारत हा राज्यांचा संघ आहे हे कलम १ मध्ये दर्शविल्या गेले आहे.[१] राज्यांच्या विकासासाठी आणि त्यानुसरून कायदे बनवण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांचा संविधानात समावेश करण्यात आला आहे. सध्या प्रजासत्ताक भारतात २८ घटकराज्य आणि ९ केंद्रशाषित प्रदेश अस्तित्वात आहे. प्रत्येक राज्य स्वतःचे अस्तित्व भारतीय पटलावर टिकवून आहे. मात्र काही मोठ्या राज्यांना विकेंद्रीत करून नवीन राज्याची निर्मिती करणे काळाची गरज आहे. उदा. उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, बिहार, पश्चिम बंगाल. या राज्यांच्या विकेंद्रीकरणा मागील उद्देश म्हणजे विकासाचा असमतोल होय. मोठ्या राज्यातील काही प्रदेशांवर सरकारचे फारसे लक्ष जात नसल्यामुळे तो प्रदेश मागासलेला असतो. त्यापैकी एक म्हणजे विदर्भ होय. त्यावेळी गोविंदभाई श्रॉफ यांनी १९७४ ला शासनावर आरोप करत घटनेच्या ३७१ (२) या कलमानुसार मराठवाडा आणि विदर्भ या दोन मागास प्रदेशांसाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळांची स्थापना करावी अशी मागणी केली.

विदर्भ प्रदेशाला एक स्वतःचा इतिहास आहे. ब्रिटिशांच्या काळापासून विदर्भ प्रदेशाची फरफट होत आहे. राज्यकर्त्यांना वाटेल त्या राज्यात या प्रदेशाचा समावेश करण्यात आला. १९०३ पर्यंत वऱ्हाडचा प्रदेश हा निजामांकडे होता. नंतर या प्रदेशाला मध्यप्रांतात सामील करण्यात आला. १९५६ च्या राज्यपुनर्रचना कायद्यानुसार हा प्रदेश मुंबई राज्याला जोडण्यात आला. १९६० ला द्विभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन गुजरात आणि महाराष्ट्र राज्याची निर्मिती करण्यात आली. त्यावेळी महाराष्ट्र राज्यात विदर्भाचा समावेश करण्यात आला. संविधानाच्या कलम ३७१ मध्ये महाराष्ट्र व गुजरात या राज्यांबाबत विशेष तरतूद करण्यात आली आहे.

कलम ३७१ ते ३७१(जे) या कलमांमध्ये भारतातील काही राज्यांना विशेष तरतुदी देण्यात आल्या आहे. संविधानाच्या कलम ३७१ महाराष्ट्र व गुजरात या राज्यांबाबत विशेष तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र किंवा गुजरात या राज्यांबाबत काढलेल्या आदेशाद्वारे राष्ट्रपतीला पुढील गोष्टीसाठी राज्यपालावर कोणतीही विशेष जबाबदारी सोपविण्याची तरतूद करता येईल (क) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र किंवा, यथास्थिति, सौराष्ट्र, कच्छ व उर्वरित गुजरात यांच्यासाठी स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करून, त्यांपैकी मंडळाच्या कामकाजाचा अहवाल दरवर्षी राज्य विधानसभेसमोर ठेवला जाईल अशी तजवीज करणे. (ख) सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी निधीचे समन्याय वाटप करणे आणि (ग) सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त सर्व क्षेत्रांबाबत तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पर्याप्त सेवा व राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीची पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्याय व्यवस्था करणे.[२]

वैधानिक विकास महामंडळ हे महाराष्ट्र राज्य सरकारने १९९४ मध्ये स्थापन केलेले मंडळ आहे. राज्याचा समतोल विकास व्हावा तसेच संपूर्ण राज्यात निधी आणि संधीचे समान वितरण व्हावे यासाठी तत्कालीन सरकारने या मंडळाची स्थापना केली होती. महाराष्ट्रात विदर्भ विकास मंडळ या एकच मंडळाची स्थापना केली नसून, त्यावेळी सोबत दोन मंडळांची निर्मिती करण्यात आली होती. त्यात मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र अशी करण्यात आली होती. श्री. यशवंतराव चव्हाण जेव्हा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले तेव्हा

त्यांनी विदर्भाला न्याय मिळेल असे आश्वासन दिले होते. मुंबई राज्य पुनर्रचना विधेयक १७ मार्च १९६० रोजी मांडल्या गेले. त्यावर त्यांनी विविधांगी अंगाने चर्चा केली. या चर्चेदरम्यान कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या भागांना नव्या महाराष्ट्रात न्याय कसा मिळणार असे अनेक प्रश्न उपस्थित केले. त्यास उत्तर देतांना मा. श्री. यशवंतराव चव्हाण म्हणाले की, आपल्याला सर्व विभागात एकजिनसी महाराष्ट्र निर्माण करावयाचा आहे. हा विचार ठरलेला आहे ही प्रतिज्ञा एका पक्षाची नव्हे तर तुम्हा आम्हा सर्वांची आहे.[३]

संविधान निर्मात्यांच्या प्रयत्नाचे फलस्वरूप म्हणून ३७१ कलम आले आहे. या कलमा संदर्भात यशवंतराव चव्हाण म्हणतात की मी याच संदर्भात हेही पण सांगू इच्छितो की, जेव्हा हे कलम तयार झाले तेव्हा द्विभाषिक अस्तित्वात नव्हते. ते मूळ कलम महाराष्ट्राच्या रचनेकरिता तयार केले गेले होते. नंतर द्विभाषिक आले. त्यात कच्छ, सौराष्ट्र आदींचा उल्लेख आला. ३७१ हे कलम नागपूर ॲग्रीमेंटला लीगल व्हॅलिडिटी देण्याच्या हेतूनी आणले गेले आहे. यामध्ये घालण्यात आलेले जे शब्दप्रयोग आहेत ते कॉन्स्टिट्यूशनल आहेत आणि सरकारने तीच भाषा आपल्या पॉलिसी स्टेटमेंटमध्ये वापरलेली आहे.[४]

यशवंतराव चव्हानांनी नागपूर करारातील तरतुदींवर विचार केला होता. त्या म्हणजे विदर्भ आणि मराठवाडा यांच्या विकासाला गती येण्याकरिता व्यवस्थेवर विचार त्यानंतर शिक्षणाची म्हणजे तांत्रिक आणि इतर शिक्षणाच्या व्यवस्थेचा प्रश्न समाधानकारकरितीने सोडविला गेला पाहिजे, म्हणजे त्याची सरकारने काळजी घेतली पाहिजे. तिसरा मुद्दा सरकारी नोकरांचा होता. त्यांना सरकारी नोकरीत योग्य प्रमाणात वाव मिळाला पाहिजे हा हेतू त्यामध्ये होता. याशिवाय आणखीही एक अट अशी होती की, त्या भागात विकासाची गती कशी आहे याचा एक अहवाल या सभागृहाला मिळाला पाहिजे. त्यांनी आपल्या विधिमंडळातील भाषणात म्हटले होते की नागपूर कराराचे पहिले पाऊल हे संविधानाच्या ३७१ कलमाप्रमाणे स्ट्यूट्युटरी बोर्ड निर्माण करणे हे होय. आणि त्याप्रमाणे स्टॅट्युटरी बोर्ड निर्माण करण्याचे आश्वासन आणि धोरण सरकारने स्वीकारल्यानंतर यात आता ज्या ज्या अडचणी निर्माण होत आहेत त्या अडचणी सोडविण्याकरिता ३७१ कलमचा कितपत उपयोग होतो हे आपणाला पाहिले पाहिजे.[५] यशवंतराव चव्हानांनी वैधानिक विकास मंडळाविषयी आणि त्याच्या

उपयुक्तेविषयी सकारात्मक विचार करतात.

**महामंडळांच्या स्थापनेचा उद्देश**

द्विभाषिक मुंबई राज्याचे राज्यपूनर्रचणा विधेयकद्वारे राज्याचे जेव्हा विकेंद्रीकरण करण्यात आले तेव्हा विदर्भ आणि मराठवाडा महाराष्ट्राला जोडण्यात आला होता. त्यावेळी त्यांना विकास व साधनसंपत्तीच्या समान वाटप करण्याचे आश्वासन देण्यात आलं होतं. महाराष्ट्र निर्मिती झाल्यावर सर्व भागांचा समान विकास होईल, अशी अपेक्षा वर्तवण्यात आली होती. पण राज्य स्थापनेला अनेक वर्ष होऊनही विदर्भ आणि मराठवाड्याचा इतर भागांच्या तुलनेत विकास झाला नव्हता. या दोन्ही भागाच्या विकासासाठी पुरेसा निधी मिळत नसल्याची येथील जनतेची आणि स्थानिक  नेत्यांची ओरड होती. त्यावेळचे गोंदियाचे तत्कालीन आमदार गौरीशंकर नागापुरे आणि मराठवाड्याचे गोविंदभाई श्रॉफ यांसारख्या नेत्यांनी विकास महामंडळांची मागणी लावून धरली. महाराष्ट्र राज्य सरकारने १९८३ मध्ये दांडेकर समितीची स्थापना केली. या समितीच्या अहवालात विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राच्या विकासाचा एकूण अनुशेष ३ हजार १८६ कोटींचा दर्शवला आणि त्यात विदर्भाचा अनुशेष सर्वाधिक असल्याचं नमूद केले होतं. तत्कालीन महाराष्ट्र राज्य सरकारने हा अहवाल लागू केला नाही. दांडेकर समितीच्या शिफारशीनुसार, १९९४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी राष्ट्रपतींच्या आदेशाने या मंडळांची स्थापना केली. विकास महामंडळाच्या माध्यमातून मागास भागातल्या सिंचनाच्या समस्येवर काम सुरू झालं. निधी मिळत नसल्याची तक्रार होत होत्या. वैधानिक विकास महामंडळाची स्थापना घटनात्मक तरतुदीनुसार करण्यात आली आहे. त्यामुळे त्याला वैधानिक दर्जा प्राप्त झाला आहे. या मंडळांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींचा समावेश असतो. या मंडळावरील अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवड ही राज्यपालांमार्फत केली जाते

**विदर्भ विकास मंडळाचा राजकीय पेच**

१९४९ च्या सरकारी निर्णयानुसार, विदर्भ आणि मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी विकास मंडळाचा स्थापना करण्यात आली. ही जी मंडळं तयार करण्यात आली होती त्याची जबाबदारी राष्ट्रपतींनी राज्यपालांवर सोपवली होती. या भागांत जो अनुशेष निर्माण झाला होता तो भरून काढण्यासाठी

निधीची तरतूद करण्याचे निर्देश राज्यपाल सरकारला देत असत. त्यानुसार राज्य सरकारला तितका निधी द्यावाच लागतो. या महामंडळाच्या माध्यमातून मागास भागातील शेती, ग्रामीण विकास, सिंचन, ऊर्जा, आरोग्य, मूलभूत सुविधा या कामांना प्राधान्य दिलं जात होत. पण, प्रत्यक्षात विकास करण्याचं काम महामंडळांचं नसतं, तर कोणत्या ठिकाणी किती अनुशेष आहे, त्यासाठी किती निधी लागेल याचा अभ्यास करून त्याचा अहवाल राज्यापालांना द्यायचा असतो आणि त्यानुसार राज्यपाल राज्यसरकारला निर्देश देतात.

या विकास महामंडळांची मुदत ३० एप्रिल २०२० ला संपली होती. उद्धव ठाकरे सरकारनं या महामंडळांना मुदतवाढ दिलेली नसल्यामुळे विरोधी पक्षात असलेल्या भाजप पक्षानी महामंडळांना मुदतवाढ देण्याचा मुद्दा रेटला होता. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत ही मागणी केली होती. त्यानंतर आघाडी सरकारनं अगदी शेवटच्या दिवशी घेतलेल्या बैठकीत या महामंडळांना मुदतवाढ देण्याची घोषणा केली. शिंदे सरकारनं ही मुदतवाढ रद्द करून, नव्यानं या महामंडळांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव केंद्राकडे प्रस्ताव पाठवण्याचा निर्णय घेतला होता. विरोधी पक्षात असतांना महामंडळांच्या मुदतवाढीसाठी भाजप पक्ष सकारात्मक होता. मात्र आता केंद्रात आणि राज्यात सरकार दोन्हीकडे सत्तेत असताना अद्यापही महामंडळांची पुनर्गठन का होत नाही? हा प्रश्न मात्र अनुत्तीर्ण आहे. सद्य अस्तित्वात असलेले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी ठरवले तर दिल्लीत जाऊन विदर्भ विकास महामंडळाची मुदतवाढीचा प्रस्तावाला मान्यता मिळवून आणू शकतात. विदर्भाच्या प्रश्नावर मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक असून या वैधानिक विकास मंडळाला जीवंत करून विदर्भाला न्याय मिळवून देईल.

**विदर्भ वैधानिक विकास मंडळाची सद्यस्थिती**

विदर्भ वैधानिक विकास महामंडळाची मुदत ३० एप्रिल २०२०ला संपली आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात महामंडळांना मुदतवाढ दिलेली नव्हती. मात्र त्या सरकारने शेवटच्या बैठकीत मुदतवाढीचा निर्णय घेतला. स्वतंत्र विदर्भ राज्याचे समर्थक श्री. नितीन रोंघे आणि विदर्भ विकास मंडळाचे माजी तज्ज्ञ सदस्य डॉ. कपिल चंद्रायण यांनी विदर्भ वैधानिक विकास महामंडळाला मुदतवाढ देण्यात यावी यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात

जनहित याचिका (PIL NO. 07/2021) दाखल केली आहे. विकास महामंडळांची पुनर्स्थापना करण्याची मागणी या याचिकेतून करण्यात आली आहे. वैधानिक विकास मंडळाची सद्यस्थिती संदर्भात विदर्भ राज्याचे समर्थक श्री. नितीन रोंघे यांच्याशी मौखिक चर्चा केली असता या याचिके संदर्भात असे कळले की, कोर्टात सर्व सुनावणी झाल्या आहे. यावर फक्त शेवटचा निर्णय बाकी आहे.

या महामंडळांचं महत्त्व लक्षात घेतल तर असे दिसून येते की मागास भागांना चांगला फायदा होतो. महामंडळांच्या वार्षिक अहवालातून कुठे अनुशेष बाकी आहे आणि कुठे विकासाची निकड आहे याची आकडेवारी माहिती होते. महामंडळाची दरवेळी मुदतवाढीचा प्रश्न नेहमीच उद्‌भवतो. विदर्भाचे वेगळे राज्य निर्माण केल्यास हा मुदतवाढीचा प्रश्नच उरणार नाही. इतर राज्याप्रमाणे विदर्भ स्वतःचे स्वतंत्र धोरण निर्माण करेल. इतर राज्यांप्रमाणे केंद्राकडून विशेष अनुदान प्राप्त होईल. कोणतेही धोरण मुंबई केंद्रित होणार नाही. या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासासाठी विदर्भाच्या वेगळ्या राज्याची निर्मिती काळाची गरज आहे.

**संदर्भ सूची**

१. भारताचे संविधान, संचालक शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित (द्विभाषी), सातवी आवृत्ती, २०१४, पृ.२

२. कित्ता, आठवी आवृत्ती, २०२५, पृ. १६५

३. डॉ. प्रतिभा पाटील, प्रा. अंबादास आरगडे (संपा.), युगपुरुष यशवंतराव चव्हाण, एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद, २०१४, पृ. ४५६

४. डॉ. व्ही.डी. खोब्रेकर (संपा.), यशवंतराव चव्हाण विधिमंडळातील निवडक भाषणे (१९४६-१९६२), व्यलुम १, यशवंतराव प्रतिष्ठान मुंबई, ई-बूक प्रथमावृत्ती, २००६, पृ. १४०

५. कित्ता. पृ. १४१

■ ■ ■

# अल्गोरिदमिक प्रशासन आणि भारतीय संविधान : कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवाधिकार आणि न्यायव्यवस्थेपुढील आव्हाने

❐ गणेश चोंडेकर
❐ डॉ. मंगेश जी. आचार्य
(मार्गदर्शक)

**सारांश (Abstract) :**

प्रस्तुत शोधनिबंध भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार आणि २०२५ मधील कृत्रिम बुद्धिमत्तेचा (Artificial Intelligence - AI) वाढता प्रभाव यांच्यातील आंतरसंबंधांचे सखोल विश्लेषण करतो. संगणकीय प्रणालींची वाढती स्वायत्तता आणि संविधानातील 'मानवी प्रतिष्ठा' (Human Dignity) यांत निर्माण होणारा तणाव हा या अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. या निबंधात 'जनरेटिव्ह AI' (उदा. ChatGPT) च्या मर्यादांचे तांत्रिक व कायदेशीर विश्लेषण केले आहे. तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या शायरा बानो (प्रकट मनमानी), लफ्टनंट कर्नल नितिशा (अप्रत्यक्ष भेदभाव) आणि कौशल किशोर (मूलभूत अधिकारांची समांतर अंमलबजावणी) या तीन ऐतिहासिक निकालांच्या आधारे, AI च्या नियमनासाठी 'अल्गोरिदमिक योग्य प्रक्रियेची' (Algorithmic Due Process) गरज अधोरेखित केली आहे.

**१. प्रस्तावना :**

भारतीय संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून ती एक सामाजिक क्रांतीची सनद आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत स्पष्ट केले होते की, संविधानाचा उद्देश केवळ सत्ता नियंत्रित करणे नसून, भारतीय समाजातील विषमतेच्या उतरंडी मोडून काढणे हा आहे. १९५० साली जेव्हा संविधान स्वीकारले गेले, तेव्हा 'यंत्र' हे मानवाचे सेवक होते. परंतु, २०२५ मध्ये 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (AI) निर्णय प्रक्रियेत मानवाची जागा घेत आहे.

आज राज्यसंस्था (State) अनेक प्रशासकीय निर्णय-जसे की रेशन वाटप, गुन्हेगारांचा शोध, किंवा नोकरीसाठी निवड हे 'अल्गोरिदम'च्या आधारे घेत

आहे. या पार्श्वभूमीवर, एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतोः ज्या यंत्राला संविधानातील 'समानता' आणि 'बंधुता' या मूल्यांची जाणीव नाही, त्या यंत्राकडे आपण मानवी हक्कांचे निर्णय सोपवू शकतो का? हा निबंध याच प्रश्नाचा शोध घेतो.

**२. 'स्टोकॅस्टिक पॅरेट' जनरेटिव्ह AI आणि सत्याचा विपर्यास :**

सामान्यतः असा समज असतो की ChatGPT सारखी 'जनरेटिव्ह AI' मॉडेल्स ही ज्ञानाची भांडारे आहेत. मात्र, तांत्रिकदृष्ट्या हे सत्य नाही. ही यंत्रे 'लार्ज लँग्वेज मॉडेल्स' (LLMs) या तत्त्वावर काम करतात.

**२.१ संभाव्यतेचा खेळ (Probabilistic Mechanism)**

ही मॉडेल्स कोणत्याही तथ्यांची पडताळणी करत नाहीत, तर ती केवळ 'पुढचा शब्द काय असेल?' (Next Token Prediction) याची सांख्यिकीय शक्यता (Probability) तपासतात. ज्याप्रमाणे एखादा पोपट मानवी बोलण्याची हुबेहूब नकला करतो, परंतु त्याला त्या शब्दांचा अर्थ माहित नसतो, तसेच ही मॉडेल्स भाषेची रचना (Syntax) अचूक वापरतात, पण त्यातील सत्यता (Semantics) समजू शकत नाहीत. तज्ज्ञ याला Stochastic Parrot (संभाव्यतेवर बोलणारा पोपट) असे संबोधतात.

**२.२ न्यायदानातील धोका : माता विरुद्ध एव्हिअंका (Mata v. Avianca) खटला**

या तांत्रिक मर्यादेचा सर्वात मोठा फटका अमेरिकेतील एका खटल्यात दिसून आला. २०२३ मध्ये, एका वकिलाने ChatGPT चा वापर करून न्यायालयात युक्तिवाद सादर केला. ChatGPT ने अशा काही खटल्यांचे संदर्भ दिले, जे अस्तित्वातच नव्हते (Hallucination). AI ने केवळ कायदेशीर भाषेशी जुळणारे शब्द एकत्र करून खोटे संदर्भ (Fake Citations) तयार केले होते.

**भारतीय संदर्भ :** भारतीय संविधानाच्या कलम २१ नुसार, प्रत्येक नागरिकाला 'योग्य कायदेशीर प्रक्रियेचा' (Due Process of Law) अधिकार आहे. जर न्याययंत्रणेत अशा 'भ्रामक' (Hallucinating) तंत्रज्ञानाचा वापर झाला, तर ते संविधानाच्या आत्मघातासमान ठरेल.

तथापि, याच तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर 'प्रोजेक्ट भाषिणी' (Project

Bhashini) द्वारे होत आहे. कलम २९ नुसार भाषिक अल्पसंख्याकांचे रक्षण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. AI च्या भाषांतर क्षमतेचा वापर करून, आज ग्रामीण भागातील नागरिक सरकारी योजनांची माहिती आपल्या मातृभाषेत मिळवत आहेत. म्हणजेच, AI हे भाषेसाठी 'पूल' (Bridge) आहे, परंतु तथ्यांसाठी (Facts) ते एक 'अविश्वासार्ह निवेदक' (Unreliable Narrator) आहे.

**३. प्रकट मनमानी (Manifest Arbitrariness) आणि 'ब्लॅक बॉक्स' समस्या**

भारतीय संविधानाचे कलम १४ हे 'समानतेचा अधिकार' देते. परंतु, आधुनिक AI प्रणाली या अधिकाराला आव्हान देत आहेत.

**३.१ 'ब्लॅक बॉक्स' अल्गोरिदम**

'डीप लर्निंग' (Deep Learning) या प्रगत AI प्रकारात, मशीन स्वतःचे नियम स्वतः शिकते. अनेकदा, या प्रक्रियेत निर्णय कसा घेतला गेला, हे खुद्द त्या अल्गोरिदम बनवणाऱ्या इंजिनिअर्सनाही सांगता येत नाही. याला तांत्रिक भाषेत 'ब्लॅक बॉक्स' म्हणतात. जर सरकारने एखादा निर्णय (उदा. कर्ज नाकारणे) दिला आणि त्याचे कारण विचारले असता संगणकाने हा निर्णय दिला आहे, कारण माहित नाही असे उत्तर मिळाले, तर ते लोकशाहीत मान्य होऊ शकत नाही.

**३.२ कायदेशीर विश्लेषण : शायरा बानो खटल्याचा अन्वयार्थ**

२०१७ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने शायरा बानो विरुद्ध भारत सरकार (तिहेरी तलाक प्रकरण) या खटल्यात 'प्रकट मनमानी' (Manifest Arbitrariness) हे नवीन तत्त्व मांडले. न्यायालयाने स्पष्ट केले की, जर राज्याची कोणतीही कृती तर्कहीन (Irrational) असेल किंवा तिला पुरेसे निर्धारित तत्त्व (Adequate Determining Principle) नसेल, तर ती कृती कलम १४ चे उल्लंघन करते.

जेव्हा एखादा अल्गोरिदम कारणमिमांसा न देता नागरिकाचे हक्क हिरावून घेतो, तेव्हा ती कृती 'प्रकट मनमानी' ठरते. त्यामुळे, प्रशासनात वापरल्या जाणाऱ्या AI प्रणालींमध्ये 'स्पष्टीकरण देण्याची क्षमता' (Explainability) असणे हे केवळ तांत्रिक गरज नसून ती एक संविधानिक अपरिहार्यता आहे.

**४. अप्रत्यक्ष भेदभाव (Indirect Discrimination): नितिशा तत्त्व**

AI प्रणाली मानवी पूर्वग्रह (Human Bias) जशाच्या तसे शिकतात. भारतात हे पूर्वग्रह जाती, धर्म आणि लिंगाशी निगडीत आहेत.

**४.१. लफ्टनंट कर्नल नितिशा विरुद्ध भारत सरकार (२०२१)**

या ऐतिहासिक निकालात सर्वोच्च न्यायालयाने 'अप्रत्यक्ष भेदभाव' (Indirect Discrimination) ही संकल्पना स्पष्ट केली. भारतीय लष्कराने महिलांना बढती देण्यासाठी जे निकष लावले होते, ते वरकरणी 'तटस्थ' (Neutral) होते. परंतु, त्याचा परिणाम (Impact) महिलांवर अन्यायकारक होत होता. न्यायालयाने सांगितले की, केवळ नियमांचा हेतू चांगला असून चालत नाही, तर त्याचा समाजातील परिणामांवर काय परिणाम होतो, हे पाहणे गरजेचे आहे.

**४.२. समग्र वेदिका आणि वगळले जाणारे नागरिक (Exclusion Errors)**

तेलंगणा सरकारने 'समग्र वेदिका' हे AI आधारित अल्गोरिदम वापरून रेशन काड्र्सची तपासणी केली. या अल्गोरिदमने 'वीज वापर' हा निकष लावला, ज्यांचे विजेचे बिल जास्त, ते श्रीमंत.

हा निकष वरकरणी तटस्थ वाटतो. परंतु, गरिबांच्या वस्त्यांमध्ये अनेक कुटुंबे एकच मीटर वापरतात (Shared Meter). त्यामुळे त्यांचे एकत्रित बिल जास्त आले आणि अल्गोरिदमने त्यांना 'श्रीमंत' समजून रेशन बंद केले.

नितिशा निकालाच्या चष्म्यातून पाहिल्यास, हे AI अल्गोरिदम असंवैधानिक ठरते. कारण त्याने भारतातील गरिबीच्या सामाजिक वास्तवाकडे दुर्लक्ष करून 'अप्रत्यक्ष भेदभाव' केला. यामुळे हजारो गरिबांना अन्नाच्या अधिकारापासून (कलम २१) वंचित राहावे लागले.

**५. डिजिटल युगातील प्रतिष्ठा आणि कौशल किशोर निकाल**

आज 'डीपफेक' (Deepfake) तंत्रज्ञानामुळे कोणाचाही खोटा व्हिडिओ बनवून चारित्र्यहनन करणे शक्य झाले आहे. यात सरकारचा थेट सहभाग नसतो, तर खाजगी व्यक्ती (Private Actors) गुन्हेगार असतात.

**५.१. आडवे हक्क (Horizontal Application of Rights)**

पारंपारिक कायद्यानुसार, मूलभूत अधिकार हे फक्त राज्याविरुद्ध (State)

वापरता येतात. परंतु, २०२३ च्या 'कौशल किशोर विरुद्ध उत्तर प्रदेश' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने एक क्रांतिकारक बदल केला. न्यायालयाने हे मान्य केले की, कलम १९ (अभिव्यक्ती स्वातंत्र्य) आणि कलम २१ (जगण्याचा अधिकार) हे खाजगी व्यक्तींच्या विरोधातही लागू होऊ शकतात.

**५.२. डीपफेक आणि मानवी प्रतिष्ठा**

जर एखाद्या समाजकंटकाने AI वापरून एका महिलेचा अश्लील डीपफेक व्हिडिओ प्रसारित केला, तर आता पीडित व्यक्ती केवळ सायबर कायद्यांतर्गत तक्रार न करता, संविधानाच्या कलम २१ अंतर्गत 'जगण्याच्या आणि प्रतिष्ठेच्या अधिकाराचा' भंग झाल्याचा दावा करू शकते. यामुळे सोशल मीडिया कंपन्या आणि AI प्लॅटफॉर्म्सवर जबाबदारी निश्चित करणे शक्य झाले आहे.

अलीकडेच दिल्ली उच्च न्यायालयाने 'अनिल कपूर विरुद्ध सिम्पली लाइफ इंडिया' प्रकरणात अभिनेत्याचा आवाज आणि चेहरा AI द्वारे वापरण्यास मनाई केली. हा निकाल 'व्यक्तिमत्व अधिकारांना' (Personality Rights) संविधानाच्या कलम २१ चा भाग मानतो.

**६. निष्कर्ष :**

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. आंबेडकर यांनी इशारा दिला होता की, संविधान कितीही चांगले असले, तरी ते राबवणारी माणसे वाईट असतील तर ते वाईट ठरेल. AI च्या युगात हे विधान थोडे बदलण्याची गरज आहे. संविधान कितीही चांगले असले, तरी ते राबवणारे कोड्स (Codes) जर अपारदर्शक आणि भेदभावपूर्ण असतील, तर न्याय अशक्य आहे.

**या संशोधनातून खालील निष्कर्ष समोर येतात :**

**१. पारदर्शकता :** शायरा बानो याच्या तत्त्वानुसार, प्रत्येक AI निर्णयाचे कारण (Reasoned Decision) नागरिकाला मिळणे आवश्यक आहे. 'ब्लॅक बॉक्स'ला प्रशासनात स्थान नाही.

**२. समानता :** नितिशा तत्त्वानुसार, AI अल्गोरिदमचे 'इम्पॅक्ट ऑडिट' (Impact Audit) होणे गरजेचे आहे, जेणेकरून 'समग्र वेदिका' सारख्या चुका टाळता येतील.

**३. मानवी हस्तक्षेप (Human-in-the-Loop) :** पूर्णपणे स्वयंचलित निर्णयप्रक्रिया धोकादायक आहे. प्रत्येक निर्णयाच्या अंमलबजावणीपूर्वी मानवी अधिकाऱ्याची विवेकबुद्धी (Human Discretion) असणे संविधानात्मक गरज आहे.

शेवटी, तंत्रज्ञान हे साध्य नसून साधन आहे. संविधानातील 'न्याय, स्वातंत्र्य आणि समता' या साध्यांपर्यंत पोहोचण्यासाठी AI ला संविधानाच्या चौकटीतच राहावे लागेल.

**संदर्भ ग्रंथसूची :**


1. Nitisha v. Union of India, (2021) SCC Online SC 261.
2. Shayara Bano v. Union of India, (2017) 9 SCC 1.
3. Kaushal Kishor v. State of Uttar Pradesh, (2023) 4 SCC 1.
4. Mata v. Avianca, Inc., No. 22-cv-1461 (S.D.N.Y. June 22, 2023).
5. Amnesty International, Analysis of Samagra Vedika and Exclusion Errors in Telangana, 2024.
6. Identity Fraud Report 2024, Sumsub (Data on 280% rise in Deepfakes).


■■■

# मानवी हक्क आणि भारतीय संविधान

❑ **सतीश शंकरराव राठोड**
सहाय्यक प्राध्यापक
नवप्रतिभा महाविद्यालय, मिरची बाजार, नागपूर

मानवी हक्काचा संघर्ष प्राचीन काळापासून सुरू आहे. सुरुवातीला तो राज्याच्या अंतर्गत चालू होता. राज्यांच्या सीमांच्या आत जुलूम आणि शोषणाविरुद्ध लढले जात होते. इंग्लंडमध्ये मध्ययुगीन काळात मॅग्ना कार्टा सनद ही मानवी हक्काचे कागदोपत्री स्वरूप म्हणून उदयास आले. नंतर आधुनिक काळात हॉब्ज, लॉक, रुसो व थॉमस पेन यासारख्या अनेक विचारवंतांनी आणि तत्त्वज्ञांनी मानवी हक्काच्या कल्पना मांडल्या किंवा त्या कल्पना घेऊन ते उदयाला आले. विविध देशांनीही त्यांच्या त्यांच्या संविधानामध्ये मानवी हक्काचे मूर्त रूप धारण केले. अमेरिकेच्या संविधानातील मानवी हक्काचे जगातील अनेक देशांनी दुसऱ्या महायुद्धानंतर संविधानाचे मूलभूत स्वातंत्र्य किंवा मूलभूत हक्क इत्यादी विविध नावांनी मानवी हक्काचा समावेश केला. भारतीय संविधानाने ही नागरिकांसाठी मूलभूत हक्काची तरतूद केली.

**मानवी हक्काची व्याख्या -**

अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाने १९७८ मध्ये धोरण दस्ताऐवजात पुढील प्रमाणे मानवी हक्काची व्याख्या केली,

मनमानी अटक आणि तुरुंगवास, छळ, अन्यायी खटले क्रूर, असामान्य शिक्षा, गोपनीयतेवर आक्रमण यापासून स्वातंत्र, अन्न, निवारा, आरोग्य सेवा, शिक्षण आणि विचार भाषण आणि सरकारमध्ये सहभागाचे स्वतंत्र भारतात मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ मध्ये मानवी हक्काची व्याख्या केली. मूलभूत हक्क आणि आंतरराष्ट्रीय करारामध्ये अंतर्भूत असलेल्या भारतीय संविधानाने हमी दिलेली व्यक्तीचे स्वातंत्र समानता आणि व्यक्तीच्या प्रतिष्ठेची संबंधित अधिकारअशी केली आहे.

१० डिसेंबर १९४८ च्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेचा ठराव २१७ अ द्वारे स्वीकारलेल्या आणि घोषित केलेल्या मानवी हक्काच्या सार्वत्रिक घोषणेच्या प्रस्तावनेद्वारे मानवी हक्काचे स्पष्ट स्पष्टीकरण दिले आहे प्रस्तावनेचा प्रारंभिक भाग असा आहे.

ज्या अर्थी मानवी कुटुंबातील सर्व सदस्यांच्या अंतर निहीत प्रतिष्ठेची आणि समान अविभाज्य हक्काची ओळखही ही जगास स्वातंत्र्य, न्याय आणि शांतीचा पाया आहे, तर मानवी हक्काचा अवमान आणि उल्लंघन यामुळे मानव जातीच्या विवेकाला त्रासदायक अशी क्रूर कृत्य घडली आहे. आता अशा जगाचे आगमन झाले आहे, तिथे मानवाला भाषण आणि श्रद्धा भयमुक्त स्वातंत्र्य आणि सर्वोच्च महत्त्वकांक्षा यापासून मुक्तता मिळेल ही सामान्य लोकांची सर्वोच्च आकांक्षा म्हणून घोषित करण्यात आली आहे. माणसाला शेवटचा उपाय म्हणून अत्याचार आणि दडपशाही विरुद्ध बंड करण्यास भाग पाडले जाऊ नये. कायद्याच्या राज्याद्वारे मानवी हक्काचे संरक्षण केले पाहिजे.

या घोषणेचा मसुदा तयार करणाऱ्या मानवी हक्काच्या प्रवर्तक नोबेल शांतता पुरस्कार विजेत्या रेने कसिस यांनी याला युगप्रवर्तक दस्तावेज म्हटले.

भारतीय संविधानाच्या वेगवेगळ्या कलमांमध्ये विचारात घेतलेले मानवी हक्क खालील प्रमाणे आहे-

**समतेचा अधिकार -**

समतेचा अधिकार हा संविधानाच्या कलम १४ ते १८ मध्ये प्रदान केलेला एक महत्त्वाचा अधिकार आहे. तो इतर सर्व हक्काचा आणि स्वातंत्र्याचा मुख्य पाया असून तो पुढील बाबीची हमी देतो.

◆ सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत समानता-संविधानाच्या कलम १६ मध्ये नमूद आहे की सरकार रोजगाराच्या बाबतीत कोणाशीही भेदभाव करू शकत नाही.

◆ अस्पृश्यता निर्मूलन-कलम १७ मध्ये अस्पृश्यतेची प्रथा नष्ट केली आहे. अस्पृश्यता प्रथा पाळणे हा गुन्हा आहे आणि असे करणाऱ्या कोणालाही कायद्याने शिक्षा होऊ शकते.

◆ संविधानाच्या कलम १८ मध्ये राज्याला कोणत्याही पदव्या देण्यास मनाई आहे.

**स्वातंत्र्याचा अधिकार -**

भारतीय संविधानात कलम १९ ते २२ मध्ये स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे. वैयक्तिक हक्काची हमी देण्याच्या दृष्टिकोनातून जो संविधानाच्या निर्मात्यांनी महत्त्वाचा मानलेला आहे. हा चार मुख्य कायद्याचा समूह असून कलम १९ मधील स्वातंत्र्याचा अधिकार खालील सहा स्वातंत्र्याची हमी देतो.

◆ भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य जे एखाद्या व्यक्तीला उपक्रमामध्ये सहभागी होण्यास सक्षम करते.

◆ शस्त्राशिवाय शांततेने एकत्र येण्याचे स्वातंत्र्य

◆ संघटना किंवा सहकारी संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य

◆ भारताच्या संपूर्ण प्रदेशात मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य

◆ भारताच्या कोणत्याही प्रदेशात भ्रमण करण्याचे व वास्तव्याचे स्वातंत्र्य

◆ कोणताही व्यवसाय किंवा उद्योग करण्याचे स्वातंत्र्य

**शोषणाविरुद्ध अधिकार**

कलम २३ व २४ मध्ये दिलेल्या शोषणा विरुद्धच्या अधिकारात दोन तरतुदी आहेत. एक म्हणजे मानवी तस्करी आणि बिगारी बंद करणे आणि दोन १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना कारखाने खानी इत्यादी धोकादायक कामावर ठेवणे बंद करणे बालमजुरी ही संविधाना च्या गाभा आणि तरतुदीचे घोर उल्लंघन मारले आहे.

**धर्म स्वातंत्र्याचा अधिकार**

कलम २५ ते २८ मध्ये धर्म स्वातंत्र्याचा अधिकार भारतातील सर्व नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य प्रदान करतो. या अधिकाराचा उद्देश भारतातील धर्मनिरपेक्षतेचे तत्व टिकून ठेवणे आहे. संविधानानुसार राज्यासमोर सर्व धर्म समान आहे व कोणत्याही धर्माला दुसऱ्या धर्मापेक्षा प्राधान्य दिले जाणार नाही. नागरिकांना त्यांच्या आवडीचा कोणताही धर्म उपदेश आचरण आणि प्रसार करण्याचे स्वातंत्र्य आहे.

**जीविताचा अधिकार -** संविधानाने विविध वाचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकाराची हमी दिली आहे. ज्यामध्ये हे अधिकार लागू करण्यासाठी आणि अमलात आणण्यासाठी विशिष्ट तरतुदीचा उल्लेख केला

आहे.

**सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क**

भारतात अनेक भाषा धर्म संस्कृती आहेत संविधानाने अनुछेद २९ ते ३० मध्ये अल्पसंख्यांकांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत. ज्या समाजाची स्वतःची संस्कृती भाषा व लिपी आहे त्यांना ते जतन करण्याचा व विकसित करण्याचा अधिकार आहे. राज्य किंवा राज्य अनुदानित संस्थांमध्ये प्रवेशासाठी कोणत्याही नागरिकांशी भेदभाव केला जाऊ शकत नाही.

**संविधानिक उपायाचा अधिकार**

संविधानिक उपायाचा अधिकार (अनुछेद ३२ ते ३५) नागरिकांना मूलभूत हक्काच्या बाबतीत न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार देतो.

**राज्य धोरण आणि मानवी हक्काची मार्गदर्शक तत्वे**

राज्याच्या कर्तव्यामध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायासह सामाजिक व्यवस्था सुरक्षित करणे, सर्व असमानता कमी करणे आणि दूर करणे (अनुच्छेद ३८), नागरिकांना पुरुषांना आणि स्त्रियांना समान उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा अधिकार सुनिश्चित करणे. (अनुच्छेद ३९ क) राज्याच्या हिताच्या पूर्ततेसाठी सामुदायिक संसाधनाच्या मालकीचे वितरण आणि नियंत्रण (अनुच्छेद ३९ ख), संपत्ती आणि उत्पादन साधनाचे सामायिक हितास हानी होईल असे केंद्रीकरण रोकने (अनुछेद ३९ ग ), पुरुष आणि महिला दोघांनाही समान कामासाठी समान वेतन सुनिश्चित करणे (अनुच्छेद ३९ घ) मजुरीसह श्रमाचा गैरवापर रोखणे (अनुच्छेद ३९ ड) बालविकाससुनिश्चित करणे (अनुच्छेद ३९ च) सामान न्याय आणि मोफत कायदेशीर मदत सुनिश्चित करणे (अनुच्छेद ३९ क) ग्रामीण लोकशाहीचे संघटन (अनुच्छेद ४०), बेरोजगारी वृद्धापकाळातील आजार आणि अपंगत्वाच्या बाबतीत काम शिक्षण आणि सार्वजनिक मदतीचा अधिकार प्रदान करणे (अनुच्छेद ४१) जगातील मानवीय परिस्थितीची तरतूद (अनुच्छेद ४२) राहणीमान वेतन आणि योग्य जीवनमान (अनुच्छेद ४३) उद्योगाच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग सुनिश्चित करणे (अनुच्छेद ४३ क), संपूर्ण देशासाठी समान नागरी संहितेची तरतूद (अनुच्छेद ४४), सहा वर्षापेक्षा

कमी वयाच्या मुलांसाठी बालसंगोपन आणि शिक्षणाची तरतूद, राज्य सहा वर्षाची होईपर्यंत सर्व मुलांना बालपणीचे संगोपन आणि शिक्षण प्रदान करण्याचा अधिकार करेल. (अनुच्छेद ४५) लोकांच्या दुर्बल घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितांना प्राधान्य देणे आणि अन्याय आणि सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करणे. (अनुछेद ४६) राहणीमान उंचावणे पोषण आणि सार्वजनिक आरोग्याची पातळी सुधारणे आणि मादक पेय आणि अमली पदार्थावर बंदी घालने (अनुच्छेद ४७), पशुपालन आणि शेतीची वैज्ञानिक पुनर्रचना (अनुच्छेद ४८), पर्यावरण जंगले आणि वन्यजीवांचे संवर्धन (अनुच्छेद ४८), कलात्मक आणि ऐतिहासिक महत्त्वाचे स्मारके आणि गोष्टींचे संरक्षण (अनुच्छेद ४९), न्यायपालिकेचे कार्य कार्यकारी मंडळापासून वेगळे करणे (अनुच्छेद ५०) आणि आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला प्रोत्साहन देणे (अनुच्छेद ५१), भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वे राज्याला अशा प्रकारे कार्य करण्यास मार्गदर्शन करतात, की जेणेकरून भारतातील नागरिकांचे मानवी हक्क सुरक्षित राहतील.

**निष्कर्ष :**

अशाप्रकारे भारतीय संविधानात समाविष्ट केलेली मूलभूत हक्क हे खऱ्या अर्थाने मानवी हक्क आहेत. मानवी हक्क हे मानवी जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. मनुष्य म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येक प्राण्याला मानवी हक्क स्वाभाविकपणे मिळालेले असतात, ते समाजात सातत्याने मिळाले पाहिजेत. भारतीय राज्यघटनेने स्वीकारलेली लोकशाही व्यवस्था हीच मानवी हक्काच्या संरक्षणाची सर्वोत्तम हमी होय. मानवी हक्काच्या रक्षणामध्ये लोकशाही व्यवस्थेचे महत्त्वाचे योगदान आहे. आपल्या देशातील लोकशाही व्यवस्थेमुळे मुक्त व स्वतंत्र समाजाची जडणघडण नागरिकांना प्राप्त झालेली आहे व्यक्ती स्वातंत्र्य पक्ष पद्धती व राजकीय पक्षांची कार्यशैली राज्यघटनेने निर्माण केलेल्या वेगवेगळ्या राजकीय संस्था या सर्वांमुळे भारतीय नागरिकांना आपल्या मूलभूत हक्काचा चांगल्या पद्धतीने लाभ घेता येणे शक्य आहे. प्रत्येक नागरिकांनी मूलभूत हक्काचा लाभ घेताना कर्तव्य पार पाडण्याची तयारी ठेवली तरच मानवी हक्काचे योग्य प्रकारे रक्षण होऊ शकते, जे संयुक्त राष्ट्रांनी मानवी हक्काच्या सार्वत्रिक घोषणापत्रात आणि कालांतराने झालेल्या

नंतरच्या आंतरराष्ट्रीय करारामध्ये घोषित केले आहे. भारतीय संविधान हे मानवी हक्काचे संरक्षण करण्यासाठी आणि प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेची स्वातंत्र्याची समतेची खात्री करण्यासाठी राष्ट्राच्या वचन पद्धतीचे प्रतीक आहे. भारतातील मानवी हक्काची उत्क्रांती सामाजिक न्याय आणि समानता साध्य करण्यासाठी सतत प्रयत्नशील असल्याचे प्रतिबिंबित करते . भारतीय संविधानाच्या भाग तीन मध्ये समाविष्ट केलेली मूलभूत हक्क राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वासह एक व्यापक चौकट देशाला प्रदान करतात. जी केवळ वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण करत नाही, तर राज्याला त्याच्या विकासात्मक धोरणामध्ये मार्गदर्शन देखील करते. ICCPR, UDHR आणि ICESCR सारख्या आंतरराष्ट्रीय प्रभावांनी ही चौकट आणखी समृद्ध केली आहे. भारताचा मानवी हक्काबद्दलचा दृष्टिकोन जागतिक मानकांशी सुसंगत राहतो याची खात्री भारतीय संविधानाने होते.

**संदर्भसूची :**


१. प्राध्यापक पाटील व्ही.वी. मानवी हक्क, के सागर प्रकाशन, पुणे, २००९.
२. मिसाळ चंद्रकांत, मानवी हक्क व जबाबदाऱ्या, व्हिजन प्रकाशन, पुणे, २०१५.
३. जोशी श्रीनिवास, मानवी हक्क, प्रशांत प्रकाशन, जळगाव, २०१२.
४. भा.ल. भोळे, भारतीय संविधान पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.


■■■

# महिला सक्षमीकरण, लिंगभाव समानता आणि पोषण आरोग्याची धोरणे - एक परस्परसंबंधी विश्लेषण

❐ **डॉ. प्रेरणा रत्नपारखी**
सहयोगी प्राध्यापक, गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख
सी.पी. अँड बेरार महाविद्यालय, महाल, नागपूर

**सारांश :**

या संशोधनात महिला सक्षमीकरण, लिंगभाव समानता आणि पोषण निर्देशक यांमधील संबंधांचा अभ्यास करण्यात आला. महिला सक्षमीकरण निर्देशांक (WEI), लिंगभाव समानता निर्देशांक (GLI), शरीर वस्तुमान निर्देशांक (BMI) आणि ॲनिमिया दर यांचा सांख्यिकीय विश्लेषणाद्वारे Pearson सहसंबंध पद्धतीने अभ्यास करण्यात आला. विश्लेषणात WEI आणि BMI यांचा उच्च व लक्षणीय सकारात्मक सहसंबंध आढळला ($r = 0.72, p<0.001$), ज्यावरून असे दिसून येते की महिलांचे शिक्षण, उत्पन्न आणि निर्णयप्रक्रियेमधील सहभाग वाढल्यास त्यांची पोषण स्थिती सुधारते. GEI आणि BMI यांच्यातही मजबूत सकारात्मक सहसंबंध ($r = 0.72, p < 0.001$) आढळला, ज्यामुळे लिंग-समान कुटुंबांमध्ये आरोग्यसेवा व पोषक आहाराचा समान प्रवेश मिळतो, हे स्पष्ट होते. दुसरीकडे, ॲनिमिया दराचा WEI ($r = 0.56$)आणि GEI ($y = -0.57$) या दोन्हीशी नकारात्मक सहसंबंध आढळला, ज्यावरून सक्षमीकरण व लिंग-समानता असलेल्या समाजात ॲनिमियाचे प्रमाण कमी असल्याचे दिसते. हे निष्कर्ष पूर्वीच्या अभ्यासांशी सुसंगत असून शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि लिंग-संवेदनशील धोरणे कुपोषण कमी करण्यात प्रभावी ठरतात. सर्वांगीणपणे, या अभ्यासातून हे निष्पन्न होते की महिला सक्षमीकरण आणि लिंगभाव समानता ही पोषण सुधारण्यासाठी केवळ सामाजिक संकल्पना नसून वैज्ञानिकदृष्ट्या आवश्यक घटक आहेत.

**मुख्य शब्द :** महिला सक्षमीकरण निर्देशांक, लिंगभाव समानता निर्देशांक,

पोषण निर्देशांक, BMI (शरीर वस्तुमान निर्देशांक), ॲनिमिया दर

**१. प्रस्तावना :**

महिला सक्षमीकरण आणि लिंगभाव समानता हे आधुनिक समाजव्यवस्थेतील सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि शाश्वत विकासाचे मूलभूत स्तंभ मानले जातात. महिलांचा सर्वांगीण विकास जितका दृढ असेल, तितके कुटुंब, समाज आणि राष्ट्राचे आरोग्य व पोषण निर्देशांक अधिक सक्षम होतात. विशेषतः पोषण आरोग्याच्या बाबतीत महिलांची भूमिका केवळ लाभार्थी म्हणून नाही तर कुटुंबातील प्राथमिक निर्णयकर्ती म्हणूनही अत्यंत महत्त्वाची आहे.

भारत सरकारने महिलांचे आणि बालकांचे पोषण स्तर उंचावण्यासाठी PPSHAN Abhiyaan (2018), National Nutrition Mission, आणि Integrated Child Development Services (ICDS) यांसारखे अनेक उपक्रम राबवले आहेत. या कार्यक्रमांचे उद्दिष्ट कुपोषण कमी करणे, पोषणाबाबत जागरूकता वाढवणे आणि महिलांना आरोग्यविषयक निर्णयांमध्ये सक्षम करणे हे आहे (Osabohien & Matthew 2024).

संशोधनाने स्पष्ट केले आहे की महिलांचे शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य, उत्पन्नावर नियंत्रण आणि कुटुंबातील निर्णयाधिकार यांचा त्यांच्या स्वतःच्या तसेच मुलांच्या पोषण स्थितीवर थेट आणि सकारात्मक परिणाम होतो (Sinha et al, 2017). जिथे महिलांना संसाधनांवर अधिक प्रवेश आणि निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे, तिथे अन्नसुरक्षा, कुटुंबातील पोषण व्यवस्थापन आणि मुलांचे आरोग्य अधिक चांगले आढळते (Burroway, 2016).

भारतामध्ये अजूनही लिंग विषमता शिक्षण, रोजगार, उत्पन्न वितरण आणि आरोग्यसेवांमध्ये प्रकर्षाने दिसून येते. विशेषतः ग्रामीण भागात महिलांच्या अन्नवाटप, आरोग्य सेवांवरील प्रवेश आणि आर्थिक स्वायत्ततेमध्ये मर्यादा असल्याने कुपोषणाचे प्रमाण तुलनेने जास्त दिसते. याउलट, शहरी भागातील साक्षरता, रोजगार संधी आणि सामाजिक जागरूकता वाढल्यामुळे महिलांचा पोषण स्तर अधिक सुधारलेला आढळतो (Tiwari, 2013).

लिंग समानतेचा उच्च निर्देशांक असलेल्या राज्यांमध्ये मातृ आरोग्य, बालक पोषण आणि एकूणच पोषण-संबंधित आरोग्य निर्देशक लक्षणीयरीत्या

चांगले असल्याचे विविध अभ्यासांतून दिसून आले आहे (Rao, 2006). त्यामुळे महिलांना शिक्षण, आरोग्यसेवा, आर्थिक सहभाग आणि सामाजिक निर्णयांमध्ये समान संधी देणे हे राष्ट्रीय पोषण धोरणाच्या यशासाठी अनिवार्य ठरते.

अशा परिस्थितीत महिला सक्षमीकरण, लिंगभाव समानता आणि पोषण आरोग्य यांचा परस्परसंबंध अभ्यासणे अत्यंत आवश्यक आहे. या संबंधांचे सखोल विश्लेषण केल्याने केवळ विद्यमान समस्यांची ओळख होत नाही, तर भविष्यातील पोषण धोरणे, समावेशक विकास कार्यक्रम आणि महिला कल्याण योजनांसाठी अधिक प्रभावी मार्गदर्शक तत्वे तयार करता येतात.

**२. संशोधन उद्दिष्टे** (Objectives)

● महिलांचे शिक्षण, उत्पन्न आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग यांचा पोषण निर्देशांकावर होणारा प्रभाव तपासणे.

● लिंग समानता निर्देशांक (GEI) आणि पोषण निर्देशक (BMI) यांतील संबंध तपासणे.

● महिला सक्षमीकरण व लिंगभाव समानतेच्या माध्यमातून पोषण सुधारण्यासाठी धोरणात्मक सूचना देणे.

**३. संशोधनाची गृहीतके (Research Hypotheses)**

● महिला सक्षमीकरण निर्देशांक (WEI) आणि पोषण निर्देशक (BMI ॲनिमिया दर) यांच्यात कोणताही महत्त्वपूर्ण संबंध नाही.

● लिंग समानता निर्देशांक (GEI) आणि पोषण निर्देशक (BMI), ॲनिमिया दर) यांच्यात कोणताही प्रभाव किंवा संबंध नाही.

**४. संशोधन पद्धती (Research Methodology)**

**४.१. संशोधनाचा प्रकार (Type of Research)**

या संशोधनाचा प्रकार वर्णनात्मक (Descriptive) आणि परस्परसंबंधात्मक (Correlational) आहे. महिला सक्षमीकरण, लिंगभाव समानता आणि पोषण आरोग्य यांतील संबंधांचा अभ्यास करण्यासाठी मात्रात्मक (Quantitative) संशोधन पद्धती अवलंबण्यात आली.

**४.२. संशोधन रचना (Research Design)**

या अभ्यासासाठी Survey Research Design निवडण्यात आला.

तथ्य संकलनासाठी संरचित प्रश्नावली (Structured Questionnare) वापरून प्राथमिक (Primary) माहिती गोळा करण्यात आली. तसेच, अभ्यासाचा व्यापक संदर्भ समजण्यासाठी NFHS-5 (2019-21) मधील काही पूरक दुय्यम (Secondary) डेटा वापरण्यात आला.

**४.३ नमुना व अभ्यासक्षेत्र (Samp;e and Area of Study)**

**तक्ता क्र. १ नमूना व अभ्यास क्षेत्रे**

| **घटक** | **तपशील** |
|---|---|
| नमुना आकार (Sample Size) | १०० प्रतिसादकर्ते (५० महिला, ५० पुरुष) |
| नमुना निवड पद्धती<br>(Sampling Method) | स्तरीकृत याहच्छ निवड<br>(Stratified Random Sampling) |
| अभ्यास क्षेत्र (Area of Study) | नागपूर जिल्ह्यातील उपनगरीय भाग |

**४.४. तथ्य संकलन पद्धती (Data Collection Methoda)**

**१. प्राथमिक डेटा** (Primary Data)

● संरचित प्रश्नावलीच्या माध्यमातून महिलांची शैक्षणिक पातळी, उत्पन्न, निर्णयक्षमतेतील सहभाग, पोषण सवयी आणि आरोग्य स्थिती याविषयी माहिती संकलित केली.

● अधिक सखोल माहिती मिळवण्यासाठी मुलाखती आणि गटचर्चा (Focus Group Discussions) आयोजित करण्यात आल्या.

**२. दुय्यम डेटा (Secondary Data)**

NFHS-5 (2019-21) **अहवाल**

Ministry of Women and Child Development आणि POSHAN Abhiyaan चे दस्तऐवज

**संबंधित संशोधन लेख आणि शैक्षणिक जर्नल्स**

**४.५. अभ्यासातील चल (Variables of the Study)**

**तक्ता क्र . २ अभ्यासातील चल**

| **चलाचा प्रकार** | **चलाचे नाव** | **मापन स्तर** | **स्पष्टीकरण** |
|---|---|---|---|
| स्वतंत्र चल (Independent Variables) | महिला सक्षमीकरण निर्देशांक (WEI) | Interval (O-1 Scale) | शिक्षण, उत्पन्न, निर्णयाधिकार |
| | लिंगभाव समानता | Interval | सामाजिक- |

| | | | |
|---|---|---|---|
| | निर्देशांक (GEI) | (O-1 Scale) | सांस्कृतिक समानतेचा स्तर |
| अवलंबित चल (Dependent Variables) | पोषण आरोग्य निर्देशक | Ratio | BMI, ॲनिमिया दर, अन्नसुरक्षा |
| नियंत्रक चल (Control Variables) | शिक्षण, वय, कौटुंबिक उत्पन्न | Ordinal/Ratio | जनसांख्यिक वैशिष्ट्ये |

**४.६. संशोधन साधने (Researcg Tools)**

१. प्रश्नावली (Questionnare) - ५ विभागः वैयक्तिक माहिती, शिक्षण, आर्थिक स्थिती, निर्णयसहभाग, पोषण सवयी

२. Likert Scale (५-बिंदू मापन) - १ = अत्यंत असहमत ते ५ = अत्यंत सहमत

३. BMI Calculator व HB Test Sata - पोषण-संबंधित निर्देशक मोजण्यासाठी

**४.७. तथ्य विश्लेषण पद्धती (Data Analysis Techniques)**

**तक्ता क्र. ३ : संकलित माहिती एुलशश्र आणि डझडड च्या साहाय्याने विश्लेषित करण्यात आली.**

| विश्लेषण प्रकार | वापरलेली पद्धत | उद्देश |
|---|---|---|
| वर्णनात्मक सांख्यिकी (Descriptve Statstics) | Mean, SD | नमुन्याचे स्वरूप जाणून घेण्यासाठी |
| सहसंबंध विश्लेषण (Correlation Analysis) | Pearsonr | WEI, GEI व BMI यातील संबंध शोधण्यासाठी |
| महत्त्व चाचणी (Significance Testing) | p-value (<0.05) | संबंधांचे सांख्यिकीय महत्त्व तपासण्यासाठी |

**४.८. मर्यादा (Limitations of the Study)**

नमुना आकार केवळ १०० प्रतिसादकर्त्यांपुरता मर्यादित असल्याने निष्कर्ष सार्वत्रिकीकरणात मर्यादा येऊ शकतात.

काही प्रश्नांची उत्तरे उत्तरदात्यांच्या वैयक्तिक मतांवर आधारित असल्याने Self-report Testing होण्याची शक्यता आहे.

५. सांख्यिकीय विश्लेषण आणि गृहीतकांची तपासणी (Statistical

Analysis and Hypothesis)

या विभागात महिला सक्षमीकरण निर्देशांक (WEI), लिंगभाव समानता निर्देशांक (GEI), BMI, इचख आणि ॲनिमिया दर यांतील परस्परसंबंधांचा अभ्यास १०० नोंदीवर Pearsons Correlation च्या साहाय्याने करण्यात आला आहे. अभ्यासाचा मुख्य उद्देश होताः

**५.१. WEI (महिला सक्षमीकरण निर्देशांक ) आणि पोषण निर्देशकांतील संबंध तपासणे**

महिला सक्षमीकरण निर्देशांक (WEI), BMI (Body Mass Index) आणि ॲनिमिया दर (%) या तीन चलांसाठी (Varaiables) मूलभूत वर्णनात्मक सांख्यिकी (Descriptive Statircs) दिली आहे

**तक्ता ४ : वर्णनात्मक सांख्यिकी (Descriptive Statistice)**

| चल (Variable) | किमान (Min) | कमाल (Max) | सरासरी (Mean) | मानक विचलन (SD) |
|---|---|---|---|---|
| WEI | 0.35 | 0.89 | 0.64 | 0.14 |
| BMI | 17.2 | 29.6 | 22.8 | 2.9 |
| ॲनिमिया दर (%) | 18 | 48 | 33.2 | 8.4 |

**तक्ता ५ : Pearson's Correlation Matrix**

| चल (Varible) | WEI | BMI | Anaemia Rate |
|---|---|---|---|
| WEI | | 0.72 | -0.56 |
| BMI | | 0.72 | 1 0.40 |
| Anaemia Rate | -0.56 | 0.40 | 1 |

**१. WEI आणि BMI मधील Pearson's**

r = 0.72

**निष्कर्ष :** अत्यंत मजबूत व सकारात्मक रेषीय संबंध

**विश्लेषण :** महिला सक्षमीकरणाचे स्तर जितके जास्त, तितका BMI चा मूल्य अधिक आढळतो. हे दर्शवते की शिक्षण, आर्थिक नियंत्रण आणि निर्णयाधिकार असलेल्या महिलांचे पोषण स्तर सुधारलेले असतात.

२. WEI **आणि ॲनिमिया दर** (%) **मधील Pearson's**

r = -0.56

**निष्कर्ष :** मजबूत नकारात्मक संबंध

**विश्लेषण :** WEI मध्ये वाढ होत गेल्यावर ॲनिमिया दरात लक्षणीय घट होते. निर्णयाधिकार असलेल्या महिलांना अधिक पोषक आहार, आरोग्यसेवा आणि सूक्ष्म पोषकतत्त्वे (Micronutrients) मिळतात, त्यामुळे लोहतुटीचे प्रमाण कमी होते.

**३. BMI आणि ॲनिमिया दर (%) मधील Pearson's**

r = + 0.40

**निष्कर्ष :** मध्यम सकारात्मक संबंध

**विश्लेषण :** WEI वाढल्यास ॲनिमियाचा दर काही प्रमाणात वाढताना दिसतो. हे विरोधाभासी वाटू शकते, परंतु काही वेळा BMI जास्त असूनही सूक्ष्म पोषणाची कमतरता राहू शकते.

शून्य गृहीतकाची तपासणी (Null Hypothesis Testion)

**शून्य गृहीतक (Ho) :** WEI आणि पोषण निर्देशक (BMI, ॲनिमिया दर) यांच्यात कोणताही संबंध नाही.

**विश्लेषणानुसार :** दोन्ही चलांमध्ये उच्च आणि सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण सहसंबंध (r = 0.72, r = -0.56) आढळल्याने Ho नाकारले जाते.

**अंतिम निष्कर्ष :** प्राप्त झालेल्या मजबूत सहसंबंध मूल्यांवरून हे स्पष्ट होते की महिला सक्षमीकरणाचा (शिक्षण, उत्पन्न, निर्णयप्रक्रिया) पोषण निर्देशकांवर महत्त्वपूर्ण प्रभाव आहे. त्यामुळे, शून्य गृहीतक (HO) नाकारले जाते. याचाच अर्थ असा की महिला सक्षमीकरण (WEI) आणि पोषण निर्देशक यांच्यात महत्त्वपूर्ण रेषीय संबंध दिसून येतो. थएख मध्ये वाढ झाल्यास चांगले पोषण (उच्च BMI) आणि सुधारित आरोग्य (कमी ॲनिमिया दर) दिसून येते.

**५.२. उद्देश :** GEI (लिंग समानता निर्देशांक) आणि पोषण निर्देशकांतील संबंध तपासणे

**गृहीतक :** लिंग समानता निर्देशांक (GEI) आणि पोषण निर्देशक (BMI ॲनिमिया दर) यांच्यात कोणताही प्रभाव किंवा संबंध नाही.

GEI (लिंगभाव समानता) आणि पोषण निर्देशक (BNI व ॲनिमिया दर) यांच्यातील संबंध तपासण्यासाठी १०० नोंद्यांवर Pearson Correlation लागू केला.

**तक्ता ६ : वर्णनात्मक सांख्यिकी (Dearson Statistics)**

| चल | GEI | BMI | ॲनिमिया दर |
|---|---|---|---|
| GEI | 18 | 35 | 29.2 4.37 |
| BMI | 15.6 | 27.4 | 22.6 2.4 |
| ॲनिमिया दर (%) | 18 | 48 | 33.2 8.4 |

**तक्ता ७ : GEI, BMI आणि ॲनिमिया दरचे Pearson Corretation Matrix**

| चल | GEI | BMI | ॲनिमिया दर |
|---|---|---|---|
| GEI | 1 | 0.695 | -0.570 |
| BMI | 0.695 | 1 | 0.428 |
| ॲनिमिया दर | -0.570 | 0.428 | 1 |

GEI आधारित सांख्यिकीय विश्लेषण

**१. GEI आणि इचख मधील संबंध**

r = +0.695

**निष्कर्ष :** मजबूत सकारात्मक संबंध

**विश्लेषण :** लिंगभाव समानता (GEI) जास्त असलेल्या कुटुंबांमध्ये महिलांना शिक्षण, स्वातंत्र्य, अन्नावर नियंत्रण मिळते, त्यामुळे BMI सुधारतो.

**२. GEI आणि ॲनिमिया दर मधील संबंध**

r = -0.570

**निष्कर्ष :** मजबूत नकारात्मक संबंध

**विश्लेषण :** लिंग समानता जास्त असताना महिलांना पोषक आहार, आरोग्य सेवा आणि सूक्ष्म पोषण मिळते, त्यामुळे ॲनिमियाचे प्रमाण कमी होते.

**३. BMI आणि ॲनिमिया दर मधील संबंध**

r = +0.428

**निष्कर्ष :** मध्यम सकारात्मक संबंध

**विश्लेषण :** BMI जास्त असूनही ॲनिमिया वाढत असल्याचे दिसते, कारण काही वेळा उच्च BMI = उच्च चरबी, परंतु सूक्ष्म पोषक कमी ज्यामुळे ॲनिमिया वाढू शकतो.

**अंतिम निष्कर्ष**

● WEI व GEI हे दोन्ही निर्देशांक पोषण आरोग्यावर अत्यंत महत्त्वपूर्ण प्रभाव टाकतात.

● WEI वाढल्यास BMI सुधारतो आणि ॲनिमिया दर घटतो.

● GEI वाढल्यास महिलांचा BMI वाढतो आणि ॲनिमिया लक्षणीयरित्या कमी होतो.

BMI आणि ॲनिमिया दरातील मध्यम सकारात्मक संबंध दर्शवतो की वजन वाढणे म्हणजे नेहमीच पोषण सुधारणा असे नसते.

शून्य गृहीतक (Ho) नाकारले गेले असून सर्वसाधारण निष्कर्ष असा की सक्षमीकरण आणि लिंग समानता वाढणे हे महिलांच्या पोषण आणि आरोग्य स्थिती सुधारण्यासाठी अत्यावश्यक घटक आहेत.

**५.३. उद्देश :** महिला सक्षमीकरण व लिंगभाव समानतेच्या माध्यमातून पोषण सुधारण्यासाठी धोरणात्मक सूचना देणे.

महिला सक्षमीकरण निर्देशांक (WEI/GEI) आणि पोषण निर्देशक (BMI) व ॲनिमिया दर) यांच्यातील सांख्यिकीय विश्लेषणातून मजबूत व महत्त्वपूर्ण सहसंबंध ($r = +0.70$; $r = -0.57$) आढळल्यामुळे, महिलांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणाचा पोषण स्थितीवर लक्षणीय प्रभाव असल्याचे स्पष्ट होते. या निष्कर्षांच्या अनुषंगाने पुढील धोरणात्मक सूचना प्रस्तावित केल्या आहेत.

### ५.३.१. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण व उत्पन्नवाढ कार्यक्रम

**सूक्ष्म-वित्तपुरवठा व कौशल्यविकास :** महिलांसाठी स्वयं-सहायता गट (SHGs) सूक्ष्म-वित्तपुरवठा योजना आणि लघुउद्योग प्रशिक्षण कार्यक्रम विस्तारण्याची आवश्यकता आहे. पोषण-संवेदनशील शेती (Nutrion-sensitive), अन्न प्रक्रिया, शिवणकाम, उद्योजकता या क्षेत्रांतील प्रशिक्षणामुळे महिलांचे उत्पन्न वाढून त्यांच्या पोषण निर्णयांवर सकारात्मक परिणाम होतो. उदाहरणार्थ, Osabohien & Amtthew (२०२४) यांनी सूचित केले की आर्थिकदृष्ट्या सबल महिलांकडे चांगल्या आहाराची निवड करण्याची क्षमता वाढते.

**निर्णयक्षमतेचे बळकटीकरण :** घरगुती अर्थसंकल्प, अन्न खरेदी, मुलांच्या आरोग्याशी संबंधित निर्णयांत महिलांचा सहभाग वाढवणे आवश्यक आहे.

महिलांची निर्णयक्षमता वाढल्यास कुटुंबातील पोषण गुणवत्ता सुधारते (WEI/GEI)

### ५.३.२. आरोग्य व पोषण शिक्षणाचे एकात्मिकरण

**शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समावेश :** लिंगभाव समानता (Gender Equality), पोषण ज्ञान (Nutritional Literary) आणि आरोग्य जागरूकता यांचा समावेश शिक्षण व्यवस्थेत करणे आवश्यक आहे. यामुळे किशोरवयातच आरोग्यदायी व लिंग-संवेदनशील दृष्टिकोन निर्माण होतो.

**प्रौढ महिलांसाठी विशेष कार्यक्रम :** अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने ॲनिमिया प्रतिबंध, मायक्रोन्यूएिंट शिक्षण, गर्भवती व स्तनदा महिलांसाठी आहार मार्गदर्शन असे कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे. Burroway (2016) यांनी दाखवून दिले की महिलांच्या आरोग्यसेवा प्रवेशात वाढ झाल्यास ॲनिमिया दर कमी होतो.

### ५.३.३. ॲनिमियावर बहुआयामी उपाय योजना

**GEI आधारित प्राधान्यक्रम प्रणाली :** ॲनिमिया कमी करण्यासाठी फक्त लोह-फॉलिक ॲसिड पूरक आहार पुरवणे पुरेसे नसून, कमी लिंगभाव समानता (Low GEI) असलेल्या भागांमध्ये महिला सक्षमीकरण कार्यक्रमांना अधिक प्राधान्य देणे आवश्यक आहे. GEI सुधारला की महिलांच्या आरोग्य निर्देशकांत घट दिसून येते (Tiwari, 2013).

**आरोग्य सेवा व पोषक आहाराचा समान प्रवेश :** महिलांना आरोग्य तपासणी, पोषणपूरक योजना, सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS) यांचा समान व अडथळामुक्त प्रवेश मिळणे आवश्यक आहे. Rao (2006) यांनी दर्शवले की पोषण स्रोतांमध्ये समान प्रवेश मिळाल्यास ॲनिमियासारख्या समस्यांमध्ये घट होते.

### ५.३.४. BMI व्यवस्थापन आणि पोषणाची गुणवत्ता

BMI व वाढता पोषण स्तर ($r = +0.70$) यांचा सकारात्मक संबंध दिसत असला तरी इचख आणि ॲनिमिया यांच्यातील मध्यम सकारात्मक सहसंबंध ($r = +0.40$) हे स्पष्ट करतो की केवळ वजन वाढणे हे चांगल्या पोषणाचे लक्षण नाही. त्यामुळे धोरणांनी पुढील बाबींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे-

● आहारातील वैविध्य (Dietary Diversity)

● हिरव्या भाज्या, प्रथिनयुक्त पदार्थ, आणि मायक्रोन्यूएिंट्सचा समावेश

● ऊर्जा-घन (एपशीसू-वशपीश) पण पोषकतत्व-गरीब अन्नाचे (जंक फूड) कमी प्रमाण

यामुळे पोषण गुणवत्ता सुधारून इचख आणि रक्तातील हिमोग्लोबिन दोन्ही संतुलित राहतात.

**अंतिम निष्कर्ष :**

वरील सर्व धोरणात्मक उपाय दर्शवितात की महिला सक्षमीकरण (WEI/GEI) हे पोषण सुधारण्यासाठी एक मुख्य केंद्रबिंदू आहे. महिलांचे शिक्षण, निर्णयक्षमता, आर्थिक स्वावलंबन, लिंगभाव समानता आणि आरोग्यसेवा प्रवेश यांमध्ये सुधारणा केल्यास इचख वाढतो, ॲनिमिया दर कमी होतो आणि कुटुंबाचा एकूण पोषण स्तर उंचावतो.

**६. निष्कर्षांचे विश्लेषण (Interpretation of Findings)**

अभ्यासातून स्पष्ट झाले की महिला सक्षमीकरण व लिंगभाव समानता ही पोषण आरोग्य उंचावण्यासाठी केंद्रबिंदूची भूमिका बजावतात. महिलांचे शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य, सामाजिक सहभाग आणि घरगुती निर्णयक्षमता यामुळे केवळ त्यांच्या स्वतःच्या नव्हे तर संपूर्ण कुटुंबाच्या पोषण स्थितीत लक्षणीय सुधारणे होते. म्हणूनच, राष्ट्रीय व राज्यस्तरीय पोषण धोरणामध्ये Gender-Sensitive Approach आणि Women-Centric Nutrition Planning समाविष्ट करणे अत्यावश्यक ठरते. संपूर्ण सहसंबंध विश्लेषण दर्शविते की महिला सक्षमीकरण आणि लिंगभाव समानता हे केवळ सामाजिक मूल्य नसून पोषण आरोग्य सुधारण्यासाठी वैज्ञानिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण घटक आहेत. दोन्ही निर्देशांकांची वाढ पोषण गुणवत्तेत सुधारणा घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

**६.१. WEI आणि BMI मधील संबंध :** सहसंबंध विश्लेषणात महिला सक्षमीकरण निर्देशांक (WEI) आणि शरीर वस्तुमान निर्देशांक (BMI) यांच्यात उच्च, स्थिर आणि सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण सकारात्मक सहसंबंध ($r = 0.72$, $p$ 0.001) दिसून आला.

यावरून स्पष्ट होते की महिलांचे शिक्षण, आर्थिक सहभाग, स्वावलंबन

आणि घरगुती निर्णय प्रक्रियेत सक्रियता वाढल्यास त्यांच्या पोषण स्थितीतही सुधारणा होते. हे निष्कर्ष Sinha et al. (2017) यांच्या अहवालाशी सुसंगत आहेत, ज्यात पोषण सुधारणेत महिलांच्या निर्णयक्षमतेची थेट भूमिका अधोरेखित करण्यात आली आहे.

**६.२. GEI आणि पोषण निर्देशकामधील संबंध :** लिंगभाव समानता निर्देशांक (GEI) आणि पोषण निर्देशकांमध्ये (BMI व पोषण गुणवत्ता) सकारात्मक सहसंबंध ($r = 0.69, p < 0.01$) आढळला. याचा अर्थ असा की ज्या कुटुंबांमध्ये लिंग समानता, संसाधनांचे समतोल वाटप आणि आरोग्यविषयक सेवांचा समान प्रवेश उपलब्ध आहे, त्या कुटुंबांमध्ये पोषण निर्देशांक अधिक चांगला नोंदवला जातो. हा निष्कर्ष Rao (2006) यांच्या लिंगभाव-संवेदनशील पोषण विश्लेषणात नमूद केलेल्या निष्कर्षांना समर्थन देतो.

**६.३ ॲनिमिया दर आणि सामाजिक सक्षमीकरणाचा संबंध :** ॲनिमिया दर आणि महिला सक्षमीकरण व लिंगभाव समानता यांच्यांत नकारात्मक सहसंबंध दिसून येतो.

यावरून असे दिसते की ज्या समाजात महिलांना सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक निर्णयांवर अधिक नियंत्रण आहे, तिथे संतुलित आहाराची निवड, आरोग्य सेवांचा वापर आणि पोषणपूरक साधनांचा लाभ अधिक घेतला जातो. परिणामी, ॲनिमिया दर कमी राहतो. Burrowa (2016) यांच्या संशोधनातही समान निष्कर्ष नोंदवले गेले आहेत.

**७. चर्चा (Discussion)**

अभ्यासातील सहसंबंध विश्लेषणाने दर्शविले की WEI आणि पोषण निर्देशकांमध्ये उच्च आणि सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण सकारात्मक संबंध आहे. ज्या महिलांना आर्थिक स्वातंत्र्य, शिक्षण, निर्णयप्रक्रियेत सहभाग, आणि संसाधनांवर नियंत्रण आहे, त्या कुटुंबांमध्ये BMI अधिक संतुलित आणि ॲनिमियाचे प्रमाण कमी आढळले.

हे निष्कर्ष पूर्वीच्या अभ्यासांशी - विशेषतः Burroway आणि Rao (2006) - सुसंगत आहेत, ज्यात लिंगभाव समानता, सामाजिक सहभाग व आर्थिक स्थैर्य हे पोषण सुधारण्याचे महत्त्वाचे घटक असल्याचे सातत्याने नोंदले गेले आहे.

**८. संशोधन निष्कर्ष (Research Conclusion)**

संशोधनातून हे स्पष्ट होते की महिलांचे शिक्षण, आर्थिक उत्पन्न, सामाजिक सहभाग, कुटुंबातील निर्णयाधिकार आणि संसाधनांवरील नियंत्रण वाढवले तर अन्नसुरक्षा, पोषण गुणवत्ता आणि आरोग्य निर्देशांकांमध्ये शाश्वत सुधारणा साधता येते.

कुपोषण आणि ॲनिमिया कमी करण्यासाठी सरकारच्या पोषण योजनांमध्ये लिंगभाव समानता, महिला सक्षमीकरण, आणि पोषण-आधारित प्रशिक्षण कार्यक्रम यांचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे.

**९. धोरणात्मक सूचना (Policy Recommendations)**

**९.१. ग्रामीण पोषण सक्षमीकरण अभियान :** ग्रामीण महिलांसाठी पोषण प्रशिक्षण, आरोग्य शिक्षण, आहार साक्षरता, मायक्रोन्यूट्रिएंट माहिती आणि ॲनिमिया नियंत्रण कार्यक्रम राबविणे. यासाठी अंगणवाडी, SHGs, स्थानिक आरोग्य केंद्रे व स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढविणे आवश्यक.

**९.२. निर्णय घेण्याचे अधिकार Decision-Making Rights :** घरातील आहार नियोजन, खरेदी, अन्नवाटप, संसाधन व्यवस्थापन आणि आरोग्यविषयक निर्णयांमध्ये महिलांचा सहभाग वाढवणे. Women-led Decision-making हा पोषण सुधारण्यात प्रभावी चालक आहे.

**९.३. GEI आधारित मूल्यांकन प्रणाली :** शासकीय पोषण योजनांचे मूल्यमापन Eender Equality Index (GEI) च्या आधारे करणे. लिंगभाव-संवेदनशील पोषण मूल्यांकनासाठी स्वतंत्र चौकट (Fromework) विकसित केल्यास धोरणात्मक सुधारणा अधिक परिणामकारक होऊ शकतात.

**संदर्भ सूची (Referenees) :**


1. Osabohien, R., & Matthew, O. (2024). Nutrition and Sustainable Development Goal 5: Gender Equality. Frontiers in Nutrition.
2. Sinha, A., McRoy, R., & Berkman, B. (2017). Drivers of Change: Examining the Effects of Gender Equality on Child Nutrition. ScienceDirect.
3. Rao, N. (2006). Land Rights, Gender Equality and Household Food Security: The Case of India. Food Policy.
4. Burroway, R. (2016). Empowering Women, Strengthening

Children: A Multi-level Analysis of Gender Inequality and Child Malnutrition. Emerald Publishing.
5. Harris-Fry, H. et al. (2020). The Impact of Gender Equity in Agriculture on Nutritional Status. BMJ Global Health.
6. Tiwari, A.K. (2013). Gender Inequality in Terms of Health and Nutrition in India. ResearchGate.
7. Njuki, J., Eissler, S., & Malapit, H. (2023). A Review of Evidence on Gender Equality, Womens Empowerment, and Food Systems. OAPEN.
8. https://dhsprogram.com/pubs/pdf/FR375/FR375.pdf
9. https://wdcw.ap.gov.in/Schemes/Saksham
10. Sinha, D., et al. (2017). Decision-making Power and Nutritional Outcomes among Women.
11. Burroway, R. (2016). Gender Equality, Social Empowerment and Nutritional Outcomes in Developing Countries.
12. Tiwari, R. (2013). Gender Equality and Nutrition Indicators in India.
13. Rao, V. (2006). Nutrition Access and Womens Health Status.

■ ■ ■

# महिला आणि मानसिक आरोग्य

❒ **डॉ. शिवानी आठल्ये**
गृहअर्थशास्त्र विभाग,
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर

**प्रस्तावना :**

महिलांचे मानसिक आरोग्य हा एक अत्यंत महत्वाचा परंतु दुर्लक्षित राहिलेला विषय आहे. शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य पण तितकेच महत्वाचे आहे. आज आपण २१ व्या शतकात वास्तव्य करीत आहोत. अशा वेळी भारतीय स्त्रीच्या जीवनाचा विचार केल्यास तिचे जीवन भारतीय संस्कृती, पर्यावरण, भौगोलिक रचना यांच्याशी जोडले गेले आहे. आज स्त्रिया अर्थार्जनाकरिता घराबाहेर पडल्या आहेत. स्त्री-पुरुष समानतेबद्दल कितीही चर्चा होत असली तरी महिलांना रुढीच्या व परंपरेच्या प्रथेच्या वर्चस्वाखाली अजूनही दाबले जाते. कामानिमित्य बाहेर जाणे, वाढलेली जबाबदारी, खाण्याच्या अनियमित वेळा, दिवस-रात्रीचे झोपेचे बदलते चक्र, प्रचंड मानसिक ताण, यामुळे होण्याऱ्या शारिरीक समस्या. या सर्वाचा आरोग्यावर परिणाम होतो.

जागतिक आरोग्य संघटना अर्थात (WHO) च्या मते स्त्री व पुरुष यांच्या मानसिक आरोग्यात फरक आहे. हा फरक बहुतांशी त्यांच्या जैविक, मानसिक व सामाजिक फरकाशी संबंधित असू शकतो. उदा. स्त्रियांच्या वेगवेगळया अवस्थांमध्ये होणारे संप्रेरकाचे बदल, जसे पाळी येणे, गर्भधारणा प्रसुती, रजोनिवृत्ती या बदलांना जितके स्त्रियांना सामोरे जावे लागते. तितके पुरुषांना नाही. स्त्री व पुरुषांच्या आयुष्यातील विविध तणाव, नातेसंबंधाकडे बघण्याचा दृष्टीकोन, संवादाची गरज, भावना व्यक्त करण्याची पध्दत यामध्ये फरक असतो. स्त्री आणि पुरुष यांच्या सामाजिक, आर्थिक स्थानातील फरक स्त्रीयांच्या मानसिक आरोग्यात महत्त्वाची भूमिका बजावतो.

मानसिक आरोग्याबद्दल समजून घेतांना आपण (१) मानसिक स्वास्थ (२) मानसिक समस्या (३) मानसिक आजार ह्या गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत.

पूर्वी जीवन नैसर्गिक बाबींशी सुसंवाद साधून होते. पण आज गुंतागुंतीचे झाले आहे. गतिमान झालेले आहे. आपल्या शारीरिक आणि बौध्दीक क्षमतांच्या मर्यादा ओलांडून मन पुढे-पुढे धावत आहे. महत्वाकांक्षा, तीव्र स्पर्धा, एकदुसऱ्यांशी चढाओढ याचे प्रमाण वाढले आहे. हे करत असतांना उघडपणे व्यक्त करण्याची संधी न मिळाल्यास मनाचा कोंडमारा होतो व मानसिक संतुलन बिघडत जीवनातील विविध प्रसंगी व्यक्तींशी कसे समायोजन, समतोल साधते यावरून त्या व्यक्तीचे मानसिक आरोग्य कळून येते.

व्यक्तिला आपले दैनंदिन, वैयक्तिक आणि सामाजिक व्यवहार कार्यक्षमतेने, सुखासमाधानाने आणि आत्मविश्वासपूर्वक करता येणे हे व्यक्तिच्या मानसिक आरोग्याचे प्रमुख लक्षण आहे.

स्व आणि परिस्थिती यामध्ये सुसंवाद निर्माण करणे म्हणजे मानसिक आरोग्य होय.

मानसिक अनारोग्य म्हणजे विषम समायोजन होय जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) च्या व्याख्येनुसार मानसिक आरोग्य म्हणजे :-

(१) व्यक्तिला प्रसंगानुरुप भावना व्यक्त करता येणे. (२) स्वतःच्या व इतरांच्या भावना समजणे. (३) क्षमतांचे आकलन होणे. (४) सहसंवेदना असणे. (५) ताणतणावांना तोंड देण्याची क्षमता असणे. (६) शरीर आणि मन यामध्ये सुसंवाद असणे.

वरील व्याख्यावरुन असे म्हणता येते की,

(१) या सगळ्यामध्ये समतोल साधणे, सुसंवाद साधणे म्हणजे मानसिक स्वास्थ

(२) कोणत्याही तणावाला, परिस्थितीला योग्य पध्दतीने तोंड न देता येणे. यामुळे चिंता, नैराश्य, आत्मविश्वास कमी, संताप, अपराधीपणा, हिंसक वृत्ती या नकारात्मक भावनांमध्ये वाढ. म्हणजे मानसिक समस्या

(३) मानसिक आजार : मानसिक आजारामध्ये व्यक्तिच्या संवेदना विचार, भावना व वर्तन यामध्ये बिघाड होतो व दैनंदिन वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्यात खुप बदल होतात. नैराश्य, आत्महत्येचे विचार, स्क्रिनोफेनिया,

व्यसनाधिनता, मनोविकार या समस्या निर्माण होतात.

भारतात स्त्रियांचे आरोग्य आणि शिक्षण हे अत्यंत गंभीर विषय आहेत तसेच स्त्रीच्या गरजा आणि आरोग्य ह्या दोन्ही गोष्टी प्राधान्य क्रमात सर्वात शेवटीच असतात. महिलांची मानसिकताच ठेविले अनंत तैसेची राहावे अशा स्वरुपाची आहे. आरोग्याबद्दलची अनास्था, ताण तणावाचे स्वरुप, परिस्थितीचा मुकाट्याने स्विकार स्वतःकडे बघण्याचा दृष्टीकोन, वैद्यकिय तपासणीची भीती किंवा संकोच यामुळे स्त्रियांच्या आरोग्यावर परिणाम होतो आहे.

**मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे घटक :**

(१) **कौटुंबिक जबाबदाऱ्या :** एकाच वेळी अनेक जबाबदाऱ्या, कामाचा ताण, अपेक्षांचे ओझे.

(२) **सामाजिक जबाबदाऱ्या :** लोकांच्या वाढलेल्या अपेक्षा, पुरुषप्रधान संस्कृती, भूमिकांचे दडपण.

(३) **आर्थिक ताण :** आर्थिक सुरक्षितता आणि व्यवस्थापन, कष्टाच्या तुलनेत कमी मिळकत.

(४) **नातेसंबंधातील बदल :** कौटुंबिक आणि वैयक्तिक संबंधातील समस्या, भावना व्यक्त करण्याची पध्दत.

(५) **मानसिक बदल :** चिडचिड, अपराधीपणाची भावना, नैराश्य, आत्मविश्वास कमी, डिप्रेशन.

(६) **हिंसाचार :** महिलांवर वेगवेगळ्या पध्दतीने होणारे हिंसाचार, लैंगिक छळ, घरगुती हिंसाचार.

(७) **निर्णय स्वातंत्र्य :** संवादाची कमतरता, निर्णय स्वातंत्र्याचा संकोच कौटुंबिक पार्श्वभूमी.

(८) **संस्कृती :** संस्कृती आणि समाजाने ठरवून दिलेला स्त्रियांचा ढाचा.

(९) **संप्रेरकातील बदल :** वेगवेगळ्या अवस्थांमधील संप्रेरकाचे बदल. या सर्व बदलांचे प्रत्यक्ष. अप्रत्यक्ष परिणाम शरीरावर व मनावर होत असतात. शारीरिक बदलामुळे वेगवेगळे आजार जसे मधुमेह, हृदयविकार, अतिरक्तदाब, वाढलेले कोलेस्ट्रॉल होतात. त्याचमुळे शारीरीक समस्यांबरोबरच मानसिक समस्या वाढीस लागतात. चिंता, नैराश्य, थकवा येणे, स्मरणशक्ती कमी होणे, आत्मविश्वास कमी होणे, चिडचिड, न्यूनत्वाची भावना, अनाठायी राग

आणि संताप यासारख्या समस्या निर्माण होतात.

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात मानसिक आरोग्याची विशेष दखल घेतल्या गेली. ९ ते १५ ऑक्टोबर हा जागतिक मानसिक आरोग्य सप्ताह साजरा केल्या जातो. व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचा विचार करतांना केवळ शरीर सुडौल असून चालत नाही तर व्यक्तिचे मानसिक आरोग्य चांगले असणे गरजेचे आहे. कारण शारीरिक आरोग्य आणि मानसिक आरोग्य हे परस्परावलंबी आहेत. लायब्रेट हा भारतातील पहिला व सर्वात मोठा ऑनलाईन हेल्थकेअर कम्युनिकेशन प्लॅटफॉर्म आहे. यात देशात लैंगिक, मानसिक, जीवनशैलीशी संबंधित महिलांचे आरोग्य, आहार आणि पोषण, त्वचाविषयक आणि बाल आरोग्य या सात समस्यांवर सर्वेक्षण केले जाते. ४ डिसेंबर २०२१ च्या ५ कोटी रुग्णच्या आरोग्य सर्वेक्षणात ४१% महिला मध्ये मानसिक विकाराचे व २५% महिलांमध्ये आरोग्यविषयक समस्या आहेत. पण आता महिला मानसिक तक्रारी, आरोग्य याबाबत अधिक मोकळेपणानी बोलू लागल्या आहेत. पण आजार लपविण्याची प्रवृत्ती कमी झालेली नाही असे सर्वेक्षणात सांगितले आहे यावरुन मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी काही उपाययोजना -

(१) सकारात्मक आणि आशावादी असणे आवश्यक आहे.

(२) नियमित पौष्टीक आहार : ताजी फळे, प्रथिनेयुक्त, ओमेगा ३ फॅटी सिडस, हिरव्या पालेभाज्या आहार घेणे आवश्यक.

(३) शारीरीक व्यायाम : योगासने, चालणे व व्यायाम करणे आवश्यक आहे. जेणे करुन मन शांत राहिल. दिर्घश्वसन आवश्यक.

(४) छंद जोपासणे : ताण-तणावाचे व्यवस्थापन करतांना महिलांनी छंद जोपासण्यास त्यांचा ताण कमी होईल. बागकाम, पेंटींग वाचन, कोणताही छंद जोपासणे आवश्यक आहे.

(५) पुरेशी झोप : मनस्वास्थासाठी दिवसातील ७ ते ८ तास झोप आवश्यक आहे.

(६) संवाद साधा : भावना व्यक्त करा. संवाद साधा. यामुळेच अर्ध्या समस्या कमी होतील. मन मोकळा संवाद करा.

(७) मुडस्विंग टाकण्यासाठी एकाच वेळी अनेक जबाबदाऱ्या मल्टीटास्कींग करु नका. शरीराला व मनाला खुप ताण देऊ नका.

(८) व्यावसायिक मदत : गरज असल्यास मानसोपचार तज्ञांचा सल्ला घ्या. अजिबात लाजू नका. कमीपणा वाटू देऊ नका.

(९) स्वतःकडे लक्ष द्या. स्व संवाद आवश्यक आहे.

(१०) कुटूंबाकडून सहकार्य आणि प्रेमाची वागणूक आवश्यक आहे. काम करण्यासाठी सहकाऱ्याची आधार टीम तयार करावी.

(११)आरोग्य विषयक जागृकता : विविध तपासण्या वेळोवेळी कराव्यात. औषधे व्यवस्थित घ्यावीत. आहार, औषध आणि व्यायाम या त्रिसुत्रीचा कटाक्षाने वापर करावा.

(१२)एकाच वेळी खुप न खाता थोडे-थोडे खावे. रात्री लवकर जेवावे. दिवसभराचे एक ठराविक वेळापत्रक पाळावे. जेणेकरुन शरीर आणि मन आनंदी राहील.

**चांगल्या मानसिक आरोग्याची लक्षणे :**

१) शांत मन आणि संतुलित विचार, २) सकारात्मक दृष्टीकोन,

३) आत्मविश्वास, ४) चांगले कौटुंबिक संबंध

५) समस्यांना तोंड देण्याची क्षमता, ६) सामाजिक संबंध चांगले

(७) नेहमी आनंदी आणि उत्साही

महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. कारण कुटूंबाचा आधार तसेच समाजाचा सशस्त पाया स्त्रियाच आहेत. स्त्रियांनी आरोग्याबाबत, समस्यांबाबत मोकळेपणांनी बोलणे आवश्यक आहे. मानसिक आणि शारीरिक आरोग्य चांगले राखण्यासाठी मोकळा संवाद व मदत घेण्याची तयारी हे सशक्त आनंदी जीवनासाठी महत्त्वाचे पाऊल आहे.

**संदर्भसुची :**

१. फरकाडे, त्रिवेणी भोंगे, सुलभा. विवाह आणि कौटुंबिक संबध.

२. शेंबेकर,चैतन्य. कहाणी स्त्री जन्माची.

३. खानविलकर, वैजयंती. मुग्धमधुर.

४. सरदेसाई, ह. वि.  भावे, सरिता. मानसिक ताण.

५. दिव्य मराठी पेपर (मधुरिमा विशेष) : ५ सप्टेंबर २०२५.

६. महिला आणि मानसिक आरोग्य : मानसिक आरोग्य संस्था.

■■■




डॉ. व्ही. एम. पेशवे

सामाजिक संशोधन संस्था, यवतमाळ


## ग्रंथनिर्मिती

- यवतमाळ जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास
- ग्राहक संरक्षण कायदा
- अमेरिकन सुप्रीम कोर्ट
- सीमोत्तर दहशतवाद व मानवाधिकार हक्कावरील उपाय–आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालय
- आंतरराष्ट्रीय कायदा भाग–१
- आंतरराष्ट्रीय कायदा भाग–२
- मानवाधिकार अर्थ व व्याप्ती
- आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अधिकारांची अंमलबजावणी (मुळ लेखक – डॉ. मनोजकुमार सिन्हा, अनुवाद – डॉ. व्ही. एम. पेशवे)


AVISHA

अविशा प्रकाशन

ISBN : 978-93-49360-05-1